# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूर शिक्षण केंद्र

सत्र–१ पेपर क्रमांक SOC 02

# भारतीय समाजाची ओळख

**(Understanding Indian Society)**

सत्र–२ पेपर क्रमांक SOC 04

# भारतीय समाजविषयीचा दृष्टीकोन

**(Prespectives on Indian Society)**

**एम. ए. भाग–१ : समाजशास्त्र**

(शैक्षणिक वर्ष २०१८–१९ पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०१४
**द्वितीय आवृत्ती :** २०१५
**तृतीय आवृत्ती :** २०१७
सुधारित चौथी आवृत्ती : २०१८
एम. ए. भाग १ (सत्र १ व २) करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :** १,०००

■

**प्रकाशक**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

**मुद्रक**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

ISBN- 978-81-8486-545-5

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ महाराष्ट्र (भारत)

★ दूर शिक्षण विभाग-विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या विकसन अनुदानातून या साहित्याची निर्मिती केली आहे.

# दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## सल्लागार समिती


**प्रा. (डॉ.) डी. बी. शिंदे**
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ए. एम. गुरव**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) भारती पाटील**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. डी. राऊत**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. एम. ए. काकडे**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. ए. अनुसे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


## समाजशास्त्र समन्वय समिती


अध्यक्ष - **प्रा. (डॉ.) जगन कराडे,**
विभागप्रमुख, समाजशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. शैलजा माने**
  लालबहादूर शास्त्री महाविद्यालय,
  सातारा

- **डॉ. उषा पाटील**
  महावीर महाविद्यालय,
  कोल्हापूर

दूर शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**भारतीय समाजाची ओळख**
**भारतीय समाजविषयीचा दृष्टीकोन**
**एम. ए. भाग–१ : समाजशास्त्र**

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | सत्र–१ घटक क्रमांक | सत्र–२ घटक क्रमांक |
|---|---|---|
| **श्री. चंद्रकांत रघुनाथ खंडागळे**<br>श्रीमती कस्तुरबाई वालचंद महाविद्यालय, सांगली | १ | – |
| **डॉ. अरुण विठ्ठल पौडमल**<br>यशवंतराव चव्हाण (के.एम.सी.) कॉलेज, कोल्हापूर | १, ४ | – |
| **डॉ. महेंद्रकुमार आनंदराव जाधव**<br>नाईट कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड कॉमर्स, कोल्हापूर | २ | |
| **श्री. पी. ए. घोंगडे**<br>यशवंतराव चव्हाण कॉलेज, हलकर्णी, जि. कोल्हापूर | ३ | – |
| **प्रा. पी. एस. साळुंखे**<br>के. बी. पी. कॉलेज, इस्लामपूर, जि. सांगली | ४ | १ |
| **डॉ. बालाजी केंद्रे**<br>मुंबई विद्यापीठ, मुंबई | – | २, ४ |
| **डॉ. सतिश देसाई**<br>पी. डी. व्ही. पी. कॉलेज, तासगांव, जि. सांगली | – | २ |
| **श्री. जे. सी. घाडगे**<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज, पेठवडगांव,<br>ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | – | ३ |

■ **संपादक** ■

**प्रा. डॉ. अरुण विठ्ठल पौडमल**
असिस्टंट प्रोफेसर,
समाजशास्त्र विभागप्रमुख,
कोल्हापूर महानगरपालिकेचे यशवंतराव चव्हाण (के.एम.सी.) कॉलेज, कोल्हापूर

# प्रस्तावना

सर्वप्रथम ज्या विद्यार्थ्यांनी पदवी अभ्यासक्रम पूर्ण करून पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी 'समाजशास्त्र' (Entire Sociology) विषयाची निवड केली अशा विद्यार्थ्यांचे मी आवश्यक Paper No. (SOC-002) 'भारतीय समाजाची ओळख'(Understanding Indian Society) आणि Paper No. (SOC-004) 'भारतीय समाजाविषयीचा दृष्टीकोन'(Perspectives on Indian Society) चा प्रमुख संपादक म्हणून हार्दिक स्वागत करतो.

पदव्युत्तर अभ्यासक्रमाचा कालावधी दोन वर्षाचा असून त्यासाठी एकूण सेमिस्टरवाईज सोळा पेपर्स आहेत. पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षासाठी एकूण आठ पेपर्स असून त्यापैकी चार आवश्यक (Compulsory) आणि चार ऐच्छिक (Elective) पेपर्स आहेत. चार आवश्यक पेपर्सपैकी पेपर क्र. SOC-002 'भारतीय समाजाची ओळख' आणि SOC-004 'भारतीय समाजाविषयीचा दृष्टीकोन' या दोन्ही पेपर्स अंतर्गत एकूण आठ घटकांचा अभ्यास विद्यार्थ्यांना करावा लागणार आहे.

भारतीय समाजाची ओळख आणि भारतीय समाजाविषयीचा दृष्टीकोन या पेपर्सचा संपादक (Editor) या नात्याने सदर पेपरची पुस्तिका तयार करण्यासाठी ज्या-ज्या लेखकांनी, सहलेखकांनी मोलाचे योगदान केले अशा सर्वांचे मी सुरुवातीलाच आभार मानतो.

प्रमुख संपादक या नात्याने मी सर्वप्रथम मा. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, दूर शिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. ए. एम. अनुसे, शिवाजी विद्यापीठ समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. जगन कराडे, समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे सर्व सदस्य, समाजशास्त्र विद्याशाखेशी संबंधित सर्व प्राध्यापक आणि दूर शिक्षण केंद्रातील सर्व प्रशासकीय सेवकांचे मोलाचे सहकार्य मिळाल्यामुळेच मला संपादकीय जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडणे शक्य झाले. या सर्वांचा मी शतशः ऋणी आहे.

संपादक,
**प्रा. डॉ. अरुण पौडमल**
समाजशास्त्र विभागप्रमुख,
कोल्हापूर महानगरपालिकेचे
यशवंतराव चव्हाण (के.एम.सी.) कॉलेज,
कोल्हापूर

## दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


■ **समाजशास्त्र अभ्यासमंडळ** ■

प्रभारी अध्यक्ष **- डॉ. मच्छिंद्र सकटे**

सौ. मंगलाताई रामचंद्र जगताप कॉलेज, उंब्रज, जि. सातारा

- **डॉ. अरुण विठ्ठल पौडमल**
  यशवंतराव चव्हाण कॉलेज (के.एम.सी.)
  कोल्हापूर
- **डॉ. मच्छिंद्र ज्ञानू सकटे**
  सौ. मंगलाताई रामचंद्र जगताप महाविद्यालय,
  उंब्रज, जि. सातारा.
- **प्रा. डॉ. जे. एच. कराडे**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती प्रतिमा शिवाजीराव पवार**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. संजय हिंदुराव शिंदे (सनदे)**
  सरदार बाबासाहेब माने कॉलेज,
  रहिमतपूर, जि. सातारा
- **डॉ. रमेश हिंदुराव पाटील**
  श्रीमती के.आर.पी. कन्या महाविद्यालय,
  उरुण-इस्लामपूर, जि. सांगली.
- **डॉ. सतीश सर्जेराव देसाई**
  एस. एम. डॉ. बापूजी साळुंखे कॉलेज,
  मिरज, जि. सांगली

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | सत्र–१ : भारतीय समाजाची ओळख | |
| १. | भारतीय समाजाचे ऐतिहासिक परिदृश्य | १ |
| २. | भारतातील विविधता आणि एकता | ३४ |
| ३. | भारतीय समाजाचे विभाग आणि त्यांची बदलती वैशिष्ट्ये | ५३ |
| ४. | भारतीय समाज : परिवर्तनाच्या प्रमुख प्रक्रिया | ७९ |
| | सत्र–२ : भारतीय समााजविषयीचा दृष्टीकोन | |
| १. | भारतीय समाजशास्त्राचा आणि सामाजिक मानवशास्त्राचा विकास | ९९ |
| २. | भारतीय समााजविषयीचा दृष्टीकोन | १०८ |
| ३. | मार्क्सवादी दृष्टीकोन | १३९ |
| ४. | सभ्यतात्मक आणि लोकउठाव दृष्टीकोन | १५५ |

■ **विद्यार्थ्यांना सूचना**

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

---

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१७-१८ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

## सत्र १ : घटक १

# भारतीय समाजाचे ऐतिहासिक परिदृश्य

## (Historical Mooring of Indian Society)

**घटक संरचना**

१.१ प्रस्तावना (Introduction)

१.२ उद्दिष्टे (Objectives)

१.३ विषय विवेचन (Presentation of Subject Matter)

  १.३.१ पारंपरिक सामाजिक संघटन : बौद्ध जैन आणि शीख

  (Traditional Social Organisation : Buddhist, Jain and Sikh)

  १.३.२ इस्लाम आणि वसाहतवादी राजवटीचा प्रभाव

  (Impact of Islam and Colonial Rule)

  १.३.३ भारतीय जातीव्यवस्थेची वैशिष्ट्ये आणि उत्पत्ती

  (Origin and Features of Caste System in India)

१.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न (Check Your Progress)

१.५ सारांश (Abstract)

१.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे (Answers to Check Your Progress)

१.७ सरावासाठीचे प्रश्न/गृहपाठ (Exercise/Home Asignment)

१.८ चिंतन आणि कार्य (Reflection and Action)

१.९ अधिक वाचनासाठी पुस्तके (Suggested Readings)

### **१.१ प्रस्तावना** (Introduction) :

या घटकात तुम्ही भारतीय समाजाचे आकलन करून घेणार आहात. कोणत्याही समाजाचे यथार्थ आकलन होण्यासाठी त्या समाजाची जडणघडण कशी झाली, त्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी काय आहे हे समजने गरजेचे ठरते. म्हणून या घटकात आपण प्रथम पारंपरिक सामाजिक संघटन यामध्ये बौद्ध समुदाय, जैन समुदाय, आणि शीख समुदाय समजावून घेणार आहोत आणि इस्लाम आणि वसाहतवादी राजवटीचा प्रभाव व भारतीय जातीव्यवस्थेची वैशिष्ट्ये आणि उत्पत्ती समजून घेण्यास मदत होईल.

## १.२ उद्दिष्टे (Objectives) :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर तुम्हास :

- पारंपरिक सामाजिक संघटनामध्ये बौद्ध समुदाय, जैन समुदाय, शीख समुदाय समजावून घेता येईल.
- इस्लाम आणि वसाहतवादी राजवटीचा प्रभाव स्पष्ट करता येईल.
- भारतीय जातीव्यवस्थेची वैशिष्ट्ये आणि उत्पत्ती सांगता येतील.

## १.३ विषय विवेचन (Presentation of Subject Matter)

या पहिल्या घटकात आपण भारतीय समाजाची पार्श्वभूमी किंवा जडणघडण किंवा परिदृश्य समजावून घेणार आहोत. त्यासाठी सर्वप्रथम पारंपरिक सामाजिक संघटनामध्ये भारतीय समाजावर बौद्ध समुदाय, जैन समुदाय आणि शीख समुदाय आणि पाश्चिमात्त्य संस्कृती यांचा काय प्रभाव पडला आहे हे समजावून घेणार आहोत. सदर विषयाच्या विवेचनासाठी ह्या घटकाचे तीन विभाग पडलेले आहेत. पहिल्या विभागात पारंपरिक सामाजिक संघटन (बौद्ध समुदाय, जैन समुदाय, शीख समुदाय) कसे आहे ते स्पष्ट केलेले आहे. दुसऱ्या विभागात इस्लाम आणि वसाहतवादी राजवटीचा प्रभाव विशद केले जाईल आणि तिसऱ्या विभागात भारतीय जातीव्यवस्थेची वैशिष्ट्ये आणि उत्पत्ती याचे विवेचन केले जाईल.

### १.३.१ पारंपरिक सामाजिक संघटन (बौद्ध समुदाय, जैन समुदाय, शीख समुदाय) :

पारंपरिक सामाजिक संघटन समजून घेण्यासाठी बौद्ध समुदाय, जैन समुदाय आणि शीख समुदायाची सविस्तर चर्चा पुढीलप्रमाणे आपण समजावून घेवूया.

**बौद्ध समुदाय :**

बौद्ध धर्म हा भारतात प्राचीन काळातच उदयास आलेला धर्म असून त्याचाही भारतीय समाजावर मोठा प्रभाव पडलेला आहे. एवढेच नव्हे तर हा धर्म उदारमतवादी असल्याने तो भारताबाहेरही प्रसारित होऊन जगातील पहिला 'विश्वधर्म' बनला व आंतरराष्ट्रीय स्तरावर त्याने आपला ठसा उमटविला. भारतीय समाजाच्या जडणघडणीत बौद्ध धर्माचे लक्षणीय योगदान असल्याने भारतीय समाजाचे आकलन करून घेताना बौद्ध धर्माचा वा बौद्ध समुदायाचा अभ्यास आवश्यक ठरतो.

**बौद्धांचे लोकसंख्याशास्त्र :**

२०११ च्या जनगणनेनुसार भारतात बौध्दांची लोकसंख्या ८४.४३ लाख इतकी असून भारतीय लोकसंख्येत त्याचे प्रमाण सुमारे ०.७० इतके आहे. आज लडाख, सिक्कीम, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, अरुणाचल प्रदेश, पश्चिम बंगालमधील दार्जिलिंग जिल्ह्यात व दक्षिण भारतातील कांही भागात बौद्ध धर्माचे अनुयायी आढळतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात अस्पृश्य जातींनी, विशेषतः महार जातीने, बौद्ध धर्माचा स्वीकार केला (१४ ऑक्टोबर १९४६) त्यामुळे महाराष्ट्रात बौद्ध धर्मियांची संख्या लक्षणीय प्रमाणात वाढली. आज इतरही कनिष्ठ जाती व जमाती बौद्ध धर्म स्वीकारू लागल्याने बौद्धांची संख्या हळूहळू वाढत आहे. हिंदू धर्माचा त्याग करून बौद्ध धर्म स्वीकारलेल्यांना नवबौद्ध असे म्हणतात.

**बौद्ध धर्मश्रद्धा व तत्त्वज्ञान :**

तथागत गौतम बुद्ध (इ.स. पूर्व ५६३ ते ४८३) यांनी बौद्ध धर्माची स्थापना केली. बौद्ध धर्म हा वैशिष्ट्यपूर्ण असा धर्म आहे. कारण हा धर्म निरिश्वरवादी व अनात्मवादी आहे. कारण हा धर्म निरिश्वरवादी व अनात्मवादी आहे. म्हणजे तो ईश्वर व आत्मा यांचे अस्तित्व मानीत नाही. तथापि, कर्मसिद्धांत, पुनर्जन्म व मोक्ष (निर्वाण) या कल्पना मात्र मानतो. परंतु त्याची पुनर्जन्म व मोक्षाची कल्पना हिंदुधर्माहून वेगळी अशी आहे. गौतम बुद्धानी सांगितलेल्या अ) जीवन दुःखमय आहे, ब) तृष्णा हे दुःखाचे कारण आहे, क) दुःखाचा विनाश करता येतो. ड) अष्टांगमार्ग हा दुःख निवारण्याचा मार्ग आहे. या चार आर्यसत्यावर (महान सत्ये) हा धर्म श्रद्धा ठेवतो. अतृप्त तृष्णेमुळे म्हणजेच अविद्येमुळे मनुष्य कर्मबंधात अडकतो व दुःख भोगतो. या कर्मबंधातून व दुःखातून मुक्त होणे म्हणजेच मोक्षप्राप्ती (निर्वाणप्राप्ती) असे हा धर्म मानतो. गौतम बुद्धाच्या मते मोक्ष म्हणजेच निर्वाण ही दुःखविरहीत परमानंदाची स्थिती आहे. जन्म, जरा, मृत्यू व आयुष्यात येणारी दुःखे यापासून मुक्तता म्हणजे निर्वाण असाही अर्थ होतो.

बौद्ध धर्माचे तत्त्वज्ञान हटवादी, मध्यममार्गी व नैतिकतेवर भर देणारे आहे. हा धर्म पारलौकिक जग, स्वर्ग व नरक या कल्पना नाकारतो व केवळ लौकिक जगाचाच स्वीकार करतो. त्यामुळे तो हटवादी ठरतो. तसेच तो देहाला आत्यंतिक कष्ट देणे हे एक टोक व देहाचे फाजील लाड करणे हे दुसरे टोक ही दोन्ही टोके टाळून मधल्या मार्गाने म्हणजे संयमाने जीवन जगावे असे सांगतो म्हणून तो मध्यममार्गी ठरतो. तसेच हा धर्म प्रज्ञा, शील, करूणा, मानवता, समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, बुद्धीप्रामाण्यवाद या तत्त्वांना प्रमाण मानतो. त्यामुळे या धर्माचे तत्त्वज्ञान नैतिक ठरते.

**बौद्ध धर्मातील धर्माचरण व धार्मिक विधी :**

जैन धर्माप्रमाणेच बौद्ध धर्मही अहिंसावादी आहे. तथापि, जैन धर्माच्या तुलनेत बौद्ध धर्मातील अहिंसा ही आत्यंतिक (कठोर) स्वरूपाची नाही. बौद्ध धर्म हा वेदप्रामाण्य, यज्ञविधी, वर्णव्यवस्था, स्त्रीपुरूष भेद, ब्राह्मणांचे श्रेष्ठत्व व वर्चस्व इत्यादींना विरोध करतो व सामाजिक समतेचा पुरस्कार करतो. निर्वाणप्राप्तीसाठी हा धर्म १) सम्यक्दृष्टी, २) सम्यक् संकल्प, ३) सम्यक् वाचा, ४) सम्यक् उपजीविका, ५) सम्यक् कर्म, ६) सम्यक् व्यायाम, ७) सम्यक् स्मृती, ८) सम्यक् समाधी या अष्टांगमार्गाचा अवलंब करणे हे धर्माचरण मानतो. तसेच १) अहिंसा, २) सत्य, ३) अस्तेय, ४) इंद्रिय संयम, ५) मादकद्रव्यांचे सेवन न करणे या पाच नियमांचे म्हणजेच पंचशीलाचे पालन करणे हे ही धर्माचरण मानतो. हा धर्म देवदेवतांची मूर्तिपूजा, यज्ञविधी व इतर कर्मकांड नाकारतो. बौद्ध विहारात (प्रार्थना स्थळ) जाऊन बुद्ध वंदना करणे हा प्रमुख धार्मिक विधी मानला जातो. बुद्धाला, धम्माला व संघाला शरण जाणे ही या धर्मातील मध्यवर्ती कल्पना आहे. बुद्धाचे जन्मगांव लुंबिनी (नेपाळ), बुद्धाला दिव्य ज्ञान प्राप्त झाले ते गया (बिहार), दिव्यज्ञान प्राप्तीनंतर बुद्धाने पहिले प्रवचन दिले ते सारनाथ (उत्तर प्रदेश) तसेच सांची (मध्यप्रदेश) राजगीर (बिहार) ही बौद्धांची तीर्थक्षेत्रे असून त्यांना भेटी देणे हेही धर्माचरण मानले जाते.

**बौद्धांचे सामाजिक जीवन :**

वैदिक काळातील बहुदेवतावाद, यज्ञसंस्थेचे अवडंबर, ब्राह्मणांचे वर्चस्व, वर्णव्यवस्थेमुळे निर्माण झालेली विषमता, इत्यादीमुळे विकृत बनलेल्या धार्मिक व सामाजिक जीवनात सुधारणा करण्यासाठी गौतम बुद्धानी नवीन धर्म स्थापन केला. बुद्धाचे त्यागमय जीवन व नैतिक शिकवण याकडे आकर्षित होऊन विभिन्न वर्णाच्या, जातीच्या लोकांनी बौद्ध धर्म स्वीकारला. अनेक राजांनीही या धर्मास आश्रय दिला. परिणामी हा

धर्म झपाट्याने भारतात व भारताबाहेर पसरला. पुढे मात्र या धर्माची लोकप्रियता घटत गेली व या धर्माचे अनुयायी उत्तरेकडील लडाख, तिबेट, सिक्किम, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, दार्जिलिंग या भागात व दक्षिणेकडील कांही भागात अल्पसंख्यांक समूह बनून राहिले. बहुसंख्यांक हिंदुंनी बौद्ध लोक वेढलेले असल्याने त्यांच्या सामाजिक जीवनावर हिंदुंचा प्रभाव टिकून राहिला. बुद्धाने स्वतः वैराग्यवृत्ती अंगिकारली असली तरी त्यांनी वैवाहिक व कौटुंबिक जीवनाकडे नकारात्मक दृष्टिने पाहिले नाही. समाज संघटन व सातत्य टिकून राहण्यासाठी व्यक्तींनी नीतिमान व लोकोपयोगी असे वैवाहिक व कौटुंबिक जीवन जगण्याची शिकवण बुद्धाने दिली. त्यानुसार बौद्ध लोक जीवन जगतात. तथापि, परंपरेने आलेल्या हिंदुंच्या सामाजिक जीवनाचा प्रभाव पूर्णतः झुगारून देणे त्यांना शक्य झाले नाही. त्यामुळे तपशिलातील कांही किरकोळ फरक वगळता बौद्धांचे सामाजिक जीवन बहुसंख्यांक हिंदुपेक्षा फारसे भिन्न नाही. बौद्ध लोक ब्राह्मणाऐवजी बौद्ध भिख्खूकडून विवाह विधी करवून घेतात. विवाहसमयी पंचशिल अनुसरण्याची, परस्परांशी एकनिष्ठ राहण्याची व परस्परांचा सन्मान करण्याची शपथ वधुवरांना दिली जाते. तसेच बुद्धाच्या प्रतिमेची पूजा केली जाते. अलिकडील नवबौद्ध हे डॉ. आंबेडकरांच्या प्रतिमेचीही पूजा करतात शिवाय त्यांनी दिलेल्या २२ प्रतिज्ञांचे वधुवरास स्मरण करून देतात. बौद्धांचे कुटुंब संघटनही इतरांप्रमाणेच आहे. ते विविध प्रकारचे व्यवसाय करतात. नवबौद्धांना शासकीय सेवेत आरक्षण असल्याने त्यांचा ओढा शासकीय नोकऱ्यांकडे असल्याचे दिसते. बौद्ध लोक गर्भमंगल, नामकरण, अन्नग्रहण, केशकर्तन, कान टोचणे, विवाह, अंत्येष्टी इ. संस्कार पाळतात. तसेच बुद्ध जयंती, नागपंचमी, विजया दशमी, वसंत पंचमी इ. सण साजरे करतात. या धर्मात तात्त्विक भेदावर आधारलेले हिनयान व महायान हे दोन पंथ आहेत. हिनयान पंथ निरिश्वरवादास चिकटून असून व्यक्तीने स्वतःच्या निर्वाणप्राप्तीसाठी झटावे असे मानतो. याउलट महायान पंथात बुद्धालाच देवत्त्व प्राप्त झाले असून व्यक्तीने सर्वांच्याच निर्वाणप्राप्तीसाठी झटावे असे हा पंथ सांगतो. हिंदुप्रमाणे बौद्धांत वर्णव्यवस्था वा जातिव्यवस्था नाही. तथापि बौद्ध समुदायात दोन स्तर पडलेले दिसतात. वरच्या स्तरात पूर्वाश्रमीच्या ब्राह्मण, क्षत्रिय व गृहपतींच्या कांही गटांचा समावेश होतो तर खालच्या स्तरात आदिवासी व इतर सीमांत समुहांचा समावेश होतो. पूर्वाश्रमीचे अस्पृश्य नवबौद्ध झाले खरे, तथापि, त्यांच्या सामाजिक दर्जात अपेक्षित सुधारणा झालेली दिसत नाही. उच्चवर्णीय हिंदू अद्यापही त्यांना कनिष्ठच लेखतात.

### जैन समुदाय :

आता आपण जैन समुदायाचा अभ्यास करणार आहोत. जैन धर्मही भारतात उदयास आलेला एक प्राचीन धर्म आहे. भारताच्या सामाजिक-सांस्कृतिक इतिहासात जैन धर्मास महत्त्व आहे. जैन धर्माचे लोक हे आर्थिकदृष्ट्या संपन्न असून त्यांचा सामाजिक दर्जाही उच्च आहे. भारतातील परंपरागत सामाजिक-सांस्कृतिक जीवनावर जैन धर्माचाही मोठा प्रभाव पडलेला आहे. त्यामुळे हिंदुप्रमाणेच जैन समुदायाच्या अभ्यासास महत्त्व प्राप्त होते.

### जैनांचे लोकसंख्याशास्त्र :

२०११ च्या जनगणनेनुसार भारतातील जैनांची लोकसंख्या ही अवघी ४४,४५,००० असून भारतीय लोकसंख्येत जैनांचे प्रमाण ०.३७ टक्के एवढे अल्प आहे. त्यामुळे जैन समुदाय हा भारतातील अल्पसंख्यांक समुदाय आहे. त्यामुळे जैन समुदाय हा भारतातील अल्पसंख्यांक समुदाय आहे. जैन लोक भारतभर विखुरलेले असले तरी ते प्रामुख्याने गुजरात, राजस्थान, मध्यप्रदेश, महाराष्ट्र व कर्नाटक या राज्यांमध्ये त्यांची संख्या अधिक आहे. ग्रामीण भागापेक्षा शहरात जैनांची लोकसंख्या जास्त दिसून येते.

**जैन धर्मश्रद्धा व तत्त्वज्ञान :**

जैन धर्माचा संस्थापक अज्ञात आहे. या धर्मात २४ तीर्थंकर (धर्माची तत्त्वे प्रकट करून मार्ग दाखविणारे) होऊन गेले असून २४ वे म्हणजे शेवटचे तीर्थंकर वर्धमान महावीर (इ.स.पू. ५९९ ते ५२७) हे आहेत. महावीरांच्यापूर्वी सुमारे २५० वर्षे अगोदर पार्श्वनाथ हे २३ वे तीर्थंकर होऊन गेले. या हिशेबाने पहिले तीर्थंकर ऋषभदेव (किंवा वृषभदेव) हे फारच प्राचीन काळात होऊन गेले असणार. ते ही केवळ तीर्थंकर होते, संस्थापक नव्हे. यावरून जैन धर्माची प्राचीनता लक्षात येते. तथापि, कांही विद्वान हे ऋषभदेवांना संस्थापक मानतात. काम, क्रोध, मोह, माया, मत्सर इत्यादी इंद्रियविकारावर विजय मिळविणाऱ्या व्यक्तिस 'जिन' म्हणतात. यावरून 'जिन' पदास पोहचलेल्या व्यक्तिंच्या उपदेशाचे सार ज्यामध्ये आहे त्यास जैनधर्म असे म्हणतात.

पुद्‌गल (परमाणू) या अजीव द्रव्यापासून सृष्टी निर्माण झाली असे जैन धर्म मानतो. त्यामुळे हा धर्म सृष्टीकर्ता (सृष्टीचा निर्मता) म्हणून ईश्वराचे अस्तित्व नाकारतो. तथापि, जैन लोक ध्यान व मुक्तीसाठी अनेक देवदेवतांचे अस्तित्व मान्य करतात व त्यांची पूजाअर्चा करतात. शिवाय हा धर्म आत्म्याचे अस्तित्व, कर्म व पुनर्जन्म सिद्धांत व मोक्ष कल्पना यावर श्रद्धा ठेवतो. मोक्षप्राप्तीसाठी सम्यक दर्शन, सम्यक ज्ञान व सम्यक चारित्र्य या रत्नत्रय सिद्धांताचा जैन धर्म पुरस्कार करतो. विरक्त वृत्ती व सदाचार याद्वारे मोक्ष मिळतो असे महावीरांचे तत्त्वज्ञान आहे. जैन धर्माचे तत्त्वज्ञान हे अनेकांतवादी असून स्याद्‌वाद व नयवाद हे दोन सिद्धांत भारतीय तत्त्वज्ञानात महत्त्वाचे मानतात. जैन तत्त्वज्ञानात अहिंसा तत्त्वास केंद्रीय स्थान आहे. हा धर्म वैदिक परंपरेतील वर्णभेद, जातीभेद, लिंगभेद, नाकारतो व सामाजिक समतेचा पुरस्कार करतो.

**जैन धर्मातील धर्माचरण व धार्मिक विधी :**

जैन धर्म हा श्रमणपरंपरावादी आहे. त्यामुळे देहाचे लाड न करता त्यास कष्ट देऊन, तपश्चर्या करून व विरक्त जीवन जगून मोक्ष मिळविणे आणि आत्मशुद्धी व चारित्र्य संवर्धन करण्यासाठी अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह या पाच व्रतांचे (नैतिक नियमांचे) पालन करणे यास जैन लोक धर्माचरण मानतात. मुनी किंवा साधुनी हे नियम अत्यंत कडक स्वरूपात तर श्रावकांनी (सामान्य लोकांनी) कांहीसे शिथील स्वरूपात पाळावेत अशी अपेक्षा आहे. उदा. अहिंसेचे पालन व्हावे म्हणून मुनींनी नाकावर कापडी पट्टी बांधावी ज्यामुळे हवेतील जंतुची ही हत्या नाकाद्वारे होऊ नये. श्रावकांनी नेहमी रूळलेल्या वाटेवरून चालावे म्हणजे पायाखाली किडामुंगीही चिरडली जाणार नाही. अपरिग्रहाचे पालन म्हणजे मुनींनी भौतीक वस्तूंचा अगदी वस्त्रांचाही त्याग करावा (नग्न रहावे) तर श्रावकांनी गरजेपुरत्याच भौतिक वस्तू बाळगाव्यात. मुनींनी ब्रह्मचर्य पाळावे म्हणजे वासनेवर पूर्णपणे विजय मिळवावा-लैंगिक सुखप्राप्तीपासून अलिप्त रहावे-तर श्रावकांनी ब्रह्मचर्य पाळावे म्हणजे एकपत्नीव्रत पाळावे, स्वैराचारी लैंगिक वर्तन करू नये असे अपेक्षित आहे. महावीरांनी मुनींना श्रेष्ठ स्थान दिले असे त्यांच्या मार्गदर्शनाखालीच श्रावकांनी शिस्तबद्ध व संयमी जीवन जगावे असे सांगितलेले आहे.

जैन लोक अनेक देवदेवतांचे अस्तित्व मानून त्याची पूजाअर्चा करतात, ध्यानधारणा करतात. तीर्थंकर व त्यांचे शिष्य (गणधर), पंचमरमेष्ठी (साधू, उपाध्याय, आचार्य, अर्हत व सिद्ध) यांची उपासना करतात. नागपूजा, स्थापनापूजा, द्रव्यपूजा व भावपूजा असे चार उपासना प्रकार या धर्मात आहेत. हिंदुप्रमाणे जैनांचीही विविध मंदिरे असून त्यामध्ये प्रार्थना, पूजाअर्चा यासारखे विधी केले जातात. मात्र हिंदूधर्मातील यज्ञविधी, त्यामध्ये दिले जाणारे पशुबळी व इतर कर्मकांडाचे स्तोम यास जैन धर्माचा कडवा विरोध आहे.

जैन धर्म वेदग्रंथांना प्रमाण मानीत नाही. 'आगमग्रंथ' हे जैनांचे पवित्र व प्रमाणग्रंथ आहेत. श्वेतांबर पंथाचे आग्रमग्रंथ हे अर्धमागधी भाषेत तर दिगंबरांचे आगमग्रंथ शौरसेनी भाषेत आहेत. कांही ग्रंथ संस्कृत भाषेतही आहे. आगमग्रंथांचे पठन करणे हे ही धर्माचरण मानले जाते.

जैन लोकही तीर्थयात्रा करणे पुण्यकर्म (धर्माचरण) मानतात. गजपंथ, मांगीतुंगी, कुंथलगिरी व बाहुबली (महाराष्ट्र), श्रवणबेळगोळ (कर्नाटक), शिखर सम्मेदजी (झारखंड) इत्यादी दिगंबराची तर माऊंट आबू (राजस्थान), संकेश्वर (कर्नाटक), पालीठाणा (महाराष्ट्र) इ. श्वेतांबराची प्रमुख तीर्थक्षेत्रे आहेत.

**जैनांचे सामाजिक जीवन :**

हिंदुप्रमाणेच जैन धर्मही प्राचीन आहे. मात्र हिंदू लोक बहुसंख्यांक तर जैन लोक अल्पसंख्यांक आहेत. भारतात जैन हे बहुसंख्यांक हिंदुंनी वेढलेले असल्याने जैनांच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनावर हिंदुंची मोठी छाप पडलेली आढळते. अर्थात जैन समुदाय हा एकसंघ नाही. त्यामध्ये श्वेतांबर व दिगंबर असे मुख्य दोन पंथ आहेत. या दोन पंथांच्या तात्त्वीक व सामाजिक जीवनात भेद आढळतो. (अ) साक्षत महावीराची वचने ग्रंथीत आहेत या श्रद्धेने श्वेतांबर जे मूलग्रंथ मानतात ते दिगंबरांना मूलग्रंथ म्हणून मान्य नाहीत (ब) साधुंनी नग्न राहावे असे दिगंबर मानतात तर साधुंनी श्वेत वस्त्रे वापरावीत असे श्वेतांबर मानतात (क) स्त्री जन्मात मोक्षप्राप्ती शक्य नाही व केवल ज्ञानप्राप्ती झालेल्या पुरुषांनी अन्नग्रहण करण्याची गरज नाही, असे दिगंबर मानतात पण या दोन्ही गोष्टी श्वेतांबरांना मान्य नाहीत. अर्थात हे फरक तात्त्विकदृष्ट्या फारसे महत्त्वाचे नाहीत. अनेकांतवाद, अहिंसावाद, रत्नत्रय सिद्धांत, सृष्टीनिर्माता असा ईश्वर नाही, पुद्‌गल द्रव्यापासून सृष्टी निर्माण झाली, तीर्थंकर सर्वज्ञ होते इत्यादी तत्त्वांवर या दोन्ही पंथांचा विश्वास आहे. दिगंबरात वीसपंथी, तेरापंथी, तारणपंथी किंवा समयापंथी, गुमानपंथी, तोतापंथी किंवा खनाजीपंथी इ. उपपंथ आहेत तर श्वेतांबरात पुजेरा किंवा मूर्तिपूजक किंवा मंदिरमार्गी, धुंडिया किंवा स्थानकवासी किंवा साधुमार्गी, तेरापंथी इ. उपपंथ आहेत.

जैन समुदाय हा वाणिज्यवृत्तीचा (व्यापारी वृत्तीचा) आहे. त्यामुळे बहुसंख्य जैन हे व्यापार-उद्योगात अग्रेसर असून त्यांची आर्थिक स्थिती उत्तम आहे. विशेषतः श्वेतांबर पंथीय जैन शहरात वास्तव्यास असून त्यांनी व्यापार-उद्योगात खूपच प्रगती साधलेली आहे. यांच्यामध्ये स्थलांतर प्रवृत्ती असल्याने ते व्यापाराच्या निमित्ताने देशभर विखूरलेले आहेत. जैन अहिंसक असल्याने शेती करीत नाहीत (कारण जमीन कसताना जीवजंतूचा नाश होतो म्हणजेच हिंसा होते) असे मानले जाते. तपापि, महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागातील जैन (विशेषतः दिगंबर पंथीय) हे शेती करताना आढळतात. आज जैन लोक हे व्यापार, कृषी, पशुपालन, व्यवस्थापन, शेअर बाजार, नागरी सेवा, सराफी व्यवसाय इत्यादीत गुंतलेले आढळतात.

हिंदुप्रमाणेच जैनांची विवाहसंस्था व कुटुंबसंस्था आहे. जैन लोक अंतर्विवाहाचे पालन करतात. म्हणजे पंथ, उपपंथ, जात इत्यादीच्या आत राहून विवाहसंबंध जोडतात. श्वेतांबर व दिगंबर पंथीय परस्परांशी विवाह करीत नाहीत. या पंथांतील जाती व उपजातीही परस्परांशी विवाह करीत नाहीत. अलिकडे मात्र आंतरधर्मिय, आंतरजातीय विवाह क्वचित होताना दिसतात. असे विवाह बहुधा प्रेमविवाह असतात. हिंदुप्रमाणेच जैनांत विशेषतः श्रीमंतात विधवाविवाह आढळत नाहीत. मात्र जैनातील कनिष्ठ व गरीब जातीत असा विवाह होताना दिसतो. अनेक जैन हे ब्राह्मणांकडून विवाह मुहूर्त पाहतात व विवाह विधी करून घेतात. हिंदुप्रमाणेच जैनांमध्येही संयुक्त कुटुंब पद्धती रूढ झालेली दिसते. मात्र अलिकडे संयुक्त कुटुंबाचे विघटन सुरू झाले असून नवीन पिढीत विभक्त कुटुंब स्थापण्याची प्रवृत्ती हळूहळू वाढत चालली आहे. शहरातील व्यापारी

कुटुंबे व ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबे ही जमेल तेवढे कुटुंबाचे संयुक्त स्वरूप टिकवून ठेवण्यावर भर देतात. मात्र बदलत्या आर्थिक परिस्थितीनुसार विभक्त कुटुंब स्थापण्यास अनुकूलता दर्शवितात.

जैनांच्या सामाजिक-सांस्कृतिक जीवनांवर हिंदुंचा प्रभाव पडलेला आहे. हिंदुंच्या देवदेवता, सण, समारंभ, संस्कार, या गोष्टी जैनांनी स्वीकारलेल्या आढळतात. हिंदुंच्या दिवाळी, गणेशोत्सव, नवरात्र, होळी यामध्ये जैन सहभागी होतात. गणपती, हनुमान, लक्ष्मी, सरस्वती इत्यादी हिंदू देवदेवतांची प्रतिष्ठापना जैन मंदिरात केलेली दिसते व जैन त्यांची पूजाअर्चा करताना आढळतात. असे असले तरी जैनांनी आपले वेगळेपण टिकवून ठेवलेले आहे.

वर्णव्यवस्था व जातिव्यवस्था यांना कडाडून विरोध करून सामाजिक समतेचा पुरस्कार करणाऱ्या जैन धर्मात हिंदुंच्या संपर्काने जातिव्यवस्था व जातीभेद निर्माण झालेला आहे. दिगंबरात ८७ जाती व उपजाती तर श्वेतांबरात ३८ जाती व उपजाती आढळतात. ओसवाल, पारवाडा, हुंबडा, नरसिंगपूर नामा यासारख्या जाती दोन्ही पंथात आढळतात. याशिवाय कांही व्यावसायिक जातीही (उदा. हातकारां, कोष्टी, साळी, गुरव, कासार इ.) जैनात आढळतात. या जाती व उपजातीत श्रेष्ठ-कनिष्ठतेची भावना आढळते. मात्र ती हिंदुप्रमाणे आत्यंतिक नाही. हिंदुमध्ये कांही कनिष्ठ जातींना जसे अस्पृश्य मानले तसे जैनातील कनिष्ठ जातींना अस्पृश्य मानले जात नाही. परंतू जैन लोक हिंदुतील अस्पृश्य जातींना हिंदुइतकेच तुच्छ लेखताना दिसतात. जैन मंदिरात हिंदुतील अस्पृश्यांना प्रवेश दिला जात नाही.

**शीख समुदाय :**

बौद्ध आणि जैन धर्मियांप्रमाणेच शीख धर्मियांचा समुदाय हा ही भारतातील एक अल्पसंख्यांक समुदाय आहे. शीख धर्म हा देखील भारतातच उदयास आलेला धर्म असून या धर्माचाही भारतीय समाजावर लक्षणीय प्रभाव पडलेला आहे. त्यामुळे भारतीय समाजाचे स्वरूप अभ्यासताना शीख समुदायाचाही अभ्यास करणे आवश्यक ठरते.

**शीखांचे लोकसंख्याशास्त्र :**

२०११ च्या जनगणनेनुसार भारतात शीखांची लोकसंख्या ही सुमारे २,०८,३३,००० इतकी असून भारतीय लोकसंख्येत शीखांचे प्रमाण सुमारे १.७२ टक्के इतके आहे. शीख समुदायाचे लोक हे मुख्यत्वे करून पंजाब व हरियाणा या दोन राज्यात (सुमारे ८० टक्के) वास्तव्यास असून ऊर्वरीत शीख हे दिल्ली, राजस्थान व उत्तर प्रदेश या राज्यांत आहेत. शिवाय भारतातील इतरही राज्यांतील प्रमुख शहरांत शीख लोक अत्यल्प प्रमाणात आहेत. शीख समुदाय हा प्रामुख्याने खत्री, जाट, अरोड, डोग्रा इत्यादी जातींचा जातींचा मिळून बनलेला आहे. पंजाब व हरियाणातील शीख हे प्रामुख्याने शेती व्यवसायात गुंतलेले असून तेथे हरित क्रांती यशस्वी करण्यात शीख शेतकऱ्यांचे मोठे योगदान आहे. परंपरेने शीख लोक हे लढवय्ये वृत्तीचे असल्याने भारतीय लष्करात शीखांचे प्रमाण लक्षणीय स्वरूपात आहे. भारतातील इतर शहरातील बहुसंख्य शीख हे व्यापार करताना आढळतात. शीख समुदायात स्थलांतराची प्रवृत्ती मोठी असून शीख लोक हे जगातील अनेक देशात (विशेषतः इंग्लंड, पूर्व आफ्रिका, मलेशिया, अमेरिका, कॅनडा, इराण, बँकॉक, जपान, ऑस्ट्रेलिया) स्थलांतरीत झालेले आहेत. आणि तेथील उद्योग व्यवसायात त्यांनी नाव कमावलेले आढळते. भारतात वाहतूक व्यवसायातही शीखांची संख्या बरीच आहे.

**शीख धर्मश्रद्धा व तत्त्वज्ञान :**

हिंदू, जैन, बौद्ध, इस्लाम, ख्रिस्ती इत्यादी प्रमुख धर्मातील चांगल्या तत्त्वांचा समन्वय साधून गुरू नानक (१४६९ ते १५३८) शीख धर्माची स्थापना केली. शीख म्हणजे शिष्य असा अर्थ आहे. गुरुमुखी भाषेत शिष्याला 'शिख्ख' असे म्हणतात. शिष्य हा कोणत्यातरी गुरुचा शिष्य असतो. यावरून गुरुच्या उपदेशाप्रमाणे आचरण करतो तो शीख असा अर्थ होतो. शीख धर्मात गुरू-शिष्य परंपरेस महत्त्वाचे स्थान आहे. गुरू नानक ते गुरू गोविंदसिंग असे एकूण १० गुरू व त्यांचे शिष्यगण (अनुयायी) हे सर्वजन म्हणजे शीख असा अर्थ होतो. शीख धर्मात गुरू-शिष्य परंपरेस महत्त्वाचे स्थान आहे. गुरू नानक ते गुरू गोविंदसिंग असे एकूण १० गुरू व त्यांचे शिष्यगण (अनुयायी) हे सर्वजन म्हणजे शीख असा अर्थ घेतला जातो. शीखांच्या प्रमुख श्रद्धा पुढीलप्रमाणे आहेत.

१) शीख धर्म एकेश्वरवादी आहे. ईश्वर हा एकच असून तो सृष्टिकर्ता, सर्वव्यापी, निर्गुण, निराकार, दयाळू व न्यायी आहे अशी या धर्माची श्रद्धा आहे. मात्र ईश्वर अवतार घेत नाही असे हा धर्म मानतो. संपूर्ण विश्व हे ईश्वरमय असल्याने प्रत्येकाने सतत ईश्वराचे स्मरण करावे असे हा धर्म सांगतो. मात्र हा धर्म मूर्तिपूजेस विरोध करतो.

२) शीख धर्म हा कर्मसिद्धांत, आत्मा, पुनर्जन्म आणि मोक्ष या संकल्पनांवरही विश्वास ठेवतो. जीव हे ब्रह्माचे म्हणजे ईश्वराचे सुक्ष्मरूप आहे. कर्मसंस्कार व पापपुण्यात्मक उपाधीमुळे जीव हा जन्ममृत्यूच्या चक्रात सापडतो. हे चक्र थांबवून मोक्ष मिळविणे ही गोष्ट मानवी जन्मातच शक्य आहे. म्हणून प्रत्येकाने ईश्वराचे सतत स्मरण करून ईश्वराशी एकरूप व्हावे असे एकरूप होणे म्हणजेच मोक्ष होय. अशी शीख धर्माची श्रद्धा आहे.

३) शीख धर्म गुरूनिष्ठा हे सर्वोच्च मूल्य मानतो. गुरू हे ज्ञान, विवेक व मोक्ष याचे प्रतीक असून गुरू ईश्वरस्वरूपच आहे अशी या धर्माची श्रद्धा आहे. 'वाहिगुरू' हा शब्द ब्रह्मवाचक मानला जातो.

शीख धर्माचे तत्त्वज्ञान हे मानवतावादी व समतावादी आहे. सर्व मानव एकाच ईश्वराची लेकरे असल्याने ती सर्व समान आहेत. असे हा धर्म मानतो. त्यामुळे वर्णभेद, जातीभेद, लिंगभेद इत्यादीस या धर्मात स्थान नाही. वैदिक परंपरेतील वर्णव्यवस्था व जातिव्यवस्था यांना या धर्माने कडाडून विरोध केला आणि सर्व धर्मातील, वर्णातील व जातीतील व्यक्तिंना शीख धर्मात प्रवेश दिला. सर्वांचा सामाजिक दर्जा हा समान मानला. या धर्माने स्त्री-पुरूष समतेचाही पुरस्कार केला आहे. या धर्मात स्त्रियांना आदराचे स्थान आहे. पडदा पद्धती, हुंडा पद्धती, घटस्फोट या अनिष्ट प्रथांना हा धर्म विरोध करतो. पुरुषांप्रमाणेच स्त्रियांना समान हक्क व संधी देतो. भजन-किर्तन, पूजा-पठण, प्रवचन करणे, विविध धार्मिक विधीत सहभागी होणे इत्यादी हक्क स्त्रियांना या धर्माने दिलेले आहेत. सामाजिक जीवनात व्यक्तीने सदाचाराने व सहिष्णुवृत्तीने वागावे, सर्वांशी बंधुत्त्वाने राहावे, मानवसेवा किंवा जनसेवा करावी, स्वतः निर्भयतेने जगावे व इतरांनाही भीती दाखवू नये. म्हणजेच शांततेने जगावे व जगू द्यावे अशी या धर्माची शिकवण आहे.

**शीख धर्मातील धर्माचरण व धार्मिक विधी :**

शीख धर्म हा आत्मसाक्षात्कारास मोक्ष मानतो आणि ज्ञान, कर्म, भक्ती आणि योग यांना आत्मसाक्षात्काराची साधने मानतो. त्यामुळे आत्मज्ञान मिळविणे, सत्कर्म करणे, ईश्वर भक्ती करणे आणि योगसाधना करणे या कृत्यांना हा धर्म धर्माचरण मानतो. शीख धर्म हा मानवी जीवन व मानवी देहास महत्त्व देतो. संन्यस्तवृत्तीचा त्याग करून व्यक्तीने गृहस्थाश्रमाचे पालन करावे असे सांगतो. विवेकयुक्त प्रपंच करून

जनसेवा करणे हे श्रेष्ठ धर्माचरण आहे असे हा धर्म सांगतो. मूर्तिपूजा व उपवास यांना या धर्मात स्थान नाही. ईश्वराची प्रार्थना, सद्‌गुरूशी निष्ठा, सद्‌गुरूची कृपा, सद्‌गुरूचे नामस्मरण इत्यादींना हा धर्म धार्मिक विधी मानतो. दहावे गुरू गोविंदसिंगानी 'खालसा' पंथाची स्थापना करून प्रत्येक शीखाने केस, कंगवा, कच्छ, कडे व कृपाण या पाच वस्तू वापरावे असे सांगितले. त्यानुसार श्रद्धाळू शीख या पाच वस्तू बाळगणे हे धर्माचरणच मानतो.

शीख धर्म हा वेदग्रंथांना प्रमाण मानीत नाही. गुरूमुखी लिपीतील 'गुरूग्रंथसाहिब' हा शीखांचा पवित्र ग्रंथ असून त्यातील शिकवण ही गुरूवाणी मानली जाते. 'गुरूद्वार' हे शीखांचे प्रार्थनास्थळ असून त्यामध्ये गुरूग्रंथसाहिबाची पूजा व पठन केले जाते. ही पूजा व पठन हाही धर्माचरणाचाच भाग मानला जातो.

शीख धर्मातील गुरूंच्या स्मरणार्थ देशात चार दिशांना स्थापन केलेल्या चार गुरुद्वारास (तरवक्ते म्हणजे धर्मपीठे) शीख लोक तीर्थक्षेत्रे मानतात. पूर्वेस पाटणा, पश्चिमेस अमृतसर, उत्तरेस आनंदपूर व दक्षिणेस नांदेड ही चार तीर्थक्षेत्रे आहेत. त्यांना भेट देणे हेही महत्त्वपूर्ण धर्माचरण मानले जाते.

**शीखांचे सामाजिक-जीवन :**

शीख समुदाय हा हिंदू धर्मातील विविध जातीच्या लोकांनी बनलेला आहे. म्हणजेच शीख हे मूळचे हिंदुच आहेत. त्यामुळे शीखांच्या सामाजिक जीवनावर हिंदूंचा प्रभाव बऱ्याच प्रमाणात दिसून येतो. पंजाब-हरियाणातील शेतकरी शीखांची कुटुंबे ही संयुक्त प्रकारची आढळतात. शीख धर्म हा गृहस्थाश्रमास महत्त्व देतो. त्यामुळे ब्रह्मचर्य अमान्य करतो. व्यक्तिने विवेकपूर्ण आणि नैतिक असे वैवाहिक व कौटुंबिक जीवन जगावे हा आदर्श मानला जातो. हिंदुप्रमाणेच विवाह हा एक संस्कार मानला जातो. विवाह विधीचे स्वरूप साधारणतः हिंदुप्रमाणेच असते. विवाहप्रसंगी गुरूग्रंथसाहिबातील आनंद नामक मंत्र म्हटले जातात. गुरूग्रंथसाहिबाभोवती चार फेरे मारून विवाह संपन्न केला जातो. शीखांमध्ये पुनर्विवाहास मान्यता आहे. बहुसंख्य शीख हे धर्म-अंतर्विवाहाचे पालन करतात. हिंदुतील १६ संस्कार शीखांमध्येही पाळले जातात. जन्म, नामकरण (बारसे), दीक्षा, जातक, विवाह, अंत्यविधी इ. संस्कार विशेषत्वाने केले जातात. शीख लोक अनेक सण साजरे करतात. विशेषतः १० गुरूंचे जन्मदिन व स्मृतीदिन, गुरूग्रंथ साहिब प्रतिस्थापना दिन, खालसा पंथ स्थापना दिन, धर्मरक्षणासाठी बलिदान केलेल्या हुतात्म्यांचे स्मृतीदिन इत्यादी दिन सण म्हणून साजरे केले जातात. मृतास अग्नी देतात व त्याची रक्षा नदीस अर्पण करतात. मृत व्यक्तीचे थडके (कबर) बांधत नाहीत. परंतु हुतात्म्यांचे स्मारक उभारतात.

शीख समुदायातील आचारसंहिता ही 'रहित मर्यादा' म्हणून ओळखली जाते. ही मर्यादा गुरूग्रंथसाहिबातील शिकवण व शीख परंपरा यावर आधारीत आहे. व्यक्तीला आचारसंहिता बदलता येत नाही. केवळ सरबत खालसालाव ती बदलण्याचा अधिकार आहे. त्यामध्ये शीखांची प्राथमिक केंद्रे व संघटनांचे प्रतिनिधी सहमतीने निर्णय घेतात. तख्खत व त्यांचे जथ्थेदार हे लौकीक-सामाजिक जीवनाविषयीचे निर्णय घेतात.

शीख धर्म हा वर्णव्यवस्था व जातिव्यवस्था नाकारतो व समतेचा पुरस्कार करतो हे खरे. तथापि, या धर्मासही जातिव्यवस्था नष्ट करता आलेली नाही. शीख धर्मातही अनेक पंथ व जातीसमूह निर्माण झालेले आहेत. अकाली, खालसा, निरंकारी ग्यानी, निर्मल यासारखे पंथ या धर्मात निर्माण होऊन पंथभेद निर्माण झालेला आहे. तसेच शीखांत 'सरदार व मझवी' हे दोन प्रमुख जातीसदृश्य समूह देखील निर्माण झालेले आहेत. सरदारांचा दर्जा मझवीपेक्षा श्रेष्ठ मानला जातो. हिंदुधर्मातील ज्या कनिष्ठ जातीजमातींनी शीख धर्म

स्वीकारला त्यांना मझवी म्हणतात व त्यांचा दर्जा कनिष्ठ मानला जातो. मझवी लोकांची वेगळी वस्ती आढळते. शीख धर्म स्वीकारलेल्या जाट, ब्राह्मण, क्षत्रिय व कांही कारागीर जातींनी आपले वेगळेपण जपलेले असून ते बहुधा आपल्या जातीबाहेर विवाहसंबंध जोडत नाहीत. खुशवंतसिंगांच्या मते, शीख धर्मातील समतेचा अर्थ आंतरजातीय विवाह करणे असा कधीही नव्हता. तथापि, मझवी लोक सरदार लोकांबरोबर गुरूद्वारातील प्रार्थना व लंगर (गुरूद्वारातील सामूहिक अन्नदान) यामध्ये सहभागी होऊ शकतात. तसेच मझवींचा स्पर्शही निषिद्ध मानला जात नाही. थोडक्यात शीखांमध्ये जातीभेद असला तरी तो हिंदुइतका कठोर नाही.

### **१.३.२ इस्लाम आणि वसाहतवादी राजवटीचा प्रभाव** (Impact of Islam and Colonial Rule)

इस्लाम राजवटीचा आणि वसाहतवादी राजवटीचा भारतीय समाजावर पडलेला प्रभाव पुढीलप्रमाणे-

- **इस्लाम राजवटीचा प्रभाव** (Impact of Islam Rule)

मध्ययुगीन भारतात इस्लामी म्हणजेच मुस्लिम राजवट होती. या राजवटीचा भारतीय समाजावर लक्षणीय प्रभाव पडला. हा प्रभाव समजावून घेण्यापूर्वी इस्लामचा उदय व भारतातील प्रवेश याविषयी थोडक्यात जाणून घेऊ. बहुदेवतावाद, अंधश्रद्धा, अनैतिकता, जुगार, मद्यपान, क्रौर्य, संघर्ष, लुटालूट इत्यादीनी ग्रासलेल्या अरब समुदायात एकेश्वरवादाचा व शांततामय जीवनाची प्रस्थावना करण्यासाठी प्रेषित महंमद पैगंबरांनी (इ.स. ५५७ ते ६३२) इ.स. ६१० मध्ये इस्लाम धर्माची स्थापना केली आणि आपल्या अनुयायांना इस्लामचा संदेश शांततेने जगभर पसरविण्याचा म्हणजे इस्लाम धर्माचा प्रसार करण्याचा आदेश दिला. त्यानुसार इस्लामचा प्रसार करणारे अनेक इस्लामी धर्मोपदेशक भारतात आले व त्यांनी शांततेने व प्रेमाने अनेक भारतीयांना इस्लाम धर्माची दिक्षा दिली. पुढे आठव्या शतकाच्या प्रारंभापासून अनेक इस्लामधर्मीय लोकांनी भारतावर आक्रमणे केली. त्यापैकी महंमद बीन कासम, गझनीचा महंमद, महंमद घोरी, तैमुरलंग इत्यादी प्रमुख होते. पुढे कुतबुद्दीन ऐबक यांनी सर्वप्रथम भारतावर पहिली मुस्लिम राजवट (१२०६ मध्ये) प्रस्थापित केली. त्यानंतर भारतावर अल्लाउद्दीन खिलजी, महंमद बीन, तुघलक, इब्राहीम लोदी यांनी दिल्लीच्या तख्तावर राज्य केले. बाबरानंतर हुमायन, अकबर, जहाँगीर, शहाजहान, औरंगजेब या मोगल सम्राटांनी राज्य केले. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर (१७०७) इस्लाम राजवट संपुष्टात आली.

सुमारे ५०० वर्षे टिकलेल्या इस्लामी राजवटीत इस्लाम धर्म, इस्लाम संस्कृती व इस्लामी राज्यपद्धती यांचा भारतीय समाजावर लक्षणीय प्रभाव पडला. हा प्रभाव कसा होता याबाबत विचारवंतात मतभिन्नता आढळते. उदा. ताराचंद यांच्या मते मुस्लिम राजवटीत हिंदू-मुस्लिमांनी परस्परांच्या चालीरितीचा कांही प्रमाणात स्वीकार केल्याने त्यांच्यात सामंजस्य व समन्वय निर्माण होऊन एक नवीन जीवनपद्धती विकसित झाली. याऊलट आर.सी. मुजूमदार यांच्या मते वेशभूषा, भोजनपद्धती, भाषा, संगीत, कला इत्यादीबाबत हिंदू-मुस्लिमांचा एकमेकांवर पडलेला प्रभाव क्षुल्लक व जीवनाच्या बाह्य अंगाशी संबंधित होता. दोन्ही धर्मातील प्रमुख वैशिष्ट्ये एकमेकांकडून आत्मसात केली गेली नाहीत. दोन्ही धर्माचे लोक शेजारी-शेजारी राहूनही ते आपापल्या सामाजिक-धार्मिक चौकटीतच जगत राहिले. त्यांच्यात सलोखा व समन्वय झाल्याचे चिन्ह दिसत नाही.

वस्तुत: वरील दोन्ही मते टोकाची वाटतात. हिंदू-इस्लाम यांच्या धार्मिक-सामाजिक वैशिष्ट्यांचे एकीकरण होऊन एक नवीन जीवनपद्धती उदयास आली नाही हे खरे पण अनेक शतकांच्या सान्निध्यामुळे

रीतीरिवाज, आहार, वेशभूषा, भाषा, विविध कला, नाणेपद्धती, प्रशासन इत्यादींचा परस्परावर कांही निश्‍चित असा प्रभाव पडला. हा प्रभाव पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**अ) सामाजिक जीवनावरील प्रभाव :**

**१) धार्मिक विविधतेत भर :** मुस्लिम राजवटीत भारतात इस्लामच्या रुपाने एक नवीन धार्मिक समूह निर्माण होऊन भारतीय समाजाच्या धार्मिक विविधतेत भर पडली. मुस्लिमापूर्वी भारतात आलेले परकीय लोक (ग्रीक, शक, हुण, कुशाण) भारतीय समाजात मिसळून गेले व भारतीय बनले. पण मुस्लिमांनी मात्र अलिप्ततावादाचे धोरण जोपासले. त्यामुळे भारतात राहूनही मुस्लिमाना भारतीय समाजाशी जवळून घेता आले नाही. त्यांनी आपले मूळ परकीय स्वरूप कायम ठेवले. त्यामुळे त्यांचा एक स्वतंत्र समूह भारतात निर्माण झाला.

**२) हिंदूच्या कर्मठपणात वाढ :** काही मुस्लिम राज्यकर्त्यांनी हिंदूचे सक्तीने धर्मांतर घडवून आणण्यावर भर दिला. त्यामुळे हिंदू समाजाचे विघटन सुरू झाले. हे विघटन थांबविण्यासाठी हिंदूधर्म मार्तंडानी कर्मठपणाचे धोरण स्वीकारून हिंदू आचारविचाराचे पालन अधिक काटेकोर केले. जातीधर्माचे निर्बंध कडपणे लागू केले. मुस्लिम झालेल्या हिंदूना परत स्वधर्मात घेण्यास मनाई केली. परिणामी हिंदूधर्म अधिकच कर्मठ बनला.

**३) स्त्रियांची दयनीय स्थिती :** कांही मुस्लिम राज्यकर्त्यांनी पराजित हिंदूच्या स्त्रियांना आपल्या अन्याय अत्याचाराचे शिकार बनविले. त्यामुळे स्त्रियांना सुरक्षित ठेवण्यासाठी हिंदूनी बालविवाह, विधवाविवाहबंदी, स्त्रीशिक्षणास बंदी, सतीप्रथा, जोहारप्रथा, पडदापद्धती, इत्यादी अनिष्ठ प्रथांचे उदात्तीकरण केले. त्यांचे पालन करणे सक्तीचे केले. मुस्लिमांच्या अत्याचारास बळी पडलेल्या हिंदू स्त्रियांना परत हिंदू धर्मात घेण्यास बंदी घातली. त्यामुळे हिंदू स्त्रियांची स्थिती खूपच दयनीय झाली.

**ब) धार्मिक जीवनावरील प्रभाव :**

**१) धार्मिक संघर्ष :** मुस्लिमांनी हिंदूचे सक्तीने धर्मांतर सुरु केले. हिंदूची मंदिर, देवदेवता, धर्मग्रंथ इत्यादींची विटंबनाही सुरू केली. हिंदूच्या संपत्तीची व स्त्रियांची लूट सुरू केली. परिणामी हिंदू-मुस्लिम संघर्ष सुरू झाला. परस्परद्वेषाची भावना वाढीस लागली. मुस्लिम हिंदूना 'काफीर' तर हिंदू मुस्लिमांना कनिष्ट जातीसारखे तुच्छ लेखू लागले.

**२) नवीन धर्मांचा व पंथाचा उदय :** हिंदू-मुस्लिम संघर्ष कमी करण्यासाठी गुरु नानक व सम्राट अकबर यांनी दोन्ही धर्मातील चांगल्या तत्त्वांचा स्वीकार करुन अनुक्रमे ''शीख'' व ''दिन इलाही'' हे नवीन धर्म स्थापन केले. दोन्ही धर्म एकाच ईश्‍वराकडे जाण्याचे मार्ग आहेत असा उपदेश सुरू केला. याच काळात सुफी पंथ व कबीर पंथ यांचा प्रभाव वाढला. या पंथांनी हिंदू-मुस्लिमांत सलोखा निर्माण करण्याचा प्रयत्न केला. मुस्लिम आक्रमणामुळे निर्माण झालेली संभ्रमावस्था दूर करण्यासाठी या पंथानी भक्तीमार्गाचा पुरस्कार करुन अध्यात्मिक उन्नती सुधारण्यावर भर दिला. या भक्तीमार्गातून महाराष्ट्रात वारकरी संप्रदाय उदयास आला व त्याने मानवतावादी व सुधारणावादी विचारांचा प्रसार सुरू केला. तथापि, त्यामुळे रचनात्मक परिवर्तन मात्र घडून आले नाही.

**३) अल्प प्रमाणात धर्मांतर :** मुस्लिमांनी हिंदूचे धर्मांतर करण्याचे धोरण स्वीकारले असले तरी हिंदू मोठ्या प्रमाणावर धर्मांतर होऊ शकले नाहीत. कारण मुस्लिम राजवटीतील लष्कर, प्रशासन, महसूल, गोळा

करणे, व्यापार व उत्पादन इत्यादी गोष्टी हिंदूच्या पाठिंब्यावर अवलंबून होत्या. त्यामुळे धर्मांतराची फार मोठी सक्ती मुस्लिम राज्यकर्त्यांनी केली नाही. त्यामुळे अल्प प्रमाणातच धर्मांतर झाले.

**४) इस्लामी तत्त्वांचा स्वीकार :** इस्लाम धर्मातील एकेश्वरवाद, समता व बंधुत्त्व ही तत्त्वे काही हिंदू विचारवंतांना पसंत पडली आणि त्यांनी सर्व धर्माचे लोक समान असून सर्वांचा ईश्वर एकच आहे फक्त त्याला वेगवेगळी नावे आहेत असा उपदेश करण्यास सुरूवात केली. कांही इस्लामी धर्मप्रसारक हे विद्वान न सदाचारी असल्याने अनेक हिंदू त्यांचे अनुयायी बनले. मुस्लिम पीर व फकीरांच्या कबरी व दर्गे यांना भेट देऊ लागले. मुस्लिमांच्या उरुसात व ताबूतच्या मिरवणूकीत सहभागी होऊ लागले.

**क) राजकीय जीवनावरील प्रभाव :**

**१) साम्राज्य निर्मिती :** सम्राट हर्षवर्धनानंतर अनेक लहान लहान राज्ये निर्माण झाली होती. हुमायूनच्या काळापर्यंत हीच स्थिती होती. तथापि अकबर, शहाजनहान, औरंगजेब यांनी साम्राज्य विस्ताराचे धोरण राबविले व त्यामध्ये ते बऱ्याच प्रमाणात यशस्वी झाले. दिल्लीचा मोगल बादशहा हा हिंदूस्थानचा सम्राट म्हणून ओळखला जाऊ लागला.

**२) उत्तम राज्यकारभार :** अल्लाउद्दीन खिलजी व औरंगजेब वगळता उर्वरित मुस्लिम राजांनी सलोख्याने व सहिष्णूतेचे धोरण ठेवून उत्तम राज्यकारभार केला. बाबराने आपल्या मृत्यूपत्रात हुमायूनला धर्मनिरपेक्षपणे राज्यकारभार करण्याचा व इतर धर्माचा आदर करण्याचा उपदेश केलेला आढळते. शेरशहा सूरीने उत्तम प्रशासनव्यवस्था निर्माण करून प्रजेच्या हिताची काळजी घेतली. अकबराने व धर्मनिरपेक्षा व सहिष्णूवृत्तीने राज्यकारभार केला. हिंदूंना राज्यकारभारात उच्च पदे दिली. राष्ट्रीय ऐक्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. जहांगीरनेही मुस्लिमेतर विद्वानांना व कलाकारांना राजाश्रय दिला. शहाजहानची कारकिर्द तर वैभवशाली होती. कर्नाटकात हैदर अल्ली व त्याचा पुत्र टिपू सुलतान यांचा राज्यकारभार प्रजेच्यादृष्टीने हितकारक असाच होता.

**३) हिंदू राजवटी :** भारतात दीर्घकाळ मुस्लिम राजवट असली तरी अनेक ठिकाणी हिंदू राजवटी टिकून होत्या उदा. सुलतानशाहीच्या काळात विजयनगरच हिंदू साम्राज्य वैभवशाली होते. दक्षिणेत अनेक हिंदू राजवटी होत्या. कांही राजपूत राजे मोगलांचे मांडलिक बनले. तथापि, राणा प्रतापसिंहने मात्र आपले राज्य टिकविण्यासाठी शेवटपर्यंत अकबराशी लढा दिला. मोगलकाळातच छत्रपती शिवाजी महाराजानी महाराष्ट्रात हिंदवी स्वराज्य स्थापन केले. थोडक्यात मुस्लिम राजवटीतही हिंदू राजवटी अस्तित्वात होत्या.

**ड) शैक्षणिक जीवनावरील प्रभाव :**

**१) मदरशांची स्थापना :** मुस्लिम राजवट सुरू होण्यापूर्वीच भारतात गझनीचा महंमद व महंमद घोरी यांनी मुस्लिम आचारविचाराचे शिक्षण देणारे मदरशा स्थापन केले. मुस्लिम राजवट स्थिरावल्यानंतर असे असंख्य मदरसा स्थापन झाले व ते मुस्लिम सांप्रदायिकतेचे शिक्षण देणारी केंद्रे बनली.

**२) व्यवसाय केंद्रे :** मुस्लिम राजवटीत इस्लामी जगातील ज्ञान, शास्त्रे, कलाकौशल्ये, संस्कृती यांची भारतात आयात झाली. सुलतानशाहीच्या काळात मुस्लिम राज्यकर्त्यावर्गातील लोकांना लागणाऱ्या दैनंदिन व चैनीच्या वस्तू निर्माण करण्याचे शिक्षण देणारी व्यावसायिक केंद्रे उघडली गेली.

**३) विविध प्रकारचे शिक्षण :** मुस्लिम राजवटीतील शिक्षण हे प्रामुख्याने धार्मिक स्वरूपाचे होते. अकबराने मात्र भारतीय तत्त्वज्ञान, नीतीशास्त्र, गृहशास्त्र, कृषीशास्त्र, मापनशास्त्र, राज्यशास्त्र, ज्योतिषशास्त्र,

खगोलशास्त्र, भौतिकशास्त्र व विविध कला यांच्या अभ्यासास उत्तेजन दिले. संस्कृत भाषा व साहित्य यांच्या अभ्यासाचीही त्याने व्यवस्था केली.

**४) ग्रंथालये :** मुस्लिम राजवटीत राज्यकर्ते, सरदार, विद्वान व श्रीमंत लोक यांनी अनेक ग्रंथालये उभारली विविध प्रकारच्या ग्रंथांनी ही ग्रंथालये समृद्ध केली.

**इ) आर्थिक जीवनावरील प्रभाव :**

मुस्लिम राजवटीत भारतीय अर्थव्यवस्थेत मूलभूत असे बदल घडन आले नाहीत. मात्र कांही किरकोळ बदल मात्र घडून आले.

**१) शेती :** कांही मुस्लिम राज्यकर्त्यांनी शेती उत्पादन वाढावे म्हणून पाणी पुरवठ्याच्या सोयी केल्या. जमीन महसूल जाचक होणार नाही याची काळजी घेतली. संकटकाळात महसूलात सूट दिली. शेतकऱ्यांना बीबियाणे व अवजारे इत्यादीसाठी मदत पुरविली. त्यांनी महसूल आकारणीची पद्धती बदलली. मात्र महसूल गोळा करणारे अधिकारी म्हणून परंपरागत हिंदूना कायम ठेवले.

**२) उद्योग व व्यापार :** अनेक मुस्लिम राज्यकर्त्यांनी उद्योजक व व्यापारी यांना मदत देण्याचे धोरण स्वीकारले. जातीचाच व्यवसाय करण्याचा निर्बंध चालूच राहिला. मुस्लिम धर्म स्वीकारलेल्या हिंदूनी आपले पूर्वाश्रमीच्या जातीचे व्यवसाय चालूच ठेवले. व्यापारमार्गांना मुस्लिम राज्यकर्त्यांनी संरक्षण दिले. भारतातून मलमल, सुती वस्त्रे, रेशीमी कापडे, मसाले, रत्ने, सुगंधी द्रव्ये, कातडी वस्तू इत्यादींची निर्यात वाढली तर सोने, चांदी, केशर, चैनीच्या वस्तू, घोडे इत्यादीची आयात वाढली. खंबायत, सूरत ह्या बंदरांचा विकास होऊन जलवाहतूक व जलमार्गात वाढ झाली.

**३) चलनव्यवस्था :** मुस्लिम राजवटीत चलनव्यवस्थेत महत्त्वपूर्ण बदल झाले. बाबर व हुमायूनच्या काळात शरुखी (दिऱ्हम) हे चलन, शेरशहा सुरीने चांदीचा 'रुपया' व तांब्याचा 'दाम' हे चलन, अकबराने 'फुलूस' हे चलन सुरू केले. अनेक ठिकाणी टाकसळी सुरू झाल्या. 'मुहर' हे नाणे विशेष प्रचलित झाले.

**४) पेढी व्यवहार :** मोगलकाळात व्यापार उद्योगास कर्जपुरवठा करण्याच्या उद्देशाने अनेक पेढ्या निर्माण होऊन पेढीव्यवहारात वाढ झाली.

**फ) सांस्कृतिक जीवनावरील प्रभाव :**

मुस्लिम राजवटीत हिंदू-मुस्लिमांत सांस्कृतिक देवाणघेवाण होऊन पुढील बदल घडून आले.

**१) भाषा :** इस्लामी राजवटीत अरबी व फारसी भाषा भारतात आल्या. फारसी राजभाषा बनली. संस्कृतचे महत्त्व कमी झाले. हिंदी भाषेचा विकास घडून आला. फारसी व हिंदी भाषांमधून ऊर्दू भाषा उदयास आली. उत्तर भारतात मुस्लिम व हिंदूही उर्दूचा वापर करु लागले. नंतर या भाषांच्या मिश्रणातून 'खडीबोली' भाषा उदयास आली.

**२) साहित्य :** फारसी, हिंदू, उर्दू भाषांतून अनेक ग्रंथ, गझला, मर्सिये, शेरशायरी निर्माण झाली. बाबर जहांगिर यांनी आत्मचरित्रे लिहून तत्कालीन इतिहास रेखाटला. शहाजहान व औरंगजेब यांच्या मुलींनी काव्यरचना केली. राज्यकर्त्यांनी लेखकांना राजाश्रय दिल्याने उत्तम साहित्य निर्माण झाले. उदा. गुलबदन बेगमचा 'हुमायूननामा', अबू फजलचा 'ऐने-ऐ-अकबरी', अब्बासखान शेरवानीचा तारीख-ए-शेरशाही इ. ग्रंथ अजरामल ठरले.

**३) कला :** औरंगजेब वगळता इतर मोगल राजे कलाप्रेमी होते. त्यामुळे विविध कलांचा विकास घडून आला. बाबराने पर्शियन चित्रकार भारतात आणले. त्याच्याकडे उत्तमोत्तम चित्रांचा संग्रह होता. हुमायून स्वत: चित्रकार होता. अकबराच्या पदरी १५० चित्रकार होते. अकबर नियमितपणे चित्रप्रदर्शन भरवित असे. याकाळात चित्रकलेत स्वतंत्र मोगल शैली निर्माण झाली. इस्लामधर्मात मूर्तिपूजा मान्य नाही. तरीही अकबराने व जहांगिरने मूर्तिकलेस व शिल्पकलेस उत्तेजन दिले. पारंपारिक भारतीय कला व इराणी कला यांचा संगम शिल्पकलेत घडून आला. भारतीय व इराणी वस्तुशास्त्राचा संगम होऊन 'इंडो-इस्लामिक' वास्तूकला शैली निर्माण झाली. घुमट, मिनार, जाळीदार नक्षीकाम, संगमरवर दगडी यांच्या वापरातून कुतुबमिनार, चारमिनार, जामा-मस्जिद, बलुंद दरवाजा, ताजमहाल, लालकिल्ला, हुमायूनचा मकबरा, बिबीका मकबरा, पंचमहाल, इत्यादी वास्तू निर्माण होऊन त्या भारतीय संस्कृतीचा अनमेल ठेवा बनल्या. अकबर, जहांगिर, शहाजहान संगीतप्रेमी होते. त्यांनी गायक व संगीतकारांना राजाश्रय दिला. अमीर खुस्रो, तानसेन असे अजरामर संगीतकार होऊन गेले.

**४) नागर संस्कृती :** प्राचीन भारतात मुख्यत: ग्राम संस्कृती होती. मुस्लिम राजवटीत लष्कर, प्रशासन, व्यापार यंची केंद्रे म्हणून अनेक जुन्या शहरांचा (दिल्ली, लाहोर, अलाहाबाद) विकास घडून आला तर अनेक नवीन शहरे (फत्तेपूर शिक्री, अहमदाबाद, शहानाबाद) वसविली गेली. त्यामुळे भारतात नागरी संस्कृतीस महत्त्व आले.

अशाप्रकारे मुस्लिम राजवटीचा जीवनाच्या सर्वक्षेत्रावर प्रभाव पडला. मात्र हिंदू-मुस्लिम संस्कृतीच्या देवाणघेवाणीतून संमिश्र संस्कृती विकसित झाली नाही. कारण मुस्लिम लोक धर्माबाबत कडवे होते पण सामाजिक नीतीच्याबाबतीत उदार होते. याउलट हिंदू धर्माबाबत उदार होते व सामाजिक नीतीबाबत कडवे होते. मुस्लिम राजवटीत त्यांची ही वैशिष्ट्ये कायम राहिली. हिंदूनी मुस्लिमांचे सामाजिक समतेचे तत्त्वज्ञान स्वीकारले नाही. तर मुस्लिमांनी हिंदूचे धार्मिक सहिष्णूता स्वीकारली नाही.

- **वसाहतवादी राजवटीचा प्रभाव :** (Impact of Colonial Rule)

इस्लाम राजवटीचा भारतीय समाजावर पडलेला प्रभाव अभ्यासल्यानंतर आता तुम्ही इंग्रजांच्या वसाहतवादी राजवटीचा भारतीय समाजावर पडलेला प्रभाव अभ्यासणार आहात. त्यासाठी प्रथम वसाहतवादाचा अर्थ समजावून घेणे उचित ठरते.

**साम्राज्यवादाचा अर्थ :** वसाहतवाद हा साम्राज्यवादाचाच एक विशेष प्रकार आहे. त्यामुळे प्रथम साम्राज्यवाद म्हणजे काय हे पाहू.

१) **एम. जे. बॉन** यांच्या मते, कमीजास्त प्रमाणात परस्परांपासून भिन्न असलेल्या राष्ट्रीयत्त्वांना एकाच मध्यवर्ती सत्तेच्या अंमलाखाली आणून एक व्यापक आकाराचे राज्य स्थापन करणे म्हणजे साम्राज्य होय आणि असे साम्राज्य स्थापन करणे, त्याचे संघटन करणे व ते चालविण्याचा उद्देश ठेवणारे धोरण म्हणजे साम्राज्यवाद होय.

२) **जे. ए. शुम्पीटर** यांच्या मते, राज्याने कोणताही उद्देश समोर न ठेवता जबरदस्तीने केलेला अमर्याद राज्यविस्तार म्हणजे साम्राज्यवाद होय.

**३) चंद्रकांत खंडागळे** यांच्या मते, आपल्या वैयक्तिक, आर्थिक, राजकीय किंवा सांस्कृतिक हितसंबंधाच्या पूर्ततेसाठी एखाद्या राज्याने आपल्या भौगोलिक व राजकीय सीमांच्या बाहेर आपली राजकीय सत्ता विस्तारीत करण्याचे धोरण म्हणजे साम्राज्यवाद होय.

**वसाहतवादाची व्याख्या :**

१) **चंद्रकांत खंडागळे :** एखाद्या देशाने परक्या देशातील भूप्रदेशात शांततामय किंवा हिंसक मार्गाने प्रथम आपली वसाहत, नंतर व्यापार-उद्योग व शेवटी राजवट स्थापन करणे व तेथील साधनसंपत्तीचा वापर व जनतेचे शोषण करून आपला विकास घडवून आणणे म्हणजे वसाहतवाद होय.

२) **विनस्लॉ** : अलिकडील काळात नव्याने माहित झालेले भूप्रदेश पादाक्रांत करून तेथे वस्ती करून राहण्याची युरोपियन लोकांची प्रवृत्ती म्हणजे वसाहतवाद होय.

३) **हॉब्सन :** एखाद्या राष्ट्राच्या अतिरिक्त राष्ट्रभावनेचा व्यापक क्षेत्रात झालेला विस्तार म्हणजे वसाहतवाद होय.

वरील विवेचनावरून वसाहतवादाविषयी पुढील मुद्दे लक्षात येतात.

- वसाहतवाद हे एक धोरण (वा प्रवृत्ती) असून या धोरणानुसार एक देश दुसऱ्या देशात आपली वसाहत व्यापार-उद्योग व राजवट शांततामय किंवा हिंसक मार्गाने स्थापन करतो.
- वसाहत स्थापन करणारा देश आपल्या या वसाहतीचे शोषण करतो व त्याद्वारे आपला विकास घडवून आणतो.
- वसाहतवादी देश स्वतःस श्रेष्ठ तर वसाहतीस कनिष्ठ मानतो व कनिष्ठ वसाहतीस सुधारण्याच्या नावाखाली तिच्यावर आपली संस्कृती, धर्म, भाषा इत्यादी लादण्याचा प्रयत्न करतो.
- वसाहतवादी देश व त्याची वसाहत यांच्यात भौगोलिक अंतर खूपच जास्त होते.
- आधुनिक काळात प्रामुख्याने प्रगत युरोपियन राष्ट्रांनी आशिया-आफ्रिका खंडातील राष्ट्रांमध्ये आपल्या वसाहती स्थापन केलेल्या होत्या.
- दुसऱ्या महायुद्धानंतर वसाहती स्वतंत्र होऊन वसाहतवादाचे धोरण संपुष्टात आले.

**वसाहतवादाचा विकास :**

वसाहतवादही प्राचीन काळापासून आढळतो. दहाव्या शतकात ग्रीकांनी व्यापाराच्या उद्देशाने आशिया मायबर, भूमध्य समुद्राजवळचा भूभाग येथे आपल्या वसाहती स्थापन केल्या. रोमनांनीही व्यापार व आपल्या संस्कृतीच्या प्रसारासाठी वसाहती स्थापन केल्या होत्या. मध्ययुगाच्या शेवटी पोर्तुगीजांनी आफ्रिका खंडात व पूर्वेकडील देशात तर स्पॅनिश लोकांनी अमेरिकेत वसाहती स्थापन केल्या. यातून प्रेरणा घेऊन पुढे इंग्लंड, फ्रान्स, डेन्मार्क, हॉलंड इ. देशांनी आफ्रिका व आशिया खंडात आपल्या वसाहती स्थापन केल्या. यामध्ये इंग्लंडच्या सर्वात जास्त वसाहती होत्या. भारत त्यापैकी एक होती. इ. स. १४५३ मध्ये तुर्की लोकांनी 'कॉन्स्टटिनोपाल' या शहरावर कब्जा केला व युरोपातून पूर्वेकडील देशांकडे जाणारा खुष्कीचा मार्ग बंद केला. त्यामुळे युरोपातील राज्यकर्ते व व्यापाऱ्यांनी पूर्वेकडे जाणारे जलमार्ग शोधण्यासाठी धाडसी दर्यावर्दी लोकांना अर्थसाहाय्य व प्रोत्साहन दिले. यातूनच वास्को-द-गामा (पोर्तुगीज) याने १४९८ मध्ये भारताकडे येणारा जलमार्ग शोधण्यासाठी धाडसी दर्यावर्दी लोकांना अर्थसाहाय्य व प्रोत्साहन दिले. यातूनच वास्को-द-

गामा (पोर्तुगीज) याने १४९८ मध्ये भारताकडे येणारा जलमार्ग शोधून काढला. त्यामुळे व्यापाराच्या निमित्ताने पोर्तुगीज, डच, फ्रेंच व इंग्रज लोक भारतात आले. त्यांनी येथे वसाहती स्थापन करून व्यापार सुरू केला. येथील व्यापार व प्रदेशावर वर्चस्व मिळविण्यासाठी त्यांच्यात संघर्ष होऊन त्यात इंग्रज विजयी झाले. इंग्रजांनी पुढे भारतावर आपली राजवट प्रस्थापित केली व ती सुमारे १५० वर्षापेक्षा अधिक काळ टिकून राहिली. पोर्तुगीजांनी गोव्यावर व फ्रेंचानी पदुचेरी (पाँडेचरी) वर कब्जा करून तेथे आपापल्या राजवटी स्थापन केल्या या वसाहतवादी राजवटींचा भारतीय समाजावर नकारात्मक तसाच सकारात्मक प्रभाव पडला. त्या प्रभावाचे स्वरूप पुढीलप्रमाणे:

**अ) राजकीय जीवनावरील प्रभाव**

**१) राजकीय पारतंत्र्य :** प्राचीन व मध्ययुगीन भारतीय राजांनी साम्राज्यविस्ताराचे प्रयत्न केले. पण त्यांना संपूर्ण भारतावर एकछत्री राजवट स्थापन करणे शक्य झाले नाही. इंग्रजांनी मात्र संपूर्ण भारतावर एकछत्री राजवट/राजकीय व्यवस्था प्रस्थापित केली. परिणामी भारत राजकीय पारतंत्र्यात गेला.

**२) नवीन प्रशासन :** इंग्रजांनी भारतीय प्रदेशाचे अनेक प्रांत प्रत्येक प्रांतात कांही जिल्हे व प्रत्येक जिल्ह्यात कांही तालुके निर्माण केले. प्रांतासाठी गव्हर्नर, जिल्ह्यासाठी कलेक्टर, तालुक्यासाठी मामलेदार असे अधिकारी नेमून त्यांना प्रशासकीय, महसूली अधिकार दिले. तसेच न्यायदानासाठी न्यायाधीश, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस नेमले. अन्य प्रशासकीय कर्मचारी नेमण्यासाठी खास शिक्षण-प्रशिक्षण देणारी केंद्रे उभारली. अशाप्रकारे वसाहतवादी राजवटीत भारतात नवीन प्रशासन व्यवस्था सुरू झाली.

**३) कायद्याचे राज्य :** इंग्रजानी भारतातील परंपरागत कायद्यांचे व कांही नवीन कायद्यांचे संकलन करून 'इंडियन पिनल कोड' ही कायदे संहिता निर्माण केली व देशभरातील सर्व जातीधर्माच्या लोकांना तसेच राज्यकर्त्यांनाही समानपणे लागू केली. कायद्यापुढे सर्वांना समान मानले. त्यामुळे भारतात 'कायद्याचे राज्य' या संकल्पनेचा पाया घातला गेला.

**४) लोकशाही व संघराज्य पद्धती :** १८५७ च्या उठावानंतर भारतीयांना राज्यकारभारात सहभागी करून घेतल्याशिवाय आपली सत्ता टिकणार नाही याची जाणीव इंग्रजांना झाली. त्यांनी भारतीयांना हळूहळू अनेक राजकीय अधिकार दिले. भारतीयांना निवडणुकीद्वारे कायदेमंडळावर प्रतिनिधित्व दिले. तसेच संघराज्य पद्धती स्वीकारून लोकनियुक्त व स्वायत्त प्रांतिक सरकारे स्थापन केली. अशाप्रकारे भारतात लोकशाही व संघराज्य पद्धतीचा पाया घातला गेला.

**५) राष्ट्रीय भावनेचा उदय :** वसाहतवादी राजवटीपूर्वी भारतीय लोक विविध धर्मात, जातीत, भाषेत, प्रांतात विभागलेले होते व त्यांच्यात ऐक्यभावना (राष्ट्रीय भावना) नव्हती. वसाहतवादी राजवटीत मात्र पाश्चिमात्त्य शिक्षण, सुधारणा चळवळी, राजकीय नेतृत्व, वृत्तपत्रे इत्यादींचा प्रभाव पडून भारतीयांच्यात राष्ट्रीय ऐक्य भावना उदयास आली. जुलमी परकीय राजवट उलथून टाकण्यासाठी त्यांनी संघटीतपणे स्वातंत्र्य लढा उभारला. या लढ्यात सर्व भारतीय लोक धर्मभेद, जातीभेद, प्रांतभेद, भाषाभेद विसरून एकत्र आले. परिणामी राष्ट्रीयत्त्वाची भावना वाढीस लागली, विकसित झाली.

**ब) आर्थिक जीवनावरील प्रभाव**

**१) आर्थिक दुरावस्था :** इंग्रजानी कृषीविकासाकडे दुर्लक्ष केले. दुष्काळातही सक्तीने शेतसारा वसुल केला. परिणामी शेतकरी कर्जबाजारी झाले. शिवाय इंग्रजांनी अन्नधान्य उत्पादनापेक्षा औद्योगिक

उत्पादनासाठी लागणाऱ्या कापूस, ताग, नीळ, चहा-कॉफी इ. पिकांच्या उत्पादनास प्राधान्य दिले. परिणामी शेती व्यवसाय डबघाईस आला. इंग्रजांनी येथील संपत्ती लूटून इंग्लंडला पाठविण्याचे धोरण राबविले. त्यांनी अवजड उद्योगधंदे उभारल्याने देशी उद्योग (कुटिरोद्योग व ग्रामोद्योग) बुडाले व त्यातील देशी कारागीर बेकार झाले. तसेच इंग्रजांनी दुष्काळ व रोगराई निवारण, पाणीपुरवठा, व्यावसायिक शिक्षणाचा प्रसार, लोकसंख्या नियंत्रण इत्यादीसंदर्भात कोणतीही उपाययोजना केली नाही. परिणामी सामान्य जनता दारिद्र्य, बेकारी, उपासमार, अनारोग्य अशा समस्यांनी त्रस्त झाली. एकंदरीत भारतास आर्थिक दुरावस्था प्राप्त झाली.

२) **बाजारपेठीय अर्थव्यवस्था :** वसाहतवादी राजवटीपूर्वी भारतीय अर्थव्यवस्था कृषीप्रधान होती. इंग्रजानी मोठमोठे उद्योगधंदे उभारून त्यात प्रचंड भांडवल गुंतवणूक केली. त्यामुळे भांडवलप्रधान व उद्योगप्रधान अर्थव्यवस्थेचा पाया रचला गेला. या नवीन अर्थव्यवस्थेत निर्वाहाऐवजी नफा मिळविण्यासाठी उत्पादन होऊ लागले. परिणामी, बाजारपेठीय अर्थव्यवस्थेचा भारतात उदय झाला.

३) **नवीन आर्थिक संस्था :** वसाहतवादी राजवटीत भारतात बँका, पतसंस्था, नियमित बाजारपेठा, शेअरबाजार, सहकारी संस्था, आयात-निर्यात केंद्रे इत्यादी नवीन आर्थिक संस्था उदयास आल्या. परिणामी, आर्थिक उलाढाल व पैशाचा वापर वाढला. त्यामुळे वस्तुविनिमयाऐवजी मुद्राप्रधान आर्थिक व्यवहारात वाढ झाली.

४) **व्यापारात वाढ :** या राजवटीत भारताचा अंतर्गत व विदेशी व्यापार वाढला. इग्लंडबरोबरच फ्रान्स, जर्मनी, पोर्तुगाल, अमेरिका या देशांशी भारताचे व्यापारी संबंध निर्माण झाले. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था जगाच्या अर्थव्यवस्थेशी घनिष्ठपणे जोडली गेली.

५) **व्यावसायिक गतिशीलतेस चालना :** पूर्वी भारतात व्यक्तीला स्वजातीचाच व्यवसाय करण्याचे कडक बंधन होते. इंग्रजानी उभारलेल्या उद्योगधंद्यात व प्रशासकीय कार्यालयात जातीचा विचार न करता आवश्यक ती शैक्षणिक व तांत्रिक पात्रता असणाऱ्या कोणत्याही जातीच्या व्यक्तीस काम मिळू लागले. त्यामुळे व्यावसायिक गतिशीलतेस चालना मिळाली.

**क) सामाजिक जीवनावरील प्रभाव**

१) **शहरीकरणास चालना :** इंग्रजांनी प्रशासकीय कार्यालये, उद्योग, शिक्षणसंस्था, लष्करी छावण्या, बाजारपेठा, वखारी इत्यादी गोष्टी मुख्यतः शहरांत वा शहरांच्या जवळपास उभारल्या. त्यामुळे सभोवतालच्या प्रदेशातील लोक शिक्षणाच्या, नोकरीच्या निमित्ताने शहरांकडे स्थलांतर करू लागले. त्यामुळे शहरीकरणास चालना मिळाली. शहरात विभिन्न जातीधर्माचे, प्रांताचे, भाषेचे, वर्गाचे लोक परस्परांच्या घनिष्ठ संपर्कात येऊ लागले. त्यामुळे बृहद् समाजाच्या (Mass Society) निर्मितीस चालना मिळाली.

२) **वर्गव्यवस्थेचा उदय :** औद्योगिक-शहरी समाजात, उद्योजक, कामगार, पगारदार नोकर इ. नवीन वर्ग उदयास आले. समान हितसंबंध असणाऱ्या व्यक्ती संघटीत होऊन त्यांनी ऐच्छिक व व्यावसायिक संघटना (उदा. कामगार संघटना, विद्यार्थी संघटना, डॉक्टरांची संघटना इ.) स्थापन केल्या विभिन्न जातीधर्माचे, प्रांताचे, भाषेचे लोक एकाच संघटनेचे सदस्य झाल्याने त्यांच्यातील धर्मभेद, जातीभेद, भाषाभेद, प्रांतभेद गळून पडले व त्यांच्यात वर्गजाणीव निर्माण झाली. यातूनच वर्गव्यवस्था उदयास आली. या व्यवस्थेत व्यक्तीला स्वकर्तृत्वाने उच्च वर्ग, दर्जा, स्थान मिळविणे शक्य होऊ लागले. परिणामी, उर्ध्वगामी सामाजिक गतिशीलतेस चालना मिळाली.

**३) सुधारणा चळवळीस प्रारंभ :** पाश्चात्त्य शिक्षण घेतलेल्या भारतीयांवर समता, स्वातंत्र्य, न्याय, मानवता, धर्मनिरपेक्षता इत्यादी मूल्यांचा प्रभाव पडला. परिणामी, त्यांनी भारतातील विविध अनिष्ट प्रथा (उदा. सतीप्रथा, बालविवाह, विधवा विवाहबंदी अस्पृश्यतापालन, स्त्रीशुद्रांना शिक्षण घेण्यास बंदी इ.) नष्ट करून धार्मिक व सामाजिक सुधारणेच्या चळवळी सुरू केल्या. ब्राह्मो समाज, आर्य समाज, प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज, रामकृष्ण मिशन इत्यादी चळवळींनी भारतात प्रबोधन युग सुरू केले.

**४) सामाजिक कायदे :** भारतीयांनी सुरू केलेल्या सुधारणांना गती देण्यासाठी इंग्रजांनी स्त्रीबालहत्त्याबंदी कायदा (१८०४), सतीबंदी कायदा (१८२९), विधवापुनर्विवाह कायदा (१८५६), मिश्र विवाह कायदा (१८७२), बालविवाह बंदी कायदा (१९२९) इत्यादी कायदे केले. त्यामुळे सुधाधणा कार्यास कायदेशीर अधिष्ठान प्राप्त झाले.

**५) प्रगत संप्रेषण साधने :** इंग्रजानी भारतात संप्रेषणाची व वाहतुकीची प्रगत साधने (उदा. टपाल, तारायंत्र, टेलिफोन, रेडिओ, मोटार, रेल्वे, जहाजे, विमाने इ.) आणली. त्यामुळे भारतीयांची भौगोलिक गतिशिलता वाढली. देशात कोठेही जलद प्रवास करणे शक्य झाले. प्रवासात जातीचे नियम पाळणे कठीण झाले. वृत्तपत्रे व रेडिओमुळे समता, स्वातंत्र्य, बंधुत्त्व, न्याय, मानवता इत्यादी मूल्यांचा समाजात प्रसार व प्रचार करणे शक्य झाले. जुलमी इंग्रज राजवटीविरुद्ध लढा देण्यासाठी लोकमत संघटीत करणेही शक्य झाले. त्यामुळे समाजसुधारणा व स्वातंत्र्य लढा यांना अनुकूल वातावरण निर्माण झाले.

**६) ग्रामीण समुदायाचे विघटन :** प्रगत वाहतूक साधनांमुळे ग्रामीण समुदाय म्हणजेच खेडी बाह्य जगाशी जोडली गेली. त्यामुळे ग्रामीण लोक नोकरी, शिक्षण, व्यापार इत्यादीच्या निमित्ताने शहरांकडे स्थलांतर कर लागले. परिणामी बलुता पद्धती मोडकळीस आली. खेड्यांची आर्थिक स्वयंपूर्णताही संपली. इंग्रजानी महसूल गोळा करणे, न्यायदान करणे, शांतता व सुव्यवस्था राखणे इत्यादी कामासाठी आपले अधिकारी नेमल्याने परंपरागत ग्रामपंचायीतेची राजकीय स्वायत्तता नष्ट झाली. भौगोलिक गतिशीलतेस वाव मिळाल्याने संयुक्त कुटुंबातील नवीन पिढी शहरांकडे स्थलांतर करू लागली. या सर्व बाबींचा प्रभाव पडून ग्रामीण समुदायाचे विघटन सुरू झाले.

**ड) शैक्षणिक जीवनावरील प्रभाव :**

**१) सर्वांना शिक्षण खुले :** परंपरागत भारतात शिक्षण घेण्याचा हक्क केवळ उच्चवर्णीयांना होता व स्त्रीशुद्रांना तो हक्क नव्हता. राज्यकारभारात कारकुनी कामात भारतीयांची मदत व्हावी म्हणून इंग्रज सरकारने सर्व जातीधर्माच्या मुलामुलींसाठी शाळा सुरू केल्या. ख्रिस्ती धर्मप्रसारक व भारतीय समाजसुधारक यांनीही शिक्षणप्रसाराचे कार्य सुरू केले. परिणामी, सर्व भारतीयांना शिक्षण घेता येऊ लागले. अशाप्रकारे वसाहतवादी राजवट शिक्षण सर्वांना खुले झाले. म्हणजेच शिक्षणाचे सार्वत्रिकरण होण्यास प्रारंभ झाला.

**२) पाश्चिमात्त्य शिक्षणाचा प्रसार :** परंपरागत भारतीय शिक्षण मुख्यतः धार्मिक स्वरूपाचे होते. इंग्रज अधिकारी मॅकाले व राजा राममोहन रॉय सारख्या समाजसुधारकांनी पाश्चिमात्त्य देशांतील वैज्ञानिक व तांत्रिक शिक्षण इंग्रजी माध्यमातून भारतीयांना देण्यासाठी शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे सुरू केली. इंग्रजी शिक्षण हे शासकीय नोकरी मिळविण्यासाठी उपयुक्त असल्याने भारतीय लोकही इंग्रजी शिक्षणाकडे वळू लागले. परिणामी, पाश्चिमात्त्य शिक्षणाचा प्रसार होण्यास प्रारंभ झाला.

**३) शिक्षणास प्रतिष्ठा :** इंग्रजी शिक्षण घेतलेल्या कोणत्याही जातीच्या व्यक्तीस शासकीय नोकरी मिळवून त्याआधारे सत्ता, संपत्ती, मानसन्मान, प्रतिष्ठा मिळविता येऊ लागली. कनिष्ठ जातीचा शासकीय

नोकर उच्च जातीवरही अधिकार गाजवू लागला. साहजिकच व्यक्तिचा सामाजिक दर्जा जातीऐवजी शिक्षण व शासकीय नोकरी या आधारे निर्धारित होण्यास प्रारंभ झाला. यातूनच शिक्षणास प्रतिष्ठा प्राप्त झाली.

४) **सुशिक्षित वर्गाचे वर्चस्व :** परंपरागत भारतात संस्थानिक, जमीनदार, जहागिरदार, इनामदार, या वर्गाचे वर्चस्व होते. वसाहतवादी राजवटीत मात्र सुशिक्षित वर्गाचे म्हणजेच वकील, पत्रकार, प्राध्यापक, न्यायाधीश, सनदी अधिकारी इत्यादी पदावरील व्यक्तींचे वर्चस्व निर्माण झाले. त्यांनी धार्मिक, सामाजिक व राजकीय सुधारणेच्या अनेक चळवळी सुरू केल्या. परिणामी, भारतीय समाजाचे नेतृत्त्व सुशिक्षितांकडे आले.

**इ) धार्मिक जीवनावरील प्रभाव :**

१) **ख्रिस्ती धर्माचा प्रसार :** वसाहतवादी राजवट प्रस्थापित होण्यापूर्वीच भारतात ख्रिस्ती धर्मप्रसारास सुरुवात झाली होती. तथापि, भारतात ख्रिस्ती लोकांचे प्रमाण अत्यल्पच होते. वसाहतवादी राजवट सुरू झाल्यानंतर मात्र अनेक ख्रिस्ती धर्मप्रसारक भारतात आले व त्यांनी या राजवटीच्या मदतीने ख्रिस्ती धर्मप्रसाराचे कार्य मोठ्या प्रमाणावर सुरू केले. ख्रिस्ती धर्मप्रसारकांच्या सेवाभावीवृत्तीने प्रभावित झालेल्या भारतीयांनी आणि हिंदुंच्या जातीभेदास कंटाळलेल्या कनिष्ठ जातीजमातींनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला. विविध आमिषे, सेवा व कांही वेळा सक्ती अशा विविध मार्गांनी इंग्रजांनी भारतात ख्रिस्ती धर्माचा प्रसार केल्याने ख्रिस्ती लोकांची संख्या भारतात वाढत गेली.

२) **धार्मिक सुधारणांना प्रारंभ :** ख्रिस्ती धर्माचा प्रसार करताना ख्रिस्ती धर्मप्रसारक हे हिंदुधर्मावर टीका करू लागले. त्यामुळे भारतीयांच्या मनात स्वधर्माविषयी संभ्रम व न्युनतेची भावना निर्माण झाली. हा संभ्रम व न्युनतेची भावना नष्ट करून हिंदू धर्मात व हिंदू समाजात सुधारणा करण्यासाठी अनेक चळवळी (ब्राह्मो समाज, आर्य समाज, सत्यशोधक समाज, प्रार्थना समाज इ.) सुरू झाल्या. या चळवळींनी हिंदू धर्मातील व समाजातील अनिष्ट प्रथांचे निर्मूलन करण्याचे कार्य सुरू केले.

३) **धर्मनिरपेक्षतेची ओळख :** परंपरागत भारतीय समाजावर धर्माचा मोठा प्रभाव होता. वसाहतवादी राजवटीने भारतात वैज्ञानिक-तांत्रिक शिक्षण सुरू केले तसेच अनेक भौतिक सुधारणा घडवून आणल्या. याचा परिणाम म्हणून धर्माचा प्रभाव हळूहळू कमी होऊ लागला. इंग्रजांनी सर्व जातीधर्मासाठी समान कायदे, न्यायव्यवस्था व प्रशासन यंत्रणा लागू केली. तसेच जातीधर्माच्या आधारे होणारा भेदभाव नष्ट करण्याचाही प्रयत्न केला. तसेच विविध कायदे करून अनिष्ट प्रथापरंपराही नष्ट करण्याचा प्रयत्न केला. व्यक्तीची जातपात न पाहता केवळ शैक्षणिक पात्रेतच्या आधारे नोकरी देणे सुरू केले. याचाच परिणाम म्हणून भारतीयांना धर्म निरपेक्षतेच्या संकल्पनेची ओळख झाली. भारतात धर्मनिरपेक्षीकरणाची प्रक्रिया सुरू झाली.

४) **हिंदु-मुस्लिमात फूट :** १८५७ च्या उठावात हिंदू व मुस्लिम एक होऊन इंग्रज सत्तेविरुद्ध लढले होते. यातून बोध घेऊन इंग्रजानी आपली सत्ता टिकविण्यासाठी 'फोडा व राज्य करा' हे धोरण राबवून हिंदू व मुस्लिमांत फूट पाडली. त्यासाठी बंगालची फाळणीही केली. मात्र हिंदू व मुस्लिमांनी एकजुटीने ही फाळणी रद्द करण्यास इंग्रजांना भाग पाडले. पण पुढे ही एकजूट टिकली नाही. इंग्रजांनी हिंदू व मुस्लिम नेत्यांना एकमेकांच्या विरोधात उभे केले. यातूनच द्विराष्ट्रवाद उदयास येऊन देशाची फाळणी झाली. फाळणीनंतर प्रचंड दंगली उद्भवल्या व जीवीतवित्ताची मोठी हानी झाली. परिणामी, हिंदु-मुस्लिमांत कटुता निर्माण झाली. ही कटुता आजही टिकून असल्याचे दिसते.

**फ) सांस्कृतिक जीवनावरील प्रभाव :**

**१) वेशभूषा, केशभूषा, खाणेपिणे व शिष्टाचार** : वसाहतवादी राजवटीच्या काळात भारतीयांनी विशेषतः उच्चशिक्षित व उच्चभ्रु लोकांनी पाश्चात्त्य संस्कृतीतील वेशभूषा, केशभूषा, खाणेपिणे, शिष्टाचार याबाबतच्या पद्धती व सवयी स्वीकारल्या. पुरूष पँट, शर्ट, कोट, टाय, हॅट वापरू लागले. ते केस व कल्ले राखू लागले. स्त्रियांनी इंग्रजी स्त्रियांसारखे केस कापणे व पोशाख करणे सुरू केले. परंपरेने निषिद्ध मानलेले धुम्रपान, मद्यपान, मांसाहार इ. गोष्टी इंग्रजनिष्ठ भारतीय आवडीने करू लागले. डायनिंग टेबलबर बसून काट्याचमच्याने खाणे, चहा-कॉफी, ब्रेड, बिस्किटे, केक, इत्यादीचे सेवन करणे, पार्ट्या देणे इत्यादीचे अनुकरण सुरू झाले. हाय-हॅलो करणे, गुडमॉर्निंग-गुडनाईट म्हणणे, सार्वजनिक ठिकाणी स्त्रीपुरुषांनी आलिंगन देणे, चुंबन घेणे, क्लब व पार्टीत एकत्र नृत्य करणे इत्यादी शिष्टाचारही रूढ झाले.

**२) उच्च जीवनमान :** परंपरागत भारतीयांचे जीवन साधे, धर्मप्रधान व रूढीप्रिय होते. पाश्चात्यांच्या संपर्काने अनुभवनिष्ठ व वैज्ञानिक विचार प्रमाण मानणे, विवेकनिष्ठ व कायदेशीर आचरणास प्राधान्य देणे, जीवनमान (राहणीमान) उच्च दर्जाचे ठेवणे (उदा. शिक्षण घेणे, आरोग्याची काळजी घेणे, स्वच्छता पाळणे, आजारात डॉक्टरकडून उपचार घेणे, उंच व हवेशीर घरे बांधणे, भौतिक सुखोपभोग घेणे इ.) इत्यादींचे अनुकरण भारतीयांनी सुरू केले.

**३) भाषा व साहित्य :** वसाहतवादी राजवटीत 'इंग्रजी' ही राज्यकारभाराची व पाश्चात्त्य शिक्षण घेण्याची भाषा बनल्याने तिला महत्त्व आले. परिणामी, संस्कृत, उर्दू, फारसी भाषांचे महत्त्व कमी झाले. मात्र ख्रिस्ती धर्मप्रसारकांनी धर्म प्रसारासाठी जनसंपर्क वाढविण्याच्या उद्देशाने भारतीय भाषा बोलणे, धार्मिक साहित्य भारतीय भाषांत प्रकाशित करणे यास प्राधान्य दिले. परिणामी भारतीय भाषांच्या विकासास चालना मिळाली. अनेक पाश्चात्त्य विद्वानांनी प्राचीन भारतीय साहित्याचा अभ्यास करून त्यातील विचार जगासमोर आणले. त्यामुळे जगाला प्राचीन भारतीय संस्कृतीच्या वैभवशाली वारशाची ओळख झाली. पाश्चात्त्य भाषांतील उत्तम ग्रंथांचे भारतीय भाषांत अनुवाद होऊ लागले. त्यामुळे पाश्चात्त्य ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, तत्त्वज्ञान यांचीही भारतीयांना ओळख झाली.

**४) कला, क्रीडा व मनोरंजन :** वसाहतवादी राजवटीत भारतात पाश्चिमात्त्य कला, क्रीडा, मनोरंजन प्रकार रूढ झाले. पाश्चिमात्त्य वास्तुकला, शिल्पकला, चित्रकला, नृत्यकला, गीत-संगीत तसेच क्रिकेट, टेनिस, बिलिअर्ड, गोल्फ, पोलो इत्यादी खेळ आणि रेडिओ, चित्रपट, दूरचित्रवाणी इत्यादी मनोरंजन साधने भारतात हळूहळू लोकप्रिय होत गेली.

अशाप्रकारे इंग्रजाच्या वसाहतवादी राजवटीचा भारतीय समाजाच्या सर्व अंगावर लक्षणीय प्रभाव पडला. त्यातून भारतात आमूलाग्र सामाजिक परिवर्तन घडून येण्यास प्रारंभ झाला. भारतात आधुनिक युगाची सुरुवात झाली.

**१.३.३ भारतातील जातिव्यवस्थेची वैशिष्ट्ये आणि उत्पत्ती** (Origin and Features of Caste System in India) :

भारतातील परंपरागत सामाजिक संघटनाच्या संदर्भात तुम्ही आतापर्यंत हिंदू, बौद्ध, जैन व शीख या समुदायांचा अभ्यास केला आहे. तसेच इस्लाम व वसाहतवादी राजवटीचा भारतीय सभाजावर पडलेला प्रभावही अभ्यासलेला आहे. भारतीय समाजाचे आकलन होण्यासाठी तुम्हाला भारतातील जातिव्यवस्थेचे स्वरूपदेखील अभ्यासावे लागणार आहे. कारण जातिव्यवस्थेचा भारतीय समाजावर मोठा प्रभाव आहे.

भारतातील व्यक्तीचे जीवन, येथील विविध सामाजिक समूह व सामाजिक संस्था यामध्ये जातिव्यवस्थेची मूळे खोलवर रूजलेली आहेत. भारतीय समाज जीवनाचे असे एकही अंग नाही की ज्यावर जातिव्यवस्थेचा प्रभाव पडलेला नाही. मूलतः हिंदू समाजाचे वैशिष्ट्य असलेली जातिव्यवस्था ही कालाच्या ओघात इतर समुदायातही थोड्याफार फरकाने उदयास आली. हिंदुंच्या संपर्कामुळे भारतातील बौद्ध, जैन, शीख, ख्रिस्ती, इस्लाम इत्यादी समुदायातही जातिव्यवस्थेने आपले हातपाय पसरलेले आढळतात. त्यामुळे केवळ हिंदू समाजाचेच नव्हे, तर एकंदर भारतीय समाजाचे यथार्थ आकलन होण्यासाठी जातिव्यवस्थेचा अभ्यास करणे अपरिहार्य ठरते. म्हणून या घटकात तुम्ही जातीचा अर्थ, व्याख्या, वैशिष्ट्ये व जातीच्या उदयाविषयीचे म्हणजेच उत्पत्तीविषयीचे विविध सिद्धांत अभ्यासणार आहात.

**जातिव्यवस्थेचे स्थूल स्वरूप :** प्राचीन काळात भारतातील हिंदू समाज हा ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र अशा चार वर्गात म्हणजेच वर्णात विभागला गेला. प्रत्येक वर्णाचा सामाजिक दर्जा, व्यवसाय व जीवनपद्धती निर्धारित झाली. सुरुवातीला व्यक्तीचा वर्ण गुणकर्माच्या आधारे ठरे. नंतर मात्र तो जन्माधारे ठरू लागला. म्हणजे मातापित्याचा जो वर्ण असेल तोच वर्ण अपत्याचा मानला जाऊ लागला. व्यक्तीला स्वकर्तृत्वाने वर्ण बदलण्याचे स्वातंत्र्य नाकारले गेले. त्यामुळे सुरुवातीस लवचिक असलेली वर्णव्यवस्था पुढे ताठर बनली. कालाच्या ओघात लोकसंख्या वाढली, गरजा वाढल्या त्यामुळे दर्जा, व्यवसाय, विवाह, सांस्कृतिक जीवन, सामाजिक संबंध इत्यादी विषयीचे नियम बदलत गेले व त्यातून प्रत्येक वर्णात अनेक समूह व उपसमूह उदयास आले. या समूह व उपसमूहांनाच जाती व उपजाती म्हणून संबोधले जाऊ लागले. या जाती व उपजातीतील परस्पर संबंधांची एक व्यवस्था निर्माण झाली तिलाच जातिव्यवस्था म्हटले जाऊ लागले. अशा या जातिव्यवस्थेत व्यक्तिची जात जन्माने निश्चित होऊ लागली. आणि व्यक्तीचे समाजातील स्थान वा दर्जा, व्यवसाय, विवाहाचा जोडीदार सामाजिक संपर्काचे क्षेत्र, जीवनशैली इत्यादी बाबी ह्या जातीवरूनच ठरू लागल्या. आणि त्यामध्ये बदल करण्यास बंदी घालण्यात आली. परिणामी जातिव्यवस्था ही बंदिस्त अशी व्यवस्था (Closed System) बनली. समाजशास्त्रीय भाषेत सांगावयाचे झाल्यास जातिव्यवस्था सामाजिक स्तरीकरणाचा बंदिस्त प्रकार आहे. अशी ही जातिव्यवस्था, शतकानुशतके टिकून राहिली. परिणामी, भारतीय समाज जीवनावर तिचा विलक्षण प्रभाव पडला. म्हणून भारतीय समाजाचे आकलन होण्यासाठी या व्यवस्थेचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.

**जातीचा अर्थ :** जात या शब्दासाठी वापरला जाणारा Caste हा इंग्रजी शब्द पोर्तुगीज भाषेतील Casta या शब्दापासून बनला असून त्याचा अर्थ 'वंशशुद्धता' असा आहे. त्यानुसार जात म्हणजे वंशशुद्धतेवर आधारलेला समूह असा अर्थ होतो. पण जात हा समूह वंशशुद्धतेचा निर्देश करीत नाही असे अनेक विचारवंतांना वाटते. 'जात' हा मराठी शब्द 'जत' या शब्दापासून बनला असून त्याचा अर्थ जन्म घेणे असा आहे. त्यामुळे जात हा जन्माच्या आधारे निर्माण होणारा समूह आहे असा अर्थ होतो. तथापि, जात हा अत्यंत गुंतागुंतीचा समूह असून जातिव्यवस्थेस अनेक अंगे आहेत त्या सर्व अंगांचे यथार्थ आकलन Caste किंवा जात या शब्दाद्वारे होत नाही. त्यामुळे जात म्हणजे काय हे समजण्यासाठी विविध अभ्यासकांनी जातीच्या केलेल्या व्याख्या पाहणे अधिक योग्य ठरते.

**जातीची व्याख्या :** जातीच्या कांही व्याख्या पुढीलप्रमाणे

**१) चार्लस कूले :** जेंव्हा एखादा वर्ग पूर्णपणे आनुवंशिकतेवर आधारलेला असतो तेंव्हा त्यास आपण जात म्हणू शकतो.

२) **मार्टिनडेल व मोनाकेसी :** जात म्हणजे अशा व्यक्तिंचा समूह की ज्यामध्ये व्यक्तिची कर्तव्ये व हक्क जन्माधारे निश्चित होतात व ज्याला धर्माची मान्यता असते.

३) **मजूमदार व मदन :** जात हा एक बंद वर्ग आहे.

४) **डॉ. व्यंकटेश केतकर** : जातीची दोन वैशिष्ट्ये आहेत. अ) विशिष्ट जातीतील सदस्यांच्या पोटी जन्मलेल्या व्यक्तींनाच त्या जातीचे सदस्यत्व प्राप्त होते. ब) आपल्या सदस्यांना आपल्या जातीबाहेरील व्यक्तीशी विवाह करण्यास कडक सामाजिक नियमनांद्वारे प्रतिबंध केला जातो.

५) **डॉ. बाबासाहेब आंबेडकर :** अंतर्विवाहाचे बहिर्विवाहावरील वर्चस्व म्हणजे जातीची निर्मिती होय. जात हा एक बंद वर्ग आहे.

६) **प्रा. मुखर्जी :** जात ही प्रामुख्याने जन्मावर आधारलेली, समाजाचे विविध विभागात विभाजन करणारी गतिशील व्यवस्था असून ती आपल्या सदस्यांवर खाणेपिणे, विवाह, व्यवसाय व सामाजिक व्यवहार याबाबतीत कमीजास्त प्रमाणात निर्बंध घालते.

७) **ई. ए. ब्लंट :** जात हा अंतर्विवाही समूह आहे किंवा अंतर्विवाही समुहांचे संकलन आहे; ज्याला एक सामान्य नाव असते, ज्याचे सदस्यत्व आनुवंशिक असते, जो आपल्या सदस्यांच्या सामाजिक संपर्कावर कांही निर्बंध घालतो, एका सामान्य परंपरागत व्यवसायाचा अवलंब करतो, समान उत्पत्तीचा दावा करतो आणि साधारणपणे एक सजातीय समुदाय आकारास आणणारा मानला जातो.

८) **ए. डब्लू ग्रीन :** जात स्तरीकरणाची अशी व्यवस्था आहे की, जिच्यामध्ये निदान तत्त्वतः तरी गतिशीलता म्हणजे दर्जाच्या अधिक्रमी रचनेत वर खाली जाण्याची क्रिया घडू शकत नाही. व्यक्तीला जन्माने प्राप्त होणारा दर्जा आयुष्यभर कायम राहतो. एखाद्याचा व्यवसाय, निवासस्थान, जीवनशैली, व्यक्तिगत सहयोगी, विवाहाचा जोडीदार निवडीचा समूह इत्यादी गोष्टी जन्माने निर्धारित होतात. जातिव्यवस्थेत उच्च जातीच्या व्यक्तीपेक्षा कनिष्ठ जातीतील व्यक्ती निम्न दर्जाच्या मानल्या जातात. जातिव्यवस्था ही कायद्याने संरक्षित केलेली असून तिला धर्माची संमती आहे.

**उपरोक्त व्याख्यांचे परीक्षण :** वरील व्याख्या परिपूर्ण व समाधानकारक नाहीत. कारण त्या जातीच्या कोणत्यातरी ठळक वैशिष्ट्यांवर भर देतात. जातीचे सदस्यत्व जन्माने प्राप्त होते व जात बदलता येत नाही हे महत्त्वाचे वैशिष्ट्य सर्वच व्याख्यांत नमूद केलेले आहे, पण इतर वैशिष्ट्ये विचारात घेतलेली नाहीत. उदा. पहिल्या तीन व्याख्या अशाच आहेत. डॉ. केतकर व डॉ. आंबेडकर यांच्या व्याख्येत जात अंतर्विवाही समूह असून त्याचे सदस्यत्व जन्माने मिळते व ते बदलता येत नाही. या वैशिष्ट्यांचा उल्लेख आहे. व्यवसाय, खाणेपिणे व सामाजिक संपर्कावरील निर्बंध, श्रेष्ठ-कनिष्ठत्वाची भावना, दर्जा इत्यादीबाबतचे जातीचे जे निर्बंध आहेत त्यांचा उल्लेख त्यांच्या व्याख्यांत नाही. या निर्बंधांचा उल्लेख प्रा. मुखर्जी, ब्लंट व ग्रीन यांच्या व्याख्येत आहे. मात्र मुखर्जी जातीला गतिशील व्यवस्था मानतात हे न पटणारे आहे. ब्लंट यांनी समान उत्पत्ती हे जातीचे एक वैशिष्ट्य मानले आहे, पण ते खरे नाही. कारण एका जातीचे सर्व सदस्य हे आपल्या सर्वांचा पूर्वज एकच आहे असे मानीत नाहीत. (आदिम जमाती तसे मानतात.) तुलनेने ग्रीनची व्याख्या स्पष्टीकरणात्मक असल्याने अधिक समाधानकारक आहे. तथापि, त्यांची व्याख्या ही व्याख्या न वाटता, वर्णन वाटते.

थोडक्यात, जातीची सर्वमान्य होईल अशी व्याख्या करणे कठीण आहे. म्हणूनच डॉ. हटन, ए. के. दत्त, डॉ. जी. एस. घुर्ये इत्यादींनी जातीची व्याख्या न करता तिची वैशिष्ट्ये सांगून जातिव्यवस्थेचे स्वरूप स्पष्ट केलेले आहे. आपणही जातीची वैशिष्ट्ये अभ्यासून तिचे स्वरूप समजावून घेऊ या.

**जातीची वैशिष्ट्ये :**

**१) जातीचा आधार जन्म :** जात जन्माने ठरते व ती मरेपर्यंत कायम राहते. जातीच्या आधारे व्यक्तीचा सामाजिक दर्जा ठरतो व तो तिला स्वकर्तृत्वाने बदलता येत नाही. तसेच जातीआधारेच व्यक्तीचा व्यवसाय, विवाहाचा जोडीदार निवडण्याचे क्षेत्र, जीवनशैली, सामाजिक संपर्क या बाबीही निर्धारित होतात. याबाबतचे जातीचे निश्चित नियम होते व त्यांचे पालन होते की नाही हे पाहण्यासाठी पूर्वी बहुतेक जातीची नियामक मंडळे म्हणजेच जातपंचायती होत्या. जातीचे नियम न पाळणाऱ्या सदस्यास जातपंचायती शिक्षा करीत. त्यामुळे व्यक्ती समुदायाच्या नियंत्रणापेक्षा जातीच्या नियंत्रणास अधिक महत्त्व देत. त्यामुळे व्यक्तीच्या मनात समुदायनिष्ठा निर्माण होण्याऐवजी संकुचित जातीनिष्ठा निर्माण झाली. या जातीनिष्ठेमुळेच प्रत्येक जात इतर जातीहून स्वतंत्र व वेगळी ठरली. आणि जातींच्या आधारे भारतीय समाज अनेक खंडात (गटात) विभागला गेला. यालाच डॉ. घुर्ये यांनी समाजाचे खंडात्मक विभाजन असे म्हटले आहे.

**२. अधिक्रमी रचना :** जातिव्यवस्था ही सामाजिक स्तरीकरणाची व्यवस्था असल्याने तिच्यात श्रेष्ठकनिष्ठतेच्या भावनेवर आधारलेली अधिक्रमी रचना किंवा सोपानपरंपरा (Hierarchy) निर्माण झालेली आहे. म्हणजेच कांही जातीचा दर्जा श्रेष्ठ, कांहीचा कनिष्ठ तर कांहीचा मध्यम मानला आहे. जातिव्यवस्थेचा मूलाधार असलेल्या वर्णव्यवस्थेत ब्राह्मणाचा दर्जा सर्वश्रेष्ठ, त्यानंतर क्षत्रियाचा, त्याच्या खालोखाल वैश्याचा तर सर्वात कनिष्ठ दर्जा शूद्र वर्णाचा मानला गेला. जातिव्यवस्थेतही ब्राह्मणाचा दर्जा सर्वश्रेष्ठ व शूद्राचा सर्वात कनिष्ठच मानला गेला. तथापि इतर जातींच्या दर्जाबाबत मात्र निश्चितता आढळत नाही. यापैकी कांही जाती इतरांपेक्षा आपला दर्जा श्रेष्ठ असल्याचा दावा करतात. उदा. महाराष्ट्रात कुणबी, सोनार, तेली, कोष्टी ह्यासारख्या जातींमध्ये आणि उत्तर भारतातील ठाकूर, यादव, पटेल, राजपूत, जाट इत्यादी जातीमध्ये श्रेष्ठकनिष्ठत्वाबाबत मतभेद आढळतात. दक्षिण भारतात 'कम्मलन' जात आपला दर्जा ब्राह्मणापेक्षा श्रेष्ठ मानते. जातीप्रमाणेच उपजातीत किंवा पोटजातीतही श्रेष्ठ कनिष्ठत्वाची भावना आढळते. उदा. ब्राह्मण जात सर्वश्रेष्ठ आहे पण तिच्यातही कांही पोटजाती असून 'किरवंत' या पोटजातीस सर्वात कनिष्ठ मानले जाते. सुतार जातीतील 'पांचाळ' ही पोटजात इतर पोटजातीपेक्षा स्वतःस श्रेष्ठ मानते. अस्पृश्य जातीतील चांभार जात महारापेक्षा स्वतःस श्रेष्ठ मानते तर महार जात मांगापेक्षा स्वतःस श्रेष्ठ मानते. अशाप्रकारे प्रत्येक जातीत व पोटजातीत श्रेष्ठकनिष्ठत्वाच्या भावनेवर आधारलेली अधिक्रमी रचना आढळते.

**३. विशेषाधिकार आणि अपात्रता :** जातीच्या रचनेत श्रेष्ठ जातींना विशेषतः ब्राह्मण जातीस अनेक विशेष अधिकार व सवलती बहाल केल्या तर कनिष्ठ जातींवर विशेषतः अस्पृश्य जातींवर अनेक अपात्रता लादल्या आहेत. ब्राह्मण हा सर्वश्रेष्ठ, वंदनिय व अपिडनिय मानला. ब्राह्मणास 'भूदेव' मानून ब्राह्मण हत्या महापातक ठरविले. इतरांच्या नमस्कारास प्रतिनमस्कार न करता ब्राह्मण केवळ आशिर्वाद देई. अध्ययन, अध्यापन, पौरोहित्य, वेदमंत्र इत्यादीबाबतचे अधिकार प्राधान्याने ब्राह्मणास दिले गेले. त्याखालोखाल इतर श्रेष्ठ जातींना कांही खास अधिकार व सवलती दिल्या. याउलट अस्पृश्य जातींना जीवनावश्यक अधिकार नाकारून त्यांच्यावर अनेक अपात्रता लादल्या. उदा. अस्पृश्यांना उच्च जातीच्या वस्तीत घर बांधणे, त्यांच्या पाणवठ्यावर, मंदिरात, स्मशानभूमीत प्रवेश करणे, वेदमंत्र ऐकणे व उच्चारणे, शिक्षण घेणे, उंची वस्त्रे, पादत्राणे, छत्री, सुवर्णालंकार इत्यादी वापरणे, इत्यादी गोष्टींस मनाई केली. अस्पृश्यांच्या सावलीचाही

विटाळ मानला गेला. म्हणूनच पुण्यात पेशवाईच्या काळात अस्पृश्यांना सावली ज्यावेळी लांब पडते त्यावेळी महामार्गावरून फिरण्यास मनाई केली. तसेच त्यांनी रस्त्यावर थुंकू नये म्हणून त्यांच्या गळ्यात थुंकण्यासाठी मडके बांधण्याची सक्ती केली. गुजरातमध्ये अस्पृश्यांना आपण अस्पृश्य आहोत हे दर्शविण्यासाठी जनावराची शिंगे जवळ बाळगावी लागत. तर पंजाबात भंग्याला आपण येत असल्याची वर्दी ओरडून द्यावी लागे. अशाप्रकारे विशेषाधिकार व अपात्रता यांच्यामुळे भारतीय समाजात प्रचंड सामाजिक विषमता निर्माण झाली.

४. **व्यवसाय स्वातंत्र्याचा अभाव :** जातिव्यवस्थेत प्रत्येक जातीचा एक परंपरागत व्यवसाय निर्धारित करून व्यक्तीला आपल्या जातीचाच व्यवसाय करण्याचे बंधन घातले. आपल्या आवडीप्रमाणे व्यवसाय निवडण्याचे किंवा बदलण्याचे स्वातंत्र्य नाकारले गेले. विविध व्यवसायांशी श्रेष्ठकनिष्ठत्वाची व पवित्र-अपवित्रतेची भावना जोडली गेली. श्रेष्ठ जातींचे व्यवसाय उच्च व पवित्र मानले तर कनिष्ठ जातींचे व्यवसाय नीच व अपवित्र मानले. कनिष्ठ जातींना उच्च जातीचे व्यवसाय करण्यास मनाई केली. प्रत्येक जातीचा एक ठराविक व्यवसाय असला तरी एकच व्यवसाय अनेक जाती करताना आढळतात. उदा. शेती, व्यापार, लष्करी सेवा इत्यादी व्यवसाय विविध जाती करताना आढळत.

५. **विवाहावरील निर्बंध :** जात हा अंतर्विवाही समूह आहे. व्यक्तीला आपल्या जातीतूनच विवाहाचा जोडीदार निवडण्याचा कडक निर्बंध घातलेला आढळतो. परजातीतील व्यक्तिशी विवाह करणे निषिद्ध ठरविले. एकाच जातीतील पोटजातीही अंतर्विवाहाचा नियम पाळतात. जातीचे सदस्यत्व जन्माने मिळते या तत्त्वाशी हा नियम सुसंगत ठरतो. वंशशुद्धता टिकविण्याची भावना या नियमामागे असल्याचे दिसते. अर्थात अनुलोम विवाह (उच्च जातीतील पुरुष व कनिष्ठ जातीतील स्त्री यांचा विवाह) आणि प्रतिलोम विवाह (उच्च जातीतील स्त्री व कनिष्ठ जातीतील पुरुष यांचा विवाह) अंतर्विवाहाच्या नियमास अपवाद ठरविले. तथापि अनुलोम विवाह कनिष्ठ दर्जाचा तर प्रतिलोम विवाह निषिद्ध मानला. त्यामुळे अंतर्विवाहाचे पालन जवळपास अनिवार्यच बनले. आज आंतरजातीय विवाह कायदेशीर मानला असला तरी बहुसंख्य लोक स्वजातीतील व्यक्तीशीच विवाह करताना दिसतात.

६. **खाणेपिणे आणि सामाजिक संपर्काबाबतचे निर्बंध :** व्यक्तीने कोणत्या जातीतील लोकांकडून अन्नपाणी स्वीकारावे, कोणाच्या पंगतीला बसून भोजन घ्यावे याबाबतचेही जातीचे कांही निर्बंध आहेत. साधारणतः उच्च जाती कनिष्ठ जातीच्या हातचे अन्नपाणी स्वीकारणे व त्यांच्या पंगतीला बसून भोजन घेणे निषिद्ध मानतात. यासंदर्भात प्रदेशपरत्वे भिन्नता आढळते. उदा. उत्तर भारतातील कांही उच्च जाती कनिष्ठ जातीकडून पक्के अन्न (दुधातुपातून बनविलेले खाद्यपदार्थ) स्वीकारतात. मात्र कच्चे अन्न (पाण्यात बनविलेले खाद्यपदार्थ) स्वीकारत नाहीत. महाराष्ट्रात उच्च जाती कनिष्ठ जातीनी बनविलेले खाद्यपदार्थ (भात, भाकरी, पोळी इत्यादी) स्वीकारत नाहीत मात्र तांदुळ, डाळी पीठ स्वीकारतात. यास कोरडा शिधा असे म्हणतात. कनिष्ठ जाती मात्र उच्च जातीकडून कोणत्याही प्रकारचे अन्न आनंदाने स्वीकारतात.

खाण्यापिण्याप्रमाणेच सामाजिक संपर्काबाबतचे निर्बंध आढळतात. उच्च जाती कनिष्ठ जातीशी घनिष्ठ असा शारीरिक व सामाजिक संपर्क ठेवणे, त्यांच्यात उठबस करणे निषिद्ध व कमीपणाचे मानतात. कनिष्ठ जातीतील व्यक्तीने उच्च जातीतील व्यक्तीशी नेहमी अदबीने वागावे, त्याच्यापासून ठराविक अंतर ठेवून संभाषण करावे असेही नियम आढळतात. उदा. दक्षिण भारतात 'तिया' या अस्पृश्य जातीच्या व्यक्तीने १२ पावले दूर राहून तर 'इलायन वाशानारायण' या जातीने २४ पावले दूर राहून उच्च जातीशी व्यवहार करावा असा नियम होता. यालाच 'आपल्या पायरीने वागणे' असे म्हणतात. जातीजातीतील सामाजिक संपर्काबाबतची ही पायरी म्हणजेच मर्यादा पाळणे व्यक्तीला अनिवार्य असे.

**७. धर्माचा आधार :** जातिव्यवस्थेला हिंदू धर्माचा आधार दिलेला असतो. जातिव्यवस्थेचे वरील सर्व नियम हे धर्माच्या आधारे लोकांच्या मनावर बिंबविण्यात आले. जाती नियमांचे पालन हे धर्मपालन ठरविले. हिंदूधर्मातील कर्म व पुनर्जन्म सिद्धांताचा आधार जातीच्या नियमांना दिला गेला. गतजन्मातील शुभाशुभ कर्मांचा परिणाम (फळ) म्हणून सांप्रत (सध्याच्या) जीवनात अनुक्रमे उच्च व नीच जातीत जन्म मिळतो. सांप्रत जीवनात जी व्यक्ती स्वजातीचे नियम निष्ठेने पाळते तिला पुढील जन्मी उच्च जात प्राप्त होते असे समाजात रुजविले. त्यामुळे लोकांच्या मनावर जातिच्या नियमांचा पगडा बसला व ते हे नियम निष्ठेने पाळीत आले. परिणामी, जातिव्यवस्था शतकानुशतके टिकून राहिली.

जातीची वरील वैशिष्ट्ये ही पारंपारिक भारतातील आहेत. आधुनिक काळात पाश्चात्त्य संस्कृती व शिक्षण, औद्योगिकीकरण, नागरीकरण, भांडवलशाही अर्थव्यवस्था, दळणवळणाची प्रगत साधने, सामाजिक सुधारणा चळवळी, लोकशाही व्यवस्था, घटनात्मक व कायदेशीर तरतूदी इत्यादी घटकांचा प्रभाव पडून जातीची वरील वैशिष्ट्ये बदलू लागली आहेत. जातीचे कांही नियम नष्ट झाले आहेत तर कांही बरेच शिथिल झाले आहेत. औद्योगिक-नागरी समाजावरील जातीचा प्रभाव खूपच कमी झाला आहे. पण, ग्रामीण समाजावरील हा प्रभाव अद्यापही बऱ्याच प्रमाणात टिकून आहे.

**जातिव्यवस्थेची उत्पत्ती (उदय) :**

जातिव्यवस्थेची व्याख्या व वैशिष्ट्ये अभ्यासल्यानंतर आता तुम्ही तिची उत्पत्ती अभ्यासणार आहात. जातिव्यवस्था ही अत्यंत संकीर्ण व्यवस्था असून तिच्यात प्रदेशपरत्वे मोठी भिन्नता आढळते. शिवाय कालपरत्वे तिच्यामध्ये मोठे बदलही घडून आलेले आहेत. त्यामुळे जातिव्यवस्थेची उत्पत्ती कशी झाली हे स्पष्ट करणे अवघड जाते. वेगवेगळ्या अभ्यासकांनी जातिव्यवस्थेच्या उत्पत्तीविषयी वेगवेगळे सिद्धांत मांडलेले आहेत. त्यापैकी कांही प्रमुख सिद्धांत पुढीलप्रमाणे:

**१) पारंपरिक सिद्धांत :** प्राचीन ग्रंथ ऋग्वेदाच्या पुरूष सुक्तातील एका ऋचेत जातिव्यवस्था ही ईश्वराने निर्माण केलेली आहे असे सांगितलेले आहे. या ऋचेनुसार ब्रह्माच्या मुखापासून ब्राह्मण, बाहुपासून क्षत्रिय, मांड्यापासून वैश्य व पायापासून शूद्र हे चार वर्ण निर्माण झाले. समाजाचे अस्तित्व टिकविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या गरजांच्या पूर्ततेसाठी पार पाडावयाच्या कार्यांचे ईश्वराने या चार वर्णात विभाजन केले. या विभाजनानुसार ब्राह्मण हे ब्रह्माच्या मुखापासून उत्पन्न झाल्याने त्यांचे कार्य अध्ययन-अध्यापन हे ठरले. कारण मुखातून वाणी (वाचा) निर्माण होते. क्षत्रिय हे बाहुपासून उत्पन्न झाल्याने त्यांचे कार्य संरक्षण हे ठरले. कारण बाहु हे सामर्थ्याचे प्रतीक आहे. वैश्य हे मांड्यापासून उत्पन्न झाल्याने कृषी, व्यापार, पशुपालन इत्यादी उत्पादक कार्य त्यांचे ठरले. कारण मांड्याचा संबंध पुनरोत्पादनाशी आहे. शूद्र हे पायापासून जन्मल्याने वरील तीन वर्णांची सेवा करणे हे त्यांचे कार्य ठरले. कारण पायाचा संबंध देहास आधार देण्याशी आहे.

मनुस्मृती या ग्रंथातही चार वर्णांची उत्पत्ती वरीलप्रमाणेच झाली आहे असे मत मांडलेले आढळते. या चार वर्णांच्या संकरातून पुढे विविध जाती व उपजाती निर्माण झाल्या असे मत मनू, वसिष्ठ, बोधायन, गौतम इत्यादी ऋषींनी मांडलेले आहे. भगवद्‌गीता या ग्रंथात श्रीकृष्णाने असे म्हटले आहे की, हे चार वर्ण मी गुणकर्माच्या आधारे निर्माण केलेले आहेत. (चातुर्वर्ण्य मया सृष्टं गुणकर्मविभागशः) थोडक्यात, प्राचीन भारतीय धर्मग्रंथानुसार जातिव्यवस्थाही ईश्वरनिर्मित आहे. या मतास पारंपरिक सिद्धांत म्हणतात.

**परीक्षण :** या सिद्धांतावर पुढीलप्रमाणे टीका केली जाते.

१) ईश्वर हा अनुभवजन्य नसल्याने हा सिद्धांत अवैज्ञानिक ठरतो. हा सिद्धांत अवैज्ञानिक ठरतो. हा सिद्धांत हा वर्णव्यवस्थेच्या उदयासंबंधीचे केवळ काल्पनिक व अलंकारीक वर्णन आहे.

२) वर्ण व जात या वेगवेगळ्या संकल्पना आहेत. चार वर्णातून पुढे हजारो जाती व उपजाती कशा उदयास आल्या याचे समाधानकारक स्पष्टीकरण या सिद्धांताद्वारे मिळत नाही.

३) या सिद्धांताद्वारे वर्णावर्णात व जातीजातीत श्रेष्ठ-कनिष्ठत्व कसे निर्माण झाले याचेही स्पष्टीकरण मिळत नाही. थोडक्यात, आजच्या विज्ञान युगात हा सिद्धांत पूर्णतः अमान्य ठरतो.

**२) धार्मिक सिद्धांत :** पाश्चात्त्य विचारवंत आर्थर एम. होकार्ट व सेनार्ट यांच्यामते जातिव्यवस्थेचा उदय धार्मिक घटकामुळे झालेला आहे.

**(अ) होकार्ट** यांच्या मते प्राचीन काळात धार्मिक विधींना महत्त्व होते. कांही धार्मिक विधी पवित्र तर कांही अपवित्र मानले जात. पवित्र विधी करणाऱ्या मानवी समूहांचा म्हणजेच जातींचा दर्जा श्रेष्ठ मानला तर अपवित्र विधी (उदा. देवतांपुढे पशुबळी देणे) करणाऱ्या समूहांचा दर्जा कनिष्ठ मानला. विविध धार्मिक विधी करणारे असे विविध समूह तयार होऊन त्यांचे सामाजिक स्थान व दर्जा निर्धारित केला गेला. महत्त्वाचे विधी करणाऱ्या समूहांचा दर्जा श्रेष्ठ तर कमी महत्त्वाचे विधी करणाऱ्यांचा दर्जा कनिष्ठ ठरविला. यातूनच विविध जाती उदयास आल्या. होकार्टनी श्रीलंकेतील बुद्धाचा दात असलेल्या मंदिरातील विधी पाहून आपला सिद्धांत मांडला.

**परीक्षण :** होकार्टच्या सिद्धांतावर पुढीलप्रमाणे टीका केली जाते.

१) हा सिद्धांत केवळ धार्मिक घटकांमुळेच जाती उदयास आल्या असे सांगतो व जातीच्या उदयास जबाबदार असणाऱ्या इतर घटकांकडे (उदा. व्यवसाय, वंश) दुर्लक्ष करतो. त्यामुळे तो एकांगी सिद्धांत ठरतो.

२) डॉ. हटनच्या मते जातीचे खाणेपिणे, विवाह, सामाजिक संपर्क इत्यादीबाबतचे जे नियम आहेत त्यांचे स्पष्टीकरण होकार्टच्या सिद्धांतात मिळत नाही.

३) होकार्ट यांनी भारतातील जातिव्यवस्थेचा अनुभवजन्य अभ्यास केलेला नसल्याने त्यांचा सिद्धांत अवैज्ञानिक ठरतो.

**(ब) सेनार्ट :** विविध जातींची निर्मिती आर्यांनी केलेली नसली तरी जातींच्या निर्मितीत आर्यांचे मोठे योगदान आहे असे सेनार्टना वाटते. त्यांच्या मते, आर्य भारतात आल्यावर येथे शुद्ध व संमिश्र मानवी समूह निर्माण होऊन त्यांच्यात शुद्धा-अशुद्धतेच्या कल्पना निर्माण झाल्या. शुद्ध समूह श्रेष्ठ तर संमिश्र समूह कनिष्ठ मानले गेले. एकाच कुलदेवतेची पूजाअर्चा करणारे लोक एकत्र येऊन त्यांचा एक समूह तयार झाला आणि इतर कुलदेवतांची पूजाअर्चा करणाऱ्या समूहांपासून हा समूह अलग झाला. अशाप्रकारे विभिन्न कुलदेवतांची पूजा करणारे विभिन्न समूह उदयास येऊन त्यांच्यात खाणेपिणे, निषिद्धे, पवित्र-अपवित्रता इत्यादी विषयीचे विभिन्न नियम तयार झाले. त्यामुळे हे समूह एकमेकांपासून वेगळे झाले. हे समूह म्हणजेच विविध जाती होय.

**परीक्षण :** सेनार्टच्या सिद्धांतावर पुढीलप्रमाणे टीका केली जाते.

१) आर्यकालीन समाजव्यवस्था ही अत्यंत साधी होती असे सेनार्टना वाटते. तथापि, आर्यकाळात अत्यंत विकसित असे धार्मिक विधी व प्रथा उदयास आलेल्या होत्या. त्यामुळे ही समाजव्यवस्था बरीचसी संकीर्ण होती असे म्हणता येते.

२) सेनार्टनी कूल व जात यांची गल्लत केलेली आहे. जात हा समूह कूल या समूहापेक्षा वेगळा आहे. एकाच जातीतील वेगवेगळ्या कुटुंबाची वेगवेगळी कूले आढळतात. त्यामुळे वेगवेगळ्या कुलदेवतेच्या पूजाअर्चेतून वेगवेगळ्या जाती उदयास आल्या हे मत पटत नाही.

३) कुटुंबाचा पूर्वज, खाणेपिणेबाबतचे नियम, संस्कारविधी यातून जातीजातीत शुद्ध-अशुद्धतेची कल्पना निर्माण झाली हे सेनार्टचे मतही न पटणारे आहे. कारण जात हा समूह एकाच मूळ पूर्वजापासून आपली वंशपरंपरा सुरू झाली असे मानत नाही.

४) जातीच्या उदयास कारणीभूत असणाऱ्या धार्मिकेतर घटकांकडे सेनार्टनीही दुर्लक्ष केलेले असल्याने त्यांचा सिद्धांत एकांगी ठरतो.

**३) वांशिक सिद्धांत** : सर हर्बर्ट रिस्ले, वील, डॉ. जी. एस. घुर्ये, डॉ. डी. एन. मजूमदार इत्यादी या सिद्धांताचे प्रमुख पुरस्कर्ते आहेत. त्यांच्या मते भारतातील वांशिक भिन्नतेतून वेगवेगळ्या जाती उदयास आल्या आहेत. **रिस्लेंच्या** मते आर्य भारतात येण्यापूर्वीच चार वर्गात विभागलेले होते. हे विभाजन त्यांनी भारतात रुजविले. प्रारंभी आर्यांनी अनुलोम विवाहास (उच्च वर्णातील पुरुष व कनिष्ठ वर्णातील स्त्री यांचा विवाह) मान्यता दिल्याने वंशसंकर होऊन वेगवेगळ्या जाती उदयास आल्या. **वील** यांच्या मते गौरवर्णीय आर्यांनी स्वतःस श्रेष्ठ मानून कृष्णवर्णियांना कनिष्ठ लेखले आणि त्यांच्याशी शारीरिक संबंध येऊ नयेत म्हणून जातीची बंदिस्त व्यवस्था निर्माण केली. डॉ. जी. एस. घुर्ये यांच्या मते, प्राचीन भारतात आर्य व अनार्य (द्रविड) यांच्या शारीरिक लक्षणांमध्ये भिन्नत्त्व होते. आपली शारीरिक लक्षणे टिकवून ठेवण्यासाठी म्हणजेच वांशिक शुद्धता राखण्यासाठी अंतर्विवाहाचा निर्बंध रूढ झाला. यातूनच जातिव्यवस्था उदयास आली. डॉ. डी. एन. मजूमदार यांच्या मते, आर्यांनी भारतात आल्यानंतर आपले वेगळेपण अबाधित ठेवण्यासाठी व वांशिक शुद्धता टिकविण्यासाठी येथील मूळच्या रहिवाशांवर अनेक निर्बंध लादले व त्यातूनच जातिव्यवस्था उदयास आली. याशिवाय मॅकायव्हर, गिलीन, शरदचंद्र रॉय इत्यादीनीही वांशिक भिन्नतेतून जातिव्यवस्था उदयास आल्याचे मत मांडलेले आहे.

**परीक्षण :** या सिद्धांतावर पुढीलप्रमाणे टीका केली जाते.

१) वांशिक भिन्नता भारताप्रमाणेच इतरही समाजात आढळते. मात्र तेथे जातिव्यवस्था उदयास आलेली दिसत नाही. ती भारतातच का उदयास आली याचा खुलासा या सिद्धांताने होत नाही.

२) डॉ. हटन म्हणतात की अमेरिकेत श्वेतवर्णिय व कृष्णवर्णिय अशी वांशिक भिन्नता आहे. पण त्यांच्या सामाजिक संबंधाविषयीचे निर्बंध अमेरिकेत फारसे दिसत नाहीत. त्यामुळे भारतातील जातिव्यवस्थेत आढळणारे वेगवेगळे निर्बंध कसे उदयास आले याचे स्पष्टीकरण या सिद्धांताद्वारे मिळत नाही.

३) हा सिद्धांत वांशिक घटक सोडून इतर आर्थिक व सामाजिक घटकांचे जातिव्यवस्थेच्या उदयामध्ये असणारे योगदान लक्षात घेत नसल्याने एकांगी ठरतो.

**४) उत्क्रांतीवादी सिद्धांत :** डेंझिल इबेटसन हे या सिद्धांताचे पुरस्कर्ते असून त्यांच्या मते, जातिव्यवस्थेचा उदय हा उत्क्रांतीच्या तत्त्वानुसार झालेला आहे. आदिम अवस्था, पुरोहित धर्म व

व्यावसायिक संघ या तीन घटकांमुळे जातिव्यवस्था हळूहळू उदयास आली. आदिम अवस्थेत मानव भटके जीवन जगत होता. अशावेळी रक्तसंबंधी लोक एकत्रीत रहात असत. शेतीचा शोध लागल्यानंतर मानवाचे भटके जीवन संपले व तो स्थीर जीवन जगू लागला. पुढे इतर अनेक व्यवसाय उदयास आले. यातून विविध व्यवसाय करणारे वर्ग (व्यावसायिक संघ) उदयास आले. या वर्गांनी आपापले हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी इतर वर्गातील व्यक्तिंना आपल्यात सामावून घेण्यावर प्रतिबंध घातला. यातून विविध व्यवसाय करणारे वर्ग (व्यावसायिक संघ) उदयास आले. या वर्गांनी आपापले हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी इतर वर्गातील व्यक्तिंना आपल्यात सामावून घेण्यावर प्रतिबंध घातला. यातूनच विविध वर्ग एकमेकांपासून पृथक–पृथक झाले. या वर्गांत आपले महत्त्व व दर्जा अबाधित ठेवण्यासाठी संघर्ष झाला व त्यामध्ये ब्राह्मण/पुरोहित वर्ग विजयी झाला. त्याने इतर वर्गांचे व्यवसाय गौण ठरविले. अंतर्विवाहाचा नियम रूढ केला. यातूनच वेगवेगळ्या जाती उदयास आल्या.

**परीक्षण :** हा सिद्धांतही टीकेला पात्र ठरला आहे.

१) डॉ. हटनच्या मते आदिम अवस्थेतील भटके जीवन, व्यवसाय संघ, पुरोहित धर्माचे वर्चस्व हे घटक भारताशिवाय इतरही समाजात आढळतात मात्र या इतर समाजात जातिव्यवस्था उदयास आली नाही, ती केवळ भारतातच का उदयास आली याचे स्पष्टीकरण या सिद्धांताने मिळत नाही.

२) हा सिद्धांत वांशिक घटकाकडे दुर्लक्ष करतो.

३) केवळ पुरोहित या एका वर्गाने आपल्या हितसंबंधांच्या रक्षणासाठी अत्यंत संकीर्ण अशी जातिव्यवस्था इतर वर्गांवर लादली हे मत अतिशयोक्तीपूर्ण वाटते.

**५) राजकीय सिद्धांत :** समाजाची विविध समूहात किंवा वर्गात विभागणी करून त्यामध्ये आपले प्राबल्य टिकून राहण्यासाठी पुरोहित वर्गाने मोठ्या चातुर्याने जातिव्यवस्था निर्माण केली असे हा सिद्धांत सांगतो. अबे डुबोईस यांच्या मते धर्मावर आधारित असलेली जातीसंस्था ही एकमेव नाही. इजिप्तमध्येही परंपरागत व आधुवंशिक व्यवसाय असलेली व्यवस्था होती. डॉ. घुर्येंच्या शब्दात, ''जातिव्यवस्था ही इंडो–आर्यन संस्कृतीतील ब्राह्मणांचे अपत्य (निर्मिती) असून त्याचे संगोपन गंगा–यमुनेच्या प्रदेशात झाले. तेथून ते पुढे देशाच्या इतर भागात संक्रमीत झाले... अंतर्विवाहाचा उदयही गंगेच्या मैदानात रहाणाऱ्या ब्राह्मणांमध्ये झाला आणि तेथून अंतर्विवाहाची कल्पना आणि जातिव्यवस्थेची इतर वैशिष्ट्ये ब्राह्मणाच्या अनुयायांनी देशाच्या इतर भागात प्रसारित केली.''

**परीक्षण :** या सिद्धांतावर पुढीलप्रमाणे टीका केली जाते.

१) समाजावर आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी ब्राह्मणांनी जातिव्यवस्था निर्माण केली हे मान्य होणारे नाही. कारण जातिव्यवस्था हे साधे सामाजिक स्तरीकरण नसून अत्यंत संकीर्ण असे आहे. जातीजातीतील भिन्नता हे या स्तरीकरणाचे एक अंग असून ही भिन्नताही जातिव्यवस्थेच्या निर्मितीस साह्यायक ठरलेली आहे. राजकीय सिद्धांत या मुद्याकडे लक्ष देत नाही.

२) जातिव्यवस्था ही ब्राह्मणांनी निर्माण केली याचा अर्थ असा होतो की, ती मानवनिर्मित म्हणजेच कृत्रिम अशी आहे. तथापि, कोणतीही सामाजिक व्यवस्था कृत्रिमपणे निर्माण केली जात नाही. तर ती स्वाभाविकपणे हळूहळू समाजात विकसित होत असते. त्यामुळे जातिव्यवस्थेची निर्मिती कृत्रिमपणे झाली हे मत ग्राह्य वाटत नाही.

३) ब्राह्मणानी जातिव्यवस्था निर्माण करून ती इतरांवर लादली हे ही न पटणारे मत आहे. कारण इतरांनी निमूटपणे जातिव्यवस्था कशी स्वीकारली याचे उत्तर या सिद्धांतात सापडत नाही.

**६) व्यावसायिक सिद्धांत :** नेसफिल्ड या विचारवंताने त्यांच्या Brief view of the Caste System या लेखात हा सिद्धांत मांडला आहे. ते म्हणतात, जातींच्या उदयाचे कारण वंश किंवा धर्म हे नसून व्यवसाय हेच आहे. समाजात अनेक व्यवसाय असतात. या व्यवसायांचे स्वरूप व दर्जा यानुसार व्यक्तींच्या जाती ठरत गेल्या. समाजात जे व्यवसाय प्रतिष्ठेचे मानले गेले ते व्यवसाय करणारी जातीही प्रतिष्ठीत मानली गेली व जे व्यवसाय हलक्या दर्जाचे वा घाणेरडे मानले गेले ते व्यवसाय करणारी जात कनिष्ठ मानली गेली. नेसफिल्ड म्हणतात, धातुकाम करणाऱ्यांचा दर्जा हा टोपल्या बनविणाऱ्यांपेक्षा उच्च आहे. कारण औद्योगिक विकासात नवनवे व्यवसाय उदयास आले व नवीन व्यवसाय हा जुन्या व्यवसायापेक्षा श्रेष्ठ मानला जाऊ लागला. थोडक्यात व्यक्तींच्या व्यवसायांवरून समाजाची विभागणी वेगवेगळ्या वर्गात होऊन त्या प्रत्येक वर्गाची वेगळी जात अस्तित्वात आली.

**परीक्षण :** हा सिद्धांतही पुढीलप्रमाणे टीकेस पात्र ठरला आहे.

१) केवळ व्यवसायामुळेच जाती उदयास आल्या असून त्यामागे धार्मिक घटक कारणीभूत नाही हे नेसफिल्डचे मत एकांगी आहे. जातींच्या निर्मितीस केवळ धर्म जबाबदार आहे हे मान्य होणारे नसले तरी यासंदर्भातील धर्माची भूमिका पूर्णतः नाकारता येत नाही. कारण वेगवेगळ्या जातींना प्राप्त झालेले धार्मिक विशेषाधिकार व सवलती पाहता जातींच्या निर्मितीत धार्मिक घटकाचे योगदान अंशतः का होईना आहे हे लक्षात येते.

२) व्यवसायाच्या प्रतिष्ठेनुसार किंवा दर्जानुसार जातीचाही दर्जा निर्धारित झाला हे मत देखील पटत नाही. कारण एकच व्यवसाय करणाऱ्या वेगवेगळ्या जाती आहेत पण त्यांचा दर्जा समान मानला जात नाही. उदा. शेती व्यवसाय उत्तर भारतात उच्च दर्जाचा मानतात तर दक्षिण भारतात हाच व्यवसाय कनिष्ठ मानतात.

३) औद्योगिक विकासात नव्याने उदयास आलेले व्यवसाय हे जुन्या व्यवसायापेक्षा श्रेष्ठ मानले गेले हे मतही वास्तववादी नाही. कारण समाजात लोहार जातीपेक्षा सोनार जातीचा दर्जा उच्च मानला जातो. परंतु लोह धातुचा शोध व वापर हा सोन्याचा शोध व वापर याच्या नंतर सुरू झाला आहे.

४) व्यवसायाच्या आधारे युरोपमध्येही सामाजिक स्तरीकरण निर्माण झाले पण ते जातिव्यवस्थेसारखे नव्हते. त्यामुळे व्यवसायाचे श्रेष्ठत्व-कनिष्ठत्व हे जातिव्यवस्थेच्या निर्मितीस कारणीभूत ठरले हे मत मान्य होणारे नाही.

**७) डॉ. हटन यांचा सिद्धांत :** डॉ. जे. एच. हटन यांच्या मते जातिव्यवस्था हे हिंदू समाजाचे अंगभूत लक्षण असावे व तिच्या उदयास कोणतातरी एकच घटक जबाबदार नाही. अनेक घटकांचा सामूहिक परिणाम म्हणून जातिव्यवस्था उदयास आली असून हे घटक हिंदू समाजातीलच असले पाहिजेत असे हटन म्हणतात. त्यांच्या मते जातिव्यवस्थेचा उदय व विकास होण्यास पुढील घटक जबाबदार असावेत.

१) भारतीय द्विपकल्प व त्यातील विभिन्न भागांची भौगोलिक अलगता.

२) अन्नपदार्थात गुणांचे संक्रमण करण्याची शक्ती असते ही आदिवासींमध्ये आढळणारी श्रद्धा.

३) देवक, निषेधके, आत्मा व माना या कल्पनांवरील श्रद्धा.

४) पावित्र्य, सोवळे-ओवळे, बळीशुद्धता याविषयीच्या कल्पना.

५) कौटुंबिक अलगता, पूर्वजपूजा व संस्कारीत भोजनासंबंधीचे विचार.

६) कर्म व पुनर्जन्म सिद्धांतावरील विश्वास.

७) कला व इतर व्यवसायाशी संबंधित असलेला जादुटोण्यावरील विश्वास.

८) परंपरागत व्यवसाय, व्यापार व कला यासंबंधीची गुपिते.

९) आर्थिक विकासातील व्यापारी संघ व इतर घटक.

१०) मातृमूलक व पितृमूलक यासारख्या परस्परविरोधी संस्कृतीतील संघर्ष.

११) वंशसंघर्ष, वर्णविषयक पूर्वग्रह व विजय.

१२) धार्मिक व सामाजिक विशेषाधिकार प्राप्त झालेल्या वर्गांचा विकास.

१३) आदिवासींचे व त्यांच्या कारभाराचे वेगळेपण.

१४) आर्थिक व प्रशासकीय पद्धतींचा सहेतुकपणे केलेला स्वीकार.

१५) सामान्य व्यक्तीस न पेलणाऱ्या अशा सुक्ष्म धार्मिक तत्त्वज्ञानाच्या विकासावर जबाबदार अशा अत्यंत बुद्धिवानाद्वारे समाजाचे होणारे पोषण.

डॉ. हटनच्या मते उपरोक्त घटकांचा सामूहिक प्रभाव पडून जातिव्यवस्था उदयास आली. त्यापैकी पावित्र्याची कल्पना व कर्म व पुनर्जन्म सिद्धांत हे घटक अधिक महत्त्वपूर्ण आहेत. या घटकांमुळेच जातिव्यवस्था भारतीय समाजात खोलवर रूजली. हट्टनचा हा सिद्धांत मान्य होण्यासारखा आहे. मात्र जातिव्यवस्था हे हिंदू समाजाचे अंगभूत लक्षण असावे हे त्यांचे मत मान्य होण्यासारखे नाही. कारण कोणत्याही समाजास उपजतच कांही लक्षण असते हे मत मान्य होणारे नाही.

**८) डॉ. इरावती कर्वे यांचा सिद्धांत :** जातीच्या उदयासंबंधीचे वरील सिद्धांत डॉ. कर्वेंना मान्य नाहीत. त्यांच्या मते, आर्यांनी भारतात जातिव्यवस्था आणली नाही तसेच त्यांनी जातिव्यवस्था निर्माणही केली नाही. आर्य भारतात येण्यापूर्वीच येथे जातिव्यवस्था अस्तित्वात होती व आर्यांनी आपल्या समाजव्यवस्थेत जातिव्यवस्थेला सामावून घेतले. डॉ. कर्वे पुढे म्हणतात की, प्राचीन साहित्यातील 'वर्ण' शब्द 'रंग' या अर्थाने आलेला नसून 'वर्ग' या अर्थाने वापरलेला आहे. व्याकरणात विशिष्ट क्रमाने लावलेल्या अक्षरांची व्यवस्था असते व तिला आपण वर्णमाला म्हणतो. वर्णव्यवस्थाही अशीच समाजातील वर्गांची विशिष्ट क्रमाने मांडलेली व्यवस्था आहे. आर्यवर्ण व दासवर्ण हे शब्दप्रयोग वैदिक साहित्यात याच अर्थाने वापरलेले आहेत. यावरून कर्वे म्हणतात की, ब्राह्मणांनी आपल्या वंशश्रेष्ठत्त्वाच्या भावनेतून जातिव्यवस्था निर्माण केलेली नाही. थोडक्यात वंश हा घटक जातींच्या निर्मितीचे कारण नाही असे त्यांना वाटते.

जातींच्या उदयासंबंधी डॉ. कर्वेनी त्यांचा सिद्धांत पुढीलप्रमाणे मांडलेला आहे. एका विशिष्ट भूप्रदेशावर एका मोठ्या जमातीचा विस्तार झाल्यानंतर या जमातीचे कांही भाग स्वतंत्रपणे वेगळे राहू लागले. या स्वतंत्र व अलग भागांना वेगवेगळ्या समाजात वेगवेगळे सामाजिक दर्जे प्राप्त झाले. पुढे हे भाग वेगवेगळे समूह बनून एकमेकांपासून अलगपणे व स्वतंत्रपणे राहू लागले. हे समूह म्हणजेच विविध जाती होय.

थोडक्यात, एकाच मूळ जमातीचे विविध समूह पडून ते विखूरले गेले व स्वतंत्रपणे व अलगपणे राहू लागले आणि ते जाती म्हणून उदयास आले. या मूळ जमातीची तुलना डॉ. कर्वेनी मोठ्या गोधडीशी केली आहे. अनेक रंगाचे, आकाराचे व प्रकाराचे कापडी तुकडे जसे एका गोधडीत गोवलेले असतात त्याप्रमाणे मोठ्या जमातीत अनेक जाती एकत्र गोवलेल्या आहेत.

अशाप्रकारे विविध विद्वानांनी जातीच्या उदयासंबंधी वेगवेगळे सिद्धांत मांडलेले आहेत. मात्र त्यापैकी कोणताही एक सिद्धांत समाधानकारक नाही. डॉ. हटन म्हणतात त्याप्रमाणे जातिव्यवस्थेच्या उदयास अनेक घटक जबाबदार आहेत.

## **१.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न** (Check your progress)

अ) बहुपर्यायी प्रश्न सोडवा (Multiple Choice Questions)

१) भारतात प्राचीन काळात उदयास आलेला धर्म कोणता?

अ) जैन ब) बौद्ध क) शीख ड) वरील सर्व

२) महाराष्ट्रात कोणत्या जातीने विशेषतः बौद्ध धर्माचा स्वीकार केला?

अ) मांग ब) चांभार क) महार ड) कुंभार

३) कोणत्या भागात जैनांची लोकसंख्या जास्त दिसून येते?

अ) शहरी ब) ग्रामीण क) डोंगरी ड) आदिवासी

४) भारतात शीखांची लोकसंख्या सुमारे किती टक्के आहे?

अ) ८४.४३ ब) ०.३७ क) १.२० ड) १.७२

५) राष्ट्रभावनेचा व्यापक क्षेत्रात झालेला विस्तार म्हणजे वसाहतवाद असे कोणी म्हटले?

अ) हॉब्सन ब) विनस्लॉ क) शुम्पीटर ड) विल्यम

ब) एका वाक्यात उत्तरे द्या.

१) बौद्ध समुदायातील धार्मिक विधी सांगा.

२) जैन समुदायाचे तत्त्वज्ञान सांगा.

३) शीख धर्माची स्थापना कोणी केली आहे?

४) वसाहतवादी राजवट प्रस्थापित करण्यासाठी कोणत्या धर्मप्रसारास सुरुवात झाली होती?

५) जात हा एक बंद वर्ग आहे असे कोणी म्हटले?

## **१.५ सारांश** (Let us sum up)

या पहिल्या घटकात आपण भारतीय समाजाचे परिदृश्य (बौद्ध समुदाय, जैन समुदाय, शीख समुदाय) समजावून घेतलेले आहे. वसाहतवादी राजवटीचा प्रभाव यामध्ये त्याचा अर्थ, व्याख्या, वसाहतवादाचा विकास : राजकीय चीवनातील प्रभाव, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक जीवनातील

प्रभाव इत्यादी समजावून घेतलेले आहे. शेवटी भारतीय जातीव्यवस्थेची वैशिष्ट्ये आणि उत्पत्ती यामध्ये जातीव्यवस्थेचे स्वरूप, अर्थ, व्याख्या जातीची वैशिष्ट्ये आणि जातीव्यवस्थेची उत्पत्ती इत्यादींना तपशीलवारपणे समजावून घेतले आहे.

## १.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे (Answers to check your progress)

अ) बहुपर्यायी प्रश्न सोडवा.

१) ड  २) क  ३) अ  ४) ड  ५) अ

ब) एका वाक्यात उत्तरे द्या.

१) बुद्ध वंदना करणे

२) स्याद्वाद व नयवाद

३) गुरू नानक

४) ख्रिस्ती

५) मजूमदार व मदन

## १.७ सरावासाठीचे प्रश्न/गृहपाठ (Exercise / Home Asignment)

अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

१) बौद्ध समुदायाचे धर्मश्रद्धा व तत्त्वज्ञान स्पष्ट करा.

२) जैन समुदायातील धर्माचरण व धार्मिक विधी विशद करा.

३) शीख समुदाराचे सामाजिक-जीवन स्पष्ट करा.

४) वसाहतवादाची व्याख्या देवून वसाहतवादाचा विकास सांगा.

५) भारतातील जातीव्यवस्थेची वैशिष्ट्ये सांगा.

ब) टीपा लिहा.

१) बौद्धांचे सामाजिक जीवन

२) जैनांचे सामाजिक जीवन

३) शीखांचे समाजिक जीवन

४) वसाहतवादाचे राजकीय जीवनावरील प्रभाव

५) जातीव्यवस्थेची उत्पत्ती (उदय)

## १.८ चिंतन आणि कार्य (Reflection and Action)

- भारतातील पारंपरिक सामाजिक संघटनातील बौद्ध, जैन, शीख धर्माची जडण-घडण कशी झाली हे समजावून घ्या व त्याआधारे एक टिपणी तयार करा.

- गौतम बुद्ध, आणि गुरू नानक यांचे जीवन व कार्य तपशिलाने अभ्यासा व त्यांच्या शिकवणीचे सार लिहून काढा.

## १.९ अधिक वाचनासाठी पुस्तके (Suggested Readings)


- प्रा. चंद्रकांत खंडागळे (२००६) भारतीय समाज रचना आणि परिवर्तन, प्रकाशिका सौ. मायावती खंडागळे, सांगली
- डॉ. अरुण पौडमल (२०१४) – भारतीय समाजाची ओळख, दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- C. N. Shankar Rao (2009) Sociology of Indian Society, S. Chanda & Company Ltd., New Delhi.
- S. C. Dube (1992) Indian Society, National Book of Trust, India New Delhi.


❑❑❑

### सत्र १ : घटक २

# भारतातील विविधता आणि एकता

## (Diversity & Unity in India)

**घटक संरचना**

२.१ प्रस्तावना (Introduction)

२.२ उद्दिष्टे (Objectives)

२.३ विषय विवेचन (Presentation of Subject Matter)

 २.३.१ भारतातील भाषिक विविधता : (भाषा, धर्म, जाती, जमाती, आणि वंश इत्यादी)

 २.३.२ भारताच्या विविधतेतील एकता.

२.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

२.५ सारांश

२.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे.

२.७ सरावासाठी प्रश्न / गृहपाठ

२.८ चिंतन आणि कार्य

२.९ अधिक वाचनासाठी पुस्तके

## २.१ प्रस्तावना (Introduction) :

भारतीय समाज प्राचीन असून त्याला अंदाजे पाच हजार वर्षापेक्षा अधिक वर्षाचा इतिहास आहे. भारतात विविध भाषांचे, धर्माचे, जातीचे, जमातीचे व वंशाचे लोक प्राचीन काळापासून रहात आलेले असल्याने भारतात प्रचंड प्रमाणावर विविधता निर्माण झालेली आहे. भारतात जगातील सर्व गोष्टी कमीजास्त प्रमाणात आढळतात म्हणून भारतास जगाची छोटी प्रतिकृती असे म्हणतात. तशी, भारतात विविधता असली तरी त्या विविधतेत एकता असल्याचेही आढळून येते. कारण भारतीय लोकांनी त्यांच्यातील परस्परसंबंधातून व सहास्तित्त्वातून एक वैशिष्ट्यपूर्ण जीवनपद्धती विकसित केलेली असून तिलाच भारतीय जीवनपद्धती असे म्हणतात. अशा या भारतीय समाजाचे व त्यातील जीवनपद्धतीचे वस्तुनिष्ठ ज्ञान होण्यासाठी त्यातील विविधता व एकता समजावून घेणे आवश्यक आहे.

## २.२ उद्दिष्टे (Objectives) :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर तुम्हांस

- भारतात भाषा, धर्म, जात, जमात व वंश इत्यादी बाबतीत असलेली विविधता समजावून घेता येईल.
- भारतातील विविधतेत एकता कशी आहे हे देखील सांगता येईल.

## २.३ विषय विवेचन (Presentation of Subject Matter) :

या घटकात तुम्ही भारतातील विविधता व एकता समजावून घेणार आहात. त्यासाठी ह्या घटकाचे दोन विभाग पाडलेले आहेत. पहिल्या विभाात भारतातील भाषा, धर्म, जात, जमात आणि वंश याबाबतीत असलेल्या विविधतेचे वर्णन करण्यात येईल. आणि दुसऱ्या विभागात ह्या विविधतेत एकता कशी आहे याचे विवेचन करण्यात येईल.

### २.३.१ भारतातील विविधता :

या ठिकाणी तुम्ही भारतातील विविधता समजावून घेणार आहात. अभ्यासाच्या सोयीसाठी ह्या विभागाचे पाच उपविभाग पाडून विवेचन करण्यात येईल ते उपविभाग पुढीलप्रमाणे :-

अ) भारतातील भाषिक विविधता.

ब) भारतातील धार्मिक विविधता

क) भारतातील जातींची विविधता

ड) भारतातील जमातींची विविधता

इ) भारतातील वांशिक विविधता.

आता तुम्ही ह्या पाच उपविभागांचा क्रमश: अभ्यास करणार आहात.

**अ) भारतातील भाषिक विविधता :**

१९७१ च्या भारतीय जनगणनेनुसार भारतात १६५२ इतक्या भाषा व बोलीभाषांची नोंद झाली. त्यावरून भारतातील भाषिक विविधतेची आपणास कल्पना येते. भारतातील भाषिक विविधता पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येते.

**१) भारतातील भाषिक कुटुंबे :**

भारतात एकूण ६ भाषिक कुटुंबे आढळतात ती पुढीलप्रमाणे -

**१) इंडो आर्यन भाषिक कुटुंब :** या कुटुंबात आसामी, बंगाली, भिल्ली, डोग्री, गुजराती, हिंदी, काश्मिरी, खानदेशी, कोकणी, मराठी, नेपाळी, उरिया, पंजाबी, संस्कृत, सिंधी, उर्दू इत्याती भाषा आढळतात.

**२) द्रविडीयन भाषिक कुटुंब :** या कुटुंबात कन्नड, तमिळ, तेलगू, मल्याळम, कुर्गी, गोंडी, उराँव, कोलामी, कोंडा, कोया, तुळू, माल्टो, पार्जी इ. भाषांचा समावेश होतो.

**३) आस्ट्रो-एशियाटीक :** यात भूमिज, गदबा, हो, जुआँग, खासी, कोरवा, कोरकू, मुंडा, मुंडारी, निकोबारी, संथाली ह्या भाषांचा अंतर्भाव होतो.

**४) तिबेटो - बर्जिम :** या कुटुंबात आडी, अनाल, अंगामी, बाल्टी, भोटिया, बोडो, चांग, गारो, कोन्याक, कुकी, लडख, लेपचा, लुशाई, नागा मणिपूरी, शेर्पा, झूमी तिबेटीयन इत्यादी भाषांचा समावेश होतो.

५) **सिमेटो – हॅमिटीक :** यामध्ये अरबी ही एक भाषा आढळते.

६) **युरोपियन :** यामध्ये इंग्रजी, पोर्तुगाली व फ्रेंच भाषा येतात.

**२) भारतातील भाषिक प्रदेश :**

भारतात वेगवेगळ्या प्रदेशात वेगवेगळ्या भाषांचे प्राबल्य आहे. यासंदर्भात ४ भाषिक विभाग पाडता येतात.

१) **पूर्व विभाग :** या विभागात बंगाली, उडिया व आसामी या तीन इंडो आर्यन भाषांचे प्राबल्य आहे. शिवाय नागालँड, मेघालय, मणिपूर, मिझोराम, त्रिपूरा, सिक्किम, अरुणाचल प्रदेश ह्या राज्यांत तिबेटी बर्जिन व ऑस्ट्रो-एशियाटीक कुटुंबातील भाषांचे प्राबल्य आहे.

२) **पश्चिम विभाग :** मराठी व गुजराती ह्या दोन इंडो आर्यन भाषांचे या विभागात प्राबल्ये आहे.

३) **दक्षिण विभाग :** यात कन्नड, तेलगू, तमिळ व मल्याळम ह्या चार द्रविडीयन भाषांचे वर्चस्व आहे.

४) **उत्तम-मध्य विभाग :** या विभागात इंडो-आर्यन कुटुंबातील हिंदी, पंजाबी व काश्मिरी ह्या तीन भाषांचे वर्चस्व आहे. हिंदू जवळजवळ ९ घटकराज्यांत आणि दिल्ली, चंदीगड व अंदमान-निकोबार ह्या तीन केंद्रशासित प्रदेशात बोलली जाते.

**३) भारतीय राज्यघटनेतील भाषा :**

भारतीय राज्यघटनेत (आठव्या अनुसूचित) केवळ २२ भाषांचा समावेश केलेला आहे. त्यापैकी बहुतेक भाषा कोणत्या तरी राज्याच्या राज्यभाषा व प्रशासकीय भाषा आहेत. हिंदी ही राष्ट्रभाषा आहे इंग्रजी सहयोगी (associated) भाषा मानली आहे पण तिला आठव्या अनुसूचित स्थान दिलेले नाही.

**४) भाषा आणि बोलीभाषा :**

भारतातील बहुतेक प्रमुख भाषांमध्ये अनेक बोलीभाषा (लिपी नसलेल्या) आहेत. उदा. हिंदीमध्ये अवधी, बघेली, भोजपुरी, ब्रिज, बुंदेली, छत्तीसगडी, हादोती, मगही, माळवी, पहाडी इत्यादी बोलीभाषा आहेत. तसेच कन्नड भाषेच्या बगडा व करुबा (करुंबा), तमिळ भाषेच्या कैकाडी व येरुकला, मराठी भाषेच्या वऱ्हाडी, अहिराणी, विजापूरी, संकेश्वरी, मालवणी इत्यादी बोलीभाषा आहेत. भाषा व बोलीभाषेतील फरक असा की भाषेला लिखीत परंपरा असते तर बोलीभाषेला केवळ मौखिक परंपरा असते.

भारतात भाषेच्या विविधतेप्रमाणे लिपीचीही विविधता आहे. देवनागरी, ब्राम्ही, उर्दू, महाजन, राठोडी, गुरुमुखी, बांगला, शारदा, मोडी, कन्नड, तमिळ, तेलगू, मल्याळी, असमिया इत्यादी लिप्या आहेत.

**५) भाषा व धर्म :**

भारतात भाषा व धर्माचा जवळचा संबंध आहे. प्राचीन हिंदूधर्मग्रंथांच्या लेखनासाठी संस्कृत भाषा वापरली गेली. त्या काळात ब्राह्मण लोक संस्कृत तर कनिष्ठ जातीचे लोक प्राकृत भाषा बोलतात. जैन व बौद्ध धर्मात मात्र अनुक्रमे अर्धमागधी व पाली भाषांचा वापर केला गेला. शीख धर्माचे गुरुमुखी भाषेचा वापर करतात. महानुभवपंथाने मराठीचा तर लिंगायत पंथाने कन्नड भाषेचा पुरस्कार केला.

### ६) ऐतिहासिक कालखंड :

भारतात वेगवेगळ्या कालखंडात वेगवेगळ्या भाषांना अधिकृत भाषा म्हणून मान्यता मिळालेली आहे. वैदिक कालखंडात संस्कृतला, जैन व बौद्ध कालखंडात अर्धमागधी व पाली भाषांना, मुस्लिम राजवटीच्या कालखंडात फारसी, अरबी व उर्दू ह्या भाषांना, ब्रिटिश कालखंडात इंग्रजीला, स्वातंत्र्योत्तर कालखंडात हिंदी व इंग्रजीला महत्त्व प्राप्त झालेले आढळते. तथापि कोणत्या एका भाषेस राष्ट्रीय भाषा म्हणून ओळखले जात नव्हते. राजवट बदलली की अधिकृत भाषा बदलत असे पण सामान्य लोक मात्र स्थानिक भाषेचा वापर करीत आलेले आढळतात.

## ब) भारतातील धार्मिक विविधता :

जगातील बहुतके प्रमुख धर्माचे लोक भारतात कमीजास्त प्रमाणात राहतात. तसेच प्रत्येक धर्मात अनेक पंथ व उपपंथ, संप्रदाय व उपसंप्रदाय निर्माण झालेले आहेत. त्यामुळे भारतात धार्मिक विविधता मोठ्या प्रमाणावर दिसून येते. भारतात हिदू, जैन, बौद्ध, शीख, ख्रिस्ती, इस्लाम, पारशी व ज्यू अशा आठ धर्माचे लोक राहतात. त्यापैकी पहिले चार धर्म भारतात व नंतरचे चार भारताबाहेर उदयास आले आहेत. हिंदू हे बहुसंख्यांक तर बाकीच्या धर्माचे लोक अल्पसंख्यांक आहेत. प्रत्येक धर्मातील श्रद्धा, कर्मकांड, तत्त्वज्ञान, धर्मग्रंथ, तीर्थस्थळे इत्यादी बाबी वेगवेगळ्या असल्याने भारतात धार्मिक विविधता मोठ्या प्रमाणावर निर्माण झालेली आहे. धार्मिक विविधता समजण्यासाठी ह्या सर्व धर्माचे स्वरुप समजावून घेऊ.

### १) हिंदू धर्म :

आजचा हिंदू धर्म हा प्राचीन काळातील वैदिक धर्माचे विस्तारीत व सुधारीत रुप आहे. हा धर्म भारतातील बहुसंख्यांक लोकांचा धर्म असून हिंदूची लोकसंख्या २००१ च्या जनगणनेनुसार ८०.५% होती. जम्मू-काश्मिर, केरळ, नागालँड, मिझोराम ही राज्ये वगळता इतर राज्यांत हिंदू बहुसंख्यांक आहेत.

हिंदू धर्मातील श्रद्धा, तत्त्वज्ञान व धर्मविधी अनेकदेवतावाद (अनेक देवांवरील विश्वास) अवतारवाद (ईश्वर अवतार घेतो.) आणि आत्म्याचे अमरत्त्व (आत्मा अमर आहे) ह्या हिंदुंच्या प्रमुख धर्मश्रद्धा आहेत. अध्यात्मवाद, कर्म व पुर्नजन्म आणि पुरुषार्थ सिद्धांत हे या धर्मातील प्रमुख तात्त्विक सिद्धांत आहेत. व्यक्तीने वर्णधर्माचे पालन करणे, मोक्षप्राप्तीसाठी प्रयत्नशील रहाणे व हिंदुचे प्रमुख धर्माचरण प्रकार आहेत. प्रार्थना, यज्ञ, उपवास, जपतप, व्रतवैकल्ये, अनुष्ठाने, संस्कारविधी, धर्मग्रंथपठन व तीर्थयात्रा इत्यादी हिंदूचे प्रमुख धर्मविधी आहेत.

**धर्मग्रंथ :** हिंदूचा अमूक एक असा धर्मग्रंथ नसून चार वेद, उपनिषदे, ब्राह्मणग्रंथ, आरण्यके, महाकाव्ये, पुराणे, स्मृतीग्रंथ यांना हिंदू आपले पवित्र धर्मग्रंथ (प्रमाणग्रंथ) मानतात.

**तीर्थस्थळे :** हिंदूंच्या प्रार्थनास्थळास मंदिर (देवालय) म्हणतात. त्यामुळे देवदेवतांची मंदिरे (बद्रिनाथ, केदारनाथ, पूरी, रामेश्वर) महापुरुषांची जन्मभूमी व कर्मभूमी (अयोध्या, द्वारका, मथुरा) नद्यांच्या संगमावरील शहरे (वाराणसी, अलाहाबाद, हरिद्वार) इ. हिंदूची तीर्थस्थळे आहेत.

**पंथ आणि उपपंथ :** शैव, वैष्णव, शाक्त, स्मार्त, गाणपत्य, महानुभव, लिंगायत, भागवत इत्यादी हिंदूधर्मातील पारंपारिक पंथ आहेत तर ब्राह्मो समाज, आर्य समाज, सत्यशोधक समाज हे आधुनिक ग्रंथ आहेत. प्रत्येक पंथाची तत्त्वे, श्रद्धा व कर्मकांड भिन्न भिन्न असल्याने हिंदू धर्मात मोठी विविधता दिसून येते.

**२) जैन धर्म :**

हिंदू धर्माप्रमाणेच जैन धर्मही प्राचीन असून त्याचा संस्थापक अज्ञात आहे. या धर्मात २४ तीर्थंकार (धर्माची तत्त्वे प्रकट करणारे) येऊन गेले असून महावीर हे शेवटचे तीर्थंकार आहेत. २००१ च्या जनगणनेनुसार जैनांची लोकसंख्या केवळ ०.४% इतकी होती.

**जैनधर्मातील श्रद्धा, तत्त्वज्ञान व धर्मविधी :** हा धर्म सृष्टिकर्ता ईश्वर नाकारतो. पण ध्यानधारणेसाठी व मोक्षप्राप्तीसाठी जैन लोक अनेक देवदेवतांवर विश्वास ठेवून त्यांची पूजाअर्चा करतात. हा धर्म श्रमणपरंपरावादी आहे. देहाचे लाड न करता त्यास कष्ट देऊन वीरक्त जीवन जगावे व मोक्षप्राप्ती मिळवावी यावर हा धर्म भर देतो. आत्मशुद्धी व चारित्र्यसंवर्धनासाठी हा धर्म अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य व अपरिग्रह या पाच व्रतांचे (नियमांचे) पालन करण्यास धर्माचरण मानतो. जैनधर्म व हिंदू धर्मातील यज्ञ, वर्ण व जातीभेद, लिंगभेद यांना विरोध करतो.

**जैनधर्मातील पंथ व उपपंथ** : जैनधर्मात श्वेतांबर व दिगंबर हे दोन पंथ आहेत. दिगंबरात वीसपंथी, तेरापंथी, तारणपंथी, गुमानपंथी, तोतापंथी, इत्यादी उपपंथ आहेत. तर श्वेतांबरात पुजेरा (मूर्तिपूजक किंवा मदिरमार्गी), धुडिया (स्थानकवासी किंवा साधूमार्गी) हे उपपंथ आहेत. महावीरांची वचने ज्या ग्रंथात आहेत त्यांना श्वेतांबू मूलग्रंथ मानतात पण दिगंबर त्यांना मूलग्रंथ मानत नाहीत. दिगंबर साधूंनी नग्न रहावे असे मानतात तर श्वेतांबर मात्र साधूंनी श्वेतवस्त्र परिधान करावे असे मानतात.

**धर्मग्रंथ :** जैन धर्म वेदग्रंथांना प्रमाण मानत नाहीत त्यांच्या धर्मग्रंथास आगमग्रंथ म्हणतात. श्वेतांबरांचे ४५ आगमग्रंथ अर्धमागधी भाषेत असून दिगंबराचे धर्मग्रंथ शौरसेनी भाषेत आहेत. कांही ग्रंथ संस्कृत भाषेत आहेत.

**तीर्थस्थळे :** जैन लोक तीर्थयात्रा करणे पुण्यकर्म मानतात. दिगंबराची तीर्थस्थळे गजपंथ, मांगीतुंगी, कुंथलगीरी, बाहुबली, श्रवणबेळगोळ, शिखर सम्मेदजी इ. आहेत. श्वेतांबरांची तीर्थस्थळे माऊंट अबु, संकेश्वर, पालीठाणा ही आहेत.

**३) बौद्ध धर्म :**

गौतम बुद्धाने स्थापन केलेल्या बौद्धधर्माचे अनुयायी २००१ च्या जनगणनेनुसार ०.८% इतके होते. लडाख, सिक्कीम, हिमाचल प्रदेश, उत्तरांचल, अरुणाचल प्रदेश, दार्जिलिंग व दक्षिणेकडील कांही ठिकाणी बौद्धधर्माचे लोक आहेत. १९५६ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली अनेक कनिष्ठ जातींनी बौद्ध धर्म स्वीकारला असून त्यांना नवबौद्ध म्हणतात.

**धर्मश्रद्धा, तत्त्वज्ञान व धर्मविधी :** हा धर्म अनिश्वरवादी (ईश्वर न मानणारा) व अनात्मवादी (आत्मा न मानणारा) आहे. पण कर्म व पुर्नजन्म सिद्धांत व मोक्ष कल्पना (निर्वाण) मानतो. हा धर्म चार आर्यसत्यावर विश्वास ठेवतो. हा धर्म इहवादी, मध्यममार्गी व नैतीकतेवर भर देतो. तसेच प्रज्ञा, शील, करुणा व मानवता, समता, स्वातंत्र्य, बंधुत्व बुद्धीप्रामण्य या मूल्यांना व तत्त्वांना प्रमाण मानतो. हा धर्म अहिंसावादी असून यज्ञविधी, वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था, लिंगभेद यांना विरोध करतो. मोक्ष म्हणजेच निर्वाण प्राप्तीसाठी हा धर्म अष्टांगमार्ग व पंचशीलचा पुरस्कार करतो. हा धर्म देवदेवतांच्या मूर्तीची पूजा ही नाकारतो. बौद्ध विहारात (प्रार्थना स्थळात) जाऊन बुद्धवंदना करणे हा प्रमुख धर्मविधी आहे. बुद्ध, धम्म व संघ यांना शरण जाणे ही या धर्मातील केंद्रीय कल्पना आहे.

**तीर्थक्षेत्रे :** बुद्धाचे जन्मगांव 'लुंबीनी' व बुद्धास दिव्यज्ञान प्राप्त झालेली 'गया' तसेच बुद्धाने पहिले प्रवचन दिलेले 'सारनाथ' याशिवाय राजगीर, सांची व विदिशा इत्यादी बौद्धांची तीर्थक्षेत्रे आहेत.

**पवित्रग्रंथ :** बौद्धधर्म वेदगक्रंथांना प्रमाण मानीत नाही. पालीभाषेतील 'त्रिपीटक' हा पवित्र धर्मग्रंथ आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या 'बुद्ध अँड हिम धम्म'' या ग्रंथास नवबौद्ध प्रमाण मानतात.

**पंथ आणि उपपंथ :** हिनयान व महायान हे दोन मुख्य मंत्र असून वैभाषिक, सौमांतिक, योगाचार (विज्ञानवाद) व माध्यमिक (शून्यवाद) हे उपपंथ आहेत. हिमयान निरिश्वरवादास चिकटून आहे तर महायानपंथांत बुद्धास देवत्वाचा दर्जा मिळालेला दिसतो.

**४) शीख धर्म :**

विविध धर्मातील चांगल्या तत्त्वांचा समन्वय साधून गुरु नानक यांनी शीख धर्म स्थापन केला. इ.स. २००१ च्या जनगणनेनुसार शीखांची लोकसंख्या १.९% होती. सुमारे ८०% शीख पंजाब व हरीयाणात आहेत. उरलेले शीख राजस्थान, दिल्ली, उत्तरप्रदेशात आहेत. इतर राज्यांत अत्यल्प शीख आहेत.

**धर्मश्रद्धा, तत्त्वज्ञान व धर्मविधी :** हा धर्म एकेश्वरवादी असून ईश्वरास सर्वस्वयापी, सृष्टिकर्ता व निर्गुण, निराकार दयाळू व अन्यायी मानतो. तसेच आत्मा, कर्म व पुर्नजन्म, मोक्ष या कल्पनांही मान्य करतो. या धर्मात १० गुरु होऊन गेले असून गुरुनिष्ठा हे सर्वोच्च मूल्य मानले जाते. हा धर्म मानवतेचा व समतेचा पुरस्कार करतो व वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था नाकारतो. हा धर्म सत्कर्म, ईश्वरभक्ती, योगसाधना विवेकयुक्त प्रपंच करून जनसेवा करणे यांना धर्माचरण मानतो. मात्र मुर्तिपूजा व उपवास यांना नाकारतो. गुरु गोविंदसिंगांनी सांगितलेल्या केस, कंगवा, कच्छ, कडे व कृपाण ह्या पाच वस्तू प्रत्येक शीख जवळ बाळगतो.

**पवित्र ग्रंथ :** हा धर्म देखील वेदग्रंथांना प्रमाण मानत नाही. गुरुमुखी लिपीतील 'गुरुग्रंथसाहेब' हा शीखांचा पवित्र ग्रंथ आहे. गुरुद्वार हे शीखांचे प्रार्थनास्थळ असून त्यामध्ये या ग्रंथाची पूजा केली जाते.

**तीर्थस्थळे :** गुरुंच्या स्मरणार्थ चार दिशांना स्थापन केलेल्या गुरुद्वारास शीख तीर्थस्थळे मानतात. पाटणा (पूर्व), अमृतसर (पश्चिम), आनंदपूर (उत्तर) व नांदेड (दक्षिण) ही चार तीर्थस्थळे आहेत.

**पंथ :** शीख धर्मात अकाली, खालसा, निरंकारी, ग्यानी निर्मल इत्यादी पंथ आहेत.

**५) ख्रिस्ती धर्म :**

हा भारताबाहेर उदयास आलेला धर्म आहे. येशु ख्रिस्तांच्या शिष्य सेंट थॉमस इ.स. ५२ मध्ये भारतात आला व त्याने मलबार किनाऱ्यावर ख्रिस्ती धर्माचा प्रसार केला. पुढे पोर्तुगीज व इंग्रज यांनी धर्मांतराच्या मार्गाने भारतात ख्रिस्ती धर्माचा प्रसार केला. बहुतेक ख्रिस्ती हे मूळचे अस्पृश्य व आदिवासी आहेत. इ.स. २००१ च्या जनगणनेनुसार ख्रिस्ती लोकसंख्या २.३% होतो.

**धर्मश्रद्धा, तत्त्वज्ञान व धर्मविधी :** हा धर्म पिता परमेश्वर त्यांचे पुत्र येशू व पवित्र आत्मा यांच्यावर विश्वास ठेवतो. यासच 'ट्रिनिटी' सिद्धांत म्हणतात. हा सृष्टीकर्ता प्रेममय न्यायी असून येशू त्याचा लाडका पुत्र व प्रेषित आहे व पापी लोकांच्या उद्धारासाठी येशू जगात आला असे हा धर्म मानतो. हा धर्म मानवतावादी व समतावादी आहे. सर्व मानव ईश्वराची लेकरे असल्याचे परस्परांचे बांधव आहेत व मानव जातीची सेवा करण्यासाठी आपण जन्माला येतो असे हा धर्म मानतो. हा धर्म सर्वावर (शत्रूवरही) प्रेम करणे,

गरीबांची सेवा करणे, दृष्कृत्य करण्यास क्षमा करणे, रविवारी चर्च (प्रार्थनास्थळ) मध्ये जाऊन सामूहिक प्रार्थना करणे, उपवास करणे यांना धर्माचरण मानतो.

**पवित्र ग्रंथ :** बायबल हा ख्रिस्ती धर्माचा पवित्र ग्रंथ असून तो ईश्वराच्या प्रकटीकरणाचा मुख्य स्त्रोत मानला जातो.

**पंथ व उपपंथ :** रोमन कॅथालिक व प्रेटेस्टंट हे ख्रिस्ती धर्मातील मुख्य दोन पंथ असून प्रॉटेस्टंट पंथात ल्युयरियन, ऑग्लीकल, काँग्रिगेशनॉलिस्ट, रिफॉर्मड, बॉप्तिस्ट इ. उपपंथ आहेत.

**६) इस्लाम धर्म :**

मध्य-पूर्व आशियातील संघर्षमय व भटके जीवन जगणाऱ्या व अनेक देवदेवतांवर विश्वास ठेवणाऱ्या अरब समुदायात महंमद पैगंबर यांनी इस्लाम धर्म स्थापन केला आणि आपल्या अनुयायांना इस्लामचा प्रसार करण्याचा संदेश दिला. काही इस्लामधर्म प्रसारकांनी भारतात प्रवेश करून शांततेने तर कांही आक्रमकांनी तलवारीच्या जोरावर भारतात इस्लामचा प्रसार केला. इस्लामच्या अनुयायांना मुस्लिम किंवा मुसलमान म्हणतात. २००१ च्या जनगणनेनुसार मुस्लिमांच्या भारतातील लोकसंख्या १३.४% होती. जम्मु-काश्मिरमध्ये मुस्लिम बहुसंख्यांक असून त्यानंतर केरळ, उत्तरप्रदेश, बिहार, आसाम, पश्चिम बंगाल, आंध्रप्रदेश या राज्यांत आहेत. उरलेल्या राज्यात मुस्लिमांची संख्या कमी प्रमाणात आहे.

धर्मश्रद्धा, तत्त्वज्ञान व धर्मविधी : हा धर्म एकेश्वरवादी आहे. अल्ला हा एकमेव ईश्वर असून महंमद त्याचा प्रेषित आहे. महंमदास दिव्यवाणीतून आलेले अल्लाचे संदेश 'कुराण' या धर्मग्रंथात आहेत. 'देवदूत' हे अल्लाचे मदतनीस असून मानवाच्या कर्माची नोंद घेतात तर 'रसूल' हे मानवास मार्गदर्शन करतात व अव्लाचे संदेश मानवापर्यंत पोहचवितात. कयामतच्या दिवशी प्रत्येकास आपल्या कर्माचा अल्लास जाब द्यावा लागतो. पापी व्यक्तीस जहन्नूम (नरक) मध्ये तर पुण्यवान व्यक्तीस जन्नतमध्ये (स्वर्गात) जावे लागते अशा इस्लामच्या श्रद्धा आहेत. ''अल्ला हे अकबर'' हे वचनाचे पठन करणे, दिवसातून पाच वेळा नमाज (प्रार्थना) पडणे, दरवर्षी उत्पन्नातील १/४ भाग गरजूसाठी दान करणे (जकात), रमजान महिन्यात उपवास (रोजा) करणे व जीवनात एकदातरी हजयात्रा (मक्केची यात्रा) करणे हे इस्लाम मधील धर्मविधी आहेत. मुस्लिम मुर्तिपूजा करीत नाहीत. शुक्रवारी सामूहिक नमाज पडणे, कुराणग्रंथाचे पठण करणे पीर व फकिरांच्या कबरीवर चादर चढविणे इ. धर्मविधी मोठ्या श्रद्धेने मुस्लिम लोक पार पाडतात.

**तीर्थस्थळे :** जगातील सर्व मुस्लिमांच्या दृष्टीने मक्का व मदिना ही प्रमुख तीर्थस्थळे आहेत. भारतातील अजमेर, चिकमंगळूर, हाजिअली हे तीर्थस्थळे आहेत.

**पवित्रग्रंथ :** कुराण हा पवित्रग्रंथ असून त्याखालोखाल 'हदीस' (महंमदाच्या उपदेशाचा संग्रह) ह्या ग्रंथास आचारसंहिता म्हणून प्रमाण मानले जाते.

**पंथ व उपपंथ :** शिया व सुन्नी हे दोन मुख्य मंथ असून शियामध्ये इसना अशारी (१२ इमामांना मानणारे) व इस्मार्सल (७ इमामांना मानणारे) असे दोन उपपंथ आहेत. इसना अशारीमध्ये अकबरी व उसली तर इस्माईलीमध्ये दाऊदी व सुलेमानी हे उपप्रकार आहेत. सुन्नीपंथात हानिफी, शफी, मल्लकी व हनबली हे चार उपपंथ आढळतात.

### ७) पारशी धर्म (झरतुष्टी धर्म) :

पारशी धर्म हा इराण देशात उदयास आला. प्राचीन काळी हा पर्शियन लोकांच्या म्हणजे इराणी लोकांचा राष्ट्रीय धर्म होता. म्हणून त्यास पारशी म्हटले जाते. झरतुष्ट हा या धर्माचा संस्थापक असल्याने या धर्मास झरतुष्टी धर्म असेही म्हणतात. इस्लाम धर्माच्या लोकांकडून होणाऱ्या छळास कंटाळून सातव्या शतकात पारशी लोक भारतात आले व येथील सामाजिक जीवनात मिसळून गेले. कष्ट व प्रामाणिकपणाच्या जोरावर पारशी लोकांनी उद्योग-व्यापारात आघाडी घेतली. सद्या या लोकांची संख्या सुमारे साठ हजार इतकी अल्प असून हे लोक मुंबई व सूरत या दोन शहरात केंद्रीत झालेले आहेत.

**धर्मश्रद्धा, तत्त्वज्ञान व धर्मविधी :** पारशी धर्म एकेश्वरवादी आहे 'अहरमज्द' या नावाचा एकच देव असून तो सत्य, सर्वज्ञ सर्वशक्तीमान व मार्गदर्शक मानला जातो. या जगात स्पँना-मइन्यू (सुष्ट) व अंग्रो-मइन्यू (दुष्ट) अशा दोन शक्ती असून त्यांच्यात सतत संघर्ष सुरू आहे. या संघर्षात स्पॅना-मइन्यू विजयी होणार अशी पारशी धर्माची श्रद्धा आहे. मानवाने रक्षण करणारे देवदूत (गार्डीयन एजंल्स) मानलेले आहेत. हा धर्म सत्कृत्ये करणाऱ्यास 'स्वर्ग' तर दुष्कृत्ये करणाऱ्यास 'नरक' प्राप्त होतो असे मानतो. प्रत्येकास दुष्कृत्याची शिक्षा भोगावीच लागते असेही हा धर्म मानतो. सँना-मइन्य या शक्तीचा विजय व्हावा यासाठी मानवाचे वर्तन शुद्ध व पवित्र असावे, असे हा धर्म सांगतो. अग्नी व पाणी याचे पावित्र्य जपावे, प्रत्येकाने गृहस्थाश्रम स्वीकारून प्रजोत्पादन करावे. यावर हा धर्म भर देतो आणि संन्यास्तवृत्ती व ब्रह्मचर्य यांना हा धर्म विरोध करतो. अहूरमज्दची पूजाअर्चा करणष, दररोज ''अवेस्ता'' या पवित्रग्रंथाचे पठन करणे, पवित्र अग्नीचे रक्षण करणे, 'अग्यारी' नावाच्या प्रार्थनास्थळात म्हणजेच अग्नीमंदीरात दररोज पाचवेळा चंदन वाहणे, 'नवजोत' नावाचा समारंभ करणे इत्यादी विधी पारशी लोक करतात. यज्ञ, पशुबळी, मद्यमान, उपवास, व्रतवैकल्ये इत्यादी कर्मकांडास या धर्मात स्थान नाही.

### ८) ज्यू धर्म (यहूदी धर्म) :

मध्यपूर्वेत उदयास आलेल्या ज्यू धर्माचा संस्थापक 'अब्राह्म' मानला जातो. हा प्राचीन धर्म असून ख्रिस्ती व इस्लाम धर्माचा उदय ज्यू धर्मातूनच झालेला आहे. 'ज्युडीया' नावाच्या प्रदेशात राहणाऱ्या 'जुडा' लोकांचा हा धर्म असल्याने त्यास ज्यूधर्म असे म्हटले गेले. सुमारे एक हजार वर्षापूर्वी हा धर्म भारतात आल असून सद्या केरळ व महाराष्ट्र या दोन राज्यांत ज्यू लोकांची वसाहत आहे. त्यांची लोकसंख्या सुमारे ५ ते १० हजार इतकीच अल्प आहे.

**धर्मश्रद्धा, तत्त्वज्ञान व धर्मविधी :** हा धर्म एकेश्वरवादी आहे. यहोवा (किंवा जेहोवा) या नावाचा एकच ईश्वर असून तो अभय देणारा, प्रेमळ व सन्मार्ग दाखविणारा, स्वर्ग-नरक शांती-पाप, प्रकाश-अंधकार यांचा निर्माता आहे. मानव हा ईश्वराचा दास नसून तो त्याचा प्रतिनिधी आहे, तसेच ईश्वराची आकृती व सृष्टीची अंतिम कलाकृती आहे असे हा धर्म मानतो. मानव मूलत: पापी नसून मनाच्या दुर्बलतेतून त्याच्या हातून पाप घडते. तथापी पश्चाताप झाल्यास मानव सदाचाराकडे वळू शकतो. कारण चांगले व वाईट यातून एकाची निवड करण्याचे मानवास स्वातंत्र्य आहे असे हा धर्म मानतो. ईश्वराने मानवाच्या आनंदासाठी सृष्टी निर्माण केली आहे. म्हणून सर्व मानवांनी एकत्र येऊन आंनद निर्माण करावा म्हणजे सर्व जग आनंदी होईल असा आशावाद हा धर्म व्यक्त करतो. केवळ सत्कृत्याद्वारेच मुक्ती मिळू शकते असे मानून हा धर्म नैतिक आचरणावर भर देतो. ईश्वराकडून 'मोझेस' या प्रेषितास मिळलेल्या १० अज्ञांचे पालन करणे हे ज्यू लोकांचे प्रमुख धर्माचरण आहे. मूर्तिपूजा या धर्मास मान्य नाही. प्रार्थना व उपवास हे प्रमुख धर्मविधी आहेत.

**प्रार्थनास्थळ, पवित्र ग्रंथ :** 'सिनेगॉग' हे ज्यू लोकांच्या प्रार्थनास्थळाचे नाव आहे. 'शनिवार' हा पवित्र दिवस मानून त्या दिवशी ज्यू लोक प्रार्थनास्थळात जाऊन धार्मिक नियमांचे पठन करतात. बायबल मधील जुना करार (म्हणजे तेराह) हा या धर्माचा पवित्र ग्रंथ आहे. त्याखालोखाल 'टॅलमूड' हा ग्रंथ पवित्र मानतात.

वरील विवेचनावरून भारतातील धार्मिक विविधतेचे स्वरूप लक्षात येते.

**क) भारतातील जातींची विविधता :**

जातिव्यवस्था हे भारतातील हिंदू समाजाचे सामाजिक स्तरीकरण आहे. वैदिक काळातील समाज हा ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र या चार वर्गात म्हणजे वर्णात विभागला गेला.

या प्रत्येक वर्णाचा व्यवसाय निर्धारित केला. अध्ययन, अध्यापन, पौराहित्य हे ब्राह्मणाचे, राज्यकारभार, व संरक्षण हे क्षत्रियाचे, शेती, पशुपालन व व्यापार हे वैश्याचे तर वरील तीन वर्णांची सेवा करणे हे शूद्राचे कार्य ठरविले गेले. कालांतराने लोकसंख्या व गरजा वाढत गेल्या. त्यातून प्रत्येक वर्णामध्ये समूह व उपसमूह निर्मार झाले या समूहांना व उपसमूहांनाच अनुक्रमे जाती व उपजाती (पोटजाती) म्हटले गेले. अशाप्रकारे चार वर्णातून सुमारे ३००० हजाराहून अधिक जाती उदयास आल्या. प्रत्येक जातीची वैशिष्ट्यपूर्ण अशी जीवनपद्धती विकसित झाली. व्यवसाय, विवाह, सामाजिक दर्जा, खाणेपिणे, पोषाख, सामाजिक संपर्काचे क्षेत्र, मित्रपरिवार, संस्कार, पूजाअर्चा, सणसमारंभ इत्यादीबाबतीत जातीचे नियम उदयास आले. जातीचे नियम प्रत्येकाने पाळणे हे धर्मपालन ठरविले गेले. व्यक्ती जातीचे नियम पाळतात की नाही हे पाहण्यासाठी प्रत्येक जातीने एक मंडळ म्हणजेच जातपंचायत स्थापन करण्यात आली. अशाप्रकारे जातीच्या आधारे भारतीय समाजात विविध प्रकारचे समूह व उपसमूह निर्माण झाले. प्रत्येक जातीची विशिष्ट अशी इतरांहून वेगळी जीवनपद्धती आकारास आली. परिणामी जातीच्या आधारे मोठी विविधता निर्माण झाली. जाती जातीतील परस्परसंबंधाची एक व्यवस्था निर्माण झाली. या व्यवस्थेसच जातिव्यवस्था म्हणतात.

वर म्हटल्याप्रमाणे जातिव्यवस्था ही सामाजिक स्तरीकरणाची व्यवस्था असल्याने तिच्यात श्रेष्ठ-कनिष्ठतेच्या भावनेवर आधारलेली अधिक्रमी रचना (सोपान परंपरा) तयार झालेली आहे. या रचनेत जातींचे चार स्तर किंवा श्रेणी असल्याचे आढळते.

**१) उच्च जाती :** जातिव्यवस्थेत कांही जातींचा सामाजिक दर्जा उच्च किंवा श्रेष्ठ मानलेला आहे. त्यांना उच्च जाती असे म्हणतात. यामध्ये ब्राह्मण, क्षत्रिय, राजपूत, बनिया इत्यादींचा समावेश होतो.

**२) मध्यम जाती :** वरील जातींच्यापेक्षा कनिष्ठ सामाजिक दर्जा असलेल्या जातींना मध्यम जाती म्हणता येईल. यामध्ये अहिर, जाट, मराठा, सोनार इत्यादी जातींचा समावेश होतो.

**३) कनिष्ठ जाती :** मध्यम जातीपेक्षा कनिष्ठ सामाजिक दर्जा असलेल्या जाती कनिष्ठ जाती ठरतात. यामध्ये सुतार, धोबी, न्हावी, तेली, शिंपी इत्यादी जाती येतात.

**४) अस्पृश्य जाती :** सर्वात कनिष्ठ सामाजिक दर्जा असलेल्या जातींचा अस्पृश्य जातीत समावेश होतो. महार, मांग, चांभार, ढोर, भंगी इत्यादी जाती अस्पृश्य आहेत.

परंपरेने उच्च जातींना विशेषत: ब्राह्मणास सामाजिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक क्षेत्रात अनेक विशेषाधिकार बहाल केले तर कनिष्ठ जातींवर अनेक अपात्रता लादल्या. अस्पृश्य जातींना तर जीवनाच्या सर्व क्षेत्रातून जवळजवळ बहिष्कृत केले. विविध जाती ठराविक अंतर ठेऊन एकमेकांशी व्यवहार करतात.

त्यामुळे प्रत्येक जात जणू सवता सुभाच बनला आणि जातीच्या आधारे हिंदू समाज अनेक खंडात (गटात) विभागला त्यामुळे हिंदूसमाजात कमालीची विविधता निर्माण झाली.

भारतात हिंदू हे बहुसंख्यांक असून जैन बौद्ध, ख्रिस्ती, मुस्लिम हे अल्पसंख्यांक आहेत. बहुसंख्यांक हिंदूच्या संपर्कात दीर्घकाळ राहिल्याने जैन, ख्रिस्ती, मुस्लिम या धार्मिक समूहातही जातीसदृश्य स्तररचना निर्माण झालेली आहे. उदा. जैनधर्मातील दिगंबर पंथात ८७ तर श्वेतांबर पंथात ३८ जातींची नोंद असल्याचे आढळते. ओसवाल, पाखाडा, हुंबडा, नरसिंगपूर इ. जाती दोन्ही पंथात आढळतात. तर खंडेलवा पाखरा या जाती फक्त श्वेतांबरात आढळतात. हातकारा कोष्टी, साळी, गुरव, कासार इ. व्यावसायिक जातीही जैनात आढळतात. मुस्लिमांमध्ये अशरफी व अजलफी असे दोन मुख्य जातीसदृश्य गट निर्माण झालेले आहेत. अशरफीचा दर्जा श्रेष्ठ तर अजलफीचा कनिष्ठ मानला जातो. अशरफी मध्ये महंमद, शेख, मोगल व पठाण असे चार उपगट आहेत. अजफली मध्ये धर्मांतरीत झालेल्या हिंदूतील कनिष्ठ जातीचा समावेश होतो.

**ड) भारतातील जमातींची विविधता :**

भारतात जाती प्रमाणेच अनेक आदिम जमातीही आढळतात. भारतात सुमारे ४०० पेक्षा अधिक आदिम जमाती असून त्या भारतीय समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर व दुर्गम भागात वास्तव्य करतात. आदिम जमातींची जीवनपद्धती ही प्रगत लोकांपेक्षा वेगळी व वैशिष्ट्यपूर्ण आहे. अनेक जमाती खाद्यसंकलन, शिकार व स्थानांतरीत शेती अशा आर्थिक क्रिया करतात. आदिमांची लोकसंख्या सुमारे ७.८% इतकी आहे. आदिम जमाती भारतभर विखूरलेल्या आहेत. मध्यप्रदेश, ओरीसा, बिहार, गुजराथ व महाराष्ट्र या तीन राज्यांत देशातील सुमारे दोन तृतीयांश आदिम लोकसंख्या आढळते. तर राजस्थान, आंध्रप्रदेश व प.बंगाल या तीन राज्यांत वीस लाखापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या आदिम जमाती आहेत. मिझोराम, नागालँड, मेघालय, अरुणाचल प्रदेश व त्रिपुरा या पाच राज्यांत एकूण लोकसंख्येत आदिम लोकसंख्येचे प्रमाण ७० ते ९५ टक्क्यापर्यंत आहे. भारताच्या वेगवेगळ्या भागातील प्रमुख आदिम जमाती पुढीलप्रमाणे आहेत.

**अ) ईशान्य विभाग :**

(आसाम, मिझोराम, मेघालय, मणिपुर, त्रिपुरा, नागालँड) या विभागामध्ये बोडो, अबीर, मिझो, कुकी, खासी, गारो, अंगामी, लुशाई, मुंडा, दुआंग इ. जमाती आढळतात.

**ब) उत्तर विभाग :**

(काश्मीर, उत्तर प्रदेश, हिमाचल प्रदेश) या विभागात गुर्जर, लहौल, गड्डी, भोतिया इ. जमाती आहेत.

**क) पूर्व विभाग :**

(प.बंगाल, बिहार, ओरिसा) या विभागात संयाल, हा, कोरवा, बैगा, चेंचू, उराँव बिरहोर या जमाती आहेत.

**ड) पश्चिम विभाग :**

(राजस्थान व गुजरात) भिल्ल, गोंड, कोळी, ठाकूर, कोरकू, परधान इ. जमाती आहेत.

**इ) मध्य व दक्षिण विभाग :**

(मध्य प्रदेश, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, कर्नाटक, केरळ व तमिळनाडू) यात बैगा, दुबळा, गोंड, कोलाम, वारली, ठाकर, कातकरी, चेंचू, येनाडी, कुर्ग, तोडा, मथूवन, पुलियन, पनियन, इरुला इ. जमाती आहेत.

**फ) बेटे :**

अंदमान निकोबार बेटावर निकोबारी, शॉम्पेन, ओंजे, जारावा या जमाती आढळतात. पंजाब, हरियाना, जम्मू-काश्मीर ही राज्ये व दिल्ली, चंदीगड, पाँडेचरी या केंद्रशासीत प्रदेशात मुळचे असे आदिवासी नाहीत.

भारताच्या ह्या विभिन्न विभागात राहणाऱ्या आदिम जमातीची जीवनपद्धती ही प्रगत समाजाच्या जीवनपद्धतीहून तर भिन्न आहेच शिवाय ह्या विविद जमातींची जीवनपद्धती देखील परस्परांहून भिन्न आहे. वेगवेगळ्या आदिम जमातींचे रितीरिवाज, व्यवसाय, भाषा, धर्मश्रद्धा व कर्मकांड, मूल्ये, नियमने, कौटुंबिक व वैवाहिक जीवन इत्यादी बाबी वेगवेगळ्या आहेत. तसेच त्यांच्या समस्या व प्रश्न देखील प्रगत समाजाहून तसेच परस्परांहून देखील वेगवेगळे आहेत. त्यामुळे भारतात आदिम जमातीतही मोठी विविधता असल्याचे आढळते. अलिकडील काळात प्रगत लोक आणि आदिवासी लोक त्यांच्यातील संपर्काचे प्रमाण वाढत चाललेले आहे. प्रगत लोकांच्या संस्कृतीतील अनेक घटकतत्त्वे आदिम जमाती स्वीकारत आहेत. त्यामुळे आदिमांच्या पारंपारिक जीवनपद्धतीत आधुनिक गोष्टींचा शिरकाव होत चालला आहे. त्यामुळे देखील आदिम जमातीच्या जीवनातील विविधतेत भर पडत चालली आहे.

**इ) भारतातील वांशिक विविधता :**

भारतात मोठ्या प्रमाणावर वांशिक विविधता आहे. कारण भारतात विभिन्न वंशाचे व उपवंशाचे लोक वास्तव्य करतात. या विभिन्न वंशाचे, विभिन्न कालखंडात भारतात आगमन झाले व काळाच्या ओगात ते परस्परात मिसळून संमिश्र बनले म्हणजेच वंशसंकर घडून आला. त्यामुळे भारतात विभिन्न शारीरिक लक्षणे असलेले मानवी समुह म्हणजेच वंश दिसून येतात. म्हणून भारतास वंशाचे संग्रहालय (चींशीीं ेष ीरलशी) असे म्हणतात. अनेक विद्वानांनी उदा - सर हर्बर्ट रिस्ले, डॉ. हंटन, डॉ. बी. एस. गुहा इत्यादींनी भारतातील लोकांचे वांशिक वर्गीकरण केलेले आहे. त्यापैकी डॉ. गुहा यांचे वर्गीकरण अधिक समाधानकारक मानले जाते. म्हणून त्यांच्या वर्गीकरणाच्या आधारे आपण भारतात वांशिक विविधता समजावून घेणार आहोत.

डॉ. गुहांनी भारतीय लोकसंख्येचे पुढील सहा प्रमुख वंशात विभाजन केलेले आहे.

१) निग्रिटो (Negrito)

२) प्रोटो - ऑस्ट्रॉलॉईड (roto-Australoid)

३) मंगोलॉईड (Mangoloid)

४) मेडिटरेनियन (Mediterranean)

५) वेस्टर्न ब्राचीसेफाल्स (Western Brachycephals)

६) नॉर्डिक (Nordic)

आता या सहा वंशांची शारीरिक लक्षणे कोणकोणती आहेत आणि ती लक्षणे भारतातील कोणत्या प्रदेशातील लोकांमध्ये दिसून येतात हे समजावून घेऊया. तसेच उपवंशाचीही माहिती करून घेऊया.

**१) निग्रिटो : डॉ. गुहा :** यांच्या मते हा भारतातील सर्वात प्राचीन वंश असावा. या वंशाची शारीरिक लक्षणे पुढीलप्रमो आहेत.

उंची - ५ फुटापेक्षा कमी.

डाके – मध्यम, गोल व लांबही आढळते.

रंग – त्वचेचा रंग काळा

केस – काळ्या रंगाचे व लोकरीसारखे वेटोळे असलेले

नाक – रुंद व पसरट (चपटे)

ओठ – मोठ्या आकाराचे म्हणजे जाड

कोचीन त्रावणकोरमधील डोंगराळ प्रदेशातील कादर, इरुला, पनियन तसेच अंदमान बेटावरील अंदमानी व आँग या आदिम जमातीत या वंशाची लक्षणे आढळतात. तसेच या वंशाची काही लक्षणे राजमहाल टेकड्यांवरील बागडी व अंगामी नागा या जमातीतही आढळतात. पश्चिम किनारपट्टीवरील काही समुहातही या वंशाची ठळक लक्षणे आढळतात. भारताच्या संमिश्र संस्कृतीत या वंशाचे नेमके योगदान किती आहे. याबाबत निश्चित काही सांगता येत नाही.

**२) प्रोटो–ऑस्ट्रालॉईड :** निग्रिटो वंशाच्या लोकानंतर प्रोटो–ऑस्ट्रालॉईड वंशाचे लोक भारतात आले असावेत. संख्येच्या दृष्टीने हा वंश महत्त्वाचा आहे. या वंशाची शारीरिक लक्षणे पुढीलप्रमाणे आहेत.

उंची – मध्यम

डोके – लांब आणि खाली असलेले कपाळ

रंग – त्वचा तपकिरी, कांहीच्या बाबतीत पूर्ण काळी.

केस – काळ्या रंगाचे कुरळे केस पण लोकरीसारखे नाहीत.

नाक – चपटे व रुंद, मुळाशी दबलेले

ओठ – मांसल, मोठ्या आकाराचे आणि जाड जबडा

हनुवटी – लहान.

या वंशाचे लोक भारतभर पसरलेले आहेत. विशेषत: पुर्व आणि मध्य भारतात मोठ्या प्रमाणावर, तर दक्षिण भारतात काही प्रमाणात आढळतात. भिल्ल, चेनऊ, कोरकु, मुंडा, चेंचु इत्यादी आदिम जमातीत या वंशाची लक्षणे आढळतात. या वंशाच्या लोकांनीच भारतीय सभ्यतेचा पाया रचला त्यांनीच ऊस, तांदुळ, साग, भाजीपाला इत्यादींची लागवड सुरू केली. इंडोआर्यन लोकांनी त्यांच्याशी अनस, दास, दस्यू, निषाद इत्यादी अपमानास्पद संज्ञा वापरलेल्या आहेत.

**३) मंगोलॉईड :** या वंशाचे लोक ईशान्येकडील बिकट मार्गाने विशेषत: आसाम – म्यानमार मार्गाने तसेच भुतान – नेपाळ मार्गाने प्रथम तिबेटमध्ये व नंतर भारतात आले असावेत. या वंशाची शारीरिक लक्षण पुढीलप्रमाणे आहेत.

उंची – मध्यम

डाके – काहीची डोकी रुंद तर काहींची लांब

रंग – त्वचा पिवळसर रंगाची

केस – विरळ, मऊ आणि सरळ

नाक - लहान व चपटे

ओठ - जाड

डोळे - तिरपे, पापणीवर जाड मांसल असा एक जादा पडदा.

चहरा - चपटा, गालाची हाडे वर आलेली.

हिमालयाच्या पर्वतमय प्रदेशातील व ईशान्य भारतातील अनेक आदिम जमाती या वंशाच्या आहेत. तसेच पश्चिम बंगाल, मणिपूर, त्रिपुरा या राज्यांतील बिगर आदिवासी लोकांतही या वंशाची काही लक्षणे आढळतात. मंगोलॉईड वंशाच्या अ) पॅलिओ-मंगोलॉईड आणि ब) तिबेटो-मंगोलॉईड या दोन शाखा (उपवंश) भारतात आढळतात. 'सेमानागा' हे त्याचे प्रातिनिधीक उदाहरण आहे. दार्जिलिंगमधील लेपचा जमात रुंद डोक्याच्या मंगोलॉईड वंशाचे प्रतिनिधित्व करते. तिबेटो - मंगोलाईड हे भारतात सिक्किममध्ये (तसेच भुतानमध्ये) आढळतात.

**४) मेडिटरेनियन (भूमध्यसागरीय) :** या वंशाचे लोक द्रविड भाषा व संसकृती यांच्याशी संबंधित असल्याने त्यांना द्रविडीयन असेही म्हणतात. तथापी द्रविड या आर्य हे वंश आहेत असे म्हणणे बरोबर नाही. कारण या संज्ञा भाषिक समुह सुचित करतात असे डॉ. दुबे म्हणतात. या वंशाच्या लोकांनीच सिंधु संस्कृती निर्माण केली असे पारंपारिक मत आहे. या वंशाची शारीरिक लक्षणे पुढीलप्रमाणे आहेत.

उंची - मध्यम

डाके - लांब

रंग - त्वचे काही, भुरकट रंगाची

केस - काळे व कुरळे

ओठ - पातळ

मेडिटरेनियन वंशाच्या पुढील तीन शाखा (उपवंश) आहेत. अ) पॅलिओ मेडिटरेनियन ब) मेडिटरेनियन, क) ओरिएंटर मेडिटरेनियन.

पहिली शाखा सर्वात प्राचीन असून कन्नड, तामिळ मल्याळम इत्यादी भाषिक समुहात दिसते. दुसरी शाखा पंजाब व गंगेच्या वरच्या घाटातून दिसून येते. तर तिसरी शाखा राजस्थान व पश्चिम उत्तर प्रदेशात दिसून येते.

**५) वेस्टर्न ब्राचीसेफाल्स (पश्चिमी रुंद डोक्याचे) :** या वंशाचे लोक आफ्रिकेतून भारतात आलेले लोक आहेत. या वंशाची शारीरिक लक्षणे पुढीलप्रमाणे आहेत.

डोके - रुंद डोके हे प्रमुख लक्षण

शरीरबांधा - मध्यम

नाक - लहान

रंग - त्वचा पिवळ्या व भुऱ्या रंगाची

या वंशाच्या अल्पिनॉईड, डिर्नेरिक व अर्मेनॉईड अशा तीन शाखा आहेत.

**अ) अल्पिनॉईड** (Alpinoid)

रुंद डोके, अरुंद नाक, गोल चेहरा, मध्यम पण मजबूत बांधा ही या शाखेची शारीरिक लक्षणे आहेत. दक्षिण बलुचिस्थान मधून सिंधमार्गे हे लोक भारतात आले असावेत. ही शाखा गुजरात मध्ये प्रकर्षाने आढळते तर मध्यभारतात, पर्वेत्तर प्रदेश व बिहार येथे क्वचित ठिकाणी आढळते.

**ब) डिनॅरिक** (Dinaric)

रुंद डोके, काळसर रंग, लांब चेहरा, लांब नाक ही या शाखेची प्रमुख शारीरिक लक्षणे आहेत. तिचे प्रतिनिधी कुर्गमध्ये सापेक्षत: शुद्ध स्वरूपात तसेच ओरिसा, काठेवाड, बंगाल येथे आणि कन्नड व तमिळ भाषिक प्रदेशात आढळतात.

**क) अर्मेनॉईड** (Armenoid)

रुंद डोके, गोरा रंग, मध्यम ते बुटका बांधा, अरुंद नाक ही या शाखेचे शारीरिक लक्षणे आहेत. पारशी लोक या शाखेचे प्रतिनिधी आहेत.

**५) नॉर्डिक :** म्हणजे आर्य लोक होय. इ.स. पूर्व २००० ते १५०० या कालावधीत नॉर्डिक वंशाचे लोक मध्य आशियातून भारतात आले. सर्वप्रथम ते पश्चिम व उत्तर पंजाबमध्ये स्थिरावले. तेथुन ते गंगेच्या मैदानात व त्यापलिकडे पसरले. पशुपालक असलेल्या आर्याचा सिंधु संस्कृतीतील लोकांशी संघर्ष झाला या वंशाची शारीरिक लक्षणे पुढीलप्रमाणे आहेत.

उंची – मध्यम

डोके – लांब भव्य कपाळ

रंग – गोरा

केस – काळे मुलायम

ओठ – पातळ

नाक – सरळ

चेहरा – लांब व हनुवटी लक्षणीय

नॉर्डिक वंशाचे लोक भारतात सर्वात शेवटी आलेले असले तरी त्यांनी भारतीय समाज व संस्कृती यावर आपला ठसा उमटविलेला आहे. पंजाब, राजस्थान व काश्मिर या राज्यात या वंशाचे लोक पसरलेले आहेत.

वरील विवेचनेवरून भारतातील वांशिक विविधता लक्षात येते.

## २.३.२ भारतातील विविधतेतील एकता :

भारतातील भाषिक, धार्मिक, जातीची, जमातीची व वांशिक विविधता अभ्यासल्यानंतर तुम्ही आता या विविधतेत एकता कशी आहे याचा अभ्यास करणार आहात. भारतात मोठ्या प्रमाणावर विविधता असली तरी त्या विविधतेत एकता असल्याचे निदर्शनास येते. ही एकता पुढील प्रमाणे समजावून घेता येईल.

**१) भाषिक एकता :** भारतात अनेक भाषा व बोलीभाषा आहेत. तथापी ह्या भाषिक विविधतेत एकता असल्याचे दिसून येते. ह्या अनेक भाषांची वर्णमाला सारखीच आहे. यापैकी अनेक भाषांवर विशेषत: इंडो-आर्यन कुटुंबातील भाषांवर संस्कृत या भाषेचा प्रभाव दिसून येतो. भारताच्या इतिहासात वेगवेगळ्या काळात वेगवेगळ्या भाषांना महत्त्व मिळालेले असले तरी त्यामुळे भाषिक संघर्ष निर्माण झालेला आढळत नाही. वैदिक काळात संस्कृतला महत्त्व होते. जैन व बौद्ध धर्मांनी संस्कृतला विरोध करून प्राकृत भाषांना (अर्धमागधी व पाली) महत्त्व दिले. तथापि ह्या दोन्ही भाषांवर संस्कृतचा प्रभाव आहे. मुस्लिम राजवटीत फारसी, अरबी या भाषांना महत्त्व आले हे खरे असले तरी ह्या भाषा व इतर भाषा यांनी एकमेकींना प्रभावित केले. त्यांच्यात कांही बाबतीत देवाणघेवाण झाली हे विसरता येणार नाही. उदा. फारसी व हिंदी भाषेतून ऊर्दू भाषा जन्मास आली. इंग्रज राजवटीच्या काळात इंग्रजी भाषेस महत्त्व आले आणि भारतीयांनी सरकारी नोकऱ्या मिळविण्यासाठी तसेच पाश्चिमात्य ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान व तत्त्वज्ञान जाणून घेण्यासाठी इंग्रजी भाषेचा स्वीकार केला. यावरून भारतात भाषिक सामंजस्याची वृत्ती असल्याचे स्पष्ट होते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर हिंदी भाषेस राष्ट्रभाषा मानले गेले. वेगवेगळ्या भाषा बोलणाऱ्या लोकांना आपसात संपर्क साधण्यासाठी एका समान भाषेची गरज होती. ही गरज हिंदी भाषा तसेच कांही प्रमाणात इंग्रजी भाषा पूर्ण करीत आहे. अर्थात प्रारंभी दक्षिणेकडील लोकांनी हिंदीस विरोध केला हे खरे. तथापि हा विरोध हळूहळू कमी होत चालला आहे. स्वातंत्र्यानंतर विविध धर्मग्रंथांचे व वेगवेगळ्या भाषेतील महान साहित्यिक कृतींचे वेगवेगळ्या भाषांत भाषांतर केले जात आहे. स्थानिक भाषांचे महत्त्व अबाधित रहावे म्हणून भाषावर राज्य रचना केली व ती लोकांनी स्वीकारली आहे. अशाप्रकारे भारतात भाषिक विविधता असली तरी त्यामुळे भारतात अव्यवस्था निर्माण झालेली नाही.

**२) धार्मिक एकता :** भारतात विभिन्न धर्माचे लोक रहात असल्याने भारतात धार्मिक विविधता निर्माण झालेली आहे. तथापि, या धार्मिक विविधतेतही एकता असल्याचा प्रत्यय येतो. कारण भारतातील सर्वच धर्म हे सहकार्य, समन्वय, सदाचार, मानवता, बंधुत्व या मूल्यांची शिकवण देतात. श्रीनिवास म्हणतात त्याप्रमाणे भारतातील एकता ही मुख्यत्वेकरून धार्मिक एकता आहे. भारतातील लोक वेगवेगळ्या धर्मांची पूजाअर्चा करीत असले तरी येथील धर्मग्रंथ, तीर्थस्थळे, साधूसंत यांनी विविध धार्मिक समूहांना एका सूत्रात बांधून एका विशाल समाजाची निर्मिती केलेली आहे. हिंदू धर्मातील यज्ञयाग, वर्णभेद, जातीभेद, लिंगभेद इत्यादींना जैन, बौद्ध, शीख लिंगायत यांनी विरोध केला असला तरी त्यामुळे भारतात धार्मिक संघर्ष निर्माण झालेला नाही. उलट या धर्मिय लोकांच्या सामाजिक-सांस्कृतिक जीवनात बरीचशी एकरूपता निर्माण झाली असल्याचे दिसते. हिंदू धर्मातील ऋषी, साधुसंत, जैनमुनी, बौद्ध भिक्षूक, शीखांचे दहा गुरु सर्वच भारतीयांना पूर्ज्यनीय वाटतात. महावीर, गौतमबुद्ध, नानक, बसवेश्वर यांचे जीवन चरित्र व उपदेश सर्वांनाच आदर्श व अनुकरणीय वाटते. इस्लाम व ख्रिस्ती हे परक्या भूमीतील धर्म भारतात आल्यानंतर सुरुवातीस त्यांचा येथील धार्मिक समूहाशी संघर्ष झाला. तथापि, पुढे मात्र भारतातील धर्म व हे परकीय धर्म यांच्यात समन्वय व सामंजस्य निर्माण करण्याचे प्रयत्न करण्यात आले. हिंदू-मुस्लिम यांच्यात समन्वय साधण्याच्या प्रयत्नातून सुफी संप्रदाय उदयास आला. उपनिषदातील एकात्मतावादी तत्त्वमान, ख्रिश्चन धर्मातील नैतिकता, इस्लाम धर्मातील एकेश्वरवाद, बौद्ध धर्मातील प्रज्ञा व करुणा यांचा सुंदर समन्वय साधून ब्राह्मो समाज हा सुधारणावादी पंथ उदयास आला. धार्मिक सामंजस्य व एकता यांचे दर्शन ग्रामीण भारतात विशेषकरून दिसून येते. ग्रामीण भागातील विविध धर्माचे लोक एकमेकांच्या देवदेवतांची पूजा करतात, एकमेकांच्या धार्मिक उत्सवात सहभागी होतात. भारतातील बहुसंख्य ख्रिस्ती व मुस्लिम देवदेवतांची पूजा करतात, एकमेकांच्या धार्मिक उत्सवात सहभागी होतात. भारतातील बहुसंख्य ख्रिस्ती व मुस्लिम हे पूर्वाश्रमीचे हिंदूच्या कनिष्ठ

जातीतील लोक आहेत. त्यामुळे त्यांच्यावरील हिंदूधर्माचे संस्कार बऱ्याच प्रमाणात टिकून आहेत. त्यामुळेही हिंदू, ख्रिस्ती, इस्लाम या धर्मांच्या लोकांमध्ये कांही समानता दिसून येते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाने धर्मनिरपेक्षतेचा स्वीकार केला आणि प्रत्येक व्यक्तीस आपल्या आवडीचा धर्म स्वीकारण्याचा व त्याचा प्रसार व प्रचार करण्याचा अधिकार दिला. तसेच सरकार नागरिकांमध्ये धर्मांच्या आधारे भेदभाव करणार नाही असे आश्वासन राज्यघटनेने दिलेले आहे. त्यामुळे भारतात सर्वधर्मसमभावाचे वातावरण निर्माण होण्यास मदत झालेली आहे. स्वातंत्र्यानंतर अधूनमधून धार्मिक दंगली उसळताना दिसतात. तथापि त्यामागे धार्मिक कारणे नसतात तर आर्थिक व राजकीय कारणे असतात. हे अनेक अभ्यासातून सिद्ध झालेले आहे. थोडक्यात भारतात अनेक धर्म असले तरी त्यांच्यात मोठ्याप्रमाणावर समन्वय व सामंजस्य निर्माण करण्याचा प्रयत्न होत आलेला आहे. त्यामुळे धार्मिक एकता निर्माण झालेली दिसून येते.

**३) जातीतील एकता :** भारतात हजारो जाती व उपजाती असल्याने भारतात जातींची विविधता निर्माण झालेली आहे. परंतु ह्या विविधतेच्या अंतर्यामी देखील एकता असल्याचे दिसून येते. कारण अनेक जाती असल्या तरी कोणत्याही जातीने विभाजनाची प्रवृत्ती जोपासलेली नाही. सर्व जाती जातीनियमांचे पालन करीत सहास्तित्वाचे जीवन जगत असलेल्या आहेत. ग्रामीण भागातील बलुता पद्धतीत सर्व जातींना एकत्र येण्याची संधी दिली. ह्या सर्व जाती आपापल्या जातीचा व्यवसाय करून एकमेकांच्या गरजा भागवित आल्या आहेत. त्यामुळे जातीजातीत संघर्ष निर्माण न होता सामंजस्य निर्माण झाले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर राज्यघटनेने वर्णभेद, जातीभेद, अस्पृश्यतापालन नष्ट केले आहे. तसेच कनिष्ठ जातींना उच्च जातींच्या बरोबरीने आणण्यासाठी त्यांना अनेक सोयीसुविधा पुरविल्या जात आहेत. त्यामुळे कनिष्ठ जातींची आर्थिक व सामाजिक स्थिती सुधारण्यास व त्यांचे सामाजिक स्थान व दर्जा उंचावण्यास मदत होत आहे. त्यामुळे जातीजातीतील विषमता कमी होऊन त्यांच्यात समानता व एकता निर्मण होण्यास चालना मिळालेली आहे.

**४) वांशिक एकता :** भारतात विभिन्न वंशाचे व उपवंशाचे लोक असल्याने भारतात वांशिक विविधता निर्माण झालेली आहे. असे असले तरी या विभिन्न वंशाच्या व उपवंशाच्या लोकांना परस्परात मिसळण्याची संधी मिळाली. त्यामुळे वंशसंकर घडून आला आणि वंशभेद कमी होत गेला. आणि हळूहळू सर्व वंशांना भारतीयत्वाचे रुप प्राप्त झाले. आज भारतातच नव्हे तर संपूर्ण जगातच वंशसंकर झाल्याने शुद्ध स्वरुपातील एकही वंश आढळत नाही. आज वंशश्रेष्ठत्वाची भावना ही अवैज्ञानिक असल्याचे सिद्ध झालेले आहे. त्यामुळे वंशभेदाची भावना हळूहळू कमी होत चालली आहे. भारतात प्राचीन काळापासून विविधता असली तरी काळाच्या ओघात वांशिक भेद कमी होत गेल्याने धर्मभेद, जातीभेद, लिंगभेद याच्याप्रमाणे वंशभेद दिसून येत नाही.

वरील विवेचनावरून हे लक्षात येते की, भारतात भाषा, धर्म, जात, जमात, वंश इत्यादींच्या बाबतीत विविधता असली तरी ही विविधता बाह्य स्वरूपाची वा वरवरची आहे. या विविधतेच्या अंतर्यामी आपणास एकता असल्याचे दिसून येते. प्राचीन काळापासून ही एकता अस्तित्त्वात असून पुढील काळातही ती टिकून राहिल यात शंका नाही. कारण भारतीय समाज हा सहिष्णू वृत्तीचा आहे. 'जगा आणि जगू द्या' या सूत्रावर या समाजाची श्रद्धा आहे. त्यामुळेच विभिन्न प्रवाह भारतीयत्वाच्या प्रवाहावर मिसळून परस्परांशी एकरुप झालेले आहेत.

## २.४ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न (Check your progress)

**अ) बहुपर्यायी प्रश्न.**

१. भारतीय राज्यघटनेत किती भाषांचा समावेश केलेला आहे.

अ) १५ ब) १८ क) २२ ड) २५

२. कोणता धर्म अनेक देवतावादी आहे ?

अ) हिंदू ब) ख्रिस्ती क) इस्लाम ड) बौद्ध

३. कोणत्या राज्यात मूळच्या आदिवासी जमाती नाहीत ?

अ) पंजाबी ब) हरियाणा क) जम्मू-काश्मिर ड) वरील सर्व

४. डॉ. गुहा यांच्या मते भारतातील सर्वात प्राचीन वंश कोणता आहे.

अ) नॉर्डिक ब) निग्रिटो क) मंगोलाईड ड) मेडिटरेनियन

**ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. द्रविडीयन भाषिक कुटुंबातील कोणत्याही चार भाषा सांगा.

२. कोणता धर्म निरिश्वरवादी आहे ?

३. चार वर्णाची नावे सांगा.

४. पश्चिम विभागात आढळणाऱ्या चार आदिम जमाती सांगा.

५. पारशी लोक कोणत्या शाखेचे प्रतिनिधी आहेत.

## २.५ सारांश (Let us Sum up)

या दुसऱ्या अध्ययन घटकात तुम्ही भारतातील विविधता व त्या विविधतेत असलेली एकता अभ्यासली आहे. भारतात भाषा, धर्म, जात, जमात, वंश इत्यादीबाबतची मोठी विविधता आढळते. सर्वप्रथम तुम्ही भाषिक विविधता अभ्यासलेली आहे. भारतात ६ भाषिक कुटुंबे असून देशाच्या वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या भाषांचे प्राबल्य असल्याचे आढळते. भारतीय राज्यघटनेच्या आठव्या अनुसूचित मात्र केवळ २२ भाषांचीच नोंद आहे. त्यापैकी बहुतेक भाषा ह्या राज्यभाषा आहेत. बहुतेक सर्व प्रमुख भाषांच्या बोलीभाषा आहेत. भारतात भाषा व धर्म यांचा जवळचा संबंध आहे. ऐतिहासिक कालखंडात वेगवेगळ्या भाषांना महत्त्व प्राप्त झालेले आढळते. भाषिक विविधतेनंतर तुम्ही धार्मिक विविधता अभ्यासलेली आहे. भारतात हिंदू, जैन, बौद्ध, शीख, ख्रिस्ती, इस्लाम, पारशी व ज्यू या प्रमुख धर्मांचे लोक राहतात. या प्रत्येक धर्मात अनेक पंथ व उपपंथ आहेत. त्यामुळे भारतात धार्मिक विविधता निर्माण झालेली आहे. त्यानंतर तुम्ही जातींची विविधता समजावून घेतलेली आहे. भारतातील हिंदू समाजात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र या चार वर्णातून सुमारे तीन हजारापेक्षा अधिक जाती-उपजाती निर्माण झालेल्या आहेत. प्रत्येक जातीची स्वत:ची अशी वैशिट्यपूर्ण जीवनपद्धती विकसित झालेली असल्याने जातीची विविधता दिसून येते. यानंतर भारतातील आदिम जमातींची विविधता अभ्यासलेली आहे. भारतात सुमारे ४०० पेक्षा अधिक जमाती असून त्या देशाच्या विभिन्न भागात विखूरलेल्या आहेत. प्रगत लोकाहून आदिम जमातींची जीवन पद्धती वेगळी तर

आहेच पण एका जमातीची जीवनपद्धती ही इतर जमातींच्या जीवन पद्धतीहून देखील भिन्न आहे. सर्वात शेवटी तुम्ही भारतातील वांशिक विविधता अभ्यासलेली आहे. डॉ. गुहांच्या मते भारतात निग्रिटो, प्रोटोऑस्ट्रालॉइडस्, मंगोलाईड, मेडिटरेनियन, वेस्टर्न ब्राची सेफाल्स, नॉर्डिक ह्या ६ वंशाचे लोक असून प्रत्येक वंशात कांही उपवंश आढळतात. काळाच्या ओघात ह्या वंश व उपवंशाचे मिश्रण होऊन वेगवेगळी शारीरिक वैशिष्ट्ये असलेले समूह भारतात निर्माण झालेले आहेत. अशाप्रकारे भारतात भाषा, धर्म, जात, जमात, वंश याबाबतीत मोठी विविधता दिसून येते.

भारतात वरीलप्रमाणे विविधता असली तरी या विविधतेच्या अंतर्यामी एकता असल्याचे निदर्शनास येते. विविधतेत एकता कशी आहे हे तुम्ही भाषिक एकता, धार्मिक एकता, जातीय एकता, वांशिक एकता अशा क्रमाने समजावून घेतलेली आहे. भारतात विभिन्न वंशाचे, धर्माचे, भाषेचे जातीजमातीचे लोक प्रदीर्घ काळापासून एकत्र रहात आलेले आहेत. त्यांच्या परस्परसंबंधातून व सहास्तित्त्वातून एक वैशिष्ट्यपूर्ण अशी जीवनपद्धती आकारास आलेली आहे. या जीवनपद्धतीस भारतीय संस्कृती असे म्हणतात. आणि विभिन्न वंशाचे, जातीचे, धर्माचे, भाषेचे, जमातीचे लोक आपण या संस्कृतीचे पाईक आहोत असे मानतात. त्यामुळे भारतात 'विविधतेत एकता' निर्माण झालेली आहे.

## २.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे (Answers to check your progress)

**अ) बहुपर्यायी प्रश्नांची उत्तरे**

१) क २) अ ३) ढ ४) ब

**ब) एका वाक्यात उत्तरे**

१. द्रविडीयन भाषिक कुटुंबातील चार भाषा पुढीलप्रमाणे–
कन्नड, तमिळ, तेलगू आणि मल्याळम

२. बौद्धधर्म निरिश्वरवादी आहे.

३. चार वर्णांची नावे पुढील प्रमाणे : ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र

४. पश्चिम विभागात आढळणाऱ्या चार जमाती पुढीलप्रमाणे
भिल्ल, गोंड, ठाकूर, कोळी

५. पारशी लोक आर्मिनाईड शाखेचे प्रतिनिधी आहेत.

## २.७ सरावासाठी प्रश्न / गृहपाठ (Exercise / Home Assignent)

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. भारतातील भाषिक विविधता स्पष्ट कराा.

२. भारतातील धार्मिक विविधतेचे वर्णन करा.

३. भारातील जातींची व जमातींची विविधता विशद करा.

४. ''भारतात विविधतेत एकता आहे'' या विधानाची चर्चा करा.

**ब) टीपा लिहा.**

१. वांशिक विविधता

२. जातीची विविधता

३. आदिम जमातींची विविधता

४. भारतातील धार्मिक एकता.

## २.८ चिंतन आणि कार्य :

- तुमच्या समुदायातील विविध धर्मांच्या अनुयांच्या धर्मश्रद्धा व कर्मकांड यांचे अवलोकन करा व त्या आधारे एक टिपणी तयार करा.
- तुमच्या समुदायातील विविध जातीधर्माचे लोक एकमेकांच्या सणसमारंभात काय योगदान देतात याचे निरीक्षण करा आणि त्या निरीक्षणांची नोंद करा.

## २.९ अधिक वाचनासाठी पुस्तके :


१. S. C. Dube (2002) Indian Society, National Book Trust, India, New Delhi.:

२. T. K. Oommen & C. N. Venu Gopal (2003) Sociology for Law Students, Eastern Book Company.

३. T. K. Ommen (1990), State and Society in India Sage, Publications.

४. प्रा. चंद्रकांत खंडागळे (१९९८) भारतीय समाज, प्रकाशिका मायोदवी खंडागळे, सांगली.


❑❑❑

## सत्र १ : घटक ३

## भारतीय समाजाचे विभाग आणि त्यांची बदलती वैशिष्ट्ये

## (Segments of Indian Society and their Changing Features)

**घटक संरचना**


३.१ प्रस्तावना

३.२ उद्दिष्टे

३.३ विषय विवेचन

३.३.१ आदिम समाज : स्वरूप, वैशिष्ट्ये, परिवर्तन

(अ) स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

३.३.२ ग्रामीण समाज : स्वरूप, वैशिष्ट्ये, परिवर्तन

(ब) स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

३.३.३ शहरी / नागरी समाज : स्वरूप, वैशिष्ट्ये, परिवर्तन

(क) स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

३.४ स्वयं अध्ययनाची उत्तरे (अ, ब, क)

३.५ सारांश

३.६ दिर्घोत्तरी प्रश्न

३.७ क्षेत्रीय कार्य

३.८ संदर्भ पुस्तके.


### ३.१ प्रस्तावना

भारतीय समाजाला काही विचारवंतांनी जगाची छोटी प्रतिकृती (Micro Coshios) अशी उपमा दिलेली आहे. या देशात अनेक जाती धर्माचे पंथाचे व वंशाचे जसे लोक राहतात. त्याचप्रमाणे लोकसंख्येची विभागणी आदिम, ग्रामीण व शहरी भागातही मोठ्या प्रमाणात झालेली आहे. बहुविधा हे भारतीय समाजाचे वैशिष्ट्य आहे. या भारतीय समाजात आजही आदिवाशींची संख्या मोठी आहे. अत्यंत दुर्गम भागात बेटावर वस्ती करून रहातात. नैसर्गिक पर्यावरणात रहाणाऱ्या लोकांना कोणी जंगलचे राजे म्हणतात तर कोणी त्यांना धरतीची लेकरे म्हणतात. म. गांधी यांनी हरिजन असे संबोधतात. आदिवाशींच्या जगण्यात वागण्यात एक प्रकारची नैसर्गिकपणा आहे. त्यांच्यात कोठेही कमिमता आढळून येत नाही. ग्रामीण आणि शहरी समाजातील लोकांपेक्षा वागणे, बोलणे भिन्न आहे. वरवर पहाता आदिवाशी म्हणजे मागासलेले असभ्य, असंस्कृत

वाटतात असे काहीना वाटते पण प्रत्यक्षात या जमातींचा अभ्यास केल्यानंतर असे लक्षात येते की, किती तरी चांगल्या गोष्टी त्यांच्याकडे आहेत, ज्यांचा प्रगतांनी अनुकरण करावे. कार्लोघात हा साज टिकून आहे याचाच अर्थ त्यांच्याकडे जगण्यासाठीची काही चिरंतन मूल्ये त्यांच्याकडे आहेत. म्हणून त्याचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

त्याचप्रमाणे भारत हा एक खेड्यांचा देश आहे. आजही भारतातील बहुसंख्य लोक खेड्यात रहातात. त्यांची जगण्याची काही वेगळी वैशिष्ट्ये आढळून येतात. त्यांच्या जीवनावर निसर्गाचा आणि धर्माचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर आढळून येतो. त्यांचाही अभ्यास समाजशास्त्रीय दृष्टीकोण डोळ्यासमोर ठेऊन करणे आवश्यक आहे. ब्रिटिशांच्या आगमनानंतर भारतात औद्योगिकरणाला सुरवात झाली या औद्योगिकराबरोबर नागरिकरणालाही सुरवात झाली. शहरे नव्याने उदयास येऊ लागली शहरी लोकांचे जीवन व त्यांच्या समस्या वेगळ्या तयार होऊ लागल्या. त्यांचाही अभ्यास करणे गरजेचे भासू लागले.

## ३.२ उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर तुम्हाला आदिवाशी समाजाची वैशिष्ट्ये समजून घेता येतील आदिवाशी समाजामध्ये होत असलेले बदल अभ्यासता येतील. ग्रामीण समाजाची वैशिष्ट्ये समजून घेता येतील. ग्रामीण समाजामधील परिवर्तन लक्षात घेता येईल. शहरी समाजाची वैशिष्ट्ये समजून घेता येतील शहरी समाजातील परिवर्तनाचा अभ्यास करता येईल.

## ३.३ विषय विवेचन (Presentation of Subject Matter)

भारताच्या या सर्वच विभागात हळूहळू परिवर्तन होऊ लागले आहे. परिवर्तनासाठी जबाबदार

असणारे घटक प्रत्येक विभागासाठी थोडेफार वेगळे असतील पण प्रत्येक विभागात आतून बदल होत आहेत. यामुळे काही समस्या नव्याने तयार होत आहेत. या सर्वांचा थोडक्यात वेध घेणे हा या घटकाचा मुख्य हेतू आहे.

### ३.३.१ आदिम समाज : स्वरूप, वैशिष्ट्ये, परिवर्तन

आदिवाशी समाजासंबंधी विपुल लिखान सध्या उपलब्ध आहे. अनेक प्रवाशांनीही साहित्यिकांनी, ब्रिटीश अधिकाऱ्यांनीही लेखन केले आहे. पण या लिखाणात कधी कधी अतिरंजितपणा अतिशोक्तीपूर्ण लिखान आढळून येते. त्यामुळे आदिवाशीचे खरे स्वरूप लक्षात येत नाही. पण मानवशास्त्राच्या वेगवेगळ्या शाखांमधून आदिवाशींची वस्तुनिष्ठ अभ्यास केला जात आहे. काही लोक आदिवाशीना मात्र अगदी प्राचीन (aforigional) आदिम अगर आदिवाशी (Primitive People) डॉ. घुर्ये यांनी तथाकथित मूळचे रहिवाशी (Socalled aforigines) व मागासलेले हिंदू (Backward Hindus) असे संबोधले आहे. भारतीय राज्यघटनेत त्यांचा अनुसुचित जमात (Scheduled Tribe) असे संबोधले आहे. डॉ. दासानी या लोकांचे वर्णन बुडत असलेली मानवजात (ub-merged Humanity) असे केले आहे.

आदिवाशीची – व्याख्या – (Definition of Primitive Society)

**१) गिलीन आणि गिलीन** – एका विशिष्ट भूप्रदेशावर राहणाऱ्या समान बोलीभाषा बोलणारा व समान सांस्कृतिक जीवन जगणारा पण अक्षर ओळख नसलेल्या स्थानिय गटाच्या समुच्चयाला आदिवाशी समाज असे म्हणतात.

(Any collection of preliterate cocal grups which occupies a common general terriotory speels a common languge & practices common calture is a tribe.)

२) **डॉ. रिव्हर्स** - आदिवाशी समुह हा साधा सरळ, सामाजिक समूह असून त्यातील सदस्य हे एकाच समान बोलीभाषेचा वापर करतात आणि युद्ध वगैरे समान उद्दीष्टांच्या पुर्ततेसाठी एकत्र येऊन कार्य करतात.

(A tribe is a social group of simple kind, the member of which speak common dialect & act together in such common purposes as warfare.)

३) **इपिरिअल गॅझेटीअर ऑफ इंडिया** - समान नाव धारण करणारा, समान बोली भाषा बोलणारा एकाच भूभागावर राहाणारा आणि पूर्वी जरी आंतर्विवाही असण्याची शक्यता असली तरी आता आंतर्विवाही नसलेल्या कुटुंबाचा समुच्चय म्हणजे आदिवाशी हाये.

(A Tribe is collection of tamilies bearing a common name, speaking a common dialect, occupying or professing to occupy common territory & is not usually endogamous, though originally it might have been so.)

४) **डॉ. डी. एन्. मुजूमदार** - आदिवाशी म्हणजे समान नाव धारण करणाऱ्या, एका विशिष्ट भुप्रदेशावर निवास करणाऱ्या, एकाच प्रकारची भाषा बोलणाऱ्या विवाह, व्यवसाय या बाबतीत समान निषेध नियमांचे पालन करणाऱ्या व निश्चित अशा काही मूल्यांची विचारांची जोपासना करणाऱ्या कुटुंबाचा समूह होय.

(A Tribe is a colleaction of families or groups of families bearing a common name, members of which occupy the same territory, speak, the same language & observe certain taboos regarding marriage, profession or occupation & have developed well assessed system of reciprocity & mutulity of obligations)

वर उल्लेख केलेल्या विविध व्याख्यांचा अभ्यास केल्यास आपणास एक गोष्ट अगदी स्पष्टपणे लक्षात येते ती म्हणजे आदिम समाज हा ग्रामीण आणि शहरी समाजापेक्षा अनेक अर्थानी वेगळा आहे. म्हणूनच आदिवाशीचे वेगळेपण दर्शविणारी वैशिष्ट्ये लक्षात घेणे आवश्यक आहे.

- **आदिम समाजाची वैशिष्ट्ये** (Characteristics of Primitive Society) :

१) **प्रमाण लघुता** (Small in size) - आदिम समुह हे प्रादेशिक समूह आहेत. इतर कोणत्याही समाजाशी तुलना करता आदिम समूह हे लोकसंख्येने अगदी लहान आहेत काही आदिवाशींची लोकसंख्या ही १०० ते २०० च्या आसपास आहे. ज्या विशिष्ट भूप्रदेशावर ते रहात असतात तो भूप्रदेशच मर्यादित असतो. सदस्य संख्या मर्यादित असल्याने सामाजिक संपर्काचे क्षेत्रही मर्यादितच रहाते उदा. ओंगू जमात.

२) **विशिष्ट भूप्रदेश** - कोणत्याही समाजाच्या निर्मितीसाठी प्रदेशाचे बंधन हे अनिवार्यच असते. त्याविना समाजच अस्तित्वात येणार नाही. आदिम समाजही या नियमाला अपवाद नाही. बहुतेक आदिवाशी लोक विशिष्ट भूप्रदेशावर वास्तव्य करून रहातात. सर्वसाधारणपणे डोंगरकपारित घनदाट जंगलात, पाण्याने वेढलेल्या बेटासारख्या भागात वास्तव्य करून रहातात. तेथे नैसर्गिकरित्या उपलब्ध असलेल्या गुहेमध्ये रहातात किंवा झोपड्या बांधून राहतात. अत्यंत दुर्गम भागात रहात असल्यामुळे प्रगत समाजाशी यांचा फारसा संपर्क येत नसतो. त्यामुळे प्रादेशिक अलगता हे त्यांचे खास वैशिष्ट्य मानले जाते.

**३) बोली भाषेचा वापर** – प्रत्येक आदिवाशींची एक स्वतंत्र बोलीभाषा असते. या बोलीभाषेतूनच ते एकमेकांशी संपर्क साधत असतात. त्यांच्यातील समूहभावना दृढ ठेवणे व इतर जमातींपासून त्यांचा सांस्कृतिक वेगळेपण ठेवणे यासाठी त्यांच्या बोलीभाषेचा वापर प्रभावीतपणे होत असतो. ते अत्यंत दुर्गम भागात रहात असल्यामुळे व प्रगत समाजाशी वर्षानुवर्षे संपर्कच नसल्यामुळे अक्षरलिपी त्यांच्यामध्ये तयार झाली नाही. आदिवाशीच्या बोलीभाषेनच त्यांचे सामाजिक संबंध व्यक्त होतात. भाषेला लिपीनसल्याने संस्कृतीचे हस्तांतर नृत्य, म्हणी, वाक्यप्रचार, कोडी, उखाणे इ. च्या माध्यमातून एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जात असते. कला, वाङमय, धर्म इ. गोष्टींची वाढ ज्याप्रमाणे प्रगत समाजात झाली त्याप्रमाणे आदिवाशीमध्ये होऊ शकली नाही. त्यामुळे त्याच्या भाषेवर खूपच मर्यादा येतात.

अलिकडील काळात म्हणजे ब्रिटीशांच्या आगमनानंतर काही ख्रिश्चन मिशनरी लोकांच्या सहवासाने व स्वातंत्र्यानंतर उदारमतवादी धोरणामुळे काही आदिवाशी प्रगतांच्या संपर्कात आले त्यामुळे नवीन पिढी शिक्षण घेऊ लागली. शिक्षीत पिढी तयार झाली हे जरी खरे असले तरी असे प्रमाणे अगदी नगण्य आहे.

**४) साधी अर्थव्यवस्था** – आदिम समाजाची अर्थव्यवस्थाही निर्वाहप्रधान अर्थव्यवस्था आहे, निसर्गातील इतर मानवेतर प्राणी ज्याप्रमाणे आज आपणाला खाण्यासाठी किती लागतले. तेवढीच शिकार करतात खातात आणि उर्वरित सोडून देतात. निसर्गाच्या सानिध्यात राहणाऱ्या आदिवाशी माणसांची अर्थव्यवस्था सुद्धा अशीच आहे. गरजेपुरते अन्न मिळविले जाते. काही आदिवाशी अद्यापही अन्न संकलन शिकार मासेमारी (Food collection) यांच अवस्थेत आहेत, काही आदिवाशी शेती करीत असले तरी त्यांची शेती करण्याची पद्धत अगदीच साधी आहे. शिल्लक उत्पादन आढळत नाही. वस्तुविनिमयाच्या सहाय्याने परस्परांच्या आर्थिक गरजांचे निराकरण करतात. त्यांचे उत्पादन हे फायदा मिळविण्यासाठी किंवा बाजारपेठेसाठी असत नाही. त्यामुळे त्यांच्या सामाजिक जीवनात कमालीची समानता आढळून येते. प्रगतांच्या सारखी जीवघेणी स्पर्धा आढळून येत नाही. श्रमविभाजन हे सुद्धा लिंगभेदावर आधारलेली असते. स्त्रिया हलक्या स्वरूपाची कामे करतात तर पुरूष शारिरिकदृष्ट्या अवघड कामे करतात. उदा. शिकारीच्या वेळी मोठमोठ्यांनी आवाज करून प्राण्यांना घाबरविण्याचे काम स्त्रिया करतात तर शिकार करण्याचे काम पुरूष करतात. शिकारीनंतर आणलेल्या प्राण्याला शिजविण्याचे काम स्त्रिया करतात प्रगतांच्या सारखे विशेषकरण आदिमांच्यामध्ये आढळत नाही.

**५) समान नाव व एकाच रक्तसंबंधीपणाची श्रद्धा** – प्रत्येक आदिवाशी जमातीला तिचे एक स्वतंत्र नाव असते. जसे वारली, भिल्ल, गोंड, बिरहोर, हो, कातकरी, मूंडा इ. एका जमातीमधील लोक स्वतःला रक्तसंबंधीत मानतात. त्यांची सर्वांची उत्पत्ती एकाच पूर्वजापासून झालेली आहे असे ते समजतात किंवा त्यांची तशी धारणां असते. त्यामुळे त्यांच्यामधील सामुहिकबंध अधिक दृढ स्वरूपाचे आढळून येतात. तसेच होऊन गेलेल्या पूर्वजाविषयी ते कधीही शंका घेत नाहीत.

**६) सीमीत तंत्रविद्या** – अर्थव्यवस्था साधी असण्याचे अपरिहार्य कारण म्हणजे साधी व सीमीत तंत्रविद्या, आर्थिक क्रियेसाठी आदिवाशी वापरत असलेली हत्यारे व अवजारे ही अत्यंत साधी व अविकसित अशा स्वरूपाची असतात. धनुष्यबाण, मासे पकडण्याचे जाळी, कुऱ्हाळ, कुदळ, भाला इ. स्वतःच्या अनेक वर्षाच्या अनुभवातून त्यांनी ही हत्यारे अवजारे व त्यांच्या आर्थिक क्रियेचे स्वरूप लक्षात घेता हे स्पष्ट होते की, त्यांचे तंत्रविद्यात्मक ज्ञान अगदीच मर्यादित व तोकडे होते.

**७) समानधर्मश्रद्धा व जादूचा प्रभाव** – इतर समाजाप्रमाणे आदिवाशीत देखील धर्मश्रद्धा आढळून येतात. निसर्गाच्या सतत सहवासाने व निसर्गाच्या ऋतुचक्रात व इतर चमत्कार या विषयी त्यांच्या मनात

निसर्गाविषयी विलक्षण आदर वास करीत असतो. निसर्गशक्तीला अनन्यभावे शरण जातात. मानवी वर्तन नियंत्रण करणारी एक अद्‌भूत शक्ती आहे. याविषयी कोणामध्येही मतमतांतरे नसतात. सर्वांची समान श्रद्धा आढळून येतात. आदिमांच्यामध्येही पूर्वजपूजा, भूतपूजा, देवपूजा व निसर्गपूजा आढळून येतात. या अतिमानवी शक्तींना प्रसन्न करूण घेण्यासाठी भगताचा आधार घेतला जातो. जादूचा प्रभाव आदिम समाजात मोठ्या प्रमाणात आढळून येतो. धर्मश्रद्धेमुळे त्यांचा जीवनविषयक दृष्टिकोन निश्चित होत असतो. आदिमांच्या जीवनात धर्मश्रद्धेला अनन्य साधारण असे महत्व आहे.

८) **सामाजिक एकजिनसीपणा** – आदिवाशी समाजाचे हे प्रमुख लक्षण आहे. समान बोलीभाषा, समान धर्माचरण, समान संस्कृती व समान सामाजिक नियमने यामुळे आदिमांच्या संपूर्ण आचार विचाराला एकसारखेपणा व एकजिनसीपणा आढळून येतो. आचार विचार, परंपरा, रूढी, जीवन विषयक दृष्टिकोण यांच्यामध्ये सदस्यामध्ये कधीही मतभेद असत नाही. एखाद्या घटनेविषयी सर्व जमातीच्या सदस्यांची प्रतिक्रिया एकच असते. लोकमताचा प्रभाव त्यांच्या जीवनावर पडलेला असतो. त्यामुळे त्यांच्या आचार विचारात भिन्नता आढळून येत नाही.

**(अ) भारतातील आदिवाशी जमाती :**

१९९१ च्या जनगणना अहवालानुसार भारतातील आदिवाशींची लोकसंख्या ६ कोटी ७७ लाख इतकी होती. म्हणजेच एकूण लोकसंख्येच्या ८% हे प्रमाण आहे. ज्या राज्यामध्ये आदिवाशी जमाती आढळतात त्या राज्यांची व त्या राज्यातील काही आदिम जमातीची संक्षिप्त यादी पुढीलप्रमाणे –

१. आंध्रप्रदेश :(४.३%) चेंचू, कोया, वादबा, जतपूस, कोंडा दोरा, कोंडाकापूस, कोंडा रेड्डी, खोंड, येनारी इ.

२. आसाम : (१२.८%) गोरी, खासी, कुकी, मिझोर, सिंगफो.

३. बिहार : (७.७%) असूर, बैंगा, वंजारे, बिरहोर, गोंड, हो खाडीया, खोंड, मुंज.

४. महाराष्ट्र व गुजराथ : (९.३% व १४.९%) भिल्ल, गोंड, वारली, कोरकू, कोरवी, कोलाय, कोळी, ठाकूर, बैगा, कमार, खाडीया, खोंड, मुंडा, उराँव.

५. केरळ : (१.१%) कादर, इरूल, मुथुवन, कनिवकर, मालंकुरवन, पलयन, कुरूचियन.

६. मध्यप्रदेश : (२३.३%) कोरल, भिल्ल, बैंगा, गोंड, खोंड, उराँव, परधान.

७. म्हैसूर : (४.३%) गौदलू, हियपिक्वी, इरूलिग, जेतुकुयब, गोंड, तोडी, वारली.

८. ओरिसा : (२२.२%) बैंगा, बंजारे, बिरहोर, बोंढो, चेंचु, गदबा, गोंड संथाळ.

९. राजस्थान : (१२.४%) भिल्ल, गरासिया, दुबळा, गोंड, कोरकू, कातकरी.

१०. प. बंगाल :(५.६%) हो, कोल, मुंडा उराँव, भूमिज, संताळ, गारो, असूर, बैगा.

११. हिमाचलप्रदेश : (४.२%) गड्डी, गुर्जर, पगवल.

१२. मणिपूर : (३४.४%) अंगामी, मिझो, पुरवम, सेमा.

१३. त्रिपुरा : (३०.९१%) लुशाई, कुकीहलम, खास्त, मुतिया, मुंडा, संताळ.

भाषेच्या दृष्टिने विचार करता भारतातील प्रत्येक आदिवाशी जमातीची भाषा वेगळी आहे. प्रगत समाजाच्या शेजारी राहूनही भाषेचे वेगळेपण त्यांनी टिकवून ठेवलेले आहे. भारतातील भाषेची गणना करणाऱ्या ग्रिअरसन यांना त्यांच्या पाहणीत असे आढळून आले की, भारतात एकूण १७९ भाषा व ५४४ बोलीभाषा आहेत. यापैकी उत्तर व इशान्य भागातील (हिमाचलप्रदेश, सिक्कीम, अरूणाचलप्रदेश, मेघालय, नागालँड, मणिपूर इ.) अगदी छोट्या छोट्या जमाती ११६ बोली भाषा बोलतात व त्यांचा अतंर्भाव तिबेटी - चिनी भाषा परिवारामध्ये केला जातो.

भारतातील आदिम जमातीमध्ये गोंड व संथाळ जमाती संख्येने मोठ्या आहेत. मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, बिहार, महाराष्ट्र या राज्यात गोंड आढळतात. संथाळ हे ओरीसा, बिहार व पं.बंगालमध्ये अधिक आहेत. कलकत्ता विद्यापिठात संथाळी भाषेचा समावेश पदव्यत्तर अभ्यासक्रमात केला गेला आहे.

- **आदिम समाजातील परिवर्तन :**

कोणताही समाज कधीही स्थिर नसतो. तर त्या प्रत्येक समाजात रचनात्मक व कार्यात्मक पातळीवर बदल होत असतो. काही समाजात हे बदल अतिशय मंदगतीने होतात तर काही समाजात अधिक वेगाने बदल होत असतात. बदलाचा वेग हा त्या समाजव्यवस्थेवर अवलंबून असते. काळानुसार समाज जीवनात अनेक परिवर्तन होत असतात. कोणत्याही साजात समाजसंरचना टिकवून धरणाऱ्या म्हणजेच समाजाचे स्थैर्य टिकविणाऱ्या प्रक्रिया चालू असतात. उदा. सामाजिककरण, सामाजिक नियंत्रण इ. त्याचप्रमाणे समाजसंरचनेत बदल घडवून आणणाऱ्या प्रक्रियादेखील सुरू असतात. समाज रचनेत होणाऱ्या बदलांनाच सामाजिक परिवर्तन असे म्हणतात आदिम समाजात परिवर्तन मंदगतीने होत आहे.

ब्रिटीशांच्या आगमनाबरोबरच ख्रिश्चन मिशनऱ्यांचेही आगमन झाले. ख्रिश्चन धर्मगुरूंनी ख्रिस्तीकरणाला सुरवात केली. सुरवातीच्या काळात आसाम, मेघालय, बिहार, मध्यप्रदेश काही प्रमाणात महाराष्ट्रातील आदिवाशींचे शिक्षणाची सोय वैद्यकिय मदत, आर्थिक मदत याद्वारे आदिवाशीच्या जीवनावश्यक गरजा भागवून त्याना ख्रिश्चन धर्मीय केले. याला विरोध म्हणून काही उच्च हिंदूधर्मीयांनी त्यांचे हिंदूकरण करण्याची प्रक्रिया सुरू केली. हिंदूकरणाची प्रक्रिया म्हणजे हिंदूधर्मातील उच्च जातींच्या देवदेवता, श्रद्धा, सणवार, उत्सव, समारंभ साजरा करण्याच्या चालिरीतीचा आदीम समाजाकडून किंवा बिगर हिंदू असलेल्या समाजाकडून जीवनपद्धतीचा स्वकार करणे होय. हिंदूकरणाच्या प्रक्रियेत हिंदू समाजव्यवस्थेतील ब्राम्हण या उच्च जातीचे अनुकरण आदिवाशी प्रामुख्याने करतात. हिंदूकरणाच्या प्रक्रियेने काही आदिवाशी खुपच प्रभावित झालेले आहेत. हिमालय पर्वत प्रदेशातील खासा जमातीचे लोक आपल्या पारंपारिक चालिरीती पाळतात परंतू ते स्वतःला हिंदू वर्णव्यवस्थेतील क्षेत्रिय वर्णासमान मानले जातात. हिंदूप्रमाणे जान्हवे घालतात. ख्रिस्तीकरण व ब्राह्मणीकरणाच्या या प्रक्रियेत आदिवाशीच्या पारंपारिक जीवनपद्धतीत बराच मोठा बदल झालेला आहे.

स्वातंत्र्यानंतर संपूर्ण देशाला (जम्मू काश्मिर वगळता) लागू होईल अशी घटना भारताने स्वीकारली. सर्वांना राष्ट्रीय प्रवाहात सामील करून घेण्याच्या दृष्टिकोणातून योजना व धोरणे आखण्यात आली. आजच्या औद्योगिक युगात मानवाची झालेली वैज्ञानिक प्रगती, विविध सुविधांची झालेली सोय इ. लक्षात घेता ७% आदिवाशी अत्यंत दारिद्र्यात जीवन जगतात हे कोणत्याही समाजाला भूषणावह नाही. म्हणून याचे दुःख, दारिद्र्याचे निर्मूलन करण्यासाठी शासन पातळीवर अनेक प्रकारच्या योजना राबविल्या जात आहेत. घटनात्मक पातळीवरून आदिवाशींना संरक्षण दिले जात आहे. उदा. घटनेच्या कलम १६ प्रमाणे शासकीय नोकऱ्याबाबत कोणताही भेदभाव केला जाणार नाही, कलम १९ प्रमाणे आचार, विचार, मुक्त वावरण्याचे

स्वातंत्र्य मिळाले. कलम २३ प्रमाणे वेठबिगारी नष्ट झाली. घटनेच्या कलम ४ मधील उपकलम (१६४) प्रमाणे आदिवाशीची वस्ती अधिक असलेल्या बिहारी, ओरिसा व मध्यप्रदेश या राज्यात आदिवासींच्या कल्याणासाठी व विकासासाठी एक स्वतंत्र मंत्री नियुक्त करण्याची तरतूद आहे. कलम १६ मधील उपकम ३३० व ३३२ प्रमाणे लोकसभा व राज्यसभेवर सदस्यत्व मिळावे यासाठी आदिवाशींच्या काही जागा राखीव ठेवण्यात आल्या. आदिवाशीच्या मुलांसाठी आश्रमशाळा सुरू करण्यात आल्या, व्यावसायिक शिक्षणाची सोय करण्यात आली. शाळा महाविद्यालयामध्ये आदिवाशीच्या मुलांसाठी जागा राखीव ठेवण्यात आल्या. आदिवाशी मुलांना दुपारचे जेवण, शालेय साहित्य, पोषाख, शिष्यवृत्या देण्यात आल्या यासाठी राज्याकडून व केंद्राकडून मोठ्या प्रमाणात निधी खर्च केला जातो. आदिवाशी भागात महाविद्यालय उघल्यास सुरवातीपासूनच १००% अनुदान योजना काही राज्यांनी सुरू केली. यामुळे आदिवाशी मुले शाळा शिकू लागली. त्यांना नोकऱ्या मिळू लागल्या, त्यांच्या आर्थिक परिस्थितीत बदल होऊ लागला. कायद्यानुसार आदिवाशीच्या ताब्यातील जमीनीची विक्री, देणगी, गहाण, ठेका याबाबत व्यवहार बिगर आदिवाशींना करता येणार नाही. कुटीरोद्योग, पशुपालन, कुक्कुटपालन, वराहपालन या पूरक व्यवसायासाठी अर्थसहाय्य शासनामार्फत उपलब्ध करून दिले जात आहे. कर्जावरील व्याजामध्येही अनुदानाच्या माध्यमातून सुट दिली जात आहे. त्यांच्यासाठी सहकारी संस्था निर्माण केल्या जात आहेत. यामूळे त्यांच्याकडे पैशाचे चलन सहजपण उपलब्ध होऊ लागले आहे. आदिवाशीच्या जीवनाला स्थैर्य प्राप्तव्हावे यासाठी मोफत घरे बांधून दिली जात आहेत. शेतीसाठी सुधारीत बी-बियाणे खते, किटकनाशके यांचा पुरवठा केला जात आहे. यामुळे स्थिर शेती करण्याचा उत्साह आदिवाशीचा वाढतो आहे. आदिवाशीची हस्तकला जोपासण्यासाठी अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जात आहे व त्याचप्रमाणे त्यांनी निर्माण केलेल्या वस्तू बाजारात खपण्यासाठी बाजारपेठ उपलब्ध करून दिले जात आहे. त्यामुळे आदिवाशीचा प्रगत समाजाशी दिवसेंदिवस संपर्क वाढतो आहे. परिणामी जीवनपद्धतीचा स्वीकार आदिवाशी करीत आहेत.

पहिल्या पंचवार्षिक योजनेपासूनच आदिवाशीच्या विकासाचा भाग म्हणून आरोग्य व वैद्यकिय सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. महाराष्ट्राच्या मेळघाट सारख्या भागात कुपोषणामुळे माता बाल मृत्यूचे प्रमाणे मोठ्या प्रमाणात होते पण आज वैद्यकिय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने दवाखाने, फिरते दवाखाने, औषधे, शस्त्रक्रियेच्या सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. यासाठी काही स्वयंसेवी संस्था सुद्धा (NGO) पुढाकार घेत आहेत. यामुळे आदिवाशीच्या आरोग्यामध्ये सुधारणा होत आहेत. तरूण पिढी भगताकडे न जाता डॉक्टरांच्याकडे उपचार घेत आहेत हा एक रचनात्मक बदल आहे.

राजकीयदृष्ट्या आदिम समाज हा प्रगतापासू अलिप्तच होता. जमातीच्या अंतर्गत निर्माण झालेले प्रश्न सोडविण्याचे काम जमातप्रमुखा मार्फत केले जात असे. प्रत्येक आदिवाशी जमातीची जमात पंचायत असते त्यामार्फतच प्रश्नांची सोडवणूक केली जात होती. पण आज आदिवाशीनाही राष्ट्रीय प्रवाहात समावून घेण्याच्या धोरणांमुळे पंचायत समिती, जिल्हापरिषद व ग्रामपंचायत या त्रिस्तरीय व्यवस्थेत आदिवाशींना समाजावून घेतले जात आहे. ज्या भागात आदिवाशीची संख्या अधिक आहे, अशा ठिकाणी त्यांना विशेष प्रतिनिधीत्व घटनेचे आधारे दिले जात आहे. लोकसभा, विधानसभेमध्येही त्यांना प्रतिनिधत्व दिले जात आहे. यामधून काही नेते स्थानिक पातळीपासून देशाच्या पातळीपर्यंत नेतृत्व करीत आहेत. त्यांच्या राजकीय उन्नतीसाठी आदिवाशी मंत्रालय प्रयत्न करीत असते. आदिमांच्यामध्ये राजकीय जागृती होत आहे. स्वातंत्र्यानंतर यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. त्यामुळे त्यांना आपल्या हक्काची जाणीव होऊ लागली आहे. यामुळेच आज सावकार, ठेकेदार, कंत्राटदार यांच्या विरूद्ध लढण्याची उर्मी तयार होऊ लागली.

काही आदिम जमातीत अविवाहीत मुलामुलींच्यासाठी युवागृहे होती. या युवागृहांना एक आंतरिकमूल्य लाभलेले होते. या युवागृहात युवक युवती प्रसन्न मनाने वावरत असत. नव्या पिढींना जमातीच्या संस्कृतिची ओळख करून दिली जात होती. प्रगतानी मात्र या युवागृहांना असंस्कृत ठरविले. त्यामुळे नवी पिढी या युवागृहात जात नाही. त्यामुळे त्यांचा ऱ्हास होऊ लागला आहे. नवी पिढी निर्भेळ अशा करमणूकीला तसेच सांस्कृतिक जीवनाच्या शिक्षणाला, परंपरागत आनंदाला मुकली आहे. युवागृहाऐवजी आदिम युवक व्यसनी, वेश्यागमनी, सिनेमा यामध्ये रममानहोऊ लागला आहे.

बहुसंख्य आदिवाशीमधील स्त्री-पुरूष संबंधामध्ये एक प्रकारची मोकळीकता होती. विवाहपूर्व लैंगिक संबंधाकडे फारसे गांभीर्याने ते पहात नव्हते. पण अनेक वैवाहिक बंधने प्रगतांच्या संपर्कामुळे आदिवाशींनी स्वीकारली. त्यामुळे विवाह मुहूर्त, विवाह विधी, भटजीची उपस्थिती या गोष्टी आल्या. वधूमूल्याची जागा वर मूल्याने घेतली.

सारांश आदिम समाज वेगवेगळ्या कारणांनी प्रगताच्या संपर्कात येत असल्यामुळे त्यांच्या संस्कृतीची मोडतोड मोठ्या प्रमाणात होऊ लागली आहे. या परिवर्तनातून त्यांच्या जीवन जगण्याविषयीच्या, आरोग्य विषयीच्या काही गंभीर समस्या निर्माण होत आहेत.

**(अ) स्वयंअध्ययनासाठी प्रश्न (गाळलेल्या जागा भरा.) :**

१. भारतीय समाजशास्त्रज्ञ डॉ. जी. एस्. घुर्ये यांनी आदिवाशींना .............. संबोधले आहे.

२. लोकसंख्येच्या दृष्टिने आदिवाशीचे ............... हे वैशिष्ट्य आहे.

३. आदिवाशीमधील श्रमविभाजन हे ................. वर आधारलेले असते.

४. १९९१ च्या जणगणनेनुसार भारतात आदिवाशीची लोकसंख्या .................. इतकी आहे.

५. आदिमा सामाजिक परिवर्तनाला ................. नंतर सुरवात झाली.

### ३.३.२ ग्रामीण समाज : स्वरूप, वैशिष्ट्ये परिवर्तन :

सजामशास्त्र हे सामाजिक संबंधाचा अभ्यास करणारे शास्त्र आहे. या शास्त्राचा उदय जरी अलिकडील काळातील असला तरी विस्तार वेगाने होत आहे. वेगवेगळ्या सामाजिक संबंधाचा स्वतंत्र अभ्यास करण्यासाठी वेगवेगळ्या शाखा निर्माण होत आहेत. उदा. कौटुंबिक संबंधाचा अभ्यास करणारे कुटुंबाचे समाजशास्त्र, उद्योगधंद्याचा अभ्यास करणारे औद्योगिक समाजशास्त्र, वैद्यकिय समाजशास्त्र, शैक्षणिक समाजशास्त्र इ. त्याचप्रमाणे ग्रामवाशीयाच्या सामाजिक संबंधाचा अभ्यास करणारी एक शाखा म्हणून ग्रामीण समाजशास्त्र वेगाने विकसित होत आहे. ग्रामीण समाजजीवनाचा अभ्यास भारताच्या दृष्टिने विशेष महत्वाचा ठरतो कारण खऱ्या अर्थाने भारत हा ग्रामवासीयांचा देश आहे. आजही ६७ ते ७०% लोक खेड्यातच रहातात. त्यांचा उदरनिर्वाह शेती व शेतीपूरक व्यवसायावर अवलंबून आहे. भारताचा अतिप्राचीन इतिहास, क्लीष्ट अशी समाजरचना, भारतीय धार्मिक जीवन व संस्कृती यांचे यथार्थ आकलन होण्यासाठी ग्रामीण समाजाचा अभ्यास अनिवार्य आहे. पुराणात गावाची किंवा ग्रामीण समुदायाची व्याख्या पुढीलप्रमाणे स्पष्अ केलेली आहे.

जिच्याभोवती किर्दसाद-वहिवाटीला योग्य जमीन आहे आणि जिच्यामध्ये मातब्बर शेतकरी व मजूर आहेत, अशा वस्तीला गाव म्हणतात.

तथा शुद्रजन प्राया सुसमृद्ध कृषीवला ।

क्षेत्रोपभोगमूमध्ये वसति ग्रामसंज्ञिता ।।

याच आधारावर **१) त्रि. ना. अत्रे** यांनी 'गावगाडा' या पुस्तकात खेड्यातील व्याख्या दिलेली आहे. खंडणे म्हणजे जमीन कसणे आणि खेडूत म्हणजे जमीन कसणारा तेव्हा खेडूतांची वस्ती ते खेडे. ज्यामध्ये प्रधान धंदा शेती व ज्यामध्ये राहणाऱ्यांची वस्ती शेतकऱ्यांची असते, त्या गावाला लोक खेड किंवा गावढे म्हणतात.

**२) डॉ. इरावती कर्वे** – एका आकस्मित निरीक्षण कार्यकर्त्यांकरीता, जेथे मोठ्या प्रमाणात शेती आहे या शेतीचे वितरण झाले आहे आणि अनेक रूपामध्ये विविधता आलेली आहे असे क्षेत्रीय निवास म्हणजे गाव होय.

**३) श्री. हेरॉल्ड पिक** – एका कुटुंबापेक्षा मोठा असा परस्परसंबंधीत अशा व्यक्तीच्या समूह ग्रामसुदायात अंतर्भूत असतो. हा समुदाय एका मोठ्या घरात अथवा सर्वसामान्यपणे जवळ जवळ रहातो. अगदी सुरवातीला समान असलेल्या अशा कृषीयोग्य जमिनीची मशागत करतो व उपलब्ध कुरणांची विभागणी करून सभोवतालच्या पडीत जमिनीवर गुरे चारतो. शेजारच्या समुदायाच्या सीमेपर्यंत पसरलेली कृषियोग्य जमीन, पडीत जमीन व कुरण यावर हा समुदाय आपला हक्क सांगतो.

(The Village Communiy Cousists of group of related or unrelated larger than a single family occupying a large house or a member of dweing places cloed together, sometimes irregularly. sometime in a street & cultivating, originally in common a number of aratle fidds, dividing the available meadow between them & pasturing their cattle upon the surrounding wasteland over which the community claims rights as for as the boundaries of adjacent communities)

**४) डॉ. ए. आर. देसाई** – खेडे हा ग्रामीण समाजात संघटीत करणारा असा रंगमंच आहे की, जेथे ग्रामीण जीवनाचे प्रमुक भाग स्वत: प्रकट हातोत व कार्य करतात.

**५) श्री. मुखर्जी** – गाव म्हणजे असा समुदाय आहे की, जेथे काही सापेक्षीत, सांस्कृतीक आणि सामाजिक समानता अनौपचारिकता प्राथमिक संबंधाची प्रधानता, लोकसंख्येचे कमी घनत्व व कृषी हाच मुख्य व्यवसाय असतो.

वरील व्याख्येच्या आधारे आपल्याला असे म्हणता येईल की, कृषीयोग्य जमिनीवर उदरनिर्वाहासाठी अन्नधान्य पिकविणाऱ्या व अकृषिक योग्य जमीनीचा गुरांना चरण्यासाठी वापर करणाऱ्या दृढ सामाजिक संबंधानी युक्त असणाऱ्या समुदायाला खेडे असे म्हणता येईल.

- **ग्रामीण समुदायाची वैशिष्ट्ये** : (Characteristics of Rural Community) :

**१. लघु आकार :** कोणत्याही समाजात ग्रामीण समाज हा नागरी समुदायाच्या तुलनेने आकाराने लहान असतो. ग्रामवाशीयांचा मुख्य व्यवसाय शेती हाच असल्याने शेतीशी निगडीत लोकच गावात रहातात. शेती जर लांब असेल तर लोक शेतात झोपडी किंवा घरे बांधून रहातात. शेतातील याच घरांची संख्या वाढत गेली की वाडी तयार होते. वाडीचेच नंतर गावात रुपांतर होत असते. उदा. सावंतवाडी, तुर्केवाडी, गौळवाडी इ.

काही गावे लोकसंख्येने खूपच लहना असतात. दुर्गम भागात वसलेल्या खेड्यांची लोकसंख्या १०० ते ३०० च्या आसपास असते. २००१ च्या जणगणनेनुसार भारतात खेड्यांची संख्या ६.४० लक्ष इतकी होती.

**२. अलगता :** पारंपारिक ग्रामीण समाजाचे हे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. काही खेडे ही अत्यंत दुर्गम भागात वसलेली आहेत. पठारावर सुद्धा दोन खेड्यामधील अंतर हे जास्त आहे. यामुळे एका गावाचा दुसऱ्या गावाशी क्वचितच संपर्क येत असे. वाहतूकीच्या सोयींचा अभाव व रस्त्याच्या अभावामुळे येणे जाणे फारसे होत नसे लग्न समारंभ, जत्रा, यात्रा, जनावरांचे प्रदर्शन, कुस्त्यांचा फड अशा काही क्वचितच प्रसंगीच लोक एका गावामधून दुसऱ्या गावाला जात असत. आजच्यासारखी रस्ते वहातूकीची साने त्या काळात उपलब्ध नव्हती.

**३. आर्थिक स्वयंपूर्णत :** (Economic self Sufficiency) : खेडी ही एकमेकापासून लांब असल्यामुळे आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण क्रमप्राप्तच बनले. कोणत्याही समाजाला आपले अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी समाजाच्या मुभूत गरजा भागणि आवश्यक असते. भारतीय खेड्यांनी आपल्या निर्वाहविषयक गरजा भागविण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभी केली. आवश्यक असणाऱ्या वस्तु आणि सेवा यांच्या निर्मितीसाठी अनेक व्यक्तींच्या समुहाची फळे उभी केली गेली. यालाच बलुतेदारी व आलुतेदारी पद्धत असे म्हणतात. सुतार, लोहार, चांभार, न्हावी, परिट इत्यादी बारा बलुतेदार व साळी, सणगर, माळी, घडशा, कलावंत असे अठरा अलुतेदारानी गावाला आवश्यक असणाऱ्या वस्तु आणि सेवा पुरविल्या याच्या मोबदल्यात शेतकरी त्यांना धान्य देत असत. या व्यवस्थेमुळे ग्रामीण खेडे दिर्घकाळ आपले अस्त्वि टिकवून ठेवण्यात यशस्वी झाली.

**४. स्वायत्तता** (Autonomy) : स्वायत्तता हे देखील ग्रामिण समुदायाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. खेडी ही एकमेकांपासून लांब असल्याने आपल्या गावाचा कारभार स्वत:च स्वतंत्रपणे पहात होती. प्रत्येक खेड्यात कारभाराची स्वतंत्र यंत्रणा उभी केली होती. यालाच पंचायत पद्धत असे म्हटले जाते. या पंचायतीकडून गावाचा कारभार चालविला जात होता. न्यायदान करणे हे पंचायतीचे प्रमुख काम होते. ग्रामसंरक्षण ग्रामस्वच्छता, महसूल गोळा करणे, विहीरी, पाटबंधारे, सार्वजनिक देवालये, तंटे सोडविणे इ. लोकहिताची कामे पंचायत करीत असे. या पंचायत प्रजातंत्रात्मक असल्यामुळे राजाही फारसा हस्तक्षेप करीत नसे. प्रत्येक गावात जात पंचायतीही होत्या या जातीअंतर्गत निर्माण होणारे कलह जातपंचायतीमार्फत सोडविल्या जात असत.

**५. जातीवर आधारित सामाजिक व्यवस्था** (Caste based Social System) : भारतीय ग्रामण समुदायात संयुक्त कुटुंबास जितके महत्त्व आहे, तितकेच महत्त्व जातीप्रथेलाही आहे. आजही ग्रामीण समुदायात पद, दर्जा व सामाजिक संबंधाचे स्वरूप जातीनुसारच निश्चित झालेले दिसते. जातीमुळे समाज अनेक खंडात विभागलेला आहे. या जातीच्या उत्क्रमरचनेत ब्राह्मणांना श्रेष्ठ स्थान व शूद्रांना कनिष्ठ स्थान आहे. या दोन्हीच्यामध्ये येणाऱ्या अनेक जातीमध्ये श्रेष्ठकनिष्ठत्वासाठी सतत संघर्ष सुरू आहे. भारतीय ग्रामीण समाजात स्तरिकरणाचा (Strtification) एक आधार म्हणून जातीव्यवस्थेचे अस्तित्व कायम राहिलेले आहे. प्रत्येक जातीचा एक व्यवसाय आहे तोच व्यवसाय त्या जातीच्या सदस्यांनी केला पाहिजे असे बंधन होते. आजही परंपरागत व्यवसाय सोडून अन्य व्यवसायात जाण्याची ग्रामवाशीयांची इच्छा नसते. कायद्याने जरी जाती व्यवस्थेचे उच्चाटन झाले असले तरी अधून मधून जातीय तणाव ग्रामीण समाजात तीव्र स्वरूप धारण कतात. उदा. खैरलांजी हत्याकांड.

**६. कुटुंब संस्थेचा प्रभाव** (Influence of Family) : ग्रामीण समाजात कुटुंबाला विशेष महत्त्व असते. कुटुंबालाच सामाजिक जीवनाचा आधारभूत घटक मानले जाते. व्यक्ती कुटुंबाच्या आधारावरून ओळखली जाते. सामाजिक नियंत्रणाच्या दृष्टीनेही कुटुंबाला महत्त्व आहे. धार्मिक, सामाजिक व राजनैतिक क्षेत्रात देखील सर्व सभासदात एकी व समानता आढळते. कुटुंबाचे सर्व सभासद धिक प्रमाणात कुटुंबावर अवलंबून असतात. प्रत्येक सदस्यांच्या आर्थिक सामाजिक व सांस्कृत्रतक गरजांची पुर्तता करण्याचे कार्य कुटुंबच करीत असते. पारंपारिक भारतीय समाजात संयुक्त कुटुंब पद्धतीचा प्रभाव अधिक होता. एका संयुक्त कुटुंबाचे विघटन झाले तरी अनेक संयुक्त कुटुंबे तयार होत असत.

भारतातील संयुक्त कुटुंबे ही पितृसत्तात्मक होती. त्यामुळे प्रत्येक कुटुंबाला एक कुटुंबप्रमुख असे. त्याच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण कुटुंबाची वाटचाल सुरु असे. सोरोकिन व झिम्मरमेन यांनी सांगितलेले कुटुंब वादाचे (familism) प्राधान्य हे ग्रामीण सामुदायाचे वैशिष्ट्य भारतीय ग्रामीण समुदायास पुरेपुर लागू पडते.

कुटुंब ग्रामीण समाज जीवनाची एक मूलभूत सामाजिक संस्था असल्यामुळे ग्रामीण कुटुंबाची छाप या कृषी समूहाच्या सर्वसामाजिक संघटनांवर पडल्यास नवल नाही. दुसऱ्या शब्दात असे म्हणता येईल की इतर सर्व सामाजिक संस्था व मूलभूत सामाजिक संबंध ग्रामीण कौटुंबिक संबंधाद्वारे निश्‍चित व निर्धारित झालेले दिसतात. अशा प्रकारच्या सामाजिक संघटनेस संबोधित करण्याकरता कुटुंबवाद (षराळश्रळी) या शब्दाचा वापर केला जातो. व्यक्तीच्या अशा आकांक्षाशी एकरुप झालेल्या असतात. कोणत्याही महत्त्वाच्या मुद्यावर कुटुंबाचे एकमत असते. त्यामुळे ग्रामीण जीवनावर कुटुंबाचेच नियंत्रण असते.

**७. सामाजिक एकरुपता** (Social Homogeniety) : खेड्यातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती हाच असतो. समुदाय आकाराने लहान असल्याने सर्वांचे वास्तव्य एकाच ठिकाणी असते. कामाच्या व हंगामाच्या वेळा ठरलेल्या असतात. बिगर हंगामाच्या काळात सगळेच मोकळे असतात. त्यामुळे गावातील सर्वांचे समोरासमोरचे संबंध असतात. एकमेकांच्या अडीअडचणीच्या काळात एकमेकांच्या मदतीसाठी धावून जातात. प्रत्येकाची काहीतरी अडचण असतेच. त्यामुळे संघर्षापेक्षा सहकाऱ्याला अधिक महत्त्व देतात. गावातील लोकांना अपाल्या गावाविषयी आत्यंतिक प्रेम वाटत असते. त्यामुळे गावात होणाऱ्या प्रत्येक धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमात उत्साहाने सर्व लोक सहभागी होत असतात. यामुळेच गावात एकीही तीव्र स्वरूपाची असते. एखाद्या विशिष्ट घटनेविषयी सर्व सदस्यांचे एकच मत असते.

**८. सामाजिक गतिशिलतेचा अभाव** (Lack of Social Mobity) : भौगोलिक अलगता, दळणवळणाच्या साधनांचा अभाव, शेती व्यवसाय, साधी तंत्रविद्या, विशेषीकरणाचा अभाव जातिप्रथेवर आधारित बलुतेदारी पद्धत, यामुळे ग्रामीण समाजात फारसे बदल आढळून येत नाहीत. ठेविले अनंते तैसेची रहावे या उक्तीप्रमाणे लोक दैववादीबनून स्थितीशील रहातात. आपला परंपरागत व्यवसाय सोडून दुसरा व्यवसाय करण्याचा सहसा प्रयत्न करीत नाहीत. त्यामुळे व्यक्ती विकासाला फारशी संधी नाही. प्रवाह विरुद्ध जाऊन परिस्थितीला छेद देन पुढे जाण्याचे धाडस ग्रामवाशियांच्यामध्ये आढळून येत नाही. त्यामुळे शहरी समाजाशी तुलना करता ग्रामीण जीवन स्थितीशील (Static) आढळून येते.

**९) लोकमताचा जबरदस्त प्रभाव** (Tremendous impact of Public Opinion) : खेड्यामध्ये लोकमताचा प्रभाव अधिक दिसून येतो. समुदाय आकाराने लहान असल्याने सर्वसदस्य एकमेकांना अगदी नावानिशी ओळखत असतात. व्यक्तीचे आचार विचार हे समुदायाच्या आचारविचाराप्रमाणे ठरत असतात. व्यक्तीला स्वतंत्र असे व्यक्तिमत्त्व असत नाही. लोकदबावापुढे व्यक्ती हतबल, असहाय्य होते. एखादी गोष्ट

करीत असताना 'लोकांना काय वाटेल' याचा विचार व्यक्ती अधिक करते 'पंचमुखी परमेश्वर' अशी म्हणच ग्रामीण भागात आढळते. लोकमत हे सामाजिक नियंत्रण प्रस्थापित करण्याचे काम करते. त्यामुळे ोक आपल्या वैयक्तिक मतापेक्षा लोकमताला अधिक महत्त्व देऊन आपले वर्तन व्यवहार ठरवितात.

**१०. रुढी, प्रथा परंपराचा प्रभाव** (Impact of Customs, Traditions) : ग्रामवासियांचे जीवन हे निसर्गाच्या सानिध्यात जात असे. निसर्गात घडणाऱ्या अनेक घटनांचे ज्ञान ग्रामवासियांना असत नाही. त्यामुळे निसर्गातील घटना या त्यांना चमत्कार वाटतात. निसर्गाविषयी नेहमीच त्यांच्या मनात भीतीयुक्त आदराचा भावना दिसून येते. या भयातूनच धर्माची कल्पना पुढे आली. निसर्ग देवतेला प्रसन्न करून घेण्यासाठी कर्मकांडाची निर्मिती झाली. कर्मकांडाला रुढी आणि परंपरेचा आधार असतो. या परंपराविषयी कधीही कोणतेही प्रश्न विचारले जात नाही. कर्मकांडाला रुढी आणि परंपराचा आधार असतो. या परंपराविषयी कधीही कोणतेही प्रश्न विचारले जात नाहीत. त्यमुळे धार्मिक आणि परंपरेचा आधार असतो. या परंपराविषयी कधीही कोणतेही प्रश्न विचारले जात नाहीत. त्यामुळे धार्मिक भावनेचा अनादर करताना ग्रामवाशिय आढळून येत नाहीत. धार्मिक प्रथा, परंपरा यामध्ये कोणतेही बदल करण्याची त्यांची मानसिकता नसते.

**११. साधे जीवन** (Simple life) खेड्यातील माणसे ही साधे जीवन जगतात. त्यांचा सतत संबंध मातीशी जनावरांशी येतो. त्यामुळे त्यांना इस्त्रीचे कपडे घालून शेती करणे शक्य नाही. दिघाऊपणापेक्षा अंगमेहनतीला अधिक महत्त्व आहे. त्यांची आर्थिक परिस्थिती ही बेताचीच असते आणि ती सर्वांची जवळ जवळ सारखीच असते. चैनी किंवा विलासी वस्तुंना यांच्या जीवनात फारसे स्थान असत नाही आणि त्यांच्या मनात त्याविषयी आसक्तीही असत नाही. त्यांच्या आचार विचारामध्ये निसर्गच एक प्रकारचा साधेपणा आणि खरेपणा आलेला असतो, त्यामुळे आर्थिक सुबत्ता नसतानाही ग्रामीण लोक सुखी अणि आनंदी असतात.

**१२. शिक्षण आणि नवीन ज्ञानाचा अभाव** (Lack of Education & New Knowledge) : रूढी, परंपरा आणि धर्म यामुळे भारतीय ग्रामवाशीय दीर्गकाळ निरक्षर राहीले. त्याचप्रामणे शेती हाच प्रमुख व्यवसाय असल्याने या शेतीला मनुष्यबळाची गरज अधिक भासते. परिणामी प्रत्येक सदस्याला लहानपणापासून शेतीशी संबंधीत कामात गुंतविले जात आहे. शेतीसुद्धा जुन्या तंत्रानुसारच केली जाते. भारतात आजही ३५ ते ४०% लोक निरक्षर आहेत. शिक्षण नसल्यामुळे ते नव्या ज्ञानाचा स्वीकार करीत नाहीत. अल्प संतुष्टत हे त्यांचे वैशिष्ट्य आहे.

**१३. स्त्रियांचा निम्न दर्जा** (Lack of Education & New Knowledge) : रूढी, परंपरा आणि धर्म यामुळे भारतीय ग्रामवाशीय दीर्गकाळ निरक्षर राहीले. त्याचप्रमाणे शेती हाच प्रमुख व्यवसाय सअल्याने या शेतीला मनुष्यबळाची गरज अधिक भासते. परिणामी प्रत्येक सदस्याला लहानपणापासून शेतीशी संबंधीत कामात गुंतविले जात आहे. शेती सुद्धा जुन्या तंत्रानुसारच केली जाते. भारतात आजही ३५ ते ४०% लोक निरक्षर आहेत. शिक्षण नसल्यामुळे ते नव्या ज्ञानाचा स्वीकार करीत नाहीत. अल्प संतुष्ट हे त्यांचे वैशिष्ट्य आहे.

**१४) स्त्रियांचा निम्न दर्जा** (Lower Status of Women) : ग्रामीण समाजातील जनता ही परंपरावादी आहे. त्यामुळे स्त्रियांना दुय्यम दर्जा दिला जातो. स्त्रियांच्याकडे बघण्याचा दृष्टिकोण हा खूपच मागासलेला आहे. स्त्रियांचे चारित्र्य हे काचेच्या भांड्यासारखे असते. तडा गेला तर ते फेकण्या योग्य बनते, स्त्रीने कसे

मर्यादित राहिले पाहिजे. इत्यादीमुळे स्त्रियांना शिक्षण फारसे दिले जात नव्हते. कमी वयात विवाह केले जातात. आर्थिक बाबतीत तिला फारसे स्वातंत्र्य दिले जात नाही. पती निर्दयी, दुराचारी व्यसनाधीन असला तरी स्त्रीला मुलांच्यासाठी, माहेरच्या नावासाठी पतीजवळ जीवन कंठावे लागले, परिणामी स्त्रीला दुय्यम दर्जा दिला जातो.

- **ग्रामीण समाजातील परिवर्तन** (Changes in Rural Community)

भारत हा एक खेड्यांचा देश आहे. या देशाला ग्रामीण संस्कृतीची दिर्घ परंपरा आहे. भारताच्या ग्रामीण संस्कृतीची ब्रिटीशांनाही दखल घ्यावी लागते. ब्रिटीश येण्यापूर्वी भारताच्या व्यापक भूमीवर थोड्याफार फरकाने समान ग्रामीण संस्कृतीची वैशिष्ट्ये आढळून येतात. पण ब्रिटीशांच्या एक छत्रीकारभारानंतर भारतीय ग्रामीण समाजात बदल होऊ लागले. ब्रिटीशांच्या केंद्रिकरण, स्थानिक पंचायतीचे अधिकार काढून घेणे, महसूल गोळा करणे, त्यासाठी प्रशासकीय यंत्रणा उभी करणे यासारख्या सुधारणामुळे ग्रामीण समाजात परिवर्तन येऊ लागले. स्वातंत्र्यानंतर मात्र जाणिवपूर्वक परिवर्तन घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले गेले. यामुळे आज ग्रामीण समाजात मोठ्या प्रमाणात स्थितंतरे होऊ लागली आहेत या परिवर्तनाला अनेक घटक जबाबदार आहेत जसे, वाहतूकीच्या सोयी, रस्ते, दूरसंदेहवहन, रेडीओ, टी.व्ही. शेती तंत्रामध्ये झालेला बदल, अर्थव्यवस्तेतील बदल, पंचायत राजाचा स्वीकार, लोकशाही व्यवस्था, विकासाचे कार्यक्रम इ. ग्रामीण समाजात कोणकोणते बदल कोणकोणत्या क्षेत्रात झाले आणि होत आहेत याचा संक्षिप्त आढावा घेणे गरजेचे आहे. त्याशिवाय ग्रामीण स माजाचा अभ्यास पूर्णच होऊ शकणार नाही.

**अ) सामाजिक क्षेत्रातील परिवर्तन :**

**१. कुटुंबसंस्तेतील परिवर्तन :** पारंपारिक भारतीय समाजातील मुख्य व्यवसाय शेती असल्यामुळे त्याच्या अपरिहार्य परिणामातून संयुक्त कुटुंब व्यवस्था दीर्गकाळ समाजात राहिली. चार-पाच पिढ्यांचे सदस्य एकत्र रहात होते. या संयुक्त कुटुंब पद्धतीत वृद्धांना एक मान होता. गावात त्यांना प्रतिष्ठेचे स्थान होते. मुलांच्यावर संस्कार करण्याचे, व्यवसाय शिक्षण देण्याचे काम वृद्धमंडळी करीत होते. सर्व सदस्य शेतीवर राबत असल्याने उत्पन्नही शेतीपासून मोठ्या प्रमाणात मिळत असे. पण आज औद्योगिकरणाचा वेग वाढला. त्याच्याबरोबर नागरीकरणही मोठ्या प्रमाणात झाले. ग्रामीण भागातून काही कुटुंबे शहराकडे स्थलांतरीत झाली. शहरात गेलेल्या कुटुंबाचा गावाकडील ओढ कमी होऊ लागली. नवी पिढी गाावकडेच येणे टाळू लागली. परिणामी कुटुंबे विभक्त झाली. त्याचप्रमाणे शहरी वातावरण गावात तयार होऊ लागले. गावातील मुले सुद्धा आई वडिलांपासून विभक्त राहू लगाली. कुटुंब लहान सुख महान हा जनु नव्या युगाचा मंत्रच बनून गेला. वृद्धांचे संस्कार व्यवसाय शिक्षणाची प्रक्रिया बंद झाली. यासाठी अंगणवाडी, पाळणाघरे, बालवाडी, शाळा, आय.टी.आय. इंजिनिअरींग अशी महाविद्यालये निर्माण झाली. व्यक्तिवादाच्या वाढत्या प्रभावामुळे कुटुंबहितापेक्षा स्वहिताला अधिक महत्त्व आले. कौटुंबिक धार्मिक सांस्कृतिक कार्यक्रम हळूहळू लुप्त होऊ लागले. परिणामी नणंद भावजय, भावजयी-भावजयी मधील प्रेम जिव्हाळा, ओलावा कमी झालेला आहे.

**२. जातिव्यवस्तेमधील परिवर्तन :** एके काळी जातीसंस्थेचा ग्रामीण समाजाचा जबरदस्त पगडा होता. सामाजिक स्तरीकरणाचा आधारच जातीसंस्था होती. पण विविध सुधारणावादी चळवळी व शिक्षण आणि तंत्रज्ञानाच्या प्रसारामुळे जातिसंस्थेत परिवर्तन होऊ लागले. कायद्याने अनेक प्रकारचे स्वातंत्र्य (कोणताही व्यवसाय करण्याचे) दिले. त्यामुळे कोणता व्यवसाय कुणी करावा याबाबतीत कोणतीही बंधने नसल्याने चांभाराचा मुलगा डॉक्टर होऊ लागला, सुताराचा मुलगा इंजिनिअर होऊ लागला, महार किंवा मांग

जातीमधील मुले सुद्धा वरिष्ठ अधिकारी होऊ लागली. कायद्याने जातीव्यवस्था नष्ट केल्यामुळे हॉटेल्स, सार्वजनिक स्थळे, देवालये, सर्व जातीधर्मांसाठी खउली झाली. बलुतेदारी पद्धत नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. जात पंचायती इतिहास जमा झाल्या, काही कनिष्ठ जातीचे लोक उच्चजातीच्या वर्तनप्रकारचे अनुकरण करीत आहेत. यालाच डॉ एम्. एन्. श्रीनिवास यांनी संस्कृतीकरण असे (Sanikritization) नाव दिलेले आहे. हे जर खरे असले तरी आजही ग्रामीण भागात जाती व्यवस्थेचे पालन काही प्रमाणात केले जाते. सवर्ण आणि दलित यामधील संघर्ष गावपातळीवर तयार होतात. यामुळे तणावाचे वातावरण निर्माण होते. यातूनच कधीकधी खैरलांजी हत्याकांडासारखे प्रकार घडून येतात. आंतरजातीय विवाहाला जरी कायद्याने मान्यता असली तरी अंतर्विवाहाचे नियम ग्रामीण भागात आजही अबाधित आहे. अस्पृश्य जातीमधील शासकीय नोकरांना उच्च जातीच्या वस्तीत घे भाड्याने मिळत नाहीत. त्याचप्रमाणे गावकुसाबाहेरील व्यक्ती गावात घर बांधण्याचे धाडस करीत नाही. अनेक गावात अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश दिला जात नाही. राजकीय पातळीवर जातींचा उपयोग निवडून येण्यासाठी केला जातो.

**३. विवाहसंतेतील परिवर्तन** (Change in Marriage System) : पारंपारिक ग्रामीण समाजात विवाह हा एक संस्कार होता. नात्यातील विवाहाला प्राधान्य दिले जात होते. पण कायदेशीर प्रतिबंध, सामाजिक व शैक्षणिक जागृती यामुळे बालविवाहाच्या प्रथेचे उच्चाटन झाले. विधवा विवाहाला मान्यता मिळाली. यामुळे विधवा पुनर्विवाह होऊ लागले. हुंडा पद्धतीला बाजारी स्वरूप आले. हुंड्याच्या प्रथेतून स्त्रियांची पिळवणूक सुरू झाली. लग्न थाटामाटाने करण्याचे प्रस्थ वाढले. चार दिवस चालणारे विवाह एक दिवसात, झटपट विवाह (यादी पे शादी) रुढ होऊ लागली. दळणवळणाच्या प्रगत साधनामुळे दूर-दूरचे विवाह संबंध जुळू लागले. विवाहपूर्ती मुलामुलींच्या आवडीनिवडीचा विचार होऊ लागला.

**४. स्त्रियांच्या दर्जामध्ये परिवर्तन :** सामाजिक प्रबोधन, कायद्यामधील स्त्री-संबंधीचे अनुकूल कायदे, शिक्षणाचा झालेला व्यापक प्रसार यामुळे स्त्रियांच्या दर्जात बदल होऊ लागला आहे. स्त्रिया आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होऊ लागल्या. वेगवेगळ्या क्षेत्रात नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्या. त्या नोकरी करू लागल्या. व्यवसाय करू लागल्या. विशेषत: शिक्षण क्षेत्रामध्ये स्त्रियांची संख्या अधिक आहे. त्यामुळे स्त्रियांना घरच्या संबंधी निर्णय घेत असताना त्यांच्या मतांचा विचार होऊ लागला. नोकरी करणाऱ्या मुलीला विवाहासाठी प्राधान्य देण्यात येऊ लागले. विवाहापूर्वी त्यांच्या मतांचा विचार होऊ लागला. हे जरी खरे असले तरी आजही हुंड्यासाठी स्त्रियांचा छळ केला जातो, स्त्रीच्या मताला दुय्यम दर्जा दिला जातो. वंशाला दिवा म्हणून मुलगा हवाच यासाठी आग्रह धरला जातो. यामुळेही आज 'लेक वाचवा' हे अभियान शासनाला राबवावे लागत आहे.

**ब) राजकीय क्षेत्रातील परिवर्तन :**

पारंपारिक भारतीय समाजातील पंचायत व्यवस्था नष्ट झाली. त्याठिकाणी पंचायत राज व्यवस्था आली. या पंचायत राज व्यवस्थेमुळे प्रत्यक्ष निवडणूकीद्वारे उमेदवाराची निवड होऊ लागली. त्यामध्ये दलित व महिला आरक्षणामुळे समाजातील सर्व घटकांना नेतृत्वाची संधी मिळू लागली. ग्रामपंचायत-पंचायत समिती व जिल्हा परिषदेमध्ये ग्रामीण भागातील नेतृत्व येऊ लागले. यातूनच काही लोकांनी आमदार खासदारपर्यंत मजल मारली. तरूण वर्ग मोठ्या प्रमाणात राजकीय प्रवाहात सामील होऊ लागला. त्यामुळे 'गावचा पाटील' इतिहास जमा झाला. सत्ता प्राप्तीसाठी संघर्ष सुरू झाला. जातीयवादी प्रचार, पैशाचा, बळाचा वापर मोठ्या प्रमाणात होऊ लागला. यामुळे शांत गांव अशांत बनले. घराघरात गटागटाचे पक्षा/पक्षाचे राजकारण अगदी खालच्या थरापर्यंत पोहचले. गावात एखाद्याचा मृत्यू झाला तर पारंपारिक

समाजात पूर्ण गाव सहभागी होत असे. आज मात्र व्यक्ती मयत झाली तर ती कोणत्या गटाची होती. हे पाहूनच गावातील लोक अंत्ययात्रेत सहभागी होतात. त्याचप्रमाणे विवाह हा धार्मिक सणसमारंभाबाबत सुद्धा हीच परिस्थिती आहे. राखीव जागांमुळे स्त्रियाही नेतृत्व करू लागल्या. सरपंच, सभापती व जि.प. अध्यक्षाच्या खुर्चीवर बसल्या ग्रामीण आणि शहरी हे अंतर कमी होऊ लागले. हे जरी खरे असले तरी पंचायत राज व्यवस्थेवर प्रभावी जातींचेच (Dominent cste) वर्चस्व आहे. असे एका सर्वेक्षणातून आढळून आले आहे. स्त्री जरी सरपंच झाली तरी कारभार तिचा पती किंवा दिर किंवा सासरच पहातो आहे. कनिष्ठ जातीबाबतही हीच स्थिती आहे. भारतीय खेडे संक्रमणावस्थेत आहेत. त्यामुळे जुन्या-नव्याचा संघर्ष एका टप्प्यावर येऊन पोहचला आहे. त्यामुळे काही परिवर्तन विधायक स्वरूपाचे; असले तरी कांही विघातक ठरून पहात आहेत.

**क) आर्थिक क्षेत्रातील परिवर्तन :**

वास्तविक पहाता पारंपारिक ग्रामीण समुदाय आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण होता. पण ही आर्थिक स्वयंपूर्णत: ब्रिटीश राजवटीत संपुष्टात आली. स्वातंत्र्यानंतरही शेतीसंबंधी नवीन कायदे व आर्थिक विकासाच्या नव्या धोरणामुळे शेती पद्धतीत बदल झाले. गरजवर आधारीत शेती बदलून वावसायिक शेती पद्धती अस्तित्वात आली. नगद पिकांना महत्त्व आले. ऊस, कापूस, तूरडाळ, फळबाग यांच्या शेती करण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढला. आधुनिक साधन सामुग्री ट्रॅक्टर, फवारणीयंत्र, ठिबक सिंचन, तुषर सिंचन, कल्टीव्हेटर, मळणीयंत्र, ऊस कटार्स यंत्र इ. मुळे शेतीपद्धती अधिक सुलभ झाली. बलुतेदारी पद्धत व बैलशेती मागे पडली. शेतीबरोबरच ग्रामीण भागात उद्योगधंद्याना प्रोत्साहन देण्यात आले. त्यामुळे शेतीवर आधारित उद्योग उभे राहू लागले. उदा. सुत गिरण्या, साखर कारखाने, फळ प्रक्रिया उद्योग (ज्युस, जाम, काजू प्रक्रिया इ.) यामुळे ग्रमीण भागात रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ लागल्या. पशुपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मधूमक्षिकापालन, रेशमी किड्यांची पैदास, वराहपालन, शेळीपालन, अत्याधुनिक गाई-म्हैशीचे गोठे इ. शेतीपूरक व्यवसायांची वाढ होऊ लागली. पैशाला अधिक महत्त्व आले. ग्रामीण भागात पैशावर आधारीत अर्थव्यवस्था अस्तित्वात आली. यामुळे उच्चनिचतेच्या कल्पा, पूर्वग्रह गळून पडले. ग्रामीण भागात रोजगार निर्माण योजान, रोजगार हमी योजना इ. यामुळेही ग्रामीण जीवनात बदल होत आहेत. बहुतेदार ही कामाबद्दल रोख मोबदला मागू लागले आहेत. सुताराच्या मुलाने फर्निचरचे दुकान टाकले आहे. या सर्व पातळीवर ग्रामीण अर्थव्यवस्थेत अमूलाग्र बदल होत आहेत.

**ड) शिक्षण क्षेत्रातील परिवर्तन** (Educational Change) :

पारंपारिक ग्रामीण समाजात शिक्षणाचा अधिकार केवळ उच्चवर्गाला म्हणजेच तो फक्त ब्राह्मण वर्गापुरताच मर्यादित होता आणि ते शिक्षण धार्मिक स्वरूपाचे होते. बलुतेदारी व आलुतेदारी संबंधीत व्यावसायिक शिक्षण कुटुंबातच मिळत असे पण ब्रिटीशांच्या आगमनानंतर सुरू झालेली शिक्षण व्यवस्था अखंडपणे सुरू आहे. तमुळष बहुजनसमाजात शिक्षणाचा प्रसार व प्रचार मोठ्या प्रमाणात झाला. स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने शिक्षणाकडे अधिक लक्ष दिले. त्यामुळे खेडोपाडी व वाड्यावस्त्यामध्ये शाळा सुरू झाल्या. व्यवसायिक शिक्षण देणाऱ्या अनेक संस्था निर्माण झाल्या. औपचारिक शिक्षणाबरोबरच वृत्तपत्रे, रेडीओ, दूरदर्शन, चित्रपट या साधनाद्वारे अनौपचारिक शिक्षणही देण्यता येऊ लागले या शिक्षण व्यवस्तेमुळे समाजात विज्ञानवादी दृष्टीकोन निर्माण करणे शक्य झाले. यामुळे ग्रामीण भागातून काही अनिष्ठ प्रथांचे उच्चाटन होऊ लागले आहे. (उदा. रोग देवाच्या अवकृपेमुळे होतात, जाती परमेश्वरानेच निर्माण केल्या आहेत इ.) शिक्षणामुळे व्यक्तिवादी दृष्टीकोण विकसित होऊ लागला आहे. त्यामुळे ग्रामीण सामुहिक

जीवनाला तडे जाऊ लागले आहेत. नोकरी मिळाली की मुलगा शहरात स्थायिक होतो. गावाकडची नाळ आपोआपच तुटून जाते.

**इ) धार्मिक क्षेत्रातील परिवर्तन** (Religious Change)

ग्रामीण समाजात धर्माला अनन्य साधारण असे महत्त्व आहे. ग्रामीण जीवनाच्या सर्व अंगावर धर्माचा प्रभाव दिसून येतो. ग्रामीण समाजातील प्रत्येक शेतीचे किंवा घराचे कार्य धार्मिक विधीनेच पूर्ण होते. धार्मिकतेबाबत कधीही वाद उपस्थित केला जात नाही. व्यक्तीचे सामूहिक व वैयक्तिक जीवन धर्मानेच नियंत्रित केले जाते. धार्मिक कर्मकांडाला फारच महत्त्व दिले जाते. धर्मश्रद्धा, जादूटोणा, मंत्रतंत्र, भूतबाधा, पूजा, होम, हवन, उपासतापास, नवस, व्रतवैकल्ये यांना महत्त्व आहे. वेगवेगळ्या देवदेवतेंसाठी वेगवेगळे विधी केले जातात. शिक्षणामुळे धर्माचे स्तोम माजविण्याचे प्रमाण कमी झाले असले तरी धार्मिक विधी कर्मकांडाचा भाग म्हणून केला जातो. पारंपारिक ग्रामीण समाजात धर्म हे एक सामाजिक नियंत्रणाचे प्रभावी साधन होते. पण आज धर्माची बंधने शिथील झाल्यामुळे धर्म सामाजिक नियंत्रण प्रस्थापित करु शकत नाही. पण राजकारणात लोकांच्या धार्मिक भावनांचा वापर करून निवडणूका जिंकल्या जातात. स्वार्थासाठी धर्माचा वापर केला जातो. बदलत्या आर्थिक-राजकीय व सामाजिक परिस्थितीतून निर्मार झालेल्या समस्यांची सोडवणूक धर्म करु शकत नाही. याची जाणीव लोकांना झाल्यामुळे धर्मापासून मानसिक सुरक्षितता मिळू शकत नाही. भौतिम सुखाचा हव्यास वाढल्यामुळे धर्माद्वारे समाधान प्राप्त होऊ शकत नाही. त्यामुळे नैराश्येने ग्रासलेली तरुण पिढी ग्रामीण भागातही तयार होऊ लागली आहे. असे असले तरी ग्रामीण जीवनातून धर्माचे पूर्णपणे उच्चाटन झाले आहे असे म्हणता येणार नाही. धर्माला आजही महत्त्व आहे. आपले कौटुंबिक, सामाजिक जीवनातील समस्या सोडविसण्यासाठी धर्माचा आधार घेतला जातो. मंदिराचा जिर्णोद्धार किंवा नवीन मंदिर बांधण्यासाठी ग्रामीण लोक आवडीने सहभागी होतात. आजही लाखोंच्या संख्येने ग्रामवाशीय पंढरपुरच्या वारीमध्ये सहभागी होतात.

**फ) सांस्कृतिक क्षेत्रातील परिवर्तन** (Ciltural change) :

यामध्ये केशभूषा, वेशभूषा, खाणपान, निवासस्थान, भाषा, नाट्य, नृत्य, मनोरंजन, दळणवळणाची साधने इ. समावेश होतो. शहरीकरणाच्या औद्योगिकरणाच्या प्रभावामुळे ग्रामवाशियांच्या केशभूषा, व वेशभूषा यामध्ये बदल होऊ लागले आहेत. अर्थात हे बदल ब्रिटीशकाळापासूनच सुरू आहेत. धोतर, बंडी, फेटा, यांच्याजागी विजार पँट, बुशशर्ट, कोट तर नऊवारी साडी, चाषळी यांच्या जागी सहावारी साडी, ब्लाऊज असे बदल स्त्री पुरुषांच्या पोषाखात झाले आहेत. मांजरपाट, कॉटन कपड्याऐवजी टेरीलीन, टेरीकॉट प्रकारचे कपडे वापरू लागले. तरूण जिनपँट, शर्ट, केसांना वेगवेगळे कट, तरुणी सलवार कमीज, पँट, टी शर्ट (पुरुषी पोषाख), बॉयकट, स्नो, पावडर, लिपस्टिक याचा सर्रास वापर सुरु झाला. स्वयंपाक घरता कुकर, मिक्सर, ओव्हन, डायनिंग टेबल, काचेचे डिशेस, फ्रिज, स्टीलची भांडी इ. वापर वाढू लागला आहे. त्याचप्रमाणे सकाळच्या न्याहारीची जागा आता चहा, ब्रेड, बिस्किटे, खारी, वर्की इ. बेकरी उत्पादनाने घेतली आहे. त्याचप्रामरे पारंपारिक ग्रामीण समाजातील झेपडीवजा घरांची जागा आर.सी.सी. सिमेंटच्या घरांनी घेतली. वाड्यांची जागा टुमदार बंगल्यांनी घेतली. गावांचा विस्तार होऊ लागलो. विस्तारीत भागात वेगवेगळ्या जातीधर्माच्या लोकांनी शेजारी-शेजारी घरे बांधण्यास सुरूवात केली. त्यामुळे जातीनिहाय वस्तीस्थान व कल्पनेला सुरुंग लागला. त्याचप्रामणे मनोरंजनाच्या क्षेत्रात वेगाने बदल होत आहेत तमासगीर, गोंधळी, किर्तनकार, बहुरुपी, शारीरिक ताकदीचे व कसरतीचे प्रयोग करणारे पैलवान, डोंबारी, माकडवाले, गारुडी इ. कलाकारांना महत्त्व होते. पण आज रेडीओ, टी.व्ही. टेपरेकॉर्ड, डेक,

डॉल्बी, व्हिडीओ, आर्केस्ट्रा, केबल कनेक्शन, चित्रपटगृहे यांना महत्त्व आले. विटीदांडु, गोट्या, आट्यापाट्या, कुस्ती यांच्या जागी क्रिकेट, व्हॉलीबॉल, केरम बुद्धीबळ असे नवे 'क्रीडाप्रकार आले. संपर्क साधनांमध्ये तर अमूलाग्र बदल झाले आहेत. घोडागाडी, बैलगाडीची जागा सायकर, मोटर सायकल, जीप, कार, मोटार, रेल्वे यांनी घेतली. त्याचप्रमाणे दु:खाचा संदेश पोहचविण्यासाठी महार या बलुतेदाराचा वापर केला जात होता. पण आज टेलिग्राम, टेलिफोन, मोबाईल यांचा सर्रास वापर ग्रामवाशीय करीत आहेत. अलगता हे ग्रामवाशियांचे वैशिष्ट्य केव्हाच मागे पडलेले आहे. अगदी दररोज मजुरीवर जाणाऱ्या मजूराकडे सुद्धा मोबाईल हे अत्याधुनिक संदेश यंत्रण आलेली आहे. यामुळे बदल होत आहेत. एटीएम साखी बँकींग यंत्रण ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात उभी करण्यासाठी बँका प्रयत्न करीत आहेत. बँका, पतसंस्था यांच्यामुळे आर्थिक व्यवहाराचे ज्ञान ग्रामवाशियांना प्राप्त होऊ लागले आहे असे जरी असले तरी ग्रामीण समाजात ज्याप्रमाणात भौतिक संस्कृतीत बदल हाते आहेत. त्याचप्रमाणात अभौतिक संस्कृतीत बदल होत नाहीत. त्यामुळे परिवर्तनाचा वेग अद्यापही मंदच आहे. असे म्हणावे लागेल.

**(ब) स्वयंअध्यनासाठी प्रश्न (चूक की बरोबर सांगा)**

१) पारंपारिक ग्रामीण समाज आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होता.

२) ग्रामीण समाजावर जातिसंस्थेचा विशेष प्रभाव दिसून येत नाही.

३) ग्रामीण समाजात सामाजिक गतिशीलता आढळून येते.

४) ग्रामीण समाजात विवाहपूर्वी मूलच्या मताचा विचार होऊ लागला.

५) ग्रामीण समाजातील बलुतेदारी पद्धती नामशेष होण्याच्या मार्गावर आहे.

### ३.३.३ शहरी / नागरी समाज : स्वरूप, वैशिष्ट्ये, परिवर्तन :

भारतीय समाज हा जरी खेड्यांचा देश असला तरी नगरांचे अस्तित्व फार प्राचीन काळापासून होते असे आढळून येते. लोकवाङ्मयात नगरांचा उल्लेख आढळतो. आटपाट नगर होते तेथे एक राजा.... यावरून नागरी समाज जीवनाची माहिती भारतीयांना होती असे स्पष्ट होते. नगर हे तुलनात्मकदृष्ट्या खेड्यापेक्षा मोठे असते. तेथे अनेक सुविधा असतात. बाजारपेठ असते. आज भारतात नागरी लोकसंख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. २००१ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या १०२.५२ कोटी होती. त्यापैकी नागरी लोकसंख्या २८.४९ कोटी होती. अमेरिकेने शहरासाठी आवश्यक असणारी लोकसंख्या कमीत कमी २५०० असावी असे निश्चित केले आहे. फ्रान्सने ही मर्यादा किमान २००० असावी, बेल्जियममध्ये ५००० आणि इजिप्तमध्ये ११००० लोकसंख्या असावी आणि भारतात किमान ५००० असावी असे धोरण निश्चित केले आहे. तुलनात्मक दृष्टीने विचार करता अमेरिका, फ्रान्स, बेल्जियम या देशातील अनेक शहरे अशी आहेत की जी भारतामध्ये खेड्याएवढी समजली जातील. आकार आणि लोकसंख्येचा आधार घेऊन खेडे आणि शहर यामध्ये जसा फरक केला जातो. तसाच याबाबतीत सामुदायिक जीवन या घटकाचाही विचार केला जातो. शहरात आणि ग्रामीणमध्ये तसे फरक करणे कठीण आहेह. गिस्ट आणि हॅलबर्ट म्हणतात, विशेषत: ग्रामीण आणि नागरी यांचा सर्वांना माहित असलेला फरक किंवा विभाजन हे सामुदायिक जीवनाच्या तथ्यावर आधारित आहे. त्या आदारित स्थानाला मौकिख प्रत्यय हाच एकमेव पुरावा आहे. बर्गलसुद्धा संदिग्धपणे असे म्हणतो की, प्रत्येक व्यक्तीला हे माहित असते की, नगर काय आहे, परंतु कोणीही नगराचा समाधानकारक अर्थ स्पष्ट केला नाही. नगरात जशा ग्रामीण स्वाभावाच्या अनेक व्यक्ती दिसून येतात तशाच खेड्यातील अनेक लोकांच्या सवयी, र्तन, रहाणीमान, भाषा आणि इतर अनेक बाबी शहरी जीवनाशी

मिळत्याजुळत्या असतात. म्हणूनच  असे म्हटले जाते की, खेडे आणि शहराची कोणतीही अशी सार्वभौम किंवा जागतिक स्वरूपाची निश्चित परिभाषा नाही. दुसरे असे की, खेडे आणि नगर या दोहोमध्ये केवळ काही अंशाचा फरक आहे. आणि तिसरे असे की, खेडे आणि नगर हे नाही म्हटल तरी सातत्याने बदलत असत. वेगवेगळ्या निकषांच्या आधारे विचारवंतानी नगराची व्याख्या केलेली आहेत. ती पुढीलप्रमाणे -

**१. लुईसवर्थ** - सामाजिक विविधता असणाऱ्या व्यक्तींची सापेक्षदृष्टीने मोठी दाट व स्थायी वसाहत म्हणजे नगर होय.

(A realitively large degree and permanent settlement or socially heterogeneous individuals)

**२. सोमबर्ट** (Sombart) नगर एक असे संस्थान आहे, जे इतके मोठे आहे की, त्याचे निवासी लोक लवकर एकमेकांना ओळखत नाहीत.

City as a place which has become so large that people no longer know each other)

**३. बर्गल** (Bergel) : आपण अशा स्थानास नगर म्हणू शकू की ज्यातील बहुतांशी निवासी हे कृषी कार्याव्यतिरिक्त इतर उद्योगामध्ये व्यवस्थ आहेत.

Thus we shall call a city any settlement where the majority of the occupant ae engaged in activities other agricultural activities.

**४. रॉबर्ट बी मिचेल** (Robert B. Mitchell) नगर म्हणजे लोक, मंदिरे, बँका, राजकिय संस्था, इमारती, वाहतूक व सांडपाण्याची सोय होय. तेथे आपणाला हवे ते सर्वकाही मिळते. मानवी अनुभूतीच्या दृष्टीने नवीन अस्तित्वात आलेली नगरे ही जुनी असतात, तर अगदी जुन्या शहरांचे नित्य नुतनीकरण होत असते.

(Cities are p[eople, churches, banks, politics, buildings, trafic and sewage, There are everything we are the newest cities are old in human experoene and oldest are coustantly enewed.)

वरील सर्व व्याक्येवरून असे स्पष्ट होते की, जेथे अधिक लोकसंख्या, कृषिव्यतिरिक्त इतर व्यवसाय, दुय्यम समुह, विजातियता आणि जटील सामाजिक संबध असतात त्यास नगर म्हणतात. नागरी समुदायाचा अर्थ पुढीलप्रमाणे निश्ति करता येईल. नागरी समुदाय म्हणजे लोकांचे असे संगठन आहे की, जे ग्रामीण समुदायाच्या तुलनेत अधिक घनता, स्पर्धा, व्यक्तिवाद, दुय्यम सामा. संबंध सामाजिक वर्तन व्यवहार कृत्रिमतेचे प्राबल्य, नियंत्रणाच्या औपचारिक साधनांद्वारे सामाजिक संघटनांची निर्मिती, उद्योग आणि व्यापार, सामाजिक गतिशीलता आणि अवैयक्तिक संबंध या आधारावर एका वेगळ्या आणि भिन्न वातावरणाद्वारे प्रभावित असलेली जीवनपद्धती स्वीकारणाऱ्या व्यक्तींच्या विशाल आकाराचा प्रादेशिक गट म्हणजे नागरी समुदाय होय.

भारताच्या १९९१ च्या जनगणना अहवालानुसार नगराची व्याख्या निकषाच्या आधारे आहे. १. जेथे नगरपालिका, महानगरपालिका, कँटोमेंट बोर्ड किंवा नगरपरिषद आहे.

२. किमान लोकसंख्या ५००० व काम करणाऱ्या पुरुषांपैकी ७५% पुरुष बिगरशेती व्यवसायात गुंतलेले आहेत. इ. घटना दर चौरस किलोमीटरला किमान ४०० आहे. या अटीची पुर्तता करणारे क्षेत्र हे नागरी समजले जाईल.

● **नागरी समुदायाची वैशिष्ट्ये** (Characteristics of Urban Society) :

**१. विशाल आकार** (Large in size) शहरी समुदायाचा आकार ग्रामीण स मुदायाच्या तुलनेने विशाल असतो. लोकसंस्थाही खूप मोठी असते. औद्योगिकरण हे नगराच्या विशालतेस कारणीभूत ठरते. औद्योगिकरणामुळे रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. ग्रामीण भागतून रोजगारासाठी स्थलांतरीत होतात. शहरात वस्ती वाढत जाते. मुख्य शहरात सर्वांनाच जागा उपलब्ध होत नाही. त्यामुळे उपनगरे वाढत जातात. जागेच्या किंमती वाढत जातात. ज्यांना जागा घेऊन घर बांदणे शक्य होत नाही असे लोक झोपडपट्ट्यांमध्ये राहू लागतात. आजूबाजूची खेडे शहरामध्ये विलीन होऊ लागतात. अशाप्रकारे शहरे विस्तारीत होत जातात. स्वातंत्र्यानंतर खेड्याच्या स्वरुपात असणारी काही गावाचे शहरात रुपांतर झाले. उदा. इचलकरंजी, भिवंडी, गडहिंग्लज, मिरज इ.

**२. बिगरशेती व्यवसाय** (Non Agricultural occupation) शहरामध्ये शेती व्यवसायाला गौणस्थान आहे. बहुसंख्य लोक शेतीव्यतिरिक्त अन्य व्यवसायामध्ये व्यस्त असतात. शहरात किंवा शहराच्या आसपासच्या परिसरात टाचणीपासून ट्रॅक्टरपर्यंत अनेक वस्तुंची निर्मिती आणि विक्री होत असते. त्यामुळे सरकारी कार्यालये, बँका, विक्रेते, वृत्तपत्रे, चित्रपटगृहे, चित्रपट स्टुडीओ, विद्यापीठ, महाविद्यालये, वावसायिक महाविद्यालये (आय.टी.आय. ते इंजिनिअरींग कॉलेजपर्यंत) बी.एड्., डी.एड्., एम.बी.ए., एम्.सी.ए. इ. मोठ्या प्रमाणात निर्मिती होते. यामुळे शेती करण्यासाठी जागाच उपलब्ध होऊ शकत नाही. कारण शेत जमिनीचा नागरी वस्तुसाठी वापर केला जातो. त्यामुळेच बिगरशेती व्यवसायाचे अधिक्य हे नागरी समुदायाचे एक प्रमुख वैशिष्ट्य आहे.

**३. सामाजिक विजातीयता** (Social Hetrogeneity) सामाजक विविधता हे नागरी समाजाचे अभिन्न अंग आहे. नगरांमध्ये देशाच्या अनेक भागातून लोक वेगवेगळ्या कारणासाठी येत असतात. उदा. नोकरी करण्यासाी, व्यवसायासाठी शिक्षणासाठी, शिक्षक म्हणून, उद्योग निर्मितीसाठी, धर्माचे पौराहित्यासाठी, कलाकार, म्हणून चित्रपटाच्या निर्मितीसाठी इ. यामुळे अनेक जाती, दर्म, पंथ, वंश, भाषा बोलणाऱ्यांची एक सरमिसळ समाज तयार होतो. नगरातील लोकांची संस्कृती, जीवन विषयक दृष्टीकोण, आवडी निवडी, रितीरिवाज, आचार विचार इ. बाबत विविधता दिसून येते. कोणीही कुणाच्या व्यक्तीगत जीवनात हस्तक्षेप करीत नाही. म्हणूनच नगराला विभिन्न संस्कृतीचा 'संस्कृतीपूंज' असे संबोधले जाते. मुंबई हे याचे उत्तम उदाहरण आहे.

**४. दुय्यम संबंधाचे प्राबल्य/प्रभाव** (Influence of Secondary Relations) ग्रामीण समाजातील लोकांचे हे समोरा समोरचे असतात. त्यामुळे प्रत्येक व्यक्ती प्रत्येकाला अगदी नावानिशी ओळखत असते. पण शहरी समुदाय आकाराने मोठा असल्याने लोकांचे प्रत्यक्ष संबंध फारसे येत नाहीत. आलेच तर ते फारच जुजबी आणि कामापुरते असतात. अनेक जाती-धर्माचे, पंथाचे भाषेचे, आर्थिक स्तराचे लोक एकत्र रहातात. त्यामुळे त्यांच्यात घनिष्ठता निर्माण होत नाही. कामाचे उद्दिष्ट साध्यासाठी वृत्तपत्रे, टेलीफोन, मोबाईल, टी.व्ही. रेडीओ यासारख्या माद्यमांचा वापर करतात. डॉक्टर आणि औषध प्रतिनिधी (Medical Representative) या दोघांची ओळख असत नाही. तरी सुद्धा औषध प्रतिनिधी डॉक्टरना भेटून औषधांची माहिती देतो. डॉक्टर पेशंटना औषधांची शिफारस करतात. औषध कंपनी देशाच्या कोणत्याही कोपऱ्यात असते. तरीपण व्यवहार व्यवस्थित चालू असतात. सारांश लोकांमध्ये निर्माण होणारे संबंध हे औपचारिक स्वरूपाचे असतात. फ्लॅटमध्ये रहाणारी माणसे वर्षानुवर्षे एकमेकाला फारसे परिचित नसतात. ही वस्तुस्थिती आहे.

**५. व्यक्तिवादी दृष्टीकोणाला प्राधान्य** (Perference to Individualism) : शहरी-समुदायात लाखो लोक वावरत असतात. प्रत्येकजण एकप्रकारचा एकाकीपणा अनुभवत असतो. असे असले तरी सुद्धा प्रत्येहक व्यक्तीमध्ये व्यक्तिवादाची भावना प्रबळ असते. वैयक्तिक हित साधणे हे नागरी जीवनाचे अंतिम उद्दिष्ट असून सामाजि कसंबध हे ते उद्दीष्ट मिळविण्याचे साधन बनतात. नागरी समुदायात व्यक्ती विकासाला भरपूर संधी असते. त्यामुळे आपल्या विचारांना चालना देऊन स्वत:चा विकास साधून घेते. एखादी व्यक्ती एखाद्या क्षेत्रात चमकली तर याला त्याच्या विशिष्ट नावावरूनच ओळखले जाते. उदा. तेजस्वीनी सावंत, सचिन तेंडूलकर इ.

**६. सामाजिक गतिशिलता** (Social mobilitity) : दाट, विपुल विजातीय शहरी समुदायात हजारो उध्योग व्यवसाय सुरू असतात. अनेक प्रकारची कौशल्ये असणाऱ्या व्यक्तींची गरज असते. अनेक कौशल्यांचे ज्ञान देणाऱ्या संस्था शहरात उपलब्ध असतात. त्यामुळे श्रमविभाजन आणि विशषीकरणावर आधारित लोकांची गरज मोठ्या प्रमाणात असते. व्यक्तिगततेला अधिक वाव मिळत सअतो. धर्म, जात, वंश, भाषा यांना विशेष महत्त्व दिले जात नाही. व्यक्तिला स्वत:च्या कर्तृत्व गुणाच्या आणि कौशल्याच्या आधारावर आपला दर्जा उंचवता येतो. दळणवळणाच्या वाढत्या साधनामुळे एका ठिकाणी राहून दुसऱ्या ठिकाणी नोकरी, व्यवसाय करता येतो. एक शहर सोडून दुसऱ्या शहरा रहाण्यासाठी जाता येते, उद्योगपती होता येते, धिरुभाई अंबानी हे उत्तम उदाहरण आहे. व्यक्तीला आपली प्रगती साधण्यासाठी अनेक मार्ग उपलब्ध असतात.

**७. श्रमविभाजन आणि विशेषीकरण** (Division of Labour and specialization) नागरी समुदाय हे विविधतेचे केंद्र आहे. उद्योगधंद्यामुळे अनेक व्यवसाय निर्माण होतात. उद्योगधंद्याला विशिष्ट कौशल्य असणाऱ्या व्यक्तींचीच गरज असते. त्यामुळे कौशल्यानुसार काम असे चित्र तयार होते. एखादे कार्य वेगवेगळे कौशल्य असणाऱ्या अनेक व्यक्तींच्या सामुहिक प्रयत्नातून साध्य करता येते. उदा. साखर कारखाना, उद्योगधंद्यातील सूक्ष्म श्रमविभाजनामुळे विशेषीकरणाला विशेष महत्त्व प्राप्त झालेले आहे.

**८. दुय्यम समुहाचे नियंत्रण** (Control of Secondary Groups) : नागरी जीवन ही एक गुंतागुंतीची व्यवस्था आहे. लाखो लोक रहात असतात. कोण काय करतात याविषयी बहुसंख्य लोक अनभिज्ञ असतात. गरजेपुरते लोक एकत्र येतात. फ्लॅटमध्ये रहाणारे शेजारील व्यक्ती कोणता व्यवसाय करते किंवा नोकरीला आहे याविषयी फारसे मान असत नाही. नागरी जीवनात गुंतागुंत खूप असते. एखाद्या फ्लॅटमध्ये वेश्या व्यवसाय चालतो किंवा ब्राऊन शुगर सापडले, चोरी झाली, धाड पडली अशा घटना पेपरमधून आल्यानंतर बऱ्याच वेळा माहित होतात. अशा समूहाचे नियंत्रण कुटुंब, शेजार यांच्यामार्फत करणे शक्य असत नाही. अशा समूहाला नियंत्रित करण्यासाठी पोलीस स्टेशन, पोलीस चौक्या, न्यायालय, तुरुंग स्तानिक स्वराज्य संस्था, (नगरपरिषद, नगरपालिका, महानगरपालिका इ.) रेडिओ, वृत्तपत्रे, दूरदर्शन इ. वापर केला जातो.

**९. ऐच्छिकमंडळाची रेलचेल** (Large Number of Coluntary groups) : मोठ्या आणि दाट लोकवस्तीच्या शहरी समाजात अनेक विचार, इच्छा, आकांक्षा, दृष्टीकोण, भाषा, आवडीनिवडी, व्यापार, व्यवसाय करणारे व बाळगणारे लोक असतात. आपआपले दृष्टीकोण, इच्छा बाळगणाऱ्या लोकांचे (समान विचार, दृष्टीकोण) समुह तयार होतात. ते आपआपले मंडळ स्थापन करतात. एक व्यक्ती अनेक ऐच्छिक मंडळाचे सदस्य असते. उदा. योगा क्लब, स्विमिंग क्लब, हास्य क्लब, लिसनर्स क्लब (जुनी गाणी ऐकणाऱ्यांचे मंडळ) नोटरी क्लब, युवा मंडळे, गणपती उत्सव समिती, पर्यावरण बचाव क्लब, नाना पाटेकर फॅन क्लब, अमिताभ डॅटींग क्लब इ.

**१०. सामाजिक सहिष्णूता** (Social tolerance) : संख्येने मोठ्या असलेल्या आणि विजातीय या लक्षणांनी युक्त असलेल्या शहरी समुदायातील प्रत्येक व्यक्तीला आपला हेतू साध्य करण्यासाठी हरगडी तडजोड करावी लगाते. शहरातील व्यक्तीला दुसऱ्याची भाषा, धर्म, जात, रितीरिवाज, पोषाख, आवडीनिवडी इ. बाबतीत स्वत:च्या मताचा आग्रह धरता येत नाही. उलट या भिन्नतेबद्दल सामंजस्यपणा दाखवावा लागतो. सामाजिक सहिष्णूता हा शहरी समुदायाचा गुणधर्मच झालेला आहे.

**११. विभक्त कुटुंब पद्धती** (Nuclear family system) नागरी समुदाय दिवसागणिक विस्तारत जाणारा समुह आहे. रहात्या जागेची गंभीर समस्या शहरात सते. त्यामुळे जसजसे कुटुंबातील सदस्यांची संख्या वाढत जाते, मुले मोठी होत जातात, तसतसे इच्छा असली तरी ती एकत्र राहू शकत नाहीत. अपुऱ्या जागेमुळे विवाह झाल्यानंतर किंवा विवाहापूर्वी स्वतंत्र रहाण्याची कुटुंबाला व्यवस्था करावी लागते. त्यामुळे आईवडील एका ठिकाणी आणि मुलगा सून दुसऱ्या ठिकाणी किंवा शेजारी अशी हातात. जागेच्या टंचाईचा अपरिहार्य परिणाम म्हणजे विभक्त कुटुंब पद्धती होय.

**१२. सामाजिक समस्यांचे केंद्र** (Center of Social Problems) नगराकडे धावणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने नागरी समुदाय हे समस्यांची केंद्रे बनलेली आहेत. वाढत्या लोकसंख्येमुळे, वाहतूकीची समस्या, गुन्हेगारी, बालगुन्हेगारी, वेश्याव्यवसाय, मटका, गुटखा, वृद्धांच्या समस्या, भिक्षावृत्ती, भ्रष्टाचार, वाढते अपघात, प्रदूषण, रोगराई (स्वाईन फ्लू), कौटुंबिक विघटन इ. यामुळे पोलीस यंत्रणेवर फार मोठा ताण तयार होतो. यामुळे कायदा आणि शिस्तीचा प्रश्न नेहमीच ऐरणीवर येतो.

- **नागरी समाजातील परिवर्तन** (Change in Urban Society) :

भारतात प्राचीन काळापासून नगरे अस्तित्वात होती. सिंधुसंस्कृतीमध्ये सापडलेली मोहोजदडो आणि हडप्पा ही नागरी वस्ती होती. ब्रिटीश राजवटीत नवीन प्रशासकीय व्यवस्था आली. समाज नियंत्रणासाठी पोलीस, न्यायालय, तुरुंग, व्यापारी पेठा, निर्माण करण्यात आल्या. काही विशिष्ट गावामध्ये सत्तेची केंद्रे निर्माण करणत आली. दळणवळणाच सोयी वाढल्या. धार्मिक स्थळांना भेटी देणाऱ्यांची संख्या वाढत गेली. नागरीकरणाची प्रक्रिया वाढीस लागली. स्वातंत्र्यानंतर आर्थिक विकासाचा नवा फंडा सुरू झाला. नगरे वाढत गेली. औद्येगिकरणाच्या प्रक्रियेने वेग घेतला. ग्रामीण भागाच्या आसपास साखर कारखाने, सूत गिरण्या, सहकारी संस्था सुरू होत गेल्या. यामुळे गावांच रुपांतर शहरामध्ये झाले. उदा. इचलकरंजी, भिवंडी, ठाणे, अहमदनगर इ. आधीपासूनच अस्तित्वात आलेली शहरे अधिक विकसित होत गेली. त्यांचा विस्तार वाढत गेला. लोकसंख्या वाढत गेली. शहरांचा कायापालट होत गेला. शहरे ही परिवर्तनाया प्रक्रियेपासून अलिप्त राहू शकली नाहीत. नागरी समाजात जे परिवर्तन घडून येत आहेत ते पुढीलप्रमाणे.

**१. कुटुंबसंस्थेतील परिवर्तन** (Change in family) : शहरी समुदायात कुटुंबसंस्थेवर फार मोठे आघात झालेले आहेत. कुटुंबाचा जसजसा विस्तार होत जातो तसतसे इच्छा असूनही आई वडील, मुले सुना, नातवंडे यांना एकत्र रहाणे शक्य हाते नाही. परिणामी विभक्त कुटुंबे तयार होतात. आम्ही नवरा-बायको आणि मुले अशा राजाराणीच्या संसाराला महत्त्व येते. घरात इतर व्यक्तींची अडचण वाटू लागले. सासू-सासरे, नणंद, दिर आले तरी पाहुण्यांसारखे रहातात आणि जातात. जागेच्या अडचणीमुळे मुलांच्या संख्येवर आपोआपच मर्यादा आल्या आहेत. पित्याचे वर्चस्व कुटुंबात कमी झाले आहे. त्याला निर्णय घेताना सर्वांया मताचा विचार करावा लागतो. पुरुषी दबावाला सगळेच नेहमी दबतातच असे नाही. स्त्रिया अर्थार्जनासाठी बाहेर पडू लागल्या. पती-पत्नीचे संबंध समान पातळीवर आले. त्यामुळे परस्परावरील वर्चस्व

कमी झाले. कौटुंबिक पातळीवर संघर्ष निर्माण होऊ लगाले. कधीकधी संघर्ष टोकला गेल्यामुळे विवाहविच्छेदनाचे प्रमाण वाढू लागले. मुलांसमोर एकमेकांचा पानउतारा केल्यानंतर मुलांना माता-पित्याची कुवत लक्षात येऊ लागते. त्यामुळे आईचे किंवा वडीलांचे कुणाचेही ऐकत नाहीत. यामुळे घराचे घरपण निघून जाते. उद्योग, व्यवसाय, राजकारण, नोकरी या ठिकाणी स्त्री-पुरुष एकत्र काम करु लागल्यामुळे जाता येता स्त्री-पुरुषांचे परस्परांना भेटण्याचे प्रमाण वाढत जाते. शब्दातून प्रेमाचे प्रगटीकरण होऊन परस्परांबरोबर सिनेमा, नाटके, हॉटेल, सहल, बाग इ. ठिकाणी जाणेयेणे वाढले. स्त्री-पुरुषांमधील संकोच कमी होऊ लागला. यामुळे विवाहपूर्व-विवाहबाह्य लैंगिक संबंधाचे प्रमाण वाढू लगाले. पती-पत्नी आपल्या निकोप आणि खऱ्या प्रेमापासून व मूले आपल्या माता-पित्याच्या जिव्हाळ्यापासून वंचित होत आहेत. एकूणच लैंगिक शिथिलतेमुळे कुटुंबाच्या रचनात्मक व कार्यात्मक व्यवस्थेत बदल होत आहेत. नीतीमत्ता, चारित्र्य, पाप पुण्य, इष्ट अनिष्ट इ. बाबी कुटुंबातील सदस्यांना कसे सांगावे किंवा सांगू नये अशी परिस्थिती कधीही नव्हती. ती आजच्या औद्योगिक-नागरीसमाजात निर्माण झाली आहे. नागरी समाजात कुटुंब व्यवस्था असुरक्षिततेच्या टप्प्यावर आहे (Live in relation) सामान्यीकरण जरी झाले नसले तरी हळूहळू मागच्या दराने येऊ लागली आहे. यामुळे तर भविष्यात कुटुंब फारच अस्थिर होईल.

कर्ती सवरती मुले कुटुंबाच्या विवाहानंतर लगेचच बाहेर पडू लागल्यामुळे शहरात वृद्धांची समस्या निर्मार होऊ लागली आहे. कधीकधी वृद्ध आई किंवा वडील एकटेच रहातात. या एकटेपणाचा फादा घेऊन काही लुटणारे, त्यांचा खून करणाऱ्या टोळ्या शहरामध्ये आहेत. विभक्त कुटुंबामध्ये विशेषत: मध्यमवर्गीयामधे पैशाची श्रीमंती आली पण मनाची कमी झाली. त्यामुळे एकप्रकारचे एकाकीपणा अधिक जाणवू लागले आहे. यातूनच व्यसनाधीनता, आत्महत्या यासारख्या सामाजिक समस्या निर्माण होत आहेत.

२. **विवाह संस्थेतील परिवर्तन :** शहरी समुदायात शिक्षणाचे वाढते महत्त्व, अर्थार्जन करण्याची पुरुषाबरोबर मिळालेली संधी, विवाहाचे वाढते वय, करियर, नोकरी, परस्परांशी वाढता संपर्क नवीन कायदे, प्रसारमाध्यमे, कुटुंब प्रमुखाचे कमी होत असलेले महत्त्व वाढते दळणवळण, टेलिफोन, मोबाईल इ. मुळे विवाह संस्थेला हादरे बसत आहेत. नागरी जीवनात विवाहाकडे बघण्याचा दृष्टीकोण बदलू लागला आहे. पती हाच परमेश्वराची जागा पती हा ('च' नाही) पार्टनर येथे पर्यंत व्यवस्था आलेली आहे. विवाह करार प्रधान झाले आहेत. विभक्त होण्यासाठी साधे कारण सुद्धा पुरेसे आहे. बदलत्या परिस्थितीत कायदा स्त्रीला अनुकुल असल्याने तिने पारंपारिक गुलामगिरी झुगारून देण्यास सुरूवात केली आहे. आंतरजातीय विवाहाचे सार्वत्रिकरण झाले नसले तरी प्रमाण वाढत आहे. यामुळे जूनी पिढी-नवी पिढी यामध्ये संघर्षाचे प्रमाण वाढत आहे. शहरी समुदायात 'जीवनमानाचा दर्जा' उंचावण्यासाठी मुले जोडीदार निवडताना नोकरी असणाऱ्या किंवा मिळवित्या मुलीला अधिक प्राधान्य देऊ लागले आहेत. अलिकडे यांना बाजारी स्वरूप आले आहे. विवाह जमविण्यासाठी इंटरनेटचाही वापर होऊ लागला आहे. विवाहानंतर हनिमुनला जाण्याची पाश्चिमात्याची आचारपद्धती नागरी जीवनात भारतीयांनी स्वीकारलेली आहे. नागरीकरणामुळे स्त्री-पुरुषातील अंतर कमी झाले असले तरी पती-पत्नीच्या बाबतीत ते रुंदावत आहे. जीवनावश्यक व इतर गरजांच्या पुर्ततेसाठी स्त्री सुद्धा घराबाहेर पडल्याने तिला नको त्या प्रसंगाला तोंड द्यावे लागते. एक माणूस म्हणून कधीकधी क्षणीक मोहाला बळी पडते आणि वैवाहिक जीवनाला विश्वासाला तडा जातो. त्यामुळे आतून दुखावलेला पती पत्नीला सोडून देतो किंवा घटस्फोट होतो. त्यामुळे शहरी समाजात परित्यक्त्या व घटस्फोटीत स्त्रियांचे प्रमाण अधिक वाढत आहे. पुरुष सुद्धा वैवाहिक जीवनाला छेद देऊन विवाहबाह्य संबंध ठेवतात. यातून कुटुंबात पत्नीकडे दुर्लक्ष होते. यातून स्त्री सुद्धा आपल्या लैंगिक भावनेचे दमन करण्यासाठी परपुरुषामध्ये आकर्षित होते. नागरी समाजात हे प्रमाण वाढत आहे. याचा परिणाम कुटुंबातील इतर

सदस्यावर पडू लागला आहे. समाजात सगळीकडेच अनैतिकतेचे प्रमाण वाढू लागल्याने एकंदरीत जीवनविषयक तत्त्व आणि मूल्यांचा भविष्यात ऱ्हास होतो की काय अशी शंका निर्माण होऊ लागली आहे.

**३. अर्थव्यवस्थेतील परिवर्तन** : नागरी समुदायातील विविध उद्योगधंदे, व्यवसाय, कारखाने यांची मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. नवनवीन उद्योगधंदे उभारण्यासाठी जागेचे आरक्षण केले जात आहे. सेझ (SEZ - Special Economic Zone) मुळे नव्या उद्योगांच्या वसाहती तयार केल्या जात आहेत. नगरमध्ये नवीन नगरे निर्माण होऊ लागली आहेत. (लवासा) ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणात लोक स्थलांतरीत होत आहेत. नगर विकासासाठी राज्य सरकार व केंद्र सरकार मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देत आहेत. शहराचा दर्जा उंचावला जातो आहे. संगणकाच्या क्रांतीमुळे IT - HiTech शहरे निर्मार होऊ लागली आहेत. उदा. पुणे, बेंगलोर, म्हैसूर इ. यामुळे एकूणच नागरी संस्कृती वेगाने बदलती आहे. बहुराष्ट्रीय-कंपन्यांनी भारतात आपल्या वसाहती तयार केल्या आहेत. त्यामुळे नोकरदारांचे पगार भरमसाठ वाढलेले आहेत. वार्षिक पॅकेजवर (१० लाख, १२ लाख, १५ लाख, ४० लाख) पगार मिळू लागले. म्हणजे मासिक पन्नास हजार ते साडेतीन लाख असे पगार झाले. त्यामुळे खर्च करण्याचे प्रमाण वाढले. शहरी अर्थव्यवस्थेला गतीप्राप्त झाली. शहरांचा चेहरामोहराच बदलून गेला. भांडवलदारी अर्थव्यवस्था अस्तित्वात आली. संगणक CNC VMC मशिन यामुळे कामगारांचे प्रमाण कमी झाले. बेकारी वाढली, आहेरे (haves) व & नाहिरे (have not) यामधील दरी वाढत निघाली आहे. कौशल्ययुक्त कर्मचाऱ्यांना आजही मागणी आहे. पण कौशल्य नसल्यास अकुशल कामगार म्हणून काम करावे लागते. शिक्षणाचे अवमूल्यन झाले आहे. (एक बातमी-अंगणवाडी सेविकेसाठी बी.ए. बी.एड्. महिला उमेदवाराचे अर्ज) शहरात पैसे मिळविण्याचे 'शॉर्टकट' मार्ग शोधले जातात. यातूनच काळ्या धंद्याना वाव मिळतो. लाचलुचपत, वशिलेबाजी, काळा बाजार, भ्रष्टाचार, गळेकापू स्पर्धा इ. गोष्टी सर्रास सुरु होतात. स्मगलिंग करणाऱ्याची एक समांतर व्यवस्था सुरु होते. भातिक जीवन व महागाई यांचा निकटचा संबंध आहे. शहरातील वाढत्या गरजा व यांचा अपुरा पुरवठा यामुळे रुपयाची क्रयशक्ती कमी होते. अत्यावश्यक गरजेच्या वस्तू महागल्या आहेत. त्यामुळे वाढती महागाई-वाढते पगार, बोनसची मागणी यातून कलह, संप, मोर्चे, टाळेबंदी यासारखे प्रकार सुरू होतात.

**४. स्त्रीच्या दर्जात वाढ** (Progress is status of Woman) : शहरी समाजात अर्थार्जनाच्या उपलब्ध होत असलेल्या सध्या शिक्षणाच्या सुविधा, शैक्षणिक कर्जाची उपलब्धता, व्यक्तिस्वातंत्र्याच्या विचारांचा वेगवेगळ्या संस्थेमार्फत होत असणारा पाठपुरावा (सखी, कस्तुरी क्लब, सेवा भावी संस्था) यामुळे स्त्रिया वेगवेगळ्या उपक्रमात भाग घेऊन आपला दर्जा उंचावत आहेत. काही शहरामध्ये स्त्रियांना आमदार फंडातून, खासदार फंडातून मोफत संगणक शिक्षण, शिलाई यंत्राचे वाटप, वेगवेगळ्या प्रकारचे व्यावसायिक प्रशिक्षण, कायद्याचे प्रशिक्षण दिले जाते. यामुळे भिशी गोळा करणे, पतीचा किंवा घरचा व्यवसाय सांभाळणे, नोकरी करणे या गोष्टी नव्या राहिल्या नाहीत. मिळवत्या मुलीला मुले पत्नी म्हणून अधिक पसंती दाखवू लागली आहेत. आर्थिक दृष्ट्या स्वावलंबन आल्यामुळे एकप्रकारचा आत्मनिर्भरपणा येऊ लागला आहे. राजकारण समाजकारणातही सहभागी होत आहे. ग्रामीण समाजातील स्त्रीयांच्या तुलनेने शहरी समाजातील स्त्रियांचा दर्जा उंचावला आहे. स्त्रियांच्या वाढत असलेल्या दर्जामुळे काही समस्याही तयार होत आहेत. वर्षानुवर्षे पुरुषी अहंकार जपणाऱ्या पुरुष वर्गाला स्त्रियांचा मुक्तवावर सहन होत नाही. त्यामुळे पुरुषामध्ये न्यूनगंडाची भावना निर्माण होते. कौटुंबिक कलह वाढू लागले आहेत. यातून कधीकधी स्त्रीच घटस्फोटाचा अर्ज दाखल करते. स्त्रीमुक्ती चळवळीमध्ये भाग घेणाऱ्या स्त्रियांच्याकडे निकोप दृष्टीने पाहिले जात नाही. याला वेगवेगळी कारणे आहेत. कधीकधी काही स्त्रिया स्त्रीमुक्ती चळवळीचा अतिरेक करतात. नवऱ्याची बदनामी करतात. यातून मुक्तता मिळविण्यासाठी अलिकडे पुरुषमुक्ती संघटनाही समाजात कार्यरत आहेत.

**५. धर्मसंस्थेतील परिवर्तन** (Change in Religion) : शहरी समाजात शिक्षणाचा वाढता प्रसार, वैज्ञानिक दृष्टीकोण, यामुळे धार्मिक कर्मकांडाचे महत्त्व कमी होऊ लागले आहे. पाप-पुण्य, स्वर्ग-नरक, सत-असत यावरील श्रद्धा कमी झाल्या आहेत. ईश्वरावरील श्रद्धा अबाधित आहे. पण कर्मकांडाचे महत्त्व कमी झाले आहे. व्यक्ती कर्मकांड करतात. पण धार्मिक विधीचा एक औपचारीक भाग म्हणून करतात. पारंपारिक समाजात मानसिक सुरक्षिततेसाठी धर्माचा वापर होत असे पण आज धर्मावरची श्रद्धा कमी झाल्यामुळे शहरी समाजातील लोकांमध्ये एकप्रकारची असुरक्षितता तयार होऊ लागली आहे. प्रसार माध्यमांचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. टी.व्ही. सारख्या माध्यमाचा वापर करून लोकांच्या धार्मिक भावनेचा फायदा घेऊन वेगवेगळ्या प्रकारच्या धार्मिक वस्तू (गंडे, ताईत, धार्मिक वस्तु, मंतरलेले पाणी) भरमसाठ किंमतीला विकले जात आहेत. मनातील भावनिक असुरक्षिततेपासून मुक्ती मिळविण्यासाठी धार्मिक स्थळांची यात्रा, प्रवचने, धार्मिक प्रसाद यांचे आयोजन केले जाते. त्यामुळे शहरातील धार्मिक स्थळांना महत्त्व आले आहे. धार्मिक उत्सव, मंदिरांचे जिर्णोद्धार करण्यासाठी फंड उभ्या केल्या जात आहेत. गणेशोत्सवाच्या काळात कोट्यावधी रुपयांची वर्गणी गोळा केली जाते. या वर्गणीचा पैसा उत्सव झाल्यानंतर चैनीसाठी वापरला जातो. (काही अपवादात्मक मंडळे विधायक कार्यासाठी निधी वापरतात) आरास, रोषणाई डॉल्बी यामुळे ध्वनी प्रदूषणाची गंभीर समस्या तयार झाली आहे. (पुत्रप्राप्ती, गुप्तधनाची प्राप्ती, घरातील शांती, धंद्यामध्ये प्रगती इ.) शहरात अनैतिक कृत्यासाठी सुद्धा धार्मिक कर्मकांड केले जाते. जसे बिअर बार, दारूचे दुकानाच्या उद्घाटनासाठी सत्यनारायणाची पूजेचे आयोजन केले जाते. वर्गणी वसूल करण्यासाठी दहशत निर्माण केली जाते.

**६. मानसिक ताणतणावात वाढ** (Increase in stress) : शहरी वस्ती दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे लोकांचे संबध अधिकच गुंतागुंतीचे बनत आहे. ते अधिक औपचारिक बनत आहेत. उद्योग धंद्यात स्वयंचलित यंत्राचा वापर वाढतो आहे. त्यामुळे कामगारावर केव्हाही बेकारीची कुऱ्हाड कोसळू शकते. त्यामुळष कामगार वर्ग प्रचंड तणावाखाली आहे. कुटुंबातील सगळेच सदस्य पैशासाी मागे धावू लागले. त्यामुळे कुणाचा कुणाशी ताळमेळ नाही. कोण सदस्य काय करतो याची माहिती असत नाही. एका घरात रहातात पण एकमेकांना भेटत नाहीत. कुटुंबाचे सदस्यावरील नियंत्रण कमी हाते आहे. गुन्हेगारी, भ्रष्टाचार, रहात्या घराची अडचण, झोपडपट्टी, वृद्धांच्या समस्या, वाढती गुन्हेगारी इ. मुळे मानसिक ताण-तणाव कमालीची वाढ झालेली आहे. त्यामुळे नैराश्य, वैफल्य वाढत आहे. आत्महत्येच्या प्रमाणात वाढ होत आहे. काही परिवर्तन विधायक असले तरी काही परिवर्तन विघातक पातळीवर आलेले आहे. समाजशास्त्रीय दृष्ट्या परिवर्तन ही एक उदासिन प्रक्रिया आहे. त्यामुळे दोन्हींचाही अभ्यास करणे हे समाजशास्त्राचे कर्तव्य आहे.

**(क) स्वयंअध्ययनासाठी प्रश्न. (चूक की बरोबर सांगा)**

१. भारतात शहरांसाठी ११००० लोकसंख्येची अट आहे.

२. शहरातील बुहसंख्य लोक शेतीव्यतिरिक्त व्यवसायात गुंतलेले असतात.

३. सामाजिक सजातियता हे शहरी समाजाचे वैशिष्ट्य आहे.

४. शहरी समाजातील लोकांचे संबध हे प्राथमिक स्वरूपाचे असतात.

५. शहरी समाजात व्यक्तीविकासाला अधिक वाव आहे.

## ३.४ स्वयंअध्ययनाची उत्तरे.

(I) अ) १. मागासलेले हिंदू  २. प्रमाणलघुता  ३. लिंगभेदावर
४. ६.७७ कोटी  ५. ब्रिटिशांच्या आगमना

(II) ब) १. बरोबर  २. चूक  ३. बरोबर  ४. बरोबर  ५. बरोबर

(III) क) १. चूक  २. बरोबर  ३. चूक  ४. चूक  ५. बरोबर

## ३.५ सारांश (Let us Sum up)

भारत हा एक खंडप्राय देश आहे. या देशाला जगाची छोटी प्रतिकृती असे संबोधले जाते. लोकसंख्येच्या दृष्टीने याचा जगात दुसरा क्रमांक लागतो. भौगोलिकदृष्ट्या व विकासाच्या दृष्टीकोणातून लोकसंख्या तीन गटात विभागली गेलेली आहे. १. आदिवाशी, २. ग्रामीण, ३. शहरी तसेच आदिवाशीची लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या सुमारे ७% इतकी आहे. विशिष्ट भूप्रदेश, प्रमाण लघुता बोलीभाषेचा वापर, साधी तंत्रविद्या, साधे रहाणीमान, समान नाव, समान धर्मश्रद्धा, सामाजिक एकजिनशीपणा, जादूचा प्रभाव ही आदिवासी समाजाची वैशिष्ट्ये आहेत. ब्रिटिशांच्या आगमनानंतर ख्रिश्चन मिशनऱ्यांनी धर्मप्रासारासाठी आदिवासी समाजात प्रवेश केला त्यांना प्रगत समाजाच्या सुख सोयी देण्यास सुरवात केली. त्यामुळे हळूहळू त्यांच्यात परिर्वतन होऊ लागले. स्वातंत्र्यानंतर त्यांनाही राष्ट्रीय प्रवाहात सामावून घेण्याच्या धोरणामुळे आदिवाशी विकासासाठी विविध योजना भारत सरकारने तयार केल्या. पंचवार्षिक योजनेत निधी राखीव ठेवण्यात आला. ज्या राज्यात आदिवासींची संख्या अधिक आहे तेथे आदिवासी मंत्रालयाची निर्मिती करण्यात आलेली आहे. आदिवासींच्यासाठी नोकरीत आरक्षण देण्यात आले. वाड्या, वस्त्यावर शाळा, आश्रमशाळा, रोख अनुदान, अनुदानित शाळा महाविद्यालये, स्कॉलरशिप, परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्त्या अशा अनेक योजना सुरू करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे आदिवासी समाजात परिवर्तन होत आहे. हे जरी खरे असले तरी कंत्राटदार, ठेकेदार, व्यापारी यांच्याकडून पिळवणूकही होत आहे. नव्या व्यवस्थेमुळे काही चांगल्या गोष्टी आदिवासींच्या नामशेष होऊ लागल्या आहेत. त्यांच्यामध्ये कांही समस्याही निर्माण होत आहेत.

पारंपारिक ग्रामीण समाजाची काही वेगळी वैशिष्ट्ये आहेत. ती वैशिष्ट्ये समजून घेतल्याशिवाय भारतीय समाज समजूनच घेता येणार नाही. आजही सुमारे ६७% लोक शेतीवरच अवलंबून आहेत. भारतात शहरांची संख्या वाढत असली तरी ग्रामीण भाग विशाल स्वरूपात आहे. पारंपारिक ग्रामीण समाजाची अलगता, स्वयंपूर्णत: स्वायत्तता, रुढीचे प्राबल्य, पैशाचा अभाव, साधे रहाणीमान, शेतीवर आधारीत अर्थव्यवस्था, प्राथमिक संबंधाची तीव्रता ही वैशिष्ट्ये आहेत. पारंपारिक ग्रामीण समाजात ही परिवर्तने अनेक अंगाने होत आहेत. दळणवळणाच्या अत्याधुनिक सोयी, प्रगत रस्ते, उद्योगधंदे, ग्रामीण उद्योगधंदे संपर्काची प्रगत साधने, शिक्षणाचा होत असलेला प्रसार, प्रसारमाध्यमे यामुळे ग्रामीण समाज परिवर्तीत होत आहेत. ग्रमीण समाजाच्या राजकारणात वेगाने बदल होत आहेत. पंचायत राज व्यवस्थेमुळे ग्रामीण सामज ढवळून निघाला आहे. यामुळे काही विधायकबदल झाले. पण काही विघातक परिणाम टोकाला गेले आहे. ग्रामीण भागातील पोलीस चौक्या उभ्या करण्याची वेळ आलेली आहे. शेती उद्योग, पुरक उद्योग, साखर कारखाने, दुग्ध व्यवसाय यामुळे आर्थिक व्यवस्था नवीन रुप धारण करु लागली आहे. जाती व्यवस्थेचे प्रस्थ कमी झाले आहे.

भारतात स्वातंत्र्यानंतर शहराचाही विकास मोठ्या प्रमाणात होत आहे. जुनी शहरे नवे रुप धारण करीत आहेत. तर काही गावाचे शहरामध्ये रुपांतर होत आहे. नव्या व्यवस्थेमध्ये शहरी मतदार संघ वाढले व ग्रामीण मतदारसंघ कमी झाले हे वाढत आलेल्या शहरीकरणाचेच द्योतक आहे. शहरी समाज ग्रामीण समाजापेक्षा अनेक अर्थानी वेगळा आहे. कृत्रिम मानव निर्मित पर्यावरण, विशाल आकार, औपचारिक संबंध, सामाजिक गतिशीलता, औद्योगिकरण, व्यक्तिविकासाला प्राधान्य अशी वैशिष्ट्य आहेत. तंत्रविद्यात्मक बदलांचा वेग अधिक असल्यामुळे शहरी समाजातही वेगाने परिवर्तन होत आहेत. यातील काही परिवर्तन विधायक आहेत तर काही परिवर्तन शहरात गंभीर समस्या निर्माण करीत आहेत.

## ३.६ दिर्घोत्तरी प्रश्न :

१. आदिवाशी समाजाची वैशिष्ट्ये सांगा.

२. आदिवासी समाजातील परिवर्तन सांगा.

३. पारंपारिक ग्रामीण समाजाची वैशिष्ट्ये सांगा.

४. ग्रामीण समाजातील परिवर्तनावर चर्चा करा.

५. शहरी समाजाची वैशिष्ट्ये सांगा.

६. शहरी समाजातील परिर्वनावर चर्चा करा.

## ३.७ क्षेत्रीय कार्य :

१. आपल्या भागात एखादी आदिवासी जमात असेल किंवा भटकंती करीत असतील तर त्याचा अभ्यास करा.

२. एखाद्या खेड्यात जाऊन व्यापक सर्वेक्षण करा.

३. एखाद्या खेड्याचा ५० वर्षापूर्वीचा स्थिती व आजचा विस्तार कमी झालेल्या पिकाऊ क्षेत्राचा अभ्यास करा.

४. एखाद्या शहराला भेट द्या. शहरातील ड्रेनेज व्यवस्था, झोपडपट्टी यांचा अभ्यास करा.

५. शहरातील एखाद्या वृद्धाश्रमाला, फ्लॅटधारकांची भेट घेऊन मुलाखत घ्या व त्यांच्या समस्या जाणून घ्या.

## ३.८ अधिक वाचनासाठी पुस्तके :


१. S. C. Dube (2002) Indian Society, National Book Trust, India, New Delhi.

२. T. K. Oommen & C. N. Venu Gopal (2003) Sociology for Law Students, Eastern Book Company.

३. T. K. Ommen (1990), State and Society in India Sage, Publications.

४. प्रा. चंद्रकांत खंडागळे (१९९८) भारतीय समाज, प्रकाशिका मायोदवी खंडागळे, सांगली.


❑❑❑

**सत्र १ : घटक ४**

# भारतीय समाज : परिवर्तनाच्या प्रमुख प्रक्रिया

## (Indian Society : Mejor Processes of Change)

**घटक संरचना**


४.१ प्रस्तावना (Introduction)

४.२ उद्दिष्टे (Objectives)

४.३ विषय विवेचन (Presentation of Subject Matter)

४.३.१ आधुनिकीकरण व त्याचा प्रभाव (Modernization and its Impact)

४.३.२ भारतातील परंपरा व आधुनिकता (Tradition and Modernity in India)

४.३.३ जागतिकीकरणाचा प्रभाव व आव्हाने (Globalization : Impact and Challenges)

४.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न (Check Your Progress)

४.५ सारांश (Abstract)

४.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे (Answers to Check Your Progress)

४.७ सरावासाठीचे प्रश्न/गृहपाठ (Exercise/Home Asignment)

४.८ चिंतन आणि कार्य (Reflection and Action)

४.९ अधिक वाचनासाठी पुस्तके (Suggested Readings)


### **४.१ प्रस्तावना** (Introduction) :

कोणत्याही समाजाचे यथार्थ आकलन होण्यासाठी त्याची संरचना व त्यामध्ये होणारे परिवर्तन या दोन्हींचा अभ्यास करावा लागतो. भारतीय समाजाच्या आकलनासाठीही त्याची संरचना व त्यात होत असलेले परिवर्तन समजावून घ्यावे लागते. म्हणून या चौथ्या व अंतिम घटकात आपण भारतात परिवर्तन घडवून आणण्यास कारणीभूत ठरणाऱ्या प्रमुख प्रक्रियांचा अभ्यास करणार आहोत. कोणत्याही समाजात सतत परिवर्तन होत असते. भारतीय समाजातही असेच आढळते. ब्रिटिशपूर्व भारतात मंद गतिने परिवर्तन होत होते. ब्रिटिश राजवटीपासून मात्र या परिवर्तनाची गती खूपच वाढत गेली. स्वातंत्र्योत्तर भारतात तर ही गती आणखीनच वाढली. पी.व्ही. नरसिंहराव सरकारने १९९१ मध्ये जागतिकीकरणाचे, उदारीकरणाचे व खाजगीकरणाचे धोरण स्वीकारून अंमलात आणल्यानंतर परिवर्तनाची गती खूपच तीव्र झालेली आहे. त्यामुळे भारतात परिवर्तन घडवून आणणाऱ्या विविध प्रक्रियांचा आपणास अभ्यास करणे भाग पडते. या घटकात आपण आधुनिकीकरण, आधुनिकता व जागतिकीकरण या प्रक्रियांचा सविस्तर अभ्यास करणार आहोत.

## ४.२ उद्दिष्टे (Objectives) :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर तुम्हास :

- आधुनिकीकरणाचा अर्थ व भारतीय समाजावर त्याचा पडलेला अभ्यास समजावून घेता येईल.
- भारतातील परंपरा व आधुनिकता यांचे आकलन होईल.
- जागतिकीकरणाचा अर्थ व त्याचा भारतीय समाजावरील प्रभाव व त्याची आव्हाने स्पष्ट करता येतील.

## ४.३ विषय विवेचन (Presentation of Subject Matter) :

प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे या घटकात तुम्ही भारतातील परिवर्तनाच्या प्रमुख प्रक्रियांचा अभ्यास करणार आहात. विषय विवेचनाच्या दृष्टिने या घटकाचे तीन विभाग पाडलेले आहेत. त्यापैकी पहिल्या विभागात आधुनिकीकरणाचा अर्थ, वैशिष्ट्ये व दुसऱ्या विभागात भारतातील परंपरा व आधुनिकता आणि तिसऱ्या विभागातीकीकरणाचा अर्थ व त्याचा भारतीय समाजावरील प्रभाव व आव्हाने स्पष्ट करण्यात येतील.

### ४.३.१ आधुनिकीकरण आणि त्याचा प्रभाव (Modernization and its Impact) :

या घटकात आपण सर्वप्रथम आधुनिकीकरणाचे स्वरूप व त्याचा भारतीय समाजावर पडलेला प्रभाव पाहणार आहोत. त्यासाठी प्रथम आधुनिकीकरणाचा अर्थ व्याख्या व वैशिष्ट्ये थोडक्यात समजावून घेणे गरजेचे ठरते. आधुनिकीकरण ही सामाजिक परिवर्तनाची अत्यंत प्रभावी प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत जीवनाच्या सर्व क्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन घडून येणे अपेक्षित आहे. पाश्चिमात्त्य जगातील औद्योगिकदृष्ट्या विकसित असलेल्या देशात ज्या प्रकारचे परिवर्तन घडून आलेले आहे तसे परिवर्तन अविकसित देशात घडून येणे म्हणजे आधुनिकीकरण असे मानले जाते. आधुनिकीकरणाचा अर्थ समजण्यासाठी त्याच्या कांही व्याख्या पाहाणे गरजेचे ठरते. त्या व्याख्या पुढीलप्रमाणे–

**आधुनिकीकरणाची व्याख्या :**

१) **चंद्रकांत खंडागळे :** मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रात विवेकी व इष्ट परिवर्तन घडून येणे म्हणजे आधुनिकीकरण होय.

२) **लाईट व किलर :** प्रगत औद्योगिक देशांतील समाजाप्रमाणे परिवर्तन घडवून आणणे यालाच साधारणतः आधुनिकीकरण मानले जाते.

३) **रस्टोव्ह आणि वार्ड :** आधुनिक विज्ञानाचा मानवी व्यवहारासाठी उपयोग करणे ही आधुनिकीकरणातील मूलभूत प्रक्रिया आहे.

४) **कुप्पुस्वामी :** आधुनिकीकरणात सामाजिक, राजकीय व आर्थिक संघटनांमध्ये रूपांतरण होणे अंतर्भूत आहे.

**आधुनिकीकरणाचा अर्थ :**

वरील व्याख्यांवरून आधुनिकीकरणाचा आपणास पुढीलप्रमाणे अर्थ स्पष्ट करता येतो.

- आधुनिकीकरण ही सामाजिक परिवर्तनाची वा रुपांतरणाची प्रक्रिया आहे.
- आधुनिकीकरणात जीवनाच्या सर्व क्षेत्रात-आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक इ. परिवर्तन घडून येते.
- आधुनिकीकरणात विकसित समाजात जसे परिवर्तन झाले तसेच परिवर्तन अविकसित समाजात होणे अपेक्षित आहे.
- आधुनिकीकरणात होणारे परिवर्तन हे विवेकनिष्ठ (बुद्धिला किंवा विवेकाला पटणारे) आणि इष्ट (चांगले) असे असते.

**आधुनिकीकरणाची वैशिष्ट्ये :**

वरील विवेचनाच्या आधारे आपणास आधुनिकीकरणाची पुढील वैशिष्ट्ये सांगता येतात.

**१) सर्वस्पर्शी व गुंतागुंतीची प्रक्रिया :** आधुनिकीकरण ही जीवनाच्या सर्व क्षेत्राला स्पर्श करणारी व अत्यंत गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत मानव समाजाच्या विविध क्षेत्रात अमूलाग्र बदल घडून येतात. हे बदल विकसित देशांत (अमेरिका, इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स, ऑस्ट्रेलिया इ.) जसे झाले तसेच ऊर्वरीत देशांत विशेषतः अविकसित देशांत होणे अभिप्रेत आहे.

**२) जूनी प्रक्रिया मात्र नाव नवे :** आधुनिकीकरणाची प्रक्रिया ही तशी जुनीच आहे. मात्र तिचे नाव तेवढे नवे आहे. १८ व्या शतकात औद्योगिक क्रांतीनंतर युरोपियन देशांत (इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, पोर्तुगाल, डेन्मार्क इ.) परिवर्तनाची प्रक्रिया सुरू झाली. या युरोपियन देशांती आशिया-आफ्रिका खंडात आपल्या वसाहती स्थापन केल्या होत्या. या वसाहतींनी युरोपियन राज्यकर्त्यां देशातील परिवर्तनाचे अनुकरण करणे सुरू केले. या अनुकरणातून जे बदल होऊ लागले त्याला प्रथम युरोपिकरण, नंतर पाश्चिमात्यीकरण व आता आधुनिकीकरण असे नवे नाव देण्यात आले आहे. थोडक्यात आधुनिकीकरण हे परिवर्तनाच्या जुन्याच प्रक्रियेसाठी वापरले जाणारे नवीन नाव आहे.

**३) औद्योगिकीकरणापेक्षा वेगळी :** आधुनिकीकरण ही औद्योगिकीकरणाहून वेगळी अशी प्रक्रिया आहे. समाजाचे औद्योगिकीकरण होणे म्हणजेच समाजात मोठमोठे उद्योगधंदे उभारले जाणे ही गोष्ट आधुनिकीकरणासाठी आवश्यक आहेच. मात्र केवळ औद्योगिकीकरण होणे म्हणजे आधुनिकीकरण होणे नव्हे. औद्योगिकीकरणाबरोबरच समाजातील संघटना, संस्था, सामाजिक संबंध श्रद्धा व मूल्ये, स्तरीकरण व्यवस्था वर्तनप्रकार इत्यादीतही बदल झाले तरच त्या बदलांना आधुनिकीकरण म्हटले जाते.

**४) आर्थिक विकास :** अविकसित देशांचे आधुनिकीकरण होण्यासाठी त्यांचा आर्थिक विकास होणे अगत्याचे मानले जाते. हे देश आपला आर्थिक विकास घडून आणण्याचे प्रयत्न करू लागले व त्यातून या देशांचे आधुनिकीकरण होण्यास सुरुवात झाली. त्यामुळे या देशांच्या संदर्भात आधुनिकीकरण व आर्थिक विकास यांचा घनिष्ट संबंध आहे. अर्थात हे देश शेतीप्रधान असल्याने त्यांच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत म्हणजेच आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत केवळ मोठे उद्योग सुरू होणे पुरेसे नाही तर त्यांच्या शेती क्षेत्राचाही विकास होणे आवश्यक ठरते. शेती विकासासाठी वीज, पाणी, खते, शेती अवजारे, जलसिंचन, वाहतूक, बाजारपेठा अशा पायाभूत सुविधा निर्माण होणे आवश्यक असते. त्यामुळे शेती विकासासाठी प्रयत्न करताना आधुनिकीकरण घडून येण्यास चालना मिळते असे शेतीप्रधान देशांच्या बाबतीत घडताना दिसते. म्हणून आर्थिक विकासातून आधुनिकीकरण घडण्यास चालना मिळते असे म्हणता येते.

५) **प्राथमिक व दुय्यम आधुनिकीकरण :** सर्वच देशात आधुनिकीकरण सुरू असले तरी त्याचे स्वरूप सर्वत्र सारखे नाही. विकसित युरोपियन देशात जे प्रथम आधुनिकीकरण सुरू झाले त्यास प्राथमिक आधुनिकीकरण म्हणतात. या देशांनी स्वप्रयत्नाने आपले आधुनिकीकरण घडवून आणले. त्यासाठी त्यांच्यापुढे अनुकरणासाठी कोणाचाही आदर्श नव्हता. त्यांचे आधुनिकीकरण हे नियोजनबद्ध नव्हते. मात्र अविकसित देशांनी युरोपियन देशांच्याप्रमाणे आपले आधुनिकीकरण घडवून आणण्यास सुरुवात केली. म्हणजेच त्यांनी इतरांचे पाहून आपले आधुनिकीकरण घडवून आणले. इतरांचे अनुकरण केले. अनुकरणासाठी त्यांच्यापुढे युरोपियन देशांचा आदर्श होता. त्यामुळे अविकसित देशातील आधुनिकीकरण हे दुय्यम आधुनिकीकरण ठरते. दुसऱ्या महायुद्धानंतर अविकसित देशांनी अमेरिकेचेही अनुकरण करून आपले आधुनिकीकरण करण्यास सुरुवात केली. कांहीनी सोव्हिएत रशियाचे अनुकरण करणे सुरू केले होते. कांही देशांनी एकाच वेळी एकापेक्षा जास्त देशांचे अनुकरण करून आपले आधुनिकीकरण घडवून आणणे सुरू केले. त्यामुळे आधुनिकीकरणाचे स्वरूप वेगवेगळ्या देशांत कांहीसे वेगवेगळे असल्याचे आढळते.

६) **विवेकी व इष्ट परिवर्तन :** आधुनिकीकरणात अविकसित देश विकसित देशाचे अनुकरण करतात. पण हे अनुकरण आंधळे नसून विवेकावर/वैज्ञानिक व तर्कशुद्ध दृष्टिकोनावर आधारलेले असते. तसेच हे अनुकरण इष्ट वा चांगले असेच असते. अविवेकी व अनिष्ट बाबींचे केलेले अनुकरण हे आधुनिकीकरण मानले जात नाही. म्हणून आधुनिकीकरण ही विवेकी व इष्ट परिवर्तन घडवून आणणारी प्रक्रिया ठरते.

७) **विविध पैलू :** आधुनिकीकरणास अर्थिक राजकीय, सामाजिक, मानसिक असे विविध पैलू आहेत. म्हणजे आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत या विविध पैलूत (क्षेत्रात) चांगले बदल घडून येतात. उदा. **आर्थिक** क्षेत्रात सुक्ष्म श्रमविभाजन, विशेषीकरण, मुद्राप्रधान विनिमय, यंत्राचा व तंत्रांचा वापर, व्यावसायिक गतिशीलता अशा गोष्टींना वाव मिळतो. **राजकीय** क्षेत्रात लोकशाही, धर्मनिरपेक्ष व कल्याणकारी राज्य प्रस्थापित होते. **सामाजिक** क्षेत्रात वर्गव्यवस्था, सामाजिक समता, नगरांची वाढ, संघटना व मंडळांची स्थापना, सहिष्णूवृत्तीची वाढ, शैक्षणिक प्रगती, चांगले आरोग्य इत्यादी गोष्टींना प्राधान्य मिळते. **मानसिक** क्षेत्रात वैज्ञानिक वृत्ती, प्रयत्नवाद, परिवर्तनशिलता, मानवतावादी व उदारमतवादी विचारांचा स्वीकार, अनिष्ट रूढीपरंपरांचा त्याग इ. गोष्टींचा स्वीकार लोक करतात. थोडक्यात आधुनिकीकरणात जीवनाच्या विविध पैलूत/क्षेत्रात अपेक्षित असे इष्ट बदल घडून येतात.

**भारतातील आधुनिकीकरण व त्याचा प्रभाव :**

भारतात आधुनिकीकरणाची सुरुवात ब्रिटिश राजवटीत झाली. ब्रिटिशांना भारतात इंग्रजी शिक्षण, उद्योगधंदे, रेल्वे, मोटार, पोस्ट, तारायंत्र, नवीन कायदे, न्यायालये, पोलिस यंत्रणा, इत्यादी नवनवीन सोयीसुविधा सुरू केल्या. या गोष्टींचा प्रभाव पडून परंपरागत भारतीय समाजात बदल होण्यास मोठी चालना मिळाली. इंग्रजी शिक्षण घेतलेल्या भारतीयांना अनिष्ट प्रथापरंपरा नष्ट करण्यासाठी धार्मिक व सामाजिक चळवळी सुरू केल्या. सुशिक्षितांनी राष्ट्रीय सभा (काँग्रेस) ही संघटना स्थापन करून ब्रिटिशांकडे प्रथम राजकीय सुधारणा व पुढे स्वराज्याची मागणी केली. यातूनच लोकशाही व्यवस्था, धर्मनिरपेक्ष व कल्याणकारी राज्य, आर्थिक विकास, समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, न्याय इत्यादींची ओळख भारतीयांना झाली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने राज्यघटनेची निर्मिती करून या सर्व गोष्टींचा स्वीकार केला. पंचवार्षिक योजनांद्वारे आर्थिक विकासास चालना दिली. लोकांना अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य, वीज, दळणवळण अशा सोयीसुविधा पुरविण्यासाठी जोरदार प्रयत्न सुरू केले. परिणामी, जीवनमानाचा दर्जा हळूहळू उंचावू लागला. दुर्बल घटकांच्या विकासासाठी समाजकल्याण कार्यक्रमही सुरू केले. या सर्व घटकांचा

प्रभाव पडून भारतात आधुनिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. या प्रक्रियेचा भारतीय समाजावर पुढीलप्रमाणे प्रभाव पडला आहे.

**अ) आर्थिक क्षेत्रावरील प्रभाव :**

आधुनिकीकरणाचा भारताच्या आर्थिक क्षेत्रावर मोठा प्रभाव पडला आहे. यातून पुढील बदल घडून आले आहेत.

- औद्योगिकीकरणास व यांत्रिकीकरणास चालना मिळाली आहे.
- कृषी विकासासाठी प्रगत उत्पादन तंत्र (रासायनिक खते, संकरित बियाणे, जलसिंचन सुविधा, जंतुनाशके, प्रगत शेती अवजारे इ.) वापरले जाऊ लागले आहे.
- जातीऐवजी गुणकौशल्यावर आधारलेले श्रमविभाजन रूढ होऊन बलुता पद्धती बंद पडली आहे.
- बाजारपेठा, बँका, वित्तसंस्था, सहकारी संस्था, पैशाचा वापर इत्यादींचा स्वीकार होऊन वस्तुविनिमय पद्धतीचा ऱ्हास झाला आहे.
- औद्योगिक व कृषी क्षेत्रात कामगारांच्या संघटना स्थापन झाल्या आहेत. तसेच विविध व्यावसायिक संघटनाही स्थापन झालेल्या आहेत.
- भारतीयांच्या राहणीमानाचा दर्जा हळूहळू उंचावत चालला आहे.

**ब) राजकीय क्षेत्रातील प्रभाव :**

आधुनिकीकरणाचा राजकीय जीवनावर प्रभाव पडून पुढील बदल घडून आले आहेत.

- राज्यघटनेनुसार राज्यकारभार सुरू झाला आहे. भारताचे सार्वभौम लोकशाही, प्रजासत्ताक राज्य निर्माण करण्याचे प्रयत्न यशस्वी झाले आहेत.
- भारतात धर्मनिरपेक्ष व कल्याणकारी राज्यव्यवस्था स्थापन करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.
- स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या मुल्यांचा स्वीकार केलेला असून ही मूल्ये वंश, धर्म, जात, प्रांत, भाषा, लिंग इत्यादींचा विचार न करता सर्वांना उपभोगण्यास मिळावित असे प्रयत्न केले जात आहेत.
- सर्व नागरिकांना मूलभूत हक्क बहाल केले आहेत.
- निवडणूका, प्रौढमताधिकार, लोकशाहीचे विकेंद्रीकरण, पंचायत राज्यव्यवस्था इत्यादीद्वारे लोकांचा राजकीय सहभाग वाढत चालला आहे. लोकात राजकीय जागृती वाढत आहे.
- स्पर्धा परीक्षांद्वारे प्रशासनात नोकर भरती केली जात आहे.
- राष्ट्रीय ऐक्य व एकात्मता निर्मितीचे प्रयत्न केले जात आहेत.

**क) सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रावरील प्रभाव :**

- जातीभेद, लिंगभेद, अस्पृश्यतापालन, इत्यादींचे कायद्याने उच्चाटन करून सामाजिक समता प्रस्थापित करण्याचे प्रयत्न होत आहे.

- अर्पित दर्जाऐवजी अर्जित दर्जास महत्त्व आले आहे. त्यामुळे सामाजिक गतिशीलता वाढत आहे. जातीव्यवस्थेची जागा वर्गव्यवस्था घेत आहे.
- नागरीकरणाची गती वाढत असून शहरी लोकसंख्या वाढत चालली आहे.
- अनिष्ट सामाजिक रुढीपरंपरांचा व अंधश्रद्धांचा प्रभाव कमी होत चालला आहे.
- सामाजिक संस्थांमध्ये (कुटुंब, विवाह, शिक्षण, धर्म, राज्य, अर्थ) बधल होत असून त्यांचे पारंपरिक स्वरूप इतिहासजमा होऊ लागले आहे. त्या अधिक संकीर्ण बनत आहेत.
- ऐच्छिक मंडळे, संस्था, संघटना इत्यादीचे प्रमाण वाढत असून औपचारिक सामाजिक संबंधाचा प्रभाव वाढत आहे.
- शिक्षण, आरोग्य, दळणवळण, मनोरंजन इत्यादी बाबतच्या प्रगत सोयीसुविधांची वाढ व विस्तार होत आहे.

**ड) मानसिक क्षेत्रावरील प्रभाव :**

- लोकांची परंपरागत, सनातनी, प्रतिगामी प्रवृत्ती कमी होत आहे.
- रुढी, परंपरा, अंधश्रद्धा, कर्मकांड इत्यादींचा लोकांच्या मनावरील प्रभाव कमी होत आहे.
- बुद्धिवाद, विज्ञानवाद, मानवतावाद, उदारमतवाद इ. विचारसरणींचा प्रभाव वाढत आहे.
- दैववादी वृत्तीच्या जागी प्रयत्नवादास प्राधान्य मिळत आहे.
- विकास, प्रगती, परिवर्तन इत्यादींचा स्वीकार करण्याची मनोवृत्ती विकसित होत आहे.
- आपले प्रश्न सोडविण्यासाठी संघटीतपणे प्रयत्न करण्याची गरज आहे हे लोकांना समजू लागले आहे. त्यामुळे संघटन करण्याची प्रवृत्ती वाढत आहे.
- समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय, मानवता इ. मूल्यांचा लोक हळूहळू स्वीकार करू लागले आहेत.

**मंदीगती :** आधुनिकीकरणाचा प्रभाव पडून वरीलप्रमाणे भारतात परिवर्तन होत असले तरी या परिवर्तनाची गती म्हणजेच आधुनिकीकरणाची गती अद्याप बरीचसी मंद आहे. कारण –

- आजही सुमारे ६०% भारतीय लोक निर्वाहासाठी शेतीवर अवलंबून असून बहुसंख्य शेतकरी परंपरागत तंत्रानेच शेती करतात.
- औद्योगिक क्षेत्रात संघटन वाढले असले तरी शेती क्षेत्र अद्यापही बरेचसे असंघटीत आहे. त्यामुळे शेतीक्षेत्रातील लोकांच्या समस्या अद्याप सुटलेल्या नाहीत.
- जातीभेद व लिंगभेद कायद्याने नष्ट केला असला तरी व्यवहारात तो अद्यापही टिकून आहे. दलित, आदिवासी, स्त्रिया यांच्यावरील अन्याय अत्याचार थांबलेले नाहीत.
- राज्यघटनेने येथील राजकीय, शैक्षणिक व इतर व्यवस्थांना धर्मनिरपेक्ष बनविलेले आहे. तथापि, या व्यवस्थेत काम करणारे असंख्य भारतीय अद्यापही जातीधर्माच्या प्रभावाखाली वावरत आहेत.
- भारतीय लोक मानसिकदृष्ट्या आधुनिक झालेत काय या प्रश्नाचे उत्तर आजही नकारार्थीच द्यावे लागते. कारण असंख्य लोक (त्यामध्ये उच्च शिक्षितही आहेत) परंपरागत व कालबाह्य रूढी, मूल्ये,

श्रद्धा इत्यादींना चिकटून आहेत. बरेच लोक उच्च शिक्षित आहेत पण ते सुशिक्षीत व सुसंस्कृत आहेत असे म्हणावेसे वाटत नाही.

थोडक्यात, पाश्चात्यांच्या तुलनेत भारतीय समाजात आधुनिकीकरणाची गती मंदच आहे.

**४.३.२ भारतातील परंपरा आणि आधुनिकता** (Tradition and Modernity in India) :

आधुनिकीकरणाचा भारतीय समाजावरील प्रभाव अभ्यासल्यानंतर आता तुम्ही भारतातील परंपरा व आधुनिकता या दोन संकल्पनांचा भारतातील परिवर्तनाच्या संदर्भात अभ्यास करणार आहात. त्यासाठी प्रथम या दोन संकल्पनांचा अर्थ व स्वरूप थोडक्यात समजावून घेऊ या.

**परंपरा : अर्थ व स्वरूप** (Tradition : Meaning and Nature)

परंपरा अर्थ समजण्यासाठी तिच्या कांही व्याख्या अभ्यासू या.

**१) चंद्रकांत खंडागळे :** ऐतिहासिकदृष्ट्या आकारास आलेल्या व सामाजिक वारसा म्हणून पिढ्यानपिढ्या हस्तांतरीत होणाऱ्या आचारविचारांच्या मार्गांचे संकलित रूप म्हणजे परंपरा होय.

**२) विल्यम स्कॉट :** समाजीकरणाच्या प्रक्रियेद्वारा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरीत होत आलेली सामाजिक रूढी म्हणजे परंपरा होय. परंपरा या एखाद्या सामाजिक समूहाच्या श्रद्धा, मूल्ये आणि विचार करण्याचे मार्ग यांचे प्रतिनिधित्व करतात.

**३) डॉ. अरुण पौडमल :** यांचे मते, ''एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे, आचारविचारांचे होणारे हस्तांतरण म्हणजे 'परंपरा' होय.''

**परंपरांच्या स्वरूपाविषयी पुढील मुद्दे मांडता येतात.**

- परंपरा या कोणत्याही समाजाच्या इतिहासाची देणगी असतात.
- परंपरा या समाजाच्या आजपर्यंतच्या अनुभवाचे प्रतिक असतात.
- परंपरा समाजातील आचार व विचारांचे संकलित रूप असतात.
- परंपरा अमूर्त वा अभौतिक असतात. कारण त्यामध्ये समाजातील रूढी, श्रद्धा, मूल्ये, नियमने, वर्तनप्रकार इ. अमूर्त बाबी समाविष्ट असतात.
- परंपरांना लोक पवित्र मानतात. त्यामुळे त्यांचे ते निष्ठेने पालन करतात. लोकांना परंपरा प्रिय वाटतात.
- परंपरा समाजात एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सातत्याने हस्तांतरीत होत असतात. त्यामुळे त्या सामाजिक वारसा ठरतात.
- लोकांना परंपरा प्रिय वाटत असल्याने त्यांच्यात बदल करण्यास बहुसंख्यांकांचा विरोध असतो. त्यामुळे त्यांचे सातत्य टिकून रहाते.

**आधुनिकता : अर्थ व स्वरूप** (Modernity : Meaning and Nature) :

आधुनिकता ही संज्ञा परंपरा या संज्ञेच्या विरुद्ध अर्थाने वापरतात. आधुनिकतेचा अर्थ स्पष्ट करणे कठीण आहे. कारण आधुनिकता, आधुनिकवाद (Modernism) व आधुनिकीकरण या संज्ञा आपण समान

अर्थाने व्यवहारात वापरतो. पण विद्वान त्यांच्या अर्थामध्ये भेद करतात. परंतु या तिन्ही संज्ञांचा भिन्न भिन्न अर्थ स्पष्ट करणे कठीण झालेले आढळते. कारण त्यांच्यातील सीमारेषा पुसट आहेत. विविध समाजशास्त्रज्ञांनी आधुनिकतेचा अर्थ विविध प्रकारे स्पष्ट केलेला आहे. उदा. **दुरखिमच्या** मते आधुनिकता म्हणजे समाजात विभेदीकरण व स्तरीकरण उदयास येणे होय. **मॅक्स वेबरच्या** मते बुद्धिप्रामाण्यवाद किंवा तार्किकता म्हणजे आधुनिकता होय. **जॉर्ज सिमेलच्या** मते नागरी जीवनपद्धती व मुद्रा अर्थव्यवस्था म्हणजे आधुनिकता होय. **कार्ल मार्क्सने** वस्तुकरण होणे म्हणजे आधुनिकता असे म्हटले आहे. ही सर्व मते विचारात घेता आधुनिकतेचा सर्वमान्य होईल असा अर्थ सांगणे किती कठीण आहे हे लक्षात येते. तथापि, अभ्यासकांनी दिलेल्या पुढील व्याख्या लक्षात घेऊ या.

**१) अन्थोनी गिडन्स :** आधुनिकता म्हणजे सरंजामोत्तर काळात युरोपमधील संस्था व वर्तनप्रकार यांच्यात झालेले बदल होय.

**२) चंद्रकांत खंडागळे :** बुद्धिप्रामाण्यवादी, अदुभववादी व इहवादी विचारसरणी आणि वैज्ञानिक व तांत्रिक प्रगती यामुळे आचार विचारात घडून येणारे इष्ट परिवर्तन म्हणजे आधुनिकता होय.

आधुनिकतेच्या स्वरूपासंबंधी पुढील मुद्दे मांडता येतात.

- प्रबोधनकाळात युरोपमध्ये घडून आलेल्या परिवर्तनासाठी आधुनिकता ही संज्ञा वापरली जाते.
- परिवर्तन बुद्धिप्रामाण्यवाद, अनुभववाद, इहवाद, विज्ञान व तंत्रज्ञान यांच्या प्रभावामुळे होते.
- आधुनिकतेत नवीन आचारविचार उदयास येतात व त्यांचा स्वीकार करणे इष्ट मानले जाते.
- आधुनिकता ही नवीन नैतिक व सामाजिक मुल्यांना प्राधान्य देते व कोणत्याही गोष्टींची इष्टानिष्टता या मुल्यांच्या आधारेच ठरविते.
- आधुनिकता ही नाविन्याचा स्वीकार करण्यास प्राधान्य देते. त्यामुळे समाजात वेगाने परिवर्तन होण्यास चालना मिळते.

**परंपरा आणि आधुनिकता यांच्यातील भेद :**

वरील विवेचनाधारे परंपरा व आधुनिकता यांच्यात पुढीलप्रमाणे भेद (फरक) दाखविता येतात.

१) परंपरा स्थितीशिलतेचा तर आधुनिकता गतिशीलतेचा पुरस्कार करते. म्हणजे परंपरा परिवर्तविरोधी तर आधुनिकता परिवर्तनानुकल आहे. म्हणून परंपरा मंद गतीने तर आधुनिकता जलद गतीने बदलते.

२) परंपरेत प्राचीनकाळापासून चालत आलेल्या आचारविचारांचा तर आधुनिकतेत नव्याने उदयास आलेल्या आचारविचारांचा समावेश होतो. त्यामुळे परंपरा जुनी तर आधुनिकता नवी बाब ठरते.

३) आजची परंपरा ही कालची आधुनिकता असते तर आजची आधुनिकता ही उद्याची परंपरा ठरू शकते.

४) परंपरांचे पालन हे अनुचलनात्मक वर्तन तर आधुनिकतेचा स्वीकार हे किमान सुरुवातीस तरी विचलनात्मक (बंडखोरी) वर्तन मानले जाते. मात्र आधुनिकतेचा स्वीकार जेंव्हा सार्वत्रिक स्वरूपात होतो किंवा ती अनुचलनात्मक वर्तन ठरते.

५) कांही लोकांना आपल्या परंपरांचा अभिमान वाटतो व म्हणून ते आधुनिकतेस नाक मुरडतात. याउलट नाविन्याची आवड असणारे लोक परंपरांना मागासलेपणाचे/प्रतिगामीपणाचे व आधुनिकतेला प्रगतीचे/पुरोगामीपणाचे लक्षण मानतात.

वरीलप्रमाणे परंपरा व आधुनिकता यांच्यात भेद असले तरी कोणत्याही समाजात त्यांचे सहास्तित्त्व आढळते. कारण कांही लोक परंपराप्रिय तर कांही आधुनिकता प्रिय असतात. कांही लोक प्रसंगानुरूप कधी परंपरा पाळतात तर कधी आधुनिकता स्वीकारतात. त्यामुळे कोणताही समाज पूर्णतः ना परंपरागत असतो ना आधुनिक असतो. तर तो कमिजास्त प्रमाणात संमिश्रच असतो.

**भारतातील परंपरा व आधुनिकता :**

परंपरा व आधुनिकता या दोन संकल्पनांचा अर्थ, स्वरूप व त्यांच्यातील भेद अभ्यासल्यानंतर आता तुम्ही भारतीय समाजाच्या संदर्भात या दोन्हींचा विचार करणार आहात. भारतीय समाज प्राचीन असून त्याला सुमारे पाच हजार वर्षांचा इतिहास आहे. या प्रदीर्घ कालखंडात या समाजात वेगवेगळ्या वेळी वेगवेगळ्या वंशाच्या, धर्माच्या, भाषेच्या, प्रदेशाच्या, जीवनपद्धतीच्या समूहांचे आगमन झाले व हे सर्व समूह परस्परात मिसळून गेले. परिणामी, हा समाज खूपच संमिश्र/विजातिय स्वरूपाचा बनला. अशा या समाजात विभिन्न क्षेत्रात विभिन्न परंपरा उदयास येऊन त्या पिढ्यानपिढ्या संक्रमीत होत आल्या आहेत. भारतीय लोक परंपराप्रिय असून ते मोठ्या निष्ठेने आपापल्या परंपरा पाळत आलेले आहेत.

अशा या परंपराप्रिय समाजात ब्रिटिश राजवटीत आधुनिकतेचा प्रवेश झाला. पोर्तुगीज, डाच, फ्रेंच, इंग्रज हे युरोपियन लोक भारतात आले. व्यापार, राज्यकारभार इत्यादीच्या निमित्ताने ते भारतात स्थिरावले. त्यामुळे भारतीय लोकांना त्यांच्या संपर्काने आधुनिक आचारविचारांची ओळख झाली. इंग्रजी शिक्षण घेतलेल्या सुशिक्षित भारतीयांनी हळूहळू आधुनिकतेचा स्वीकार करणे सुरू केले. ब्रिटिश राजवटीत भारतात औद्योगिकीकरण, नागरीकरण, वाहतुकीची व संप्रेषणाची प्रगत साधने, पाश्चिमात्त्य शिक्षण, लोकशाही मूल्ये (स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय इ.), मुद्राप्रधान अर्थव्यवस्था, औपचारिक कायदे, पोलीस, न्यायालय, बँका, इत्यादी आधुनिक गोष्टी हळूहळू विस्तारत गेल्या व यातूनच आधुनिक युग भारतात अवतरले. स्वातंत्र्यानंतर भारताने आर्थिक-सामाजिक विकासाचे नियोजनबद्ध प्रयत्न सुरू केले. आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक अशा सर्व क्षेत्रात आधुनिकतेची कास धरण्यात आली. परिणामी, आधुनिकतेचा प्रसार होण्यास मोठी चालना मिळाली. याचा परिणाम म्हणून अनेक परंपरांवर आघात होऊन त्यांचे पालन हळूहळू मागे पडू लागले. १९९१ नंतर भारताने जागतिकीकरण स्वीकारल्याने भारत जागतिक आर्थिक-सामाजिक व्यवस्थेशी जोडला आहे व यामुळे तर आधुनिकतेची व्याप्ती आणखीनच वाढत चालली आहे.

असे असले तरी, भारतीय समाजातून परंपरांचा ऱ्हास होऊन तो पूर्णतः आधुनिक बनला आहे असे मात्र नाही. मागे म्हटल्याप्रमाणे आज भारतातही परंपरा व आधुनिकतेचा स्वीकार करतानाच परंपराही मोठ्या आस्थेने पाळणारे असंख्य भारतीय आजही दिसून येतात. परंपा व आधुनिकतेचे अजब मिश्रण भारतात आढळते. हे मिश्रण पुढील मुद्यांच्या आधारे समजावून घेऊ या.

**१) उत्पादन क्षेत्र :** भारतात आधुनिक उद्योगधंदे उभारले असून सर्वच आवश्यक वस्तू व सेवांचे उत्पादन अजैविक शक्तीद्वारे चालणाऱ्या यंत्रतंत्राद्वारे होत आहे. तथापि, आदिम व ग्रामीण क्षेत्रात आजही अनेक लोक परंपरागत तंत्राने हस्तव्यवसाय व कुटिरोद्योग करीत आहेत. मुठभर बडे बागाईतदार शेतीत

आधुनिक उत्पादन तंत्र वापरून नगदी पिकांचे उत्पादन घेत आहेत तर अल्पभूधारक शेतकरी परंपरागत तंत्राने कोरडवाहू शेती करीत आहेत.

२) **नागरीकरण :** आधुनिक काळात भारतात नागरीकरणाची गती वाढत चालली आहे. नगरे व नागरी लोकसंख्या वाढत आहे. तथापि, आजही सुमारे ६०% लोकसंख्या ग्रामीण क्षेत्रात परंपरागत जीवन जगत आहेत. नगरात वीज, पाणी, संप्रेषण, वाहतूक, शिक्षण, आरोग्य, मनोरंजन इत्यादी आधुनिक सुविधांची रेलचल आहे तर ग्रामीण क्षेत्रात असंख्य लोक या सुविधापासून वंचित असून ते परंपरागत पद्धतीने आपल्या मूलभूत गरजा भागवित आहेत.

३) **स्तरीकरण :** ब्रिटिश राजवटीपासून भारतात वर्गव्यवस्थेसारखी मुक्त सामाजिक स्तरीकरण हळूहळू प्रस्थापित होत आहे, तरीपण जातिव्यवस्थेसारखे बंदिस्त स्तरीकरण अद्यापही टिकून आहे. शहरात गुणांवर अर्जित आधारीत दर्जाला महत्त्व येत आहे तर ग्रामीण भागात आजही जात, लिंग इत्यादीवर आधारीत परंपरागत अर्पित दर्जा देण्याची पद्धती टिकून आहे. राज्यघटनेने जातीभेद, अस्पृश्यतापालन, लिंगभेद नष्ट करून सामाजिक समतेचा पुरस्कार केला आहे. तथापि, व्यवहारात आजही जातीभेद व स्त्रीपुरुष भेद टिकून आहे. आंतरजातीय आंतरधर्मिय विवाह कायदेशीर ठरविले आहेत. तथापि, आपल्याच जातीधर्मात विवाह करण्याची परंपरा बहुसंख्य लोक पाळताना आढळतात. स्त्रीपुरुषांना समान मानून स्त्री सक्षमीकरणाच्या अनेक योजना राबविल्या जात अहेत तर दुसऱ्या बाजूने स्त्रियावरील अन्याय अत्याचार वाढत आहे. स्त्रीने अर्थाजनासाठी नोकरी करणे योग्य मानले जात असले तरी तिला पगार कमावूनही आर्थिक स्वावलंब आलेले नाही. थोडक्यात, सामाजिक समता हे आधुनिक मूल्य सर्वजन मान्य करतात मात्र व्यवहारात सामाजिक विषमता, जी आपली परंपरा आहे, ती अद्यापही टिकून आहे.

४) **धार्मिकता/धर्मनिरपेक्षता :** राज्यघटनेने धर्मनिरपेक्षतेच्या आधुनिक तत्त्वाचा पुरस्कार केला आहे. देशाचा कोणताही धर्म नाही. सार्वजनिक जीवनात सर्वांनी धर्मनिरपेक्षपणे वागावे हे आपले घटनात्मक कर्तव्य ठरविले आहे. कांही लोक ते पाळतातही तथापि, बहुसंख्य लोक हे परंपरागत धर्मश्रद्धा व धार्मिक कर्मकांडाच्या प्रभावाखाली आहेत. भारतीयांना आधुनिक वैज्ञानिक-तांत्रिक शिक्षण मिळत आहे. तथापि, त्यांच्या ठिकाणी वैज्ञानिक वृत्ती अद्याप पुरेसी विकसित झालेली नाही. कारण विज्ञान-तंत्रज्ञानाचे शिक्षण घेतलेले अनेक भारतीय हे धर्माच्या नावाखाली दैववादी, अंधश्रद्धा अशा रूढी-परंपरा पाळताना दिसतात. संगणक व इंटरनेट सारखी आधुनिक यंत्रे व तंत्रे वापरणारी मंडळी ही त्यांचा वापर भविष्य पाहणे, शूभ मुहूर्त पाहणे अशा अंधश्रद्धा गोष्टीसाठी करीत आहेत. आधुनिकता व परंपरांचे हे मोठे चमत्कारीक मिश्रण आहे.

५) **वर्तनप्रकार :** विविध वर्तनप्रकारांच्या संदर्भातही आधुनिकता व परंपरा यांचे मिश्रण आढळते. उदा. नेहमी आधुनिक पाश्चात्त्य पोशाख करणारे स्त्रीपुरुष हे सणसमारंभाच्यावेळी मात्र आवर्जून आपला पारंपारिक भारतीय पोशाख करणे पसंत करताना दिसतात. परंपरेने मद्यपान, धुम्रपान, मांसाहार निषिद्ध मानणारी मंडळी घराबाहेर जाऊन या गोष्टी करणे निषिद्ध मानत नाहीत. विशेषतः पुरुष मंडळी घराबाहेर मद्यपान व मासांहार करतात पण स्त्रियांना मात्र या गोष्टी करण्यास मनाई करतात. अभ्यासक्रमात वैज्ञानिक व तार्किक दृष्टिकोन शिकणारी व शिकवणारी अनेक उच्च शिक्षित मंडळी ही अवैज्ञानिक व अतार्किक परंपरागत वर्तनप्रकार निष्ठेने आचरणात आणताना दिसतात.

६) **परंपरागत व आधुनिक मुल्यांमधील संघर्ष :** भारताात पारंपारिक व आधुनिक मुल्यांमध्ये संघर्ष होताना दिसत आहे. विशेषतः नव्या व जुन्या पिढीत हा संघर्ष होताना दिसत आहे. विशेषतः नव्या व जुन्या पिढीत हा संघर्ष आढळतो. नवी पिढी जातीधर्म निरपेक्ष वागू इच्छिते. मात्र जुनी पिढी जातीधर्माची परंपरा

पाळण्यासाठी नव्या पिढीवर दबाव टाकते. त्यामुळे व्यक्तीवाद व व्यक्तिस्वातंत्र्य या आधुनिक मूल्यांवर समुदायवाद/समष्टीवाद या परंपरागत मुल्यांचा दबाव पडताना दिसतो. यातूनच जातीबाहेर विशेषतः कनिष्ठ जातीतील व्यक्तीशी विवाह केल्यास मुलामुलींची पालकांकडून हत्या होण्याच्या घटना (ऑनर किलिंग) घडताना दिसतात.

**७) वैज्ञानिकता विरुद्ध अवैज्ञानिकता :** भारतात वैज्ञानिक (शास्त्रीय) व अवैज्ञानिक (अशास्त्रीय) विचारसरणी यांच्यातही संघर्ष होताना दिसतो आहे. उदा. एका बाजूने विज्ञान-तंत्रज्ञानाच्या मदतीने कृत्रिम पाऊस पाडण्याचा प्रयोग केला जातो. तर दुसऱ्या बाजूने कांही मंडळी पाऊस पडावा म्हणून यज्ञ, जपतप, मंत्रतंत्र असे परंपरागत अवैज्ञानिक उपायाचा अवलंब करताना दिसतात. आजारपणात आधुनिक वैद्यकीय उपचार घेतले जातातच पण त्याच्या जोडीने आजार बरा व्हावा म्हणून देवदेवतांना नवस बोलणे, पूजाअर्चा व उपासतापास करणे असे अवैज्ञानिक परंपरागत उपायही श्रद्धेने (खरे तर अंधश्रद्धेने) करताना दिसतात.

अशाप्रकारे भारतात परंपरा व आधुनिकता यांचे सहास्तित्व आढळते. अर्थात परंपरागत समाजाचे आधुनिक समाजात रूपांतर होण्याच्या या संक्रमणीय अवस्थेत हे स्वाभाविकच ठरते.

### ४.३.३ जागतिकीकरण : प्रभाव आणि आव्हाने (Globalization : Impact and Challenges) :

भारतातील परंपरा व आधुनिकता अभ्यासल्यानंतर आता आपण जागतिकीकरणाची प्रक्रिया भारताच्या संदर्भात अभ्यासणार आहोत. आज जगभर सुरू असलेल्या आर्थिक पुनर्रचनेच्या किंवा सुधारणांच्या कार्यक्रमातील जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरण या तीन महत्त्वाच्या प्रक्रिया आहेत. **पी. व्ही. नरसिंहराव** सरकारने १९९१ मध्ये नवीन आर्थिक धोरण जाहीर करून जागतिकीकरणाचा स्वीकार केला. या प्रक्रियेचा भारतावर मोठा प्रभाव पडला. तसेच अनेक आव्हानेही निर्माण झाली. हा प्रभाव व आव्हाने अभ्यासताना प्रथम जागतिकीकरणाचा अर्थ व वैशिष्ट्ये समजावून घेऊ या. जागतिकीकरण ही संपूर्ण जगाची एकच बाजारपेठ निर्माण करणारी किंवा जागतिक अर्थव्यवस्था निर्माण करणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे जागतिकीकरण ही मूलतः आर्थिक प्रक्रिया ठरते. तथापि जागतिकीकरणास आर्थिक पैलूंबरोबरच राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, पर्यावरणविषयक असे अनेक पैलू आहेत. म्हणून जागतिकीकरण ही सार्वत्रिक, सर्वस्पर्शी व संकीर्ण अशी प्रक्रिया आहे. त्यामुळे विचारवंतांनी जागतिकीकरणाच्या व्याख्या विविध दृष्टिकोनातून केलेल्या आहेत.

**जागतिकीकरणाच्या व्याख्या :**

**१) दिपक नय्यर :** ''एखाद्या देशाचे आर्थिक व्यवहार त्या देशाच्या भौगोलिक व राजकीय सीमेच्या बाहेर विस्तारित करण्याची प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण होय.'' ही व्याख्या आर्थिक दृष्टिकोनातून केलेली आहे.

**२) डेव्हिड हेल्ड आणि अ‍ॅन्थनी मॅकग्रा :** ''सामाजिक संबंध व व्यवहार यात आमूलाग्र बदल घडवून आणणारी आणि व्यायोगे विविध कार्यांचे, परस्पर संबंधाचे आणि सत्तेचे आंतरखंडीय वा आंतरक्षेत्रीय जाळे निर्माण करणारी प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण होय.'' ही व्याख्या सामाजिक दृष्टिकोनातून केलेली आहे.

**३) बायलिस आणि स्मिथ :** ''जगाच्या वेगवेगळ्या प्रदेशातील लोकांमध्ये वाढत जाणारे आर्थिक, सामाजिक, औद्योगिक, व्यापारी व सांस्कृतिक संबंध दाखविणारी व्यापक प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण होय.'' ही व्याख्या व्यापक दृष्टिकोनातून केलेली आहे.

४) **चंद्रकांत खंडागळे :** ''जगातील विविध लोक, राष्ट्रे किंवा समाज यांच्यामध्ये असलेल्या भौगोलिक व राजकीय सीमांचे उल्लंघन करून त्यांना मुक्तपणे जागतिक स्तरावर आर्थिक, राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक व्यवहार करण्यास वाव देईल अशी एकच व्यवस्था निर्माण करणारी प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण होय.'' ही व्याख्या सर्वसमावेशक स्वरूपाची आहे.

**जागतिकीकरणाची वैशिष्ट्ये :**

वरील व्याख्यांच्या आधारे जागतिकीकरणाची पुढील वैशिष्ट्ये सांगता येतात.

१) **जागतिक अर्थव्यवस्था :** जागतिकीकरण ही जागतिक अर्थव्यवस्था निर्माण करणारी प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत जागतिक व्यापारावरील निर्बंध दूर करून विविध देशांतील भांडवल, तंत्रज्ञान, बाजारपेठा व श्रम या घटकांचे एकीकरण करून विशाल आकार असलेल्या जगाचे प्रत्यक्ष व्यवहार करण्यासाठी एक लहान खेड्यात (Global Village) रूपांतर होणे अभिप्रेत आहे. जागतिकीकरणात देशाची अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडल्याने कोणत्याही देशातील उत्पादित वस्तू जगात कोठेही विक्रीसाठी उपलब्ध होत आहे. त्यामुळे संपूर्ण जगासाठी एकच बाजारपेठ तयार होऊन हे जणू एक बाजारसमूह (Shopping Complex) बनला आहे.

२) **सामाजिक प्रक्रिया :** साधारणपणे जागतिकीकरण ही आर्थिक प्रक्रिया ठरते. जॉर्ज मॉडेलस्कीच्या मते, ''जागतिकीकरण ही जगातील विविध समाजांना एका जागतिक व्यवस्थेत आणणारी प्रक्रिया आहे.'' खुला किंवा मुक्त जागतिक व्यापार, जलदगतीची वाहतूक व दळणवळणाची साधने, उपग्रहीय संदेशवहन, माहिती व तंत्रज्ञानातील प्रगती इत्यादी घटकांमुळे जगातील विविध समाजात पूर्वीपेक्षा कितीतरी अधिक पटीने परस्परसंबंध व परस्परावलंबन वाढले आहे. एका समाजात घडलेल्या घटनेचे परिणाम संपूर्ण जगावर होत आहेत. एका समाजात उद्भवलेली समस्या सर्व जगाची समस्या वाढू लागली आहे. व्यापार, उद्योग, नोकरी, पर्यटन, इ. निमित्ताने लोकांना जगात कोठेही स्थलांतर करणे शक्य झाले आहे. स्थळकाळाचे अंतर कमी होऊन 'विश्वची माझे घर' हा दृष्टिकोन प्रत्यक्षात साकारत आहे. मोलकम वाटर्स म्हणतात त्याप्रमाणे जागतिकीकरणात विविध सामाजिक-सांस्कृतिक व्यवस्थेवरील भौगोलिक प्रभाव दूर होऊन भौगोलिक सीमा अनावश्यक आहेत असे लोकांना वाटू लागले आहे.

३) **उदारीकरण व खाजगीकरण :** या दोन प्रक्रिया जागतिकीकरणासी संलग्न अशा प्रक्रिया आहेत. जागतिकीकरणात सामील होणाऱ्या राष्ट्रांना आर्थिक उदारीकरणाचे व खाजगीकरणाचे धोरण राबविणे भाग पडते. **चंद्रकांत खंडागळे** यांच्या मते, उत्पादन, वितरण, विनिमय, उपभोग, गुंतवणूक, श्रमपुरवठा इ. आर्थिक प्रक्रियांवर असलेले अनावश्यक निर्बंध, नियंत्रणे व नियमने शिथील वा कमी करणे म्हणजे उदारीकरण होय. **एम. रामनजनेयुल** यांच्या मते गुंतवणूक, आयात व उत्पादन यावरील अनावश्यक निर्बंध, नियंत्रणे व परवाने मोडीत काढणे म्हणजे आर्थिक उदारीकरण होय. जागतिकीकरणात असे उदारीकरण करावे लागते. चंद्रकांत खंडागळे यांच्या मते खाजगीकरण म्हणजे सार्वजनिक उद्योगाची मालकी खाजगी क्षेत्राकडे किंवा त्याच उद्योगातील कर्मचाऱ्यांकडे देणे किंवा तो उद्योग भाड्याने खाजगी क्षेत्रास चालविण्यास देणे होय. **डी. आर. पेंडसे** म्हणतात की, देशाच्या आर्थिक क्रियातील सरकारचा वा सार्वजनिक क्षेत्राचा सहभाग कमी करण्याची प्रक्रिया म्हणजे खाजगीकरण होय. जागतिकीकरणाची प्रक्रिया ही या दोन प्रक्रियांच्याद्वारे गतिमान होते.

४) **विविध माध्यमे :** जागतिकीकरणाच्या प्रक्रियेस विविध माध्यमांद्वारे चालना दिली जात आहे. जागतिकीकरणास चालना देण्याचे काम ज्या संस्था व संघटना करीत आहेत त्यांना जागतिकीकरणाची माध्यमे (agencies) असे म्हणतात. त्यापैकी कांही प्रमुख माध्यमे पुढीलप्रमाणे आहेत.

अ) **आंतरराष्ट्रीय वित्त संस्था :** उदा. आंतरराष्ट्रीय नाणे निधी व जागतिक बँक (IMF and WB)

ब) **बिगरशासकीय संघटना :** (Multi-National Corporations) उदा. युनिलिव्हर, पाँड्स, पेप्सिको, ॲमेझॉन, फिलिप्स इ.

क) **बिगरशासकीय संघटना** (Non-Government organition) : उदा. रेडक्रॉस, अम्नेस्टी इंटरनॅशनल, मानवी हक्क आयोग, स्काऊट्स अँड गाईड्स.

ड) **संप्रेषण साधने** (Mass Media) : उदा. नियतकालिके, रेडिओ, टेलिव्हिजन, चित्रपट, संगणक व इंटरनेट इ.

ई) **बाजारपेठा आणि विविध राष्ट्र–राज्ये** (Markets and Nation-States) : वरील विविध माध्यमांच्याद्वारे जागतिकीकरणास चालना मिळते आहे.

५) **राजकीय सत्तेवर मर्यादा :** जागतिकीकरणात राष्ट्राच्या राजकीय सत्तेवर अनेक मर्यादा आल्या आहेत. जगात उदयास आलेल्या विविध आंतरराष्ट्रीय संघटनेत व करारात सहभागी होणे व त्या संघटनेच्या नियमांचे व करारांचे पालन करणे प्रत्येक राष्ट्रास भाग पडत आहे. आपले आर्थिक व राजकीय धोरण ठरविताना वा संघटनांचा, करारांचा व इतर राष्ट्रांचा विचार प्रत्येक राष्ट्रास करावा लागत आहे. गंभीर समस्या सोडविणे कोणत्याही एका राष्ट्रास शक्य नाही. त्याला इतर राष्ट्रांची मदत घ्यावीच लागत आहे. त्यामुळे तत्त्वतः प्रत्येक राष्ट्र सार्वभौम असले तरी व्यवहारात त्याची सत्ता मर्यादित होत चालली आहे. म्हणूनच डॅनियल बेल म्हणतात जागतिकीकरणात राष्ट्रराज्याची संकल्पना मोडीत निघाली आहे.

६) **व्यक्तीस महत्त्व :** जागतिकीकरणात व्यक्तीचे महत्त्व वाढत चालले आहे. व्यापार, उद्योग, नोकरी, शिक्षण इत्यादीसाठी व्यक्ती जगात कोठेही जाऊ शकते. राज्यदेखील व्यक्तीला त्यासाठी प्रोत्साहन व मदत देत आहे. राज्य उच्च गुणवत्तेच्या परकीय व्यक्तीला आपल्या समाजात आमंत्रित करीत आहे. काही राज्यांनी तर दुहेरी नागरिकत्व देणे सुरू केले आहे. याचाच अर्थ असा की पूर्वी व्यक्तीचा विचार एखाद्या देशाचा नागरिक म्हणून होई. आता संपूर्ण मानवजात यासंदर्भात व्यक्तीचा विचार होऊ लागला आहे. त्यामुळे व्यक्ती अधिक गतिशील (Mobile) व जागतिक (Global) होत आहे.

७) **सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया :** जागतिकीकरण ही मानवसमाजात (जगात) आमूलाग्र परिवर्तन घडवून आणणारी प्रक्रिया आहे. जागतिकीकरणात उद्योग, व्यापार, वित्तपुरवठा, तंत्रज्ञान, दळणवळण, स्थलांतर, राहणीमान, शासन व्यवस्था, समाजव्यवस्था, संस्कृती पर्यावरण अशा सर्वच क्षेत्रात रूपांतरण घडून येत आहे.

विकसित राष्ट्रांचे प्रभुत्व : जागतिकीकरणात सर्व जगासाठी एकच किंवा सामाईक अर्थव्यवस्था, सामाजिक सांस्कृतिक व्यवस्था निर्माण होत आहे. तथापि यामध्ये सर्व राष्ट्रांचा समान सहभाग आढळत नाही. जागतिकीकरणात विकसित राष्ट्रांचे (उदा. अमेरिका, युरोपियन देश इ.) प्रभुत्व आढळते. विकसित राष्ट्रे आपली अर्थव्यवस्था, धोरणे व संस्कृती विकसनशील राष्ट्रांवर लादत आहेत. यालाच काही विद्वान नवीन वसाहतवाद असे म्हणतात.

**जागतिकीकरणाचा भारतीय समाजावरील प्रभाव व आव्हाने**

जागतिकीकरण ही सामाजिक परिवर्तन घडवून आणणारी प्रक्रिया असून तिचा भारतीय समाजावर इष्ट व अनिष्ट प्रभाव पडला आहे. तसेच त्यामुळे भारतासमोर कांही आव्हाने निर्माण झालेली आहेत. या ठिकाणी आपण प्रथम इष्ट प्रभाव समजावून घेऊ व त्यानंतर अनिष्ट प्रभाव व त्यातून उद्‌भवलेली आव्हाने समजावून घेऊ.

**इष्ट प्रभाव :**

१) **औद्योगिकीकरणास चालना :** जागतिकीकरणामुळे भारतात औद्योगिकीकरणास मोठी चालना मिळाली आहे. कारण या प्रक्रियेत नवीन उद्योग उभारणे, जुन्यांचा विस्तार करणे, परकीय गुंतवणुकीस परवानगी देणे असे निर्णय घेतल्याने देशी विदेशी कंपन्यांनी विविध उद्योग स्वतंत्रपणे वा संयुक्तपणे उभारले. खाजगीकरणाच्या प्रक्रियेत सार्वजनिक आजारी उद्योग खाजगी क्षेत्रास चालविण्यास दिले. त्यामुळे असे उद्योग पुनरुज्जीवीत होऊन त्यांचा नफा वाढू लागला. या प्रक्रियेत वाहतुकीवरील निर्बंध उठविल्याने अनावश्यक खर्च कमी झाला. परिणामी पर्यटन व हॉटेलिंग व्यवसायाचा विकास होऊ लागला. थोडक्यात जागतिकीकरणात औद्योगिकीकरणाची गती वाढली आहे. परकीय कंपन्यांच्या आगमनाने देशी उद्योगांपुढे स्पर्धात्मक आव्हान उभे राहिले. त्यामुळे देशी उद्योगांना आपली गुणवत्ता सुधारण्यास भाग पडत आहे. ही गोष्ट औद्योगिक क्षेत्रासाठी फायदेशीर ठरत आहे.

२) **बाजारपेठेचा विस्तार :** जागतिकीकरणात परकीय भांडवल, तंत्रज्ञान, तंत्रज्ञ, व्यवस्थापन इत्यादींना भारतात प्रवेश मिळू लागला. तसेच भारतीय उद्योजकांना परदेशात उद्योग उभारण्यास व आपला माल जागतिक बाजारात विकण्याची संधी मिळाली. त्यामुळे भारतातील बाजारपेठ जगाच्या बाजारपेठेशी जोडली. परिणामी, तिचा विस्तार झाला आहे.

३) **विदेशी व्यापार वाढला :** जागतिकीकरणामुळे भारताचा विदेशी व्यापार वाढला आहे. कारण जागतिकीकरणात आयातनिर्यातीवरील निर्बंध दूर झाले. त्यांच्या दरातही घट करण्यात आली. रुपया परिवर्तनिय बनविला. त्यामुळे भारताचा विदेशी व्यापार तर वाढलाच शिवाय या व्यापारात विविधताही आली. म्हणजे पूर्वी भारताचा विदेश व्यापार कांही मोजक्या देशांशीच होई. जागतिकीकरणामुळे हा व्यापार आता विविध देशांशी होऊ लागला आहे. त्यामुळे भारताच्या विदेश व्यापाराचे भौगोलिक क्षेत्र विस्तारले. याचा परिणाम म्हणून विदेश व्यापार वाढण्यास व परकीय चलनाचा साठा वाढण्यास मदत झाली आहे.

४) **ग्राहकांचा फायदा :** जागतिकीकरणामुळे भारताातील ग्राहकांचाही फायदा होऊ लागला आहे. कारण जागतिकीकरणात आयात दरात घट झाल्याने परकीय बाजारातील असंख्य वस्तू भारतीय बाजारात विक्रीसाठी येऊ लागल्या. मोटार सायकली, मोटारी, टी.व्ही. सेट, वॉशिंग मशिन्स, फ्रिज, मोबाईल सेट, लॅपटॉप, संगणक इत्यादी परकीय वस्तू लोकांना भरपूर प्रमाणात कमी किंमतीत मिळू लागल्या आहेत. त्यामुळे भारतीय ग्राहकांचा फायदा होत आहे.

५) **रोजगार वाढला :** जागतिकीकरणात औद्योगिकीकरण वाढले, बाजारपेठ विस्तारली, आयातनिर्यात वाढली. परिणामी अनेक नवीन रोजगार उपलब्ध झाले. भारतीयांना विशेषतः उच्चशिक्षित तंत्रज्ञांना व कुशल कामगारांना नोकऱ्या मिळू लागल्या. अशा नोकऱ्यांसाठी आवश्यक असणाऱ्या शिक्षण व प्रशिक्षण देणाऱ्या नवीन शिक्षणसंस्थांही स्थापन झाल्या. त्यातूनही रोजगार संधी उपलब्ध झाल्या. एवढेच नव्हे तर भारतीय

तंत्रज्ञांना विदेशातही नोकऱ्या मिळू लागल्या. थोडक्यात जागतिकीकरणामुळे रोजगार वाढण्यास मदत झाली आहे.

६) **सेवा क्षेत्राचा विस्तार :** जागतिकीकरणामुळे सेवाक्षेत्राचाही मोठ्या प्रमाणावर विस्तार झाला आहे. वाहतुकीच्या क्षेत्रात खाजगी गुंतवणूक सुरू झाल्याने रस्ते व महामार्ग यांची स्थिती सुधारली आहे. लोहमार्ग व जलमार्ग सुविधांमध्येही लक्षणीय सुधारणा झाली आहे. बँका व वित्त संस्थांना स्वायत्तता मिळाल्याने इंटरनेट बँकिंग, एटीएम सुविधा, कोठेही गेले तरी बँकिंग सुविधा (any where banking facility) इत्यादी सुविधा लोकांना मिळू लागल्या आहेत. जागतिकीकरणामुळे संप्रेषण (communication) क्षेत्रातही क्रांती घडून आली आहे. दूरध्वनी, मोबाईल, इंटरनेट इत्यादींचे जाळे विणले गेले आहे. त्यामुळे जगातील कोणत्याही व्यक्तीशी त्वरीत संपर्क साधणे शक्य झाले आहे. स्पर्धेमुळे मोबाईल सेवा स्वस्त होऊन सामान्यातील सामान्य माणूसही मोबाईल वापरू लागला आहे. टपालसेवेचे खाजगीकरण होऊन कुरिअर कंपन्याद्वारे त्वरीत टपाल पोहचविता येत आहे. जागतिकीकरणात जगातील नामांकित शिक्षणसंस्थांना इतर राष्ट्रात आपल्या शाखा उघडण्यास परवानगी मिळाल्याने तेथील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. शिवाय या परकीय शिक्षणसंस्थांशी होणाऱ्या स्पर्धेत टिकण्यासाठी स्थानिक शिक्षणसंस्थांना आपला शैक्षणिक दर्जा सुधारणे भाग पडत आहे. यातून शिक्षण क्षेत्रातील सुधारणांना गती मिळत आहे. थोडक्यात जागतिकीकरणामुळे सेवाक्षेत्र विस्तारले आहे व त्यामुळेही रोजगार वृद्धी झाली आहे.

७) **सामाजिक–सांस्कृतिक संबंधात वाढ :** जागतिकीकरणामुळे विभिन्न राष्ट्रातील लोक परस्परांच्या राष्ट्रांना भेटी देऊ लागल्या आहेत. शिक्षण, रोजगार, पर्यटन इत्यादीच्या निमित्ताने जगात कोठेही स्थलांतरीत होऊ लागले आहेत. परिणामी जगातील विविध लोक व राष्ट्रे यांच्यात केवळ आर्थिक सहकार्याचेच नव्हे तर सामाजिक–सांस्कृतिक सहकार्याचेही संबंध वाढत चालले आहेत. या संबंधावरील राजकीय व भौगोलिक सीमा दूर झाल्या आहेत. त्यामुळे जग खूप जवळ आले आहे. राष्ट्राराष्ट्रातील या सहकार्यामुळे संपूर्ण जग हे जणू एक खेडे बनले आहे. जागतिकीकरणामुळे जागतिक खेड्याचे (Global Village) स्वप्न प्रत्यक्षात उतरण्यास चालना मिळाली आहे.

**अनिष्ट प्रभाव/आव्हाने :**

जागतिकीकरणाचा अनिष्ट प्रभाव व आव्हाने पुढीलप्रमाणे आहेत.

१) **स्थानिक उद्योगास मारक :** जागतिकीकरण हे स्थानिक उद्योगास मारक ठरत आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत उत्तम गुणवत्तेच्या परकीय वस्तू मुबलक प्रमाणात व वाजवी दरात स्थानिक बाजारपेठेत उपलब्ध होत आहेत. स्थानिक वस्तूंना या परकीय वस्तूंशी स्पर्धा करणे शक्य होत नाही. त्यामुळे स्थानिक उद्योगात मंदी येऊन ते आजारी पडत आहेत. कांही स्थानिक उद्योजकांनी तर आपले उद्योग परकीय कंपन्यांना विकून टाकले आहेत. परकीय कंपन्यांनी जाहिरातीच्या जोरावर स्थानिक बाजारपेठा काबीज केल्याने स्थानिक उद्योगधंद्यांची विशेषतः लघुउद्योगांची स्थानिक बाजारपेठीत पिछेहाट झाली आहे. लघुद्योगांचे अस्तित्व टिकविणे हे एक आव्हान निर्माण झाले आहे.

२) **बहुराष्ट्रीय कंपन्यांची मक्तेदारी :** जागतिकीकरणामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांची अनेक क्षेत्रात मक्तेदारी निर्माण होत आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत अमेरिका, पश्चिम युरोपियन राष्ट्रे, जपान इत्यादीमधील अनेक कंपन्यांनी विकसनशील राष्ट्रातील महत्त्वाचे उद्योग आपल्या ताब्यात घेऊन स्थानिक उद्योजकांना बाजारपेठेतून हुसकावून लावले आहे. प्रचंड भांडवल, अत्याधुनिक तंत्रज्ञान, उत्तम

व्यवस्थापकीय कौशल्य, आकर्षक जाहिरातबाजी इत्यादीच्या जोरावर बहुराष्ट्रीय कंपन्यांनी जागतिक बाजारापील मोठा हिस्सा काबीज केला आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांची मक्तेदारी संपविणे हे ही एक आव्हान आहे.

**३) बेरोजगारीत वाढ :** अनेक विकसनशील राष्ट्रांत मुळातच रोजगाराच्या संधी कमी आहेत. त्यामुळे बेरोजगारीचे प्रमाण बरेच आहे. जागतिकीकरणामुळे बेरोजगारीचे हे प्रमाण वाढण्यास हातभार लागला आहे. परकीय वस्तूंशी स्पर्धा करू शकत नसल्याने अनेक स्थानिक उद्योग आजारी किंवा बंद पडून त्यातील कामगार बेरोजगारी (बेकार) बनले आहेत. खाजगीकरणाच्या धोरणामुळेही कामगार कपात होऊन अनेक कामगार बेकार झाले आहेत. लघुउद्योगांची पिछेहाट झाल्यानेही बेकारीत वाढ झाली आहे. बेकारीची ही समस्या सोडविण्याचे आव्हानही भारतापुढे निर्माण झालेले आहे.

**४) विषमतेत वाढ :** जागतिकीकरणामुळे आर्थिक तसेच सामाजिक विषमता वाढली आहे. जागतिकीकरणामुळे ज्या रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत, त्यांचा फायदा केवळ उच्च शैक्षणिक पात्रताधारक व्यक्तीस होत आहे. बडे शेतकरी, उद्योजक व व्यापारी या प्रक्रियेत मालामाल होत आहेत. त्यांच्या तुलनेत लहान शेतकरी, शेतमजूर, अकुशल कामगार, दलित, आदिवासी इत्यादी दुर्बल घटक जागतिकीकरणाच्या फायद्यापासून वंचित राहिलेले आहेत. त्यामुळे श्रीमंत वर्ग अधिक श्रीमंत तर गरीब वर्ग अधिक गरीब होत आहे. श्रीमंत वर्ग चैन करू लागला आहे, तर गरीब वर्गास मूलभूत गरजा भागविणेही अवघड झाले आहे. परिणामी, आर्थिक व सामाजिक विषमता वाढत आहे. अशी ही वाढती विषमता देखील मोठेच आव्हान आहे.

**५) कर्जबाजारीपणात वाढ :** जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत विकसनशील राष्ट्रांच्या कर्जबाजारीपणात वाढ झाली आहे. जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणे निधीकडून कर्ज घेताना विकसनशील राष्ट्रांना उदारीकरणाचे व खाजगीकरणाचे धोरण स्वीकारणे भाग पडते. हे धोरण राबविताना परकीय भांडवल, तंत्रज्ञान, वस्तू व सेवा यांची आयात करावी लागते. आयात वाढल्याने कर्ज फेडण्यासाठी पुन्हा कर्ज काढावे लागते. परिणामी, ही राष्ट्रे कर्जाच्या विळख्यात अडकली आहेत. उदा. मेक्सिको, ब्राझील, चिली, अर्जेंटिना यांचा कर्जबाजारीपणा वाढला आहे. भारताचाही कर्जबाजारीपणा वाढत चालला असून तो कमी करणे हे ही एक आव्हान आहे.

**६) पर्यावरणाची समस्या :** जागतिकीकरणामुळे पर्यावरणाची समस्या अधिक गंभीर बनली आहे. बहुराष्ट्रीय कंपन्या व उद्योगपती हे जास्तीत जास्त फायदा वा नफा मिळविण्याच्या हेतुने नैसर्गिक साधनसामग्रीचा स्वैरपणे वापर करीत आहेत. पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करण्याऐवजी हवा, पाणी, भूमी, ध्वनी यांचे प्रदूषण वाढवित आहेत, जंगलतोड करीत आहेत. त्यामुळे तापमान वृद्धीची समस्या उग्र बनली आहे. पर्यावरणाची समस्या सोडविण्याचे आव्हानही देशापुढे आहे.

**७) समाजवाद व कल्याणकारी धोरणास सोडचिठ्ठी :** जागतिकीकरणामुळे विकसनशील राष्ट्रे समाजवाद व कल्याणकारी धोरणास सोडचिठ्ठी देऊ लागली आहेत. जागतिकीकरणात आर्थिक सुधारणांचे कार्यक्रम राबविण्यासाठी विकसनशील राष्ट्रांना जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणे निधी व अमेरिकेसारखी बडी राष्ट्रे यांच्याकडून कर्ज व इतर मदत घ्यावी लागते. ही मदत देताना या संस्था व बडी राष्ट्रे विकसनशील राष्ट्रांवर अनुदानात आणि कल्याणकारी योजनांत कपात करावी, समाजवादी उपक्रम बंद करावेत यासारख्या अटी लादत आहेत. विकसनशील राष्ट्रांना या अटींचे पालन करणे भाग पडत आहे. त्यातूनच कामगार कपात करणे, कंत्राटी पद्धतीने कामगार भरती करणे, पेन्शन व विमा सुविधा बंद करणे,

अन्नधान्य, गॅस, खनीज तेल इत्यादीवरील अनुदान बंद करणे इत्यादी उपाययोजना केल्या जात आहेत. त्यामुळे या राष्ट्रांतील गरीबांना आता कोणीच वाली राहिलेला नाही. महत्त्वाची म्हणजे इतरांना अर्थव्यवस्था मुक्त करण्यास व अनुदाने बंद करण्यास सांगणारी अमेरिका स्वतः मात्र आपल्या उद्योगांना संरक्षण व शेतकऱ्यांना अनुदाने देत आहे. ही दुटप्पी नीती अन्यायकारक आहे.

**८) सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रावर अनिष्ट प्रभाव :** जागतिकीकरणाचा विकसनशील राष्ट्रांच्या सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रावर अनिष्ट प्रभाव पडत आहे. या राष्ट्रांतील लोकांचे आचारविचार, श्रद्धामुल्ये, सवयी, अभिवृत्ती, जीवनपद्धती इत्यादीत अनिष्ट परिवर्तन होत आहे. व्यक्तीवाद, उपभोक्तावाद, उपयुक्ततावाद या मूल्यांचा प्रभाव जागतिकीकरणात वाढत आहे. त्यामुळे समष्टीवाद सामाजिक बांधिलकी, राष्ट्राचे हित स्वसंस्कृती अभिमान, इत्यादींचा प्रभाव घटत आहे. या राष्ट्रातील नवीन पिढी ही तेथील हवामानास प्रतिकूल ठरेल अशा खाण्यापिण्याच्या व पोषाखाच्या आहारी जात आहे. विकसित राष्ट्रातील वस्तुंचे व चालिरीतीचे अंधानुकरण होऊ लागले आहे. इंग्रजी भाषाचे प्रभुत्व वाढून देशी भाषांचे महत्त्व तरूण पिढीस वाटेनासे झाले आहे. पायाभूत व मूलभूत सेवांच्या विकासापेक्षा चैनीच्या वस्तूंचे आकर्षण वाढत चालले आहे. विकसित राष्ट्रांच्या संस्कृतीचे आक्रमण थोपविण्याचे आव्हानही आपल्यापुढे उभारले आहे.

**९) पायाभूत सुविधांकडे दुर्लक्ष :** जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत बहुराष्ट्रीय कंपन्यांना पायाभूत सेवांमध्ये (वीज, पाणीपुरवठा, रस्ते, वाहतूक, संप्रेषण इत्यादी) गुंतवणूक करण्यास परवानगी दिली आहे. तथापि, या कंपन्या पायाभूत सेवासुविधांमध्ये गुंतवणूक करण्याकडे दुर्लक्ष केले आहे. त्याऐवजी चैनीच्या वस्तूंचे (उदा. वॉशिंग मशीन, टी.व्ही. सेट, कॉम्प्युटर, लॅपटॉप, मोटार सायकली, मोटार इत्यादी) उत्पादन करण्यावर भर देत आहेत. त्यामुळे गरिबांचा फायदा होण्याऐवजी श्रीमंताची चैन पुरविली जात आहे.

अशाप्रकारे जागतिकीकरणाचा भारतावर इष्ट व अनिष्ट प्रभाव पडला आहे. या अनिष्ट प्रभावामुळे भारतीय समाजापुढे अनेक आव्हाने उभी ठाकली आहेत.

## ४.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न (Check your progress) :

अ) एका वाक्यात उत्तरे द्या.

१) आधुनिकीकरणाचा अर्थ सांगा.

२) परंपरा म्हणजे काय?

३) उदारीकरणाची कोणतीही एक व्याख्या द्या.

४) खाजगीकरणाचा अर्थ स्पष्ट करा.

५) जागतिकीकरणात भारताने कोणत्या धोरणाकडे पाठ फिरविली आहे.

ब) बहुपर्यायी प्रश्न सोडवा.

१) आधुनिकीकरणाची प्रक्रिया कोणत्या राष्ट्रांत सुरू झाली?

अ) आफ्रिकी ब) आशियाई क) युरोपियन ड) वरील सर्व

२) खालीलपैकी कोणते आधुनिकतेचे उदाहरण आहे?

अ) रूढीप्रियता ब) जातीभेद क) पुरुषप्रधानता ड) धर्मनिरपेक्षता

३) आर्थिक क्रियांमधील सरकारचा सहभाग कमी करण्याच्या प्रक्रियेस काय म्हणतात?

अ) जागतिकीकरण ब) खाजगीकरण क) उदारीकरण ड) आधुनिकीकरण

४) भारतात कोणत्या सरकारने नवीन आर्थिक धोरण जाहीर केले?

अ) राजीव गांधी ब) इंदिरा गांधी क) मनमोहनसिंग ड) पी. व्ही. नरसिंहराव

५) अम्नेस्टी इंटरनॅशनल ही काय आहे?

अ) बिगर शासकीय संघटना ब) वित्तसंस्था

क) बहुराष्ट्रीय महामंडळ ड) शासकीय संघटना

## ४.५ सारांश (Abstract) :

या चौथ्या घटकात तुम्ही भारतीय समाजातील परिवर्तनाच्या कांही प्रमुख प्रक्रियांचा अभ्यास केलेला आहे. कोणत्याही समाजात परिवर्तन घडवून आणणाऱ्या विविध प्रक्रिया चालू असतात. भारतीय समाजही याला अपवाद नाही. भारतीय समाजात परिवर्तन घडवून आणण्यामध्ये आधुनिकीकरण, आधुनिकता व जागतिकीकरण यांचा मोठा वाटा आहे. आधुनिकीकरण ही मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रात इष्ट व विविके परिवर्तन घडवून आणणारी प्रक्रिया आहे. ब्रिटिश राजवटीत ही प्रक्रिया भारतात सुरू झाली. या प्रक्रियेचा भारतीय समाजाच्या आर्थिक, राजकीय, सामाजिक-सांस्कृतिक व मानसिक क्षेत्रांवर लक्षणीय प्रभाव पडला असून त्यामुळे परिवर्तन घडून येण्यास चालना मिळाली आहे. परंपरा व आधुनिकता या दोन संकल्पनाही आपण या ठिकाणी समजावून घेतलेल्या आहेत. भारतीय समाजात होत असलेल्या परिवर्तनाच्या संदर्भात आपण परंपरा व आधुनिकता यांची चर्चा केलेली. या घटकाच्या शेवटी आपण जागतिकीकरणाची व्याख्या, वैशिष्ट्ये व भारतीय समाजावर त्याचा पडलेला प्रभाव अभ्यासलेला आहे. जागतिकीकरण ही बहुआयामी प्रक्रिया आहे. तिला आर्थिक, सामाजिक, राजकीय, मानसिक असे अनेक पैलू आहेत. जगातील विविध लोक व माज वा राष्ट्रे यांच्यात आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक संबंध प्रस्थापित करून सर्व जगाची एकच व्यवस्था निर्माण करणे म्हणजे जागतिकीकरण होय. भारताने १९९१ मध्ये जागतिकीकरणाचा स्वीकार केला. या प्रक्रियेचा भारतीय समाजावर इष्ट तसेच अनिष्ट प्रभाव पडलेला आहे. तसेच या प्रक्रियेने भारतासमोर अनेक आव्हाने उभी केलेली आहेत, जागतिकीकरणाचा हा प्रभाव व त्याची आव्हाने याची चर्चा आपण केलेली आहे.

## ४.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे (Answers to check your progress) :

अ) एका वाक्यात उत्तरे द्या.

१) मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रात विवेकी व इष्ट परिवर्तन घडून येणे म्हणजे आधुनिकीकरण होय.

२) ऐतिहासिकदृष्ट्या आकारास आलेल्या व पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या रूढी, विधी, कल्पना, मूल्ये, वर्तनविषयक नियमने इत्यादींना परंपरा असे म्हणतात.

३) आर्थिक क्रियांवर असलेले निर्बंध, नियंत्रणे व नियमने शिथिल वा कमी करणे म्हणजे उदारीकरण होय.

४) खाजगीकरण म्हणजे आर्थिक क्रियांतील सरकारचा किंवा सार्वजनिक क्षेत्राचा सहभाग कमी करणे होय.

५) जागतिकीकरणात भारताने समाजवादी व कल्याणकारी धोरणाकडे पाठ फिरविली आहे.

ब) बहुपर्यायी प्रश्न सोडवा.

१) क, २) ड, ३) ब, ४) ड, ५) अ

## ४.७ सरावासाठीचे प्रश्न (Exercise / Home Asignment) :

अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

१) आधुनिकीकरणाची व्याख्या व वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) आधुनिकीकरणाचा भारतीय समाजावरील प्रभाव विशद करा.

३) भारतातील परंपरा व आधुनिकता यावर निबंध लिहा.

४) जागतिकीकरणाची व्याख्या देऊन त्याची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

५) भारतीय समाजावरील जागतिकीकरणाचा प्रभाव विशद करा.

ब) टीपा लिहा.

१) आधुनिकीकरणाची वैशिष्ट्ये

२) आधुनिकीकरणाचा भारतीय समाजावरील प्रभाव

३) परंपरा व आधुनिकता

४) जागतिकीकरणाचा इष्ट प्रभाव

५) जागतिकीकरणाचा अनिष्ट प्रभाव

## ४.८ चिंतन आणि कार्य (Reflection and Action) :

आपण ज्या ठिकाणी राहात आहात त्या ठिकाणच्या समुदायात आधुनिकीकरणामुळे कोण कोणते परिवर्तन होत आहे याचे निरीक्षण करून त्याआधारे एक टिपणी तयार करा.

## ४.९ अधिक वाचनासाठी पुस्तके (Suggested Readings) :


- प्रा. चंद्रकांत खंडागळे - जागतिकीकरण आणि समाज, दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (२०१५)
- प्रा. चंद्रकांत खंडागळे - भारतीय समाज, प्रकाशिका सौ. मायादेवी खंडागळे, सांगली (१९९८)
- म. द. साठे - जागतिक अर्थव्यवस्था, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे (२००७)

- प्रा. चंद्रकांत खंडागळे - उपयोजित समाजशास्त्र, प्रकाशिका सौ. मायादेवी खंडागळे, सांगली (२०१८)
- डॉ. अरुण पौडमल - भारतीय समाजाची ओळख, दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- Reddy A. V. and Bhaskar G. - Rural Transformation in India; The Impact of Globalization, New Century Publications, New Delhi (2005)
- Yogendra Singh - Modernization of Indian Tradition, Rawat Jaipur (1986).


❑❑❑

सत्र २ : घटक १

# भारतीय समाजशास्त्राचा आणि सामाजिक मानवशास्त्राचा विकास

## (Development of Sociology and Social Anthropology in India)

**घटक संरचना**

१.१ प्रस्तावना

१.२ उद्दिष्टे

१.३ विषय विवेचन

  १.३.१ अन्वेषणात्मक कालखंड (Exploratory Phase)

  १.३.२ विकासात्मक कालखंड (Development Phase)

  १.३.३ विश्लेषणात्मक कालखंड (Analytical Phase)

१.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

१.५ सारांश

१.६ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.७ सरावासाठी प्रश्न

१.८ चिंतन आणि कार्य

१.९ अधिक वाचनासाठी पुस्तके

### १.१ प्रस्तावना (Introduction)

या घटकामध्ये आपण भारतीय समाजशास्त्राचा आणि सामाजिक मानवशास्त्रांचा विकास यांचे आकलन करून घेणार आहोत. त्यामध्ये प्रामुख्याने अन्वेषणात्मक कालखंड - भारतीय समाजशास्त्र, सामाजिक मानवशास्त्र या अभ्यास शाखांच्या ऐतिहासिक विकासासंबंधी आढावा घेणे. विकासात्मक कालखंड व विश्लेणात्मक कालखंड या विषयी अभ्यासक्रमासंबंधी आणि संशोधना संबंधी भारतातील विविध विद्यापीठांमध्ये कशा स्वरूपाचा विकास घडून आला याचा मागोवा समजून घेणार आहोत.

### १.२ उद्दिष्टे (Objectives)

या घटकाच्या अभ्यास केल्यानंतर आपणास

१. अन्वेषणात्मक कालखंड समजावून घेता येईल.

२. विकासात्मक कालखंड समजावून घेता येईल.

३. विश्लेणात्मक कालखंड समजावून घेता येईल.

## १.३ विषय विवेचन (Presentation of Subject Matter) :

या घटकामध्ये आपण भारतीय समाजाशस्त्राचा विकास आणि सामाजिक मानवशास्त्राचा विकास कसा झाला ते समजावून घेणार आहेत. त्यांनतर अन्वेषणात्मक कालखंड म्हणजे काय ? कोणकोणत्या विचारवंतांनी त्यासाठी योगदाने दिले याचा ही अभ्यास करणार आहेत व विकासात्मक कालखंड आणि विश्लेषणात्मक कालखंड इत्यादींचा हे समाजशास्त्रातील संशोधनासाठी म्हणून असणाऱ्या वैशिष्ट्यपूर्ण कारणांचाही शोध घेतला जाईल.

### १.३.१ अन्वेषणात्मक कालखंड (Exploratory Phase) :

A surveing of Research in Sociology and Social Autopology नावाचा अहवाल इंडियन कौन्सील ऑफ सोशल सायन्स आणि रिसर्च नांवाच्या संस्थेने कांही नामवंत अभ्यासकांच्या मार्गदर्शनाखाली प्रकाशित केला आहे. या स्वरुपाचा अहवाल प्रसिद्ध करण्यापाठीमागे तीन प्रमुख उद्दिष्टे होती.

i) भारतातील समाजशास्त्र, सामाजिक मानववंशशास्त्र आणि सोशल वर्क या अभ्यास शाखांच्या ऐतिहासिक विकासासंबंधीचा आढावा घेणे.

ii) या विषयामध्ये झालेल्या विविध संशोधन अहवालातील प्रमुख निष्कर्षासंबंधीची नोंद घेवून त्यावरून पुढील संशोधनाला चालना देणे.

iii) या विषयासंबंधीच्या अभ्यासक्रमासंबंधी आणि संशोधना संबंधी भारतातील विविध विद्यापीठांच्यामध्ये कशा स्वरूपाचा विकास घडून अला याचा मागोवा घेणे.

**अ) भारतातील समाजशास्त्रासंबंधीच्या संशोधनाचा कालखंड** (Research Phase) १७७४ ते १९१९ :

ब्रिटीश राजवटीमध्ये समाजशास्त्र आणि सामाजिक मानवशास्त्र विषयांच्या मधील संशोधनासाठी असणारी परिस्थिती सारखीच होती. तरी सुद्दा समाजशास्त्रातील संशोधनासाठी म्हणून असणाऱ्या वैशिष्ट्यपूर्ण कारणांचा शोध घेणे आवश्यक ठरते.

**१) पाश्चात्य विचारवंतांचे योगदान :** कार्ल मार्क्स, हेन्रीमन आणि मॅक्स वेबर यांनी भारतीय समाजव्यवस्थेच्या अभ्यासामध्ये भारतातील जाती आणि धर्म संस्थेचा अभ्यास संदर्भात ....... पद्धतीने चालत आलेल्या नियमांचा अभ्यास केला होता. त्याच बरोबर भारतातील ग्रामीण समाजजीवनाचा अभ्यास केलेला होता. हेन्री यांनी (१८२२ ते १८३८) या कालखंडात 'Ancient law (1861)' या त्यांच्या अभ्यासामध्ये हिंदू कायद्याचा संदर्भ घेतला होता. तसेच पूर्वेकडील आणि पश्चिमेकडील ग्रामीण जीवनाचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी समाजशास्त्रीय पद्धतीचा अवलंब केला होता. तसेच धर्म व्यवस्था आणि नितीमूल्ये आणि कायदे व्यवस्था यांचा परस्पर संबंध कसा असतो. याचाही त्यांनी अभ्यास केला होता. तसेच विविध ऐतिहासिक कालखंडामध्ये कायदे यंत्रणेचा परिणाम म्हणून त्याचे समाज जीवनावर कशा स्वरूपाचे परिणाम दिसून येतात यासंबंधीही त्यांनी संशोधन केले होते.

**कार्ल मार्क्स :** १८६३ मध्ये कार्ल मार्क्स यांनी भारतातील ग्रमीण समाजजीवनाच्या अभ्यासामध्ये खेड्यातील सामाजिक जीवन आणि स्वयंपूर्णता अभ्यासत असताना, खेड्यातील शेत जमिनीवर सामूहिक मालकी कशाप्रकारे दिसून येते या विषयी त्यांच्या मनामध्ये उत्सुकता निर्माण केली होती. मॅक्स वेबर यानी

१९१६-१७ या कालखंडात भारतातील जाती व्यवस्था आणि धर्म या संबंधीचा अभ्यास केला होता. या विचारवंतांच्या खेरीज फ्रेंच विचारवंत सी. बाऊजल यांनी 'एींशपलश रपव ठशरश्रळीूं`ष ींहश लरीींश ूीींशा ळप १९०८ हे पुस्तक लिहिले होते. वरील विचारवंतांच्या खेरीज विल्यम जोन्स, हेन्री थॉमस, मॅक्स मुलर इत्यादीसारख्या पाश्चात्य विचारवंतांना भारतीय समाजा संबंधीचे संशोधन करीता असताना संस्कृत भाषेतील वाङ्मयाचा संदर्भा घेण्यामध्ये ते जास्त उत्सुक असत. तसेच भारतातील आर. जी. भांडारकर, पी. व्ही. काणे, ए. एस्. आळतेकर आणि जयस्वाल या भारतीय अभ्यासकांचा संदर्भ त्यांच्या अभ्यासात दिसून येतो.

**२) ब्रिटीश शासन व्यवस्थेमधील प्रशासकांनी केलेला भारतीय समाजा संबंधीचा अभ्यास** : ब्रिटीश राजवटीमध्ये भारतामध्ये असणाऱ्या कांही प्रशासकीय अधिकाऱ्यांना या ठिकाणच्या आदिम जमातींचा केवळ अभ्यास करावयाचा नव्हता तर, या ठिकाणी दिसून येणाऱ्या नव नवीन जाती आणि ग्रामीण समुदायाचा त्यांनी शोध घेण्याचा प्रयत्न केला होता. त्यांनी अशा ग्रामीण भागातील शेत जमिनीवर असणाऱ्या कुळांचा अभ्यास केला होता. या स्वरूपाच्या अभ्यासाचा फायदा खेड्यांच्यामधून मिळणारा जो महसूल होता तो निश्चित करत असताना त्याला अनुसरून खेड्यांच्या सीमा रेषा निश्चित करता येत होत्या. ग्रामीण समुदायासंबंधी चार्लस मेटकॉफ, बेडन पॉवेल यांनी अभ्यास केला होता. भारतातील जाती व्यवस्थेचा उगम आणि विकास या संबंधी अनेक पाश्चात्य विचारवंतांना आकर्षण होते. त्यामध्ये नेसफिल्ड, रिसले, क्रूकस् (crooks) बाऊजल इ. विचारवंतांचा समावेश होतो.

कांही भारतीय अभ्यासकांनी जाती व्यवस्थेचा अभ्यास केला होता. त्यामध्ये जे. भट्टाचार्य यांनी 'Hindu Castes and Sects (1896)' मध्ये अभ्यास केला होता. तर एस्. व्ही. केतकर यांनी History of caste in India (1909) मध्ये अभ्यास केला होता. पाश्चात विचारवंतांनी केलेल्या भारतातील जाती आणि धर्म संस्थेच्या अभ्यासासंबंधी कांही प्रतिक्रिया नोंद केल्या होत्या. अशा प्रकारच्या प्रतिक्रिया ए. के. कुमारस्वामी, ब्रिजेंद्रनाथ सिल, यांचा त्यामध्ये समावेश होता.

**३) भारतातील औद्योगिकरण आणि शहरीकरणा संबंधीचे संशोधन :** ८० व्या शतकाच्या आरंभीला औद्योगीकरणामुळे आणि शहरीकरणामुळे भारतीय समाजव्यवस्थेमधील समस्ये संबंधीचे संशोधन पेट्रक गिडिज यांनी १९१५ मध्ये केले होते. पेट्रीक गिडिज हे शहरांचे नियोजन करणारे आणि मानवी भूगोलाचे अभ्यासक होते. ते १९१४ मध्ये भारतात आले. यांनी भारतातील विविध शहरांच्या नियोजनासंबंधीच्या कार्य पद्धतीचे संशोधन सुरू केले होते. पेट्रीन गिडीज यांनी राधाकमल मुखर्जी यांच्या 'The foundation of Indian Economy' या ग्रंथाची प्रस्तावना लिहिली होती. १९१९ मध्ये भारत सरकारने त्यांना मुंबई विद्यापीठामध्ये समाजशास्त्र विभाग सुरू करण्यासंबंधीची विनंती केली होती. म्हणजे आरंभीच्या कालखंडामध्ये शहरांच्या अभ्यास आणि नियोजनासंबंधीचे संशोधन भारतीय समाजशास्त्रामध्ये झाले होते.

### **१.३.२ विकासात्मक कालखंड** (Development Phase) :

भारतातील समाजशास्त्र विषयाची पायाभूत उभारणी (Development as an Academic Discipline) किंवा समाजशास्त्राची शैक्षणिक अभ्यासक्रम म्हणून झालेला विकास :

**अ) मुंबई विद्यापीठातील अभ्यासक :**

१९१४ साली भारत सरकारने मुंबई विद्यापीठास समाजशास्त्र विषयाचा स्वतंत्र अभ्यासक्रम सुरू करण्यासाठीचे अनुदान मंजूर केले असले तरी प्रत्यक्षात १९१९ मध्ये 'Department of sociology and

Civics' नावाने पेट्रीक गिडीज यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झाले. बाहेर देशामध्ये समाजशास्त्र विषय अभ्यासासाठी जाणाऱ्या गुणवान विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येत होती. गिडीज यांनी त्यावेळी जी. एस. घुर्ये यांना शिष्यवृत्ती दिली होती. या संधीचा फायदा घेवून घुर्ये यांनी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स' या ठिकाणी शिक्षण घेतले. त्याठिकाणी त्यांनी १९२३ मध्ये 'Caste & Race' या विषयावर डॉक्टरेट मिळवली. ज्यावेळी गिडीज नंतर मुंबई विद्यापीठातील समाजशास्त्र विषयाचा पदभार डॉ. घुर्ये यांनी हाती घेतला त्यावेळी पदव्युत्तर अभ्यासक्रमांची सुरुवात मुंबई विद्यापीठात झाली होती. M.A. अभ्यासक्रमांसाठी ज्या विद्यार्थ्यांना संशोधन करावयाचे तसेच त्यांच्यासाठी Theory चे आठ पेपर्स असत. Ph.D. अभ्यासक्रम मुंबई विद्यापीठात १९३६ साली सुरू झाला. संशेधन हे विभागाचे वैशिष्ट्य होते. १९३८ मध्ये एम. सी. प्रधान यांनी सर्वप्रथम Untouchables in Bombay या विषयावर Ph.D. पदवी संपादन केली.

समाजशास्त्राचे पहिले नियतकालिक १९२० मध्ये सुरू झाले. त्यांचे नांव Indian journal of sociology असे होते. त्यांचे संपादक अल्बन जी. बिजरे (uidgery) असे होते. या नियतकालीकामध्ये समाजशास्त्राचे विषय प्रामुख्याने बालकल्याण, भारतीय शहरातील धार्मिक संघटना, शिक्षण, राजकारण, नागरी समाजजीवन आणि नियोजन इत्यादी त्यामध्ये विविध समाजशास्त्रीय लेखनांचा आढावा व पेट्रीक गिडीज यांच्या लेखांचा समावेश केला जात असे.

**ब) कलकत्ता विद्यापीठातील अभ्यासक्रम :**

समाजशास्त्र विषयाचा अभ्यासक्रम कलकत्ता विद्यापीठामध्ये २० व्या शतकातील पहिल्या दशकामध्ये अशितोष मुखर्जी यांनी आर्टस् आणि सायन्स कडील पदव्युत्तर अभ्यासक्रमांना सुरुवात करून केले. एम.ए. अभ्यास्रकमासाठी समाजशास्त्र विषयासोबत अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र हे विषय अभ्यासावे लागत असत. या ठिकाणी (Benoy Kumar Sarkar) (B.K. Sarkar) हे सुरुवातीला अध्यापनाचे काम पहात होते. त्यांनी १९१७ ते १९३६ या कालखंडात अनेक विषयांवर शोध निबंध लिहिले. यामध्ये 'हिंदू संस्कृतीचा' अभ्यास जास्त होता. त्यांनी समाजशास्त्रीय लिखान केले त्यामध्ये 'The folk Element in Hindu Culture' आणि 'Positive Back ground of Hindu sociology' यांचा समावेश होतो. १९१७ ते १९२१ या पाच वर्षाच्या कालखंडात त्यांच्या सोबत राधाकमल मुखर्जी होते. ते लाहोर हून कलकत्ताला आले होते व समाजशास्त्र, राज्यशास्त्र आणि फिलॉसॉपी हे विषय ते शिकवत असत.

**क) म्हैसूर विद्यापीठातील अभ्यासक्रम :**

१९१७-१८ मध्ये म्हैसूर विद्यापीठामध्ये पदवी अभ्यासक्रमासाठी समाजशास्त्र विषय सर्व प्रथम सुरू झाला. १९२८-२९ मध्ये बी.ए. अभ्यासक्रमासाठी ३ पेपर्सची सुरूवात केली. पदवी अभ्यासक्रमासाठी समाज शास्त्राबरोबर 'Social Philosophy' हा विषय घ्यावा लागत असे. ए. आर. वाडिया यांना या संपूर्ण कार्याचे श्रेय जाते. त्याचा मुख्य हेतू Applied Sociology कडे होता. इतर विद्यापीठाइतकी संशोधनाची वाटचाल म्हैसूर विद्यापीठामध्ये त्या काळात झालेली नव्हती.

**ड) लखनौ विद्यापीठातील अभ्यासक्रम :**

अर्थशास्त्र विभागा अंतर्गत समाजशास्त्र अधपनाचे कामकाज १९२१ मध्ये लखनौ विद्यापीठात सुरू झाले. राधाकमल मुखर्जी हे त्यांच्या 'Regionalism and social Ecology' या विषयातील संशोधनासाठी ख्यातनाम होते व तेच अर्थशास्त्र आणि समाजशास्त्र अधपनाचे काम करीत असत. त्याच्या

सोबत १९२२ मध्ये डी.पी. मुखर्जी यांची नेमणूक झाली. त्याचा अभ्यास प्रामुख्याने Sociology of Culture हा होता. १९३५ मध्ये लखनौ विद्यापीठाने "Sociological Review" नांवाचे नियतकालिक सुरू केले. लखनौ विद्यापीठामध्ये १९५१ पर्यंत मानवशास्त्र विभाग समाजशास्त्र विभागाशी संलग्न होता. परंतु त्यानंतर डी.एन. मुजूमदार यांच्या मार्गदर्शनाखाली मानवशास्त्र विभाग स्वतंत्र कार्यरत झाला.

त्यानंतर १९३० ते १९४० च्या अखेरीला अनेक विद्यापीठातून समाजशास्त्र विभाग सुरू झाल. १९२८ मध्ये उस्मानिया विद्यापीठामध्ये ऐच्छिक विषय म्हणून समाजशास्त्र सुरू झाला व १९४६ मध्ये नंतर समाजशास्त्र विभाग अस्तित्वात आला. १९३० च्या अखेरीला डेक्कल कॉलेज येथे पुणे विद्यापीठाची पदव्युत्तर संशोधन संस्था डॉ. इरावती कर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झाली.

### **१.३.३ विश्लेषणात्मक कालखंड** (Analytical Phase) :

- **स्वातंत्र्योत्तर कालखंड किंवा संशोधनातील विविधतेचा कालखंड :**

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये समाजशास्त्रीय संशोधनाचा वेग मानवशास्त्राच्या तुलनेत जास्त आणि आश्चर्यजनक स्वरूपाचा होता.

**अ) रचनात्मक कार्यात्मक सिद्धांताद्वारे अभ्यासाचे स्वरूप :**

भारतातील समाजशास्त्राच्या अभ्यासकांनी रचनात्मक कार्यात्मक पद्धती सिद्धांताद्वारे अभ्यासाला सुरूवात केली. त्या अगोदरच्या कालखंडात तुलनात्मक ऐतिहासिक आणि स्वदेशी (Indogogical) सिद्धांताच्या द्वारे भारतीय संस्कृती, परंपरा आणि सामाजिक संस्थांचा अभ्यास केला जात होता. कांही प्रमुख समाजशास्त्र आणि मानवशास्त्र अभ्यासकांनी त्यांच्या संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना रचनात्मक-कार्यात्म सिद्धांतांचा परिपाठ दिला होता. एम. एन्. श्रीनिवास, मुजूमदार आणि दुबे यांचा त्यामध्ये समावेश होतो. यापैकी काही विचारवंतांनी समाजशास्त्र आणि सामाजिक मानवशास्त्र यांच्या मधील संशोधनामध्ये फारसा फरक नसल्याचे स्पष्ट केले होते.

**ब) क्षेत्रकार्य अभ्यास पद्धतीद्वारे अभ्यास** (Field studies) :

भारतातील लहान समुदायाचे अध्ययन करण्यासाठी म्हणून समाजशास्त्र आणि सामाजिक मानवशास्त्रांच्या अभ्यासामध्ये क्षेत्रकार्य अभ्यास पद्धतीचा स्वीकार करण्यात आला की, ज्यामुळे त्या समुदायांचे वास्तव आणि जिवंत स्वरूप स्पष्ट केले जात असे. १९५० आणि ६० च्या काखंडात लहान लहान समुदायांच्या अभ्यासावर भर दिला जात होता. (Micro studies) 'खेडे' हा अभ्यास विषयाचा प्रमुक घटक मार्ग खेड्यातील कार्य पद्धतीचा अभ्यास, खेड्यातील विविध जाती व्यवस्थेची कार्यपद्धती, त्यांची भूमिका आणि स्थान या संबंधातून केला जात असे. १९५५ मध्ये अशा स्वरूपाचे कांही प्रमुख अभ्यास केले गेले. त्यामध्ये India's villages (एम्. एन्. श्रीनिवास), Rural Profiles (डी. एन. मुजूमदार), Village India (मॅकीम मॅरोयट) आणि Indian village (एस. सी. दुबे) यांचा समावेश होतो. अशा प्रकारे ग्रामीण खेड्यातील संशोधनाचा प्रमुख हेतू म्हणजे, खेड्यातील जाती, व्यवस्थेमधील श्रेष्ठ-कनिष्ठता जाणून घेणे, खेड्यातील वर्गरचना, ग्रामीण नेतृत्व, जमातीपद्धती अथवा बलुतेदारीचा अभ्यास, जाती आणि वर्ग यांच्यामधील परस्पर संबंधाचा अभ्यास, भारतीय खेडी आणि सभोवतालच्या विश्वाचे स्वरूप इ. संबंधीचा अभ्यास केला जात असे. तसेच जाती विषयक, अभ्यासामध्ये जाती व्यवस्थेची आर्थिक, राजकीय सामाजिक आणि जातीचे प्रादेशिक स्वरूप आणि श्रेष्ठता इ. अभ्यास केला जात असे.

**क) 'खेडे' हा समाजास्त्रीय संशोधनाचा केंद्रबिंदू :**

भारतामध्ये स्वातंत्र्योत्तर कालखंडात समुदाय विकास कार्यक्रमांची सुरूवात झाली होती. त्यामध्ये खेड्यांचा विकास कार्यक्रमांना अग्रक्रम दिला असल्याने समाजाशस्त्रातील संशोधनाचा फायदा विकास कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी उपयुक्त ठरत होता. तसेच मानवशास्त्रातील अभ्यासकांना आपल्या अभ्यासाचे क्षेत्र अदिवासीच्यापासून ग्रामीण समुदायाच्या अभ्यासाकडे वळवता आले. नागरीसमूहांच्या अभ्यासापेक्षा ग्रमीण समुदायाच्या अभ्यासाला प्राधान्य दिले जात होते. तरी सुद्धा १९३६ ते १९६८ या कालखंडात मुंबई विद्यापीठात डॉ. जी. एस. घुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली ३४ नागरी समुदायावरील पीएच.डी. प्रबंध सादर केले गेले.

**ड) राजकीय समाजशास्त्रातील संशोधन :**

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये समाजशास्त्रातील संशोधनाचे आणखी एक प्रमुख क्षेत्र म्हणजे राजकीय समाजशास्त्र होय. या विषयातील संशोधनामध्ये निवडणूकीचे स्वरूप, सांप्रदायिकता, मागासवर्गीयांच्या चळवळी, ग्रामीण स्तरावर बदलणारे नेतृत्व इ. समावेश केला जातो. राजकीय समाजशास्त्रामुळे राज्यशास्त्रातील अभ्यासकांचे 'राज्यघटना आणि त्यांच्या इतर संस्थांशी असणारा संबंध' या विषया बाहेर संशोधन करत असताना, व्यक्तीच्या राजकीय वर्तनाचा सामाजिक संबंधाच्या दृष्टीकोनातून अभ्यासाला सुरूवात झाली. समाजशास्त्रातील संशोधनामध्ये प्रामुख्याने टालकॉट पारसन्स, मर्टन, मिल्स, कार्ल मार्क्स, मॅक्स वेबर इ. विचारवंतांचा प्रभाव दिसून येतो.

**इ) औद्योगिक समाजशास्त्र, शिक्षणाचे समाजशास्त्र इ. विषयातील संशोधनाचे स्वरूप :**

स्वातंत्र्येत्तर कालखंडात औद्योगिक समाजशार्स्तीतील संशोधनाला देखील विशेष स्थान होते. कारण ब्रिटीश राजवटीमध्ये भारताचा औद्योगिक विकास फारसा झालेला नव्हता. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळात औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेला वेग आला होता. त्यामुळे कामगारांचा अभ्यास, उद्योजकांचा अभ्यास, औद्योगिक क्षेत्रातील नोकरशाहीचे स्वरूप, औद्योगिक संबंधाचा अभ्यास, कामगार संघटनांचा अभ्यास इ. क्षेत्रातील संशोधनाचे महत्त्व निर्माण झाले होते. आर्थिक विकासाचा परिणाम म्हणून निर्माण झालेल्या समस्यांचा अभ्यास संशोधनाचा केंद्रबिंदू होता. तसेच ज्यावेळी स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षण आयोग स्थापन करण्यात आला तसे शिक्षणा संबंधीचे विविध संशोधन शिक्षणाच्या समाजशास्त्रामध्ये केले गेले.

**उ) समाजशास्त्रातील सैद्धांतिक दृष्टिकोनाचा विकास :**

भारतातील समाजशास्त्राचा विकास जाणून घेत असताना केवळ समाजशास्त्रातील संशोधनांची विविध क्षेत्रातील व्याप्ती विचारात घेऊन चालत नाही. तर त्यासाठी सैद्धांतिक दृष्टीकोनातून समाजशास्त्राच्या अभ्यासामध्ये काय भर पडली हे माहित होणे आवश्यक आहे. योगेंद्रसिंग यांच्या मते, सैद्धांतिक दृष्टीकोनातून स्वातंत्र्योत्तर कालखंडात भारतातील समाजशास्त्रामध्ये प्रामुख्याने १) तुलनात्मक ऐतिहासिक दृष्टीकोन, २) तत्त्वज्ञानात्मक समाजशास्त्रीय दृष्टीकोन, ३) तर्कशास्त्रीय तत्त्वज्ञान दृष्टीकोन, ४) रचनात्मक कार्यात्मक दृष्टीकोन, ५) संख्यात्मक प्रत्यक्ष वाढी, दृष्टीकोन विकसित झाला,

**ऊ) समाजशास्त्रीय व्यावसायिक संस्थांची निर्मिती** (Professional Asociations) :

स्वातंत्र्योत्तर कालखंडात समाजशास्त्र अभ्यासाविषयाशी संलग्न असणाऱ्या विविध व्यावसायिक संस्था, संपूर्ण भारतभर स्थापन झाल्या. ही एक महत्त्वपूर्ण घटना होती. १९५२ मध्ये इंडियन सोशीयॉलॉजिकल

सोसायटीची स्थापना झाली व त्याचे पहिले श्रेय जी. एस. घुर्ये यांना जाते. याच कालखंडात Sociological Bulletin चे प्रकाशन सुरू केले. त्याचा फायदा संशोधकाना विविध अभ्यासविषयासंबंधीचे शेधनिबंध प्रकाशित करता येऊ लागले. तसेच इंडियन सोशीयॉलॉजिक सोसायटी मार्फत विविध ठिकाणी परिषदा आयोजित होऊ लागल्या. याशिवाय इंडियन जर्नल ऑफ सोशियॉलॉजी आणि सोशल सायन्स रिसर्च जर्नलच्या माध्यमातून समाजशास्त्राचे क्षेत्र व्यापक बनत गेले.

## १.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न (Check your Progress) - १

१. भारतातील समाजशास्त्रा संबंधीचा कालखंड कोणता होता ?

२. पाश्चात्य विचारवंतांची नावे सांगा ?

३. सी. ब्राअजल यांच्या पुस्तकाचे नांव काय ?

४. The Soundation of Indian Economy हा ग्रंथ कोणी लिहिला.

**स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न – २**

१. मुंबई विद्यापीठाची स्थापना केव्हा झाली.

२. एम. सी. प्रधान यांचा पीएच.डी. चा विषय कोणता होता?

३. समाजशास्त्राचे पहिले नियतकालीक केव्हा सुरू झाले ?

४. लखनौ विद्यापीठाने कोणते नियतकालीक सुरू केले ?

**स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न – ३**

१. क्षेत्रकार्यापद्धतीमध्ये मुख्यता कशाचा अभ्यास केला जातो ?

२. समाजशास्त्रीय संशोधनाचा केंद्रबिंदू कोणता होता ?

३. समाजशास्त्रीय संशोधनात कोणत्या विचारवंतांचा जास्त प्रभाव दिसून येतो.

४. इंडियन सोशिऑलॉजीकल सोसायटीची स्थापना केव्हा झाली.

## १.५ सारांश :

या पहिल्या घटकात आपण भारतीय समाजशास्त्राचा विकास आणि सामाजिक मानवशास्त्राचा विकास कसा झाला त्यासाठी अन्वेषणात्मक कालखंड, विकासात्मक कालखंड आणि विश्लेषणात्मक कालखंड इत्यादींच्या कालखंडाने वेगवेगळ्या भारतीय आणि भारता बाहेरील विचारवंतांचे यासाठी जे योगदान दिलेले आहे त्याचा सविस्तर अभ्यास या प्रकरणात केलेला आहे.

## १.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे –१

१. भारतीय समाजशास्त्रा संबधीचा कालखंड हा १७७४ ते १९१९ हा होता.

२. कार्ल मार्क्स, मॅक्स वेबर, हेन्रीमन ही पाश्चात्य विचारवंतांची नावे आहे.

३. Essence and Reality of the caste system in 1908 हे सी. बाऊजल यांच्या पुस्तकाचे नाव होते.

४. राधाकमल मुखर्जी यांनी लिहिला.

**स्वयं अध्ययनासाठीच्या प्रश्नांची उत्तरे – २**

१. १९१९ मध्ये मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली.

२. Untourachable in Bombay हा विषय होता.

३. १९२० मध्ये समाजशास्त्राचे पहिले नियतकालीक सुरू झाले.

४. Sociological Review हे नियतकालीक सुरू केले.

**स्वयं अध्ययनासाठीच्या प्रश्नांची उत्तरे – ३**

१. क्षेत्रकार्यपद्धतीमध्ये खेड्यातील कार्यपद्धतीचा अभ्यास केला जातो.

२. समाजशशस्त्रीय संशोधनाचा केंद्रबिंदू हा खेडेच आहे.

३. टॉलकॉट पार्सन्स, मिल्स, मर्टन, कार्ल मार्क्स, वेबर इत्यादी.

४. १९५२ मध्ये Indian Sociological Society ची स्थापना झाली.

## १.७ सरावासाठी प्रश्न (Exercise / Home Asignment) :

१. अन्वेषणात्मक कालखंडातील घडमोडींची चर्चा करा.

२. विकासात्मक कालखंडामध्ये विचारवंतांच्या योगदानाची चर्चा करा.

३. विश्लेणात्मक कालखंडातील क्षेत्रकार्य पद्धतीचा विषय लिहा ?

## १.८ चिंतन आणि कार्य (Reflection and Action) :

भारतीय समाजशास्त्राचा उदय, विकास व सामाजिक मानवशास्त्रीय विकास कसा झाला ते सांगून त्याची एक टिपणी तयार करा.

## १.९ अधिक वाचनासाठी पुस्तके (Suggested Readings) :


१. Shankar Rao C. N. Sociology of Indian Society, S. Chanda & company Ltd., New Delhi, 2009

२. Dube S.C. : Indian Society, National book of Trust, India-New Delhi 1992.

३. Oommen T. K. : Sociology for law students, eastern book company Ltd., New Delhi, 2004.

४. Yogendra Singh : Idelogy & Theory in Indian Sociology, Rawat Publications, Jaipur-2004

५. Nagla B. K. : Indian Sociological thought, Rawat Publications, Jaipur-2008.

६. Dhanagare, D. N. 2008 : Themes and Perspectives in Indian Sociology, Rawat Pblication, Jaipur.

❑❑❑

**सत्र २ : घटक २**

# भारतीय समाजविषयीचा दृष्टीकोन

## (Perspectives on Indian Society)

**घटक संरचना**

२.१ प्रस्तावना

२.२ उद्दिष्टे

२.३ विषय विवेचन

२.३.१ प्राच्यविद्या दृष्टीकोन (Indological Prespective)

डॉ. गोविंद सदाशिव घुर्ये (Dr. G. S. Ghurye)

ल्युईस ड्युमाँट (Louis Dumount)

२.३.२ संरचनात्मक दृष्टीकोन (Structural Prespective)

डॉ. एम. एन. श्रीनिवास (Dr. M. N. Shrinivas)

डॉ. एस. सी. दुबे (Dr. S. B. Dube)

२.४ सारांश

२.५ स्वयं अध्ययनासाठी उत्तरे

२.६ सरावासाठी प्रश्न

२.७ चिंतन आणि कार्य

२.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

## २.१ प्रस्तावना (Introduction) :

भारतीय समाज व्यवस्थेच्या अध्ययनविषयीचे मानवशास्त्र व समाजशास्त्रामध्ये अनेक दृष्टीकोन आहेत. त्यापैकी जास्ततर दृष्टीकोन हे पाश्चात्य मानवशास्त्रज्ञ आणि समाजशास्त्रज्ञानी विकसित केले आहेत. त्याद्वारेही भारतीय समाजाचा अभ्यास अनेक समाजशास्त्रज्ञानी केला आहे. परंतु भारतीय समाजाची पार्श्वभूमी समाजरचना, संस्कृती, सभ्यता ही जगातील इतर देशापेक्षा वेगळी असल्याने इतर देशात विकसित झालेले दृष्टीकोन वापरून भारतीय समाजाचे अध्ययन करण्यापेक्षा ऐतदेशीय दृष्टीकोन तयार करुन त्या दृष्टीकोनातून भारतीय समाजाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न काही भारतीय व परकीय समाजशास्त्रज्ञांनी केला आहे.

या प्रकरणात आपण ऐतदेशीय प्राच्यविद्या दृष्टीकोन म्हणजे काय ? व त्यानंतर हा दृष्टीकोन वापरून डॉ. जी. एस. घुर्ये यांनी भारतीय समाजाचे केलेले अध्ययन याचा आढावा घेणार आहोत. त्याच बरोबर फ्रेंच समाजशास्त्रज्ञ लुईस ड्यूमा यांनी प्राच्यविद्या दृष्टीकोन वापरुन भारतीय समाजाचे अध्ययन केले. त्यानंतर

संरचनात्मक प्रकार्यवाद म्हणजे काय ? यासाठी सुप्रसिद्ध भारतीय समाजशास्त्रज्ञ डॉ. एम. एन्. श्रीनिवास यांनी भारतीय समाजातील खेड्यांचा जातीव्यवस्थेचा अभ्यास केला. तर डॉ. एस. सी. दुबे यांनी भारतीय समाजातील आदिवासींचा व खेड्यांचा अभ्यास करून त्यांनी भारतीय समाजशास्त्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. भारतीय समाजाचा अभ्यास करताना त्यांनी संरचनात्मक प्रकार्यवादी दृष्टीकोनाचा अवलंब केला आहे.

## २.२ उद्दिष्टे (Objectives) :

या प्रणाचे अध्ययन केल्यानंतर आपल्याला -

१. प्राच्यविद्या दृष्टीकोनाचा अर्थ समजून घेता येईल.

२. प्राच्यविद्या दृष्टीकोन वापरून भारतीय समाजाचे जी. एस. घुर्वे यांनी केलेले अध्ययन समजून घेता येईल.

३. लुईस ड्यूमा या फ्रेंच समाजशास्त्रज्ञाचे भारतीय समाजाविषयीचे प्राच्यविद्या दृष्टीकोनातील संशोधन कार्य समजून घेता येईल.

४. संरचनात्मक - प्रकार्यवादी दृष्टिकोणाचा अर्थ समजून घेता येईल.

५. डॉ. एम्. एन्. श्रीनिवास यांचा जीवन परिचय करून घेता येईल.

६. डॉ. एम्. एन्. श्रीनिवास यांच्या ग्रंथांचा परिचय करून घेता येईल.

७. डॉ. एम्. एन्. श्रीनिवास यांनी संरचनात्मक-प्रकार्यवादी दृष्टिकोणातून भारतीय समाजाचे केलेले अध्ययन समजून घेता येईल.

## २.३ विषय विवेचन (Presentation of Subject Matter) :

विषय विवेचनामध्ये प्रामुख्याने आपण प्राच्यविद्या दृष्टीकोनाच्या अर्थाचे स्पष्टीकरण व नंतर प्राच्यविद्या दृष्टीकोनाचा वापर करुन जी. एस. घुर्ये आणि लुईस ड्यूमा यांचे भारतीय समाजाविषयीचे अध्ययन पाहू.

आपण या अगोदरच्या घटकामध्ये प्राच्यविद्या दृष्टिकोणाचा अभ्यास केला आहे. प्राच्यविद्या दृष्टिकोणाप्रमाणेच समाजशास्त्रात संरचनात्मक-प्रकार्यवादी दृष्टिकोणाचा अवलंब केला आहे. आपण या घटकात संरचनात्मक-प्रकार्यवादी दृष्टिकोणाचा अभ्यास करणार आहोत. नंतर डॉ. एम्. एन्. श्रीनिवास यांचा जीवन परिचय व ग्रंथ परिचय पाहणार आहोत. आणि शेवटी श्रीनिावस यांनी संरचनात्मक-प्रकार्यवादी दृष्टिकोणाच्या सहाय्याने भारतीय समााजचे केलेले अध्ययन पाहणार आहोत.

### २.३.१ प्राच्यविद्या दृष्टीकोन (Indological Perspective)

मानवशास्त्र व समाजशास्त्र या समाजाचे अध्ययन करण्यासाठी वेगवेगळे दृष्टीकोन विकसित झालेले आहेत, त्यामध्ये प्रामुख्याने ऐतिहासिक दृष्टीकोन, प्राच्यविद्या दृष्टीकोन, संरचनात्मक-कार्यवादी दृष्टीकोन, मार्क्सवादी दृष्टीकोन, सांस्कृतिक दृष्टीकोन, सभ्यतात्मक दृष्टीकोन, लोकउठाव दृष्टीकोन इ. चा समावेश होतो. यामध्ये प्रामुख्याने पाश्चीमात्य दृष्टीकोनाचे वर्चस्व आपणास दिसून येते. परंतु भारतीय समाजव्यवस्था ही गुंतागुंतीच्या ऐतिहासिक प्रक्रियांची निर्मिती असल्याने ह्या ऐतिहासिक प्रक्रिया घडून येण्यासाठी काही मोठ्या घटनांचा उल्लेख करणेही महत्त्वाचे आहे. यामध्ये प्रामुख्याने आर्याचे आगमन, भारतातील इतर धर्माचा उदय, (जैन, बौद्ध, शिख) व परकीय धर्माचे भारतातील आगमन त्याचबरोबर पाश्चात्यांचा वसाहतवाद,

वसाहतवाद विरोध स्वातंत्र्यलढा, भारताची फाळणी या ऐतिहासिक घटनांचा भारताच्या समाजनिर्मितीमध्ये महत्त्वाच्या आहेत. त्याचबरोबर भारतात सांस्कृतिक विविधता आणि विविधतेत एकता हे घटक इतर समाजापेक्षा वेगळे आहेत. म्हणून पाश्चात्य विचारवंतांनी विकसित केलेले दृष्टीकोन भारतीय समाजाला कितपत लागू पडतील हा विचार प्राच्यविद्या दृष्टीकोनाच्या निर्मितीला चालना देणारा होता.

प्राच्यविद्या दृष्टीकोनाचा वापर करून भारतीय समाजाचा अभ्यास करणाऱ्या समाजशास्त्रज्ञामध्ये जी. एस. घुर्ये यांचे नाव प्रामुख्याने घ्यावे लागेल. कारण घुर्ये ज्यावेळी परदेशातील समाजशास्त्राचे शिक्षण घेऊन भारतात परतले. त्यावेळी त्यांनी भारतीय समाजाचे अध्ययन पाश्चात्त्य दृष्टीकोनातून करणे यावर आपले मौन सोडले आणि भारतीय समाजाचे अध्ययन करण्यासाठी ऐतदेशीय दृष्टीकोनाची गरज असल्याचे स्पष्ट केले. कारण भारतीय समाजव्यवस्था पाश्चात्य देशांच्या तुलनेत वेगळी आहे. त्यासाठी पाश्चात्य दृष्टीकोन वापरणे योग्य नाही असे प्रतिपादन केले. त्यांच्यावेळी वसाहतकाळात ब्रिटिशांनी जे समाजाचे अध्ययन केले ते त्यांचे राज्य चालवण्यासाठी सुखकर होईल अशा दृष्टीकोनातून केले म्हणून पाश्चात्यांची भारतीय समाजविषयीची जाणीव ही एका धोरणाची होती म्हणून ती योग्य नव्हती अशी टिका घुर्ये यांनी पाश्चात्य दृष्टीकोनावर केली.

- **प्राच्यविद्या दृष्टीकोन म्हणजे काय ?**

  (What is Indological Prespective?)

प्राच्याविद्या या शब्दाचा शब्दश: अर्थ प्राचीन विद्या हा होय. भारतीय समाजाची संस्कृती इतर समाजापेक्षा वेगळी ओ. समाजाचा इतिहास समजून घेण्यासाठी त्या समाजातील अस्तित्वात असणाऱ्या, सांस्कृतिक जिवन विषयक धार्मिक प्राचीन ग्रंथाच्या सहाय्याने समाज जिवनाची वास्तवता समजून घेण्याचा प्रयत्न म्हणजे प्राच्यविद्या दृष्टीकोन होय यात प्रामुख्याने प्राचीन अभिजात साहित्याचा समावेश होतो. जसे वेद, पुराण, मनुस्मृती, रामायण, महाभारत इ. प्राच्यविद्या दृष्टीकोनामध्ये प्रामुख्याने प्राचीन ग्रंथ (text) चे निर्वचन करणे, प्राचीन भारतीय संस्कृती व भाषेच्या अध्ययनाच्या समस्या जाणून घेणे, यावरही भर देण्यात आला आहे. यासाठी भारतीय पुरातत्व खाते, लोकआलेखपद्धती, मानवशास्त्रीय पुरावे या घटकाचाही समावेश होतो.

टी. के. ओमन यांच्या मते, ''प्राच्यविद्या दृष्टीकोन म्हणजे हिंदू धर्मातील कांही आदर्शावर प्रकाश टाकण्याचा, लक्ष केंद्रित करण्याचा प्रयत्न आहे. यामध्ये प्रामुख्याने धर्म (कर्तव्य), कर्म (कृती) पुनर्जन्मावर विश्वास आणि मोक्ष (स्वर्ग), हिंदू परंपरा, जातीव्यवस्था, एक विवाह पद्धती एक मूल्यव्यवस्था याचा यात समावेश होतो.'' थोडक्यात, प्राच्यविद्या दृष्टीकोन हिंदू समाजाचे आदर्शवत जिवन समजून घेण्यासाठी वापरला आहे.

थोडक्यता प्राच्यविद्या दृष्टीकोन म्हणजे भारतीय समाजाची संस्कृती, समाजव्यवस्था, मूल्य परंपरा, सामाजिक जिवन हे प्राचीन धर्मग्रंथाच्या आधारे समजून घेण्याचा केलेला प्रयत्न होय.

- **स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-१** (Check your Progress)

  खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.

  १. प्राच्यविद्या शब्दाचा अर्थ काय ?

  २. भारतीय समाजाचे अध्ययन करण्यासाठीचे कोणतेही दोन दृष्टीकोन लिहा.

  ३. लुईस ड्यूमा हा कोणत्या देशाचा समाजशास्त्रज्ञ होता ?

४. हिंदू धर्मातील कोणतेही दोन आदर्श लिहा.

- **डॉ. गोविंद सदाशिव घुर्ये** (१८९३-१९८४)

हे भारतीय समाजशास्त्राच्या बौद्धीक आणि संशोधकाच्या वर्तुळातील वेगळे व्यक्तीमत्त्व म्हणून परिचित आहेत. त्यांच्या असाधारण कर्तव्यामुळे 'भारतीय समाजशास्त्राचे जनक' म्हणूनही ओळखले जाते. त्याच बरोबर त्यांना 'समाजशास्त्रीय सृजनशिलतेचे प्रतिक' म्हणूनही ओळखले जाते. भारतीय समाजशास्त्राच्या विकासात घुर्ये यांचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे. हे आपण त्यांच्या कार्याच्या दोन बाजू लक्षात घेऊन समजून घेऊ.

१. भारतीय समाजाविषयीचे वेगवेगळ्या क्षेत्रातील संशोधन वाढवणे व चालना देणे.

२. घुर्येचे स्वत:चे लिखाण, यामध्ये प्रामुख्याने सैद्धांतिक विवेचन व समाजशास्त्राच्या भूमिकेविषयीची दूरदृष्टी या दोन्ही बाबतीत घुर्ये यांचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे हे आपण सविस्तर अभ्यासणार आहोत.

- **पार्श्वभूमी** (Background) :

गोविंद सदाशिव घुर्ये यांचा जन्म १२ डिसेबंर १९९३ रोजी महाराष्ट्रातील कोकणात मालवन येथे एका सारस्वत ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांचा मृत्यू २८ डिसेबंर १९८३ मुंबई येथे झाला. घुर्ये विद्यार्थी असताना समाजशशस्त्र हा विषय भारतात महाविद्यालय आणि विद्यापीठ स्तरावर अध्ययनासाठी नव्हता. तरीही त्यांनी युरोपमध्ये समाजशास्त्रामध्ये शिक्षण घेऊन समाजशास्त्र विषयाला जागतिक मान्यता मिळवून देण्याचा प्रयत्न केला. घुर्ये यांनी कॉलेज जीवनात संस्कृत विषयाचे अध्ययन केले. त्याच बरोबर इंग्रजी विषयाचे अध्ययनही त्यांनी केले. एलफिन्स्टन कॉलेजात नोकरी करीत असताना घुर्येनी मुंबई एक नागरी केंद्र (Bombay as an Urban Centre) या विषयावर पेट्रीक गिडस यांच्या मार्गदर्शनाखाली एक शोधनिबंध सादर केला. ज्यामुळे त्यांना परदेशी जाण्यासाठी संधी मिळाली. सुरुवातीच्या काळात घुर्ये यांनी 'लंडन स्कुल ऑफ इकॉनॉमीक्स' येथे एल. टी. हॉब हाऊस यांच्या बरोबर काम केले. नंतर ते कॅब्रिंज विद्यापीठात गेले. तेथे त्यांनी डब्ल्यू, एच. आर. रिव्हर्स यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच.डी. चे काम केले. ते करत असताना रिव्हर्स यांचा मृत्यू झाला नंतर त्यांनी ए. सी. हाडन यांच्या मार्गदर्शनाखाली "Caste and Race in India" या विषयावर पीएच.डी. मिळवली.

भारतात परत आपल्यानंतर त्यांनी भारतीय समाजशास्त्राचा विकास हाच ध्यास धरला आणि जवळ जवळ ५० वर्षाचा काळ त्यांनी समाजशास्त्राच्या विकासासाठी खर्च केला. संशोधक विद्यार्थ्यांना मार्गदर्शक म्हणूनही त्यांनी नावलौकिक मिळवला. ज्यामध्ये भारतातील महत्त्वाचे समाजशास्त्र त्यांच्याकडून प्राशिक्षित झाले. भारतीय समाजशास्त्राच्या विकासासाठी त्यांनी १९५२ मध्ये (Indian Sociological Society) नावाच्या संस्थेची स्थापना केली. ही संस्था आज समाजशास्त्र विषयाची सर्वात महत्त्वाची राष्ट्रीय पातळीवरील संस्था म्हणून प्रसिद्ध आहे. त्याचबरोबर या संस्थेमार्फत संशोधनपर लेख प्रकाशित करण्यासाठी समाजाशस्त्रीय जर्नल (Sociological Bulletin) चालू केले. आजही याचे महत्त्व सर्व भारतीय समाज शास्त्रज्ञासाठी महत्त्वाचे आहे.

याच बरोबर घुर्ये यांनी भारतीय विज्ञान परिषदेच्या (१९३४) मानवशास्त्र विभागाचे अध्ययन म्हणून काम केले. त्याच वर्षात त्यांना ''रॉयल आशियाटिक समाज'' संस्थेचे प्रतिनिधी म्हणून पाठवण्यात आले. या संस्थेवर त्यांनी १९४८ पर्यंत कार्य केले.

घुर्ये यांचा मुख्य अभ्यासविषय वेगवेगळ्या सभ्यतामध्ये संस्कृतीच्या उत्क्रांतीची सामान्य प्रक्रिया त्यातल्या त्यात भारतीय हिंदू सभ्यतेच्या उत्क्रांतीचे अध्ययन हा होता.

- **डॉ. घुर्येंची सैद्धांतिक आणि पद्धतशास्त्रीय चौकशी** (Ghurye's Theoretical and Methodological framework)

डॉ. घुर्येंचे पद्धतीशास्त्र हे भारतीय समाजाशस्त्रामध्ये एक महत्त्वाचे योगदान आहे. जरी घुर्ये यांचे समाजशास्त्राच्या अभ्यासाचे प्रशिक्षण केंब्रिज आणि ऑक्सफोर्ड येथे झाले असले तरी त्यांनी भारतीय समाजाच्या अध्ययनासाठी ऐतदेशीय पद्धतीशास्त्राचा वापर समाजाच्या अध्ययनासाठी केला. घुर्ये यांनी प्राचीन ग्रंथाच्या आधारे भारतीय समाज समजून गेण्याचा प्रयत्न केला. त्याच बरोबर ग्रामीण, शहरी व आदिवासी समुदायाचाही अभ्यास घुर्ये यांनी केला. थोडक्यात घुर्ये हे पद्धतीशास्त्राच्या बाबतीत ''बहू आयामी पद्धतीशास्त्र'' वापर करणारे समाजशास्त्रम म्हणून परिचित आहेत. थेडक्यता घुर्वे यांनी भारतीय समाजाचे अध्ययन करण्यासाठी विविध पद्तीचा अवलंब केला. त्यात प्रामुख्याने ऐतिहासिक पद्धती, तुलनात्मक पद्धती आणि सर्वेक्षण पद्धतीचा समावेश आहे.

- **डॉ. घुर्ये यांचे कार्य** (Work of Ghurye)

घुर्ये यांनी आपल्या कार्यकाळात वेगवेगळ्या Theme व दृष्टीकोनातून आपले योगदान देण्याचा प्रयत्न केला आहे. यात प्रामुख्यनो उल्लेख करण्यासारखे म्हणजे घुर्वेचे लिखाण हे साहित्यीक, ऐतिहासिक, पुातत्वीय, रंगकार्य, मुर्तीशास्त्र या स्त्रोताच्या आधारे तयार केल्याचे दिसून येते.

१९८० पर्यंत त्यांनी एकतीस पुस्तके लिहिली होती. त्यातील काही महत्त्वाची पुतके खालीलप्रमाणे–

1. Caste and Race in India - 1932-1955
2. Cuture and Society - 1947
3. The Indian Sadhus, 1953
4. Family and Kin in Indo-European Culture, 1955
5. Cities and Civilization, 1962
6. Anatomy of a Rural - Urban Community, 1963
7. Scheduled Tribes,, 1963
8. Religious Consciousenes, 1965
9. Social Tensions in India, 1968
10. Indian acculturation, 1977
11. Vedic India

घुर्येंच्या कार्याचे वर्गीकरण वेगवेगळ्या टप्यात मांडता येते. परंतु या बाबतीत महत्त्वाचे म्हणजे प्रामाणिक (१९९४) यांनी घुर्ये यांचे कार्य सहा विभागत मांडण्याचा प्रयत्न केला आहे. ते आपण थोडक्यात अभ्यासणार आहोत.

१) जात, २) जमात, ३) आप्तसंबंध, कुटुंब, विवाह, ४) संस्कृती, सभ्यता आणि शहरांची ऐतिहासिक भूमिका, ५) धर्म, ६) संघर्षाचे आणि एकात्मीकरणाचे समाजशास्त्र.

● **जातीव्यवस्था विषयक संशोधन** (Research regarding Caste System) :

भारतीय समाज व्यवस्थेत जातीव्यवस्था ही महव्वाची सामाजिक उप व्यवस्ता असल्याने ती समजून घेणे अतिशय महत्त्वाचे आहे. कारण मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात जसे सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय इ. जातीव्यवस्था ही महत्त्वाचे कार्य करते. जाती व्यवस्था समजून घेण्यासाठी घुर्ये यांनी ऐतिहासिक, मानवशास्त्रीय आणि समाजाशस्त्रीय दृष्टीकोनातून ती समजून घेण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. जाती व्यवस्तेच्या उत्पत्ती विषयी व कार्याविषयी त्यांनी अभिजात प्राचीन ग्रंथ स्त्रोत म्हणून वारपरले आणि जाती व्यवस्था समजून घेण्याचा प्रयत्न केला. त्याच बरोबर घुर्ये यांनी जातिव्यवस्था व आप्तसंबंध व्यवस्ता ह्या ऐतिहासिक, तुलनात्मक आणि एकात्मीक दृष्टीकोनाच्या माध्यमातून समजून घेण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते.

घुर्ये यांनी भारतातील जातीव्यवस्ता व आप्तसंबंध व्यवस्था यांचा इतर समाजाशी तुलनात्मक अभ्यास करत असताना खालील मुद्दे मंडले.

१) भारतीय आप्तसंबंध आणि जाती व्यवस्था हे इतर समाजातील व्यवस्थासारखेच आहेत.

२) भारातील आप्तसंबंध आणि जातीव्यवस्था यांनी यापूर्वी एकात्मीकरणाचे कार्य केले आहे.

घुर्ये यांच्या मते समाजाची उत्क्रांती ही वेगवेगळ्या वांशिक, गटांच्या आप्तसंबंधाद्वारे असणाऱ्या संबंधाच्या वांशिक, गटांच्या आत्मसंबंधाद्बो असणाऱ्या संबंधाच्या एकात्मीकरणाचा परिणाम होय. घुर्ये यांनी भारतीय समाजशास्त्रासाठीचे योगदान समजून घेण्यासाठी त्यांच्या 'उरींश रपव ठरलश ळप खपवळर' या ग्रंथाचा उल्लेख करणे अपरिहार्य आहे. या ग्रंथात त्यांनी जी जातीची संरचनात्मक वैशिष्ट्ये सांगितली आहेत ती थोडक्यता पुढीलप्रमाणे -

१. **खंडात्मक विभागणी** (Segmental division):

जातिव्यवस्थेचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे खंडात्मक विभागणी हे होय. यामध्ये प्रामुख्याने जातीव्यवस्थेचे स्वरुप हे वेगवेगळ्या खंडात झाले आहे. यामध्ये प्रामुख्याने जातीव्यवस्थेचे स्वरूप हे वेगवेगळ्या प्रदेशात वेगळे आढळते. जातीचा दर्जा व कार्य ही प्रदेशानुसार / खंडानुसार वेगळी आढळतात. म्हणून सर्वच जातीचे समाजातील स्थान सर्वत्र सारखे आढळत नाही.

२. **श्रेणी रचना** (Hierarchy) :

श्रेणीरचना हे एक भारतीय जातीव्यवस्थेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. यामध्ये प्रामुख्याने श्रेष्ठ-कनिष्ठता, पवित्र-अपवित्रता या संकल्पना महत्त्वाच्या आहेत. ब्राह्मण हे श्रेणीरचनेतील सर्वात उच्च-श्रेष्ठ दर्जा असणारा वर्ग होता तर क्षुद्र हा कनिष्ठ व कमी दर्जा असणारा गट होता. पंचम (दलित वर्ग) हा या व्यवस्थेबाहेरचा मानण्यात आला होता. म्हणजेच समाजाच्या श्रेणीरचनेत दलितांचे स्थान सर्वात कनिष्ठ स्वरुपाचे होते.

### ३. **पवित्र अपवित्रतेच्या संकल्पना** (Pollution and Purity) :

पवित्र अपवित्रतेच्या संकल्पना हा घटक जातीव्यवस्थेतील महत्त्वाचा घटक आहे. कारण श्रेणी रचनेतील उच्च-श्रेष्ठ वर्गाचे व्यवसाय हे पवित्र मानले आहेत. उदा. ब्राह्मणाचे कार्य ज्ञान घेणे व देणे पवित्र मानले आहे. तर इतर वर्गाचे व्यवसाय व कार्य हे तुलनेने कमी महत्त्वाचे व अपवित्र मानले आहे. जसे राजा हा राजा असला तरी त्याचे शुद्धीकरण ब्राह्मणाने करावे नंतरच तो राजा होतो. म्हणजे राजा पेक्षाही ब्राह्मण श्रेष्ठ अशी कल्पना आहे. हे आपणास शाहू महाराजांच्या वेदोक्त प्रकरणावरून लक्षात येईल. त्याच बरोबर शुद्र वर्गाचे सर्वच व्यवसाय हे अपवित्र असल्याचे मानल्याने या लोकांचा स्पर्शही अपवित्र आहे ही भावना जातीव्यवस्थेत आढळते.

### ४. **धार्मिक आणि नागरी असमर्थता आणि विविध घटकांचे विशेषाधिकार** :

(Civil and Rural gious disabilities and Privileges of different Sections) :

जातीव्यवस्थेमध्ये काही घटकांना नेहमीच आपोआप काही विशेषाधिकार मिळाले आहेत तर काही घटकांना आपोआप दारिद्र्य, दु:ख, मिळाले आहे. जसे उच्च जातीत जन्माला आल्यास संपत्ती, सत्ता, अधिकार, दर्जा हा आपोआप त्यासंबंधित कुटुंबाकडून व्यक्तीस मिळतो. तर कनिष्ठ जातीत जन्माला आल्यास साहजिकच दु:ख, यातना, कष्ट, अन्याय, अत्याचार या गोष्टीना सामोरे जावे लागते. धार्मिक जिवनात कनिष्ठ जातीना देवळाच्या देव्हाऱ्याच्या बाहेरील सर्व कामासाठी वापरले जाते मात्र त्यांना आतमध्ये कोणत्याही कार्यात हस्तक्षेप करता येत नाही. ते फक्त ब्राह्मणच करु शकतात. आजही आपण आपल्या सभोवताली मंदिर प्रदेशासाठी दलितांचा संघर्ष करताना पाहतो हे एक याचे उदाहरण आहे.

### ५. **व्यवसाय निवडीवर निर्बंध** (Lack of Choice of Occupation) :

ब्राह्मण, क्षेत्रीय, वैश्य, शुद्र यांच्या व्यवसायाचे वाटप हे त्यांच्या जातीच्या आधारावरती झाले असल्याने व्यवसाय बदलणे हे जाती व्यवस्थेच्या तत्त्वाच्या विरोधातील आहे. असा एक काळ होता, परंतु आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत जातीव्यवस्थेचे हे वैशिष्ट्य काही प्रमाणात दबलेले आढळून येते. जसे बरेचसे पूर्वीचे कनिष्ठ वर्गातील समजलेले लोक ज्ञानदानाचे कार्य करत आहेत. तर पूर्वी ज्ञानदानाचे कार्य करणारे लोक आता पूर्वी कनिषठ मानले जाणारे व्यवसाय करत आहेत.

### ६. **विवाहावरील निर्बंध** (Restrictions of Marriages) :

भारतीय समाजात किती जाती आणि उपजाती आहेत हे आजही स्पष्ट नाही. परंतु एक गोट स्पष्ट आहे ती म्हणजे प्रत्येक जात आणि उपजात ही आंतरर्विवाही आहे. म्हणजे विवाह हा आपल्या उपजातीत-जातीत झाला पाहिजे असे याचे तत्त्व होय. आधुनिकीकरणाच्या काळातही आंतर्विवाह हा प्रत्येक समुदायात महत्त्वाचा मानला जातो. म्हणजेच भारतातील प्रत्येक जात-उपजात समूह हा अंतरर्विवाही व्यवस्थेचे समर्थन करणारा आहे. हे एक जाती व्यवस्थेचे वैशिष्ट आहे.

घुर्ये यांनी वरील जे महत्त्वाचे वैशिष्ट सांगितले आहेत त्यामध्ये प्रामुख्याने श्रेणीरचना आणि आंतर्विवाह हे जातीव्यवस्थेची प्रमुख वैशिष्ट्ये मानले आहे. त्याच बरोबर जाती ही आप्तसंबंध व्यवस्थेबरोबर जोडली जाते. जात हा अंतरर्विवाही समूह आहे तर गोत्र हा बर्हिविवाही समूह आहे. गोत्र हे सर्व ब्राह्मण समूदायांनी बहिर्विवाही मानले आहे. त्यामुळे त्याचे अनुकरण इतर समुदायही करताना दिसून येतात. गोत्रातील सर्व व्यक्ती (ऋषी) कोणत्या ना कोणत्या कारणाने रक्तसंबंधी असल्याने बर्हिविवाह हा एक महत्त्वाचा नियम

यामध्ये पाळला जातो. शेवटी घुर्ये म्हणतात की, भारतातील ब्राह्मणवाद्यांनी जाती व्यवस्थेतील श्रेणीरचना आणि प्रविण-अपवित्रतेच्या कल्पनांच्या आधारे धर्मशास्त्रामध्ये जातीव्यवस्थेचे कायदेशीकरण केले आहे.

- **जमाती** (Tribes) :

जी. एस. घुर्ये यांच्या अध्ययनाचे दुसरे महत्त्वाचे क्षेत्र म्हणजे भारतातील जमातीचे अध्ययन होय. खरे तर हा मानवशास्त्राच्या अभ्यासाचा महत्त्वाचा अभ्यासविषय आहे. असे मानले तरी मानवशास्त्रज्ञांनी भारतातील जमातीविषयी उपस्थित केलेले प्रश्न आणि उपाय आणि स्थिती हे घटक महत्त्वाचे आहेतच परंतु या क्षत्रित समाजशास्त्रज्ञाचा शिरकाव होणे हेही महत्त्वाचे आहे. कारण जमातीचा अभ्यास मानवशास्त्रमानी ज्या पद्धतीने मांडला त्यमाध्ये समाजशास्त्रीय दृष्टीकोनाची कमतरता जाणवली म्हणून घुर्ये यांनी जमातीविषयीचे अध्ययन अतिशय काळजीपूर्वक केले.

घुर्ये यांनी वर्गीकृत जमाती (Scheduled Tribes) हे पुस्तक लिहले. त्यामध्ये त्यांनी भारतीय जमातीच्या ऐतिहासिक, प्रशासकीय आणि सामाजिक पैलुंच्या संदर्भात अध्ययन केले. विशेषत: घुर्ये यांनी महाराष्ट्रातील 'महादेव कोळी' या जमातीचा अभ्यास केला. जमातीबाबत मानवशास्त्रज्ञानी मांडलेले विचार घुर्ये यांनी आणखी स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. यामध्ये प्रामुख्याने मानवशास्त्रज्ञ हे जातींची कोणत्याही परिस्थितीत वेगळी स्वतंत्र ओळख ठेवण्याच्या विचाराचे होते तर घुर्ये यांनी याबाबत विश्‍वास व्यक्त केला की भारतातील विविध जमाती ह्या पूर्वीच हिंदू झालेल्या आहेत. यालाच त्यांनी जमातीं हिंदूकरण असे म्हटले आहे आणि असे स्पष्ट केले की जमाती या स्वतंत्र वेगळ्या आहेत हे सरळ चुकीचे आहे. आणि शेवटी घुर्ये यांनी या जमातीना 'मागासलेल्या हिंदू जाती' (Backward Caste Hindus) असे म्हटले आहे. या हिंदू जातीचे मागासलेपणाचे महत्त्वाचे कारण म्हणजे या जातीचा मुख्य प्रवाहातील जाती पासून असलेले अलगीकरण हे आहे.

- **ग्रामीण-नागरीकरण** (Rural-Urbanization) :

घुर्ये हे अष्टपैलू व्यक्तीमत्त्व असणारे समाजशास्त्रज्ञ होते. त्यामुळे त्यांनी आपल्या अभ्यासाचे क्षेत्र व्यापक ठेवले होते. जातीव्यवस्था आप्तसंबंध व्यवस्था, भारतातील वर्गीकृत जमाती यांच्या अभ्यासाबरोबरच त्यांनी भारतातील ग्रमीण-नागरीकरण या विषयावरही संशोधन केले आहे.

घुर्ये यांच्या मते भारतातील नागरीकरण हे फक्त औद्योगिक वाढीचा परिणाम नाही किंवा फक्त औद्योगिकरणानंतरच भारतात नागरीकरण चालु झाले आहे असे नाही. तर नागरीकरणाची प्रक्रिया खऱ्या अर्थाने ग्रामीण भागातूनच चालू झाली. घुर्येच्या मते नागरीकरणाची भारतातील प्रक्रिया स्थानिक भागातील बाजाराच्या गरजेनुसार ग्रमीण भागात सुरु झाली. शेतीच्या उत्पादनातील वाढीमुळे उत्पादनाला बाजार मिळवण्यासाठी ग्रामीण भागात बाजार उभे राहिले. याचाच परिणाम असे ग्रामीण भाग नगरामध्ये परिवर्तीत झाले. त्याचाच परिणाम नंतर या ग्रामीण भागामध्ये प्रशासकीय, न्यायीक आणि इतर संस्थांची उभारणी झाली. या सर्वांना आधार होता तो सरंजामशाहीचा आणि सिल्क कापड, दागिने, मेटल, शस्त्र तयार करणाऱ्या व्यवसायाचा यातुनच भारतातील शहराचा विकास चालू झाला.

थोडक्यात आपणास यावरून असे लक्षात येते की, घुर्ये यांचा ग्रामीण नागरीकरणाचा दृष्टीकोन हेच स्पष्ट करतो की, नगरवादाचा भारतीय स्त्रोत हा ग्रामीण नागरीकरण आहे. घुर्येच्या मते मोठी शहरे ही उच्च शिक्षण, संशोधन, न्यायीक व्यवस्था, आरोग्य सेवा, मुद्रित माध्यमे आणि जनसंपर्क माध्यमे यांचे केंद्र आहेत

आणि ते सांस्कृतिक विकासाचे केंद्र म्हणून काम करत आहे. शहराची मुख्य कार्ये म्हणजे सांस्कृतिक एकात्मीकरणाची भूमिका पार पाडणे हे आहे.

नागरी समाजाच्या समस्या विषयी घुर्ये यांनी खालील बाबींचे नियोजन योग्य पद्धतीने होणे गरजेचे आहे असे प्रतिपादन केले आहे.

१. पिण्याच्या पाण्याचा मुबलक पुरवठा

२. मानवी कोंडी कमी करण्यासाठी प्रयत्न करणे.

३. वाहतूकीची कोंडी कमी करण्यासाठीचे प्रयत्न करणे.

४. सार्वजनिक वाहतूकीचे नियंत्रण.

५. रेल्वे सुविधा सुधारणे इ.

६. झाडांची लागवड करणे (तोडणी थांबवणे)

७. ध्वनी प्रदूषण कमी करणे.

८. पादचाऱ्यासाठी सुविधा करणष.

यावरून आपल्याला असे लक्षात येते की, घुर्ये हे किती दूरदृष्टी असणारे समाजशास्त्रज्ञ होते.

- **संस्कृती आणि सभ्यता** (Culture and Civilization) :

घुर्ये यांच्या मते कोणताही समाज समजून घ्यायचा असेल तर त्या समाजाची संस्कृती समजून घेणे महत्त्वाचे असते. कारण त्या समाजाची संस्कृती हा त्या समाजव्यवस्थेचा मुलभूत घटक असतो. त्याद्वारे आपण त्या समाजाची उत्क्रांती समजून घेऊ शकतो. या संबंधीचे घुर्ये यांचे लिखाण महत्त्वाचे म्हणजे, (The Disposal of Human Placenta) या प्रकाशनाद्वारे आपण घुर्ये यांचे भारतीय संस्कृतीच्या अध्ययनाची रुपरेषा समजू शकतो. संस्कृती ही त्या समाजाच्या मूल्यांची व्यवस्था असते. घुर्ये यांच्या मते व्यक्तीमध्ये आपली संस्कृती टिकवण्यासाठी मूल्यावर प्रचंड श्रद्धा असते व ती बदलत्या काळानुसार बदलत नवीन मूल्ये स्वीकारण्याची क्षमता निर्माण करण्यास मदत करते.

घुर्ये हे हिंदू संभ्यतांच्या उत्क्रांतीबद्दल नेहमीच संबंधित होते. कारण हिंदू सभ्यता ही इतर सभ्यतांच्या तुलनेत 'गुंतागुंतीची सभ्यता' मानली जाते. त्यांच्या मते ऐतिहासिक सभ्यतांच्या सांस्कृतिक गतिशिलतांचे विश्लेषण करण्यासाठी काही प्रक्रिया स्पष्ट करणे गरजेचे आहे. त्यांच्या मते acculturation प्रक्रिया ही संस्कृतीच्या प्रसारण प्रक्रियेपेक्षा महत्त्वाची आहे. त्यामुळे सांस्कृतिक प्रक्रियांचे विश्लेर करणे हे भारतीय समाजशास्त्रज्ञांच्या समोरील महत्त्वाचे आव्हान आहे. घुर्ये यांच्या मते सभ्यतांचा ऱ्हास आणि विकास हा संस्कृतीचे गतिशीलतेचा परिणाम आहे. त्यांच्या मते 'आधुनिक सभ्यतांचा सामुदायिक वारसा' हा सभ्यतांचा सामुदायिक मानवता वादासाठीचा प्रयत्न आहे आणि शेवटी सभ्यतांच्या वाढीसाठी संस्कृतीचे गतिशील घटक हे अतिशय महत्त्वाचे असतात ते थोडक्यात पुढीलप्रमाणे –

१. धार्मिक जाणिव

२. सद्सद्विवेक बुद्धी

३. न्याय

४. ज्ञान आणि मुक्त अभिव्यक्तिचा मूक्त पाठलाग

५. परधर्म सहिष्णूता इ.

कोणत्याही संस्कृतीमध्ये वरील घटक सांस्कृतिक गतिशलता निर्माण करण्यास महत्त्वाचे असतात. याद्वारे संस्कृती सभ्यतेकडे वाटचाल करत असते.

● **धर्माचे समाजशास्त्र या क्षेत्रातील घुर्ये यांचे कार्य** (Work of G. S. Ghurye in the field of Sociology of Religion) :

घुर्ये यांच्यामते धर्म हा मानवी जीवनाचा मुलभूत घटक आहे. यांच्यामते मानवाला सद्‌सद् विवेक बुद्धी विषयक विचार सभ्यतेच्या विकासाच्या पूर्वीच सुचलेले होते. त्यातूनच धर्माचा उदय झाला. धर्माच्या समाजशास्त्राच्या क्षेत्रात घुर्ये यांच्या पूर्वी काही समाजशास्त्रज्ञांनी अध्ययन केले आहे. त्यात प्रामुख्याने मॅक्स वेबर यांचे 'The protestants Ethics and Spirit of Capitalism' हा ग्रंथ महत्त्वाचा आहे. त्याचबरोबर एमिल दुरखिम या समाजशास्त्रज्ञानेही 'The Elementry forms of Religious life 1915' या पुस्तकामध्ये धर्माविषयक समाजशास्त्रीय विचार मांडले आहेत.

घुर्ये यांच्या मते मानवाच्या सांस्कृतिक वारशामध्ये धर्म हा केंद्रस्थानी आहे. म्हणजेच संस्कृतीच्या गतिशिलतेच्या घटकातही धार्मिक जाणिव हा घटक अतिशय महत्त्वाचा मानला आहे. धर्म हा समाजातील मानवाच्या वर्तनाला दिशा देतो व बदलतो.

घुर्ये यांनी भारतीय धार्मिक श्रद्धा आणि चालीरिती संदर्भात महत्त्वाचे योगदान त्यांच्या अभ्यासाद्वारे देण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये प्रामुख्याने खालील संशोधने महत्त्वाची आहेत.

१. भारतीय साधू - १९५३

२. देव आणि माणूस - १९६२

३. धार्मिक जाणिव - १९६५

४. भरतीय संचयीकरण - १९७७

५. वैदिक भारत - १९७९

६. रामायनाचा वारसा - १९७९

यावरील संशोधन कार्याच्या आधारे आपण घुर्ये यांचे धर्माचे समाजशास्त्र या विषयाला दिलेले योगदान समजून घेऊ शकतो. यामध्ये त्यांनी प्रामुख्याने समाजातील धर्माच्या भूमिकेविषयी संशोधन केले आहे.

● **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - २** (Check your progress)

खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. भारतीय समाजशास्त्राचे जनक म्हणून कोणास ओळखले जाते ?

२. डॉ. जी. एस. घुर्ये यांनी कोणत्या विषयावर पी.एच्.डी. मिळविली.

३. 'इंडियन सोशालॉजिकल सोसायटीची' स्थापना केव्हा झाली.

४. डॉ. घुर्ये यांच्या पद्धतीशास्त्रातील दोन महत्त्वाच्या पद्धती कोणत्या ?

५. डॉ. घुर्ये यांच्या मते भारतातील मागासलेल्या जमातीचे मागासलेपण असण्याचे कारण कोणते?

- **लुईस ड्यूमाँट :** (१९११ - १९९८)

लुईस ड्युमाँट हा जगप्रसिद्ध फ्रेंच समाजशास्त्रज्ञ होता. ड्यूमाँटने आपले समाजशास्त्रातील कार्य १९३० च्या दरम्यान चालू केले. परंतु नंतर दुसऱ्या महायुद्धाच्या काळात यामध्ये काहीना काही कारणाने त्यांच्या अध्ययनात व्यत्यय आला. याच काळात युद्ध कैदी म्हणून काही दिवस त्यांना जर्मनीमध्ये बंदिस्त ठेवण्यात आले होते. तेथे त्याने या काळात जर्मन भाषा अवगत केली. ड्यूमाँटच्या अध्ययनाचे क्षेत्र हे यूरोप आणि आशिया हे खंड होते. असे असले तरीही भारतीय समाजाविषयीचे त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे.

आपल्या संशोधन पद्धतीचे ड्यूमाँट याने लोक-आलेख पद्धतीचा वापर व्यापक प्रमाणात केला. त्याचबरोबर समग्रलक्ष्मी दृष्टीकोन (holistic approach) चा वापर त्यांनी समाजाच्या अभ्यासासाठी केला. ड्यूमाँट यांनी दक्षिण भारतातील तामीळनाडू राज्यातही समाजशास्त्रीय संशोधन केले. विशेषत: १९४९ ते १९५० दरम्यान प्रमलाई कालार (Pramalai Kallar) या जातीचे अध्ययन केले. त्यांच्या मते अभिजात भारताच्या निर्मितीमध्ये द्रविडियन आणि आर्यन यांच्या संपर्कामुळे हिंदूवादाचे सामाजिक आर्थिक दृष्ट्या वेगळेपण येथे आहे ते अभ्यासने महत्त्वाचे होते ते त्यांनी अभ्यासले.

१९५७-५८ च्या दरम्यान ड्यूमाँट यांनी उत्तर भारतातील उत्तर प्रदेशातील गोरखपूर जिल्ह्यातील एका खेड्याच्या अध्ययनासाठी जवळ-जवळ पंधरा महिने परिश्रम घेतले. परंतु दक्षिण भारतातील कार्याइतका चांगले अनुभव ड्यूमाँट यांना उत्तर भारतात आला आहे.

- **लुईस ड्यूमाँट पद्धतीशास्त्र** (Methodology of Louis Dumont) :

भारतीय समाजाच्या अध्ययनासाठी लुईस ड्यूमांट यांनी खालील महत्त्वाचे सैद्धांतिक दृष्टीकोन वापरले. ज्यामध्ये त्यांनी विवाह पद्धती, आप्तसंबंध, जातिव्यवस्था, या सामाजिक संस्थांचे अध्ययन केले. प्रामुख्याने खालील घटक हे ड्यूमाच्या पद्धतीशास्त्राचे मुख्य आधार आहेत.

१. विचार प्रणाली आणि संरचना

२. संक्रमणात्मक संबंध आणि तुलना

३. प्राच्यविद्या आणि संरचनात्मक दृष्टीकोन

४. सजातीय ऐतिहासिक दृष्टीकोन

भारतीय समाजातील जाती व्यवस्थेचे अध्ययन करण्यासाठी लुईस ड्यूमाँट यांनी प्राच्यविद्या दृष्टीकोनाचा अवलंब केला. आणि यामध्ये प्रामुख्याने त्यांनी प्राच्यविद्येमध्ये असणाऱ्ये जातीविषयक विचारप्रणालीचे अध्ययन करण्याचा प्रयत्न केला. ड्यूमाँटच्या मते विचारप्रणाली म्हणजे, ''मूल्य आणि कल्पना यांचा एकत्रीत केलेला संच होय.'' ड्यूमाँटच्या मते भारतीय सभ्यता म्हणजे ज्याची मूलभूत विचारप्रणाली पाश्चात्य सभ्यतेच्या विरोधी आहे. ज्यामध्ये पाश्चात्य समाज आधूनिक आहे तर भारतीय समाज पारंपारीक आहे. यामुळे विचारप्रणालीत विरोधाभास आढळतो. जसे पवित्रतावाद आणि व्यक्तीवाद, शुद्ध-अशुद्धता किंवा पवित्र अपवित्रता, समानता विरोधी श्रेणीरचना दर्जा विरोधी सत्ता हेस व द्वंद्वात्मक संबंध विचार प्रणालीत आढळतात.

- **लुईस ड्यूमाँट यांचे कार्य** (Work of Louis Domount) :

डयूमाँट हे फ्रेंच समाजशास्त्रज्ञ होते. त्यांच्यावर फ्रेंच समाजशास्त्र विचार प्रणालीचा प्रभाव होता. त्यादृष्टीकोनातून त्यांनी भारतीय समाजव्यवस्थेचे अध्ययन करण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये प्रामुख्याने मानवशास्त्र आणि समाजशास्त्र (प्राच्यविद्याशास्त्र) या विषयामध्ये अध्ययन केले. लुईस ड्युमाँट यांनी वेगवेगळ्या व व्यापक अशा क्षेत्रात आपले कार्य केले आहे. जसे हिंदूवाद, जात, आप्तसंबंध व्यवस्था आणि भारतातील सामाजिक आणि राजकीय चळवळीचे अध्ययनही डयूमाँट यांनी केले आहे.

- **लुईस डयूमाँटचे महत्त्वाचे लिखाण कार्य :**

1. Hierarchy and Mariage Alliance in South India (1957)
2. Homo Hierarchicus : The Caste System and Its Implication (1966)
3. Religion Politics and History in INdia : Collected Papers in Indian Sociology - (1970)
4. Homo aequalis (1977)

प्रस्तुत प्रकरणामध्ये आपण लुईस डयूमा यांच्या प्राच्यविद्या दृष्टीकोनासंबंधीच्या कार्याचा आढावा घेणार आहोत. यात प्रामुख्याने भारतातील जातीव्यवस्थेच्या संदर्भात विचारप्रणाली व वर्णव्यवस्था याचे सविस्तर विवेचन करण्यात आले आहे.

"Homo Hirarchicus : The Caste System and its Implication", या असाधारण संशोधनपर ग्रंथामध्ये लुईस डयूमाँट यांनी भारतीय समाजातील जातीव्यवस्थेची विचारप्रणाली व जातीव्यवस्था समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे. डयूमाँट यांनी भारतातील जातीव्यवस्था, ग्रामीण समाज संरचना समजून घेण्यासाठी प्राच्यविद्या व संरचनात्मकवाद दृष्टीकोनाचा पुरस्कार केला. डयूमाँटच्या मते भारतीय प्राच्यविद्या आणि समाजशास्त्र यांचा संगम आढळतो की, जो भारतीय समाजाच्या अध्ययनासाठीची पूर्व आवश्यकता आहे. डयूर्मांट यांचे हे संशोधन कार्य पूर्णपणे सैद्धांतिक स्वरूपाचे कार्य आहे, की जे आपल्याला उपलब्ध असणाऱ्या लोक आलेख पद्धतीच्या तथ्यांना मिळवण्यासाठी मदत करते, हे कार्य जाती व्यवस्थेच्या संदर्भातील इतर कार्यापेक्षा साहजिकच वेगळे आहे. कारण, याची सुरुवातच श्रेणीरचने विषयीच्या मुख्य तत्त्वाने होऊन पुढे नवीन प्रारुप मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

भारतीय समाजव्यवस्थेतील श्रेणीरचना ही इतर आधुनिक समाजापासून भारतीय समजाला वेगळी करते. कारण आधुनिक समाजव्यवस्थेचे मूलभूत सामाजिक तत्त्व म्हणजे समानता होय. तर भारतीय समाज व्यवस्थेचे मूलभूत तत्व हे श्रेणीरचना हे आहे. परंतु या श्रेणीरचनेकडून समानतेकडे येण्यामुळे या व्यवस्थेतील एका घटकाला याचा गैरफायदा होणार असल्याने तो श्रेणीरचना टिकवण्यासाठी प्रयत्न करत असतो. तर या व्यवस्थेमध्ये जे सर्वात कनिष्ठ स्तरावर आहेत ते ही व्यवस्था बदलण्यासाठी प्रयत्न करतात. परंतु डयूमाँटच्या मते कोणतीही सामाजिक श्रेणीरचना ही टिकवून ठेवण्यासाठी त्या समाज व्यवस्थेतील अभिजन हे ही व्यवस्था टिकविण्यासाठी प्रयत्न करतात. तर दबलेले लोक बदलण्यासाठी प्रयत्न करतात. डयुमाँटच्या मते हे भारतीय समाजाच्या बाबतीतही सत्य आहे.

लुईस डयूमाँट यांचा भारतीय जातीव्यवस्थेसंबंधीचा संशोधन ग्रंथ हा आकरा प्रकरणामध्ये स्पष्ट केला आहे. त्यामद्ये त्यांनी भारतातील जातीव्यवस्थेच्या विचारप्रणाली विषयी आपले संशोधनात्मक विचार मांडले

आहेत. याविषयी थोडक्ता सांगायचे झाले तर ड्युमाँट या मूळच्या फ्रेंच समाजशास्त्रज्ञाने भारतीय समाजातील जाती व्यवस्था समजून घेण्यासाठी प्राच्यविद्या दृष्टीकोनाचा वापर केला आहे. ज्यामध्ये भारतीय भाषेचे ज्ञान असणे अतिशय आवश्यक आहे. त्याच्या मते भारतीय जातीव्यवस्था समजून घेणे अतिशय आवश्यक आहे आणि हे काम भारतातील किंवा भारताबाहेरील समाजशास्त्रज्ञांचे आहे. ड्युमाँट यांनी आपल्या संशोधनासाठी अभिजात साहित्य (प्राचीन ग्रंथ) आणि ऐहतिहासिक उदाहरणांचा यामध्ये वापर केला आहे. यामध्ये प्रामुख्याने ड्युमाँट यांनी जातीव्यवस्था, वर्ण सिद्धांत, पवित्र-अपवित्र, श्रेणीरचना, सत्ता आणि प्रदेश, जातपंचायत या बाबीवर संशोधन केले आहे.

- **लुईस ड्युमाँटचे भारतातील जाती व्यवस्था विषयक विचार** (Dumonts Views regarding Caste System in India) :

भारतीय समाजाच्या अध्ययनामध्ये प्रामुख्याने जाती व्यवस्थेच्या विचारप्रणालीचे अध्ययन करण्याचा प्रमुख हेतू ड्यूमाँट यांचा होता. ड्यूमाँटच्या मते जाती व्यवस्था म्हणजे बहुधा धार्मिक स्वरूपाच्या मूल्याद्वारे, सामाजिक, आर्थिक, राकीय आणि आप्तसंबंध व्यवस्था टिकवण्यासाठीच्या संबंधाची व्यवस्था होय.

ड्यूमाँटच्या मते, जात ही सामाजिक स्तरीकरणाचा आधार नसून सामाजिक असमानता निर्माण करण्याचा आधार आहे. हा सार समाजशास्त्रज्ञांनी समजून घेणे गरजेचे आहे. जाती व्यवस्थेतील 'श्रेणी रचना' हे हिंदूवाद पुरस्कृत महत्त्वाचे मूल्य आहे.

ड्यूमा यांनी बोडगल यवांच्या जातीच्या व्याख्येवरून हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे की, संपूर्ण भारतीय समाज मोठ्या संख्येने वेगवेगळा वांशिक गटात विभागलेला आहे. की जो एकमेकांपासून वेगळा आणि एकत्र ठेवला आहे. त्याची वैशिष्ट्ये म्हणजे,

अ) विवाह आणि संपर्क याबाबतचे जातीचे वेगळे नियम

ब) कार्याचे विभाजन कार्याचे परस्परावलंबन ज्यामध्ये प्रत्येक समूह आपल्या कार्यासाठी एकमेकावर अवलंबून असतो. परंतु आपल्या मर्यादेतच आपले काम करतो.

क) शेवटी दर्जा किंवा श्रेणीरचनेतील स्थान की जे समुहाला श्रेणी रचनेमध्ये उच्च किंवा कनिष्ठ स्थान मिळते त्यामुळे विकसित होणारे संबंध.

या वरील व्याख्येच्या स्पष्टीकरणावरून लुर्सस ड्युमाँट यांनी भारतातील जातीव्यवस्थेची वैशिष्ट्ये स्पष्ट केली आहेत. त्याच बरोबर जाती व्यवस्थेचे इतर काही पैलू त्यांनी स्पष्ट केले आहेत. ती थोडक्यता पुढीलप्रमाणे-

१. भरत हा अनेक लहान भुप्रदेशांनी आणि जातीनी निर्माण झालेला देश आहे.

२. प्रत्येक जात ही विशिष्ट भौगोलिक प्रदेशापुरती मर्यादित आहे.

३. जाती व्यवस्था पद्धतीत स्वत:च्या जातीबाहेर विवाह करणे अशक्य आहे.

या सर्व विवेचनावरून आपल्या हे लक्षात येईल की, ड्यूमा यांनी जातीव्यवस्थेसंबंधी हिंदूवादाच्या मनाची स्थिती काय आहे हे स्पष्ट केले आहे. ड्यूमाँटच्या मते, जात म्हणजे 'मूल्य आणि कल्पना' यांची व्यवस्था की जी औपचारिकपणे लक्षात येण्यासारखी तार्किक व्यवस्था आहे. यामध्ये पवित्र अपवित्रतेच्या

कल्पना यासाठी आहेत की ज्यामुळे श्रेणीरचनेचे समर्थन करता येते. पवित्र मानल्या जाणाऱ्या बाबी श्रेणी रचनेतील कनिष्ठ वर्गाकडे लादलेल्या आहेत.

- **पवित्र-अपवित्रतेच्या संकल्पना** (Concept of Pure and Impue) :

भारतीय जातीव्यवस्थेच्या श्रेणी रचनेचा महत्त्वाचा आधार म्हणजे पवित्र-अपवित्र या संकल्पना आहेत. कारण पवित्र म्हणजे काय आणि अपवित्र म्हणजे काय याचा आधार व योग्य स्पष्टीकरण कोठेही नाही. परंतु जाती व्यवस्था ही मूल्य आणि कल्पना यांचा संच असल्याने या संकल्पनाही मूल्यात्मक पातळीवर स्पष्ट केल्या आहेत.

श्रेणीरचनेतील उच्च वर्गातील लोकांचे व्यवसाय व कार्य हे पवित्र मानले आहेत. त्यांच्याच कार्यांना मानपान दिला आहे. राजा सत्ता घेताना वेदातान ब्राह्मणांच्या हस्ते आशिर्वाद घेतात म्हणजे राजा किती संपत्ती व सत्ता असणारा असला तरी त्याला ब्राह्मणाचा आशिर्वाद घेऱ्यासाठी ब्राह्मणाकडे विनंती करावी लागते कारण ब्राह्मणाचा व्यवसाय पवित्र व उच्च मानला आहे.

त्याचबरोबर कनिष्ठ वर्गात असणाऱ्या व्यक्तीचे व्यवसाय हे अपवित्र मानले असल्यामुळे त्यांना मान-पान हा तसाच मिळतो. जसे त्यांना प्रथमतः मानव म्हणून ही वागणूक मिळत नाही. अमानवी वागणूक हे एक कनिष्ठ वर्गाच्या (अपवित्र) जिवनाला मिळालेली देणगीच असते. जसे गाय मंदिरात नैवेद्य खायला गेलेली चालते परंतु शुद्र (दलित) व्यक्ती मंदिरात गेल्यास उच्च श्रेणीतील व्यक्तीस ते चालत नाही. म्हणजेच कनिष्ठ श्रेणीतील लोकांवर अशी अनेक बंधने अपवित्रतेच्या नावाखाली घातलेली असतात. ड्युमाँटच्या मते, ह्या प्रकारची स्थिती गांधीच्या आंदोलनाने व भारताच्या स्वातंत्र्याने काही प्रमाणात बदललेली आहे.

भारतातील अस्पृश्य हे अपवित्र व्यवसायातील विशेषीकृत असल्याने त्यांना अपवित्रतेचे कायमस्वरूपी गुलाम व्हावे लागले. या संदर्भात ड्यूमाँट यांनी कायमस्वरूपी अपवित्रता आणि तात्पुरती अपवित्रता हे पवित्रतेचे दोन प्रकार पाडले आहे. तात्पुरती पवित्रता ही सर्वच समाजात दिसून येते. काही सामाजिक बाबीच्या वेळी येणारी ही अपवित्रता घालणचे उपायही आहते. परंतु कायमस्वरूपी अपवित्रता ही समाजमान्य अपवित्रता आहे. मुलाचा जन्म, मृत्यू यासारख्या वेळी तात्पुरती अपवित्रता असते. पण ती काही कारणाने घालवता येते. जसे मुल झाल्यास त्या स्त्रीला काही ठराविक दिवसानंतर काही विधी करून पवित्र केले जाते. व्यक्ती मृत्यू पावल्यास तेरा दिवसांनी इतर व्यक्ती पवित्र होतात इ. असे असले तरी सध्याच्या समाजात या पवित्र-अपवित्रतेच्या संकल्पना बदलत आहेत.

- **वर्णव्यवस्थेचा सिद्धांत** (Theory of Varna) :

वर्ण व्यवस्थेच्या सिद्धांताचा अभ्यास केल्याशिवाय भारतातील जाती व्यवस्था समजून घेणे अवघड आहे. वर्ण व्यवस्थेलाच जाती व्यवस्थेच्या निर्मितीचे मूळ हिंदू धर्मात मानतात. भारतीय हिंदू समाज व्यवस्थेत वर्ण व्यवस्था ही जाती व्यवस्थेपेक्षा जूनी व्यवस्था होती. त्या आधारेच जाती व्यवस्था विकसित झाली. वर्ण म्हणजे मुलतः रंग जे चार वर्गात विभागले आहेत जसे.

ब्राह्मण - ज्ञानदान करणे व घेणे

क्षेत्रीय - लढाऊ योद्धे (सैनिक)

वैश्य - व्यापारी

शुद्र - नोकर

याशिवाय अस्तित्वात असणारा वर्ग म्हणजे अस्पृश्य जो या वर्गीकरणाच्या बाहेरचा आहे. ड्यूमाँट यांच्या मते संशोधक जातीव्यवस्था व वर्णव्यवस्था समजून घेण्यात गोंधळलेले असतात. कारण वर्ण व्यवस्था ही प्राचीन ग्रंथात आढळते पण जात आढळत नाही. परंतु जात आणि वर्ण व्यवस्था ह्या श्रेणीरचना आणि सत्ता यांच्या संबंधाच्या आधारावर समजून घेतल्या पाहिजेत.

शेवटी ड्यूमाँट यांनी जाती व्यवस्थेत झालेया महत्त्वपूर्ण बदलाविषयी चर्चा केली आहे. त्यमाध्ये ड्यूमाँट म्हणतो की, पारंपारिक व्यवसायाचे अवलंबित्व हे स्पर्धा आणि आवश्यक स्वयंपूर्णता यामध्ये दबलेले आहे. याला ड्यूमाँट यांनी 'जाती भरीवीकरण' असे म्हटले आहे. त्याचबरोबर जाती व्यवस्थेच्या बदलामध्ये, न्यायीक आणि राजकीय बदलाबरोबर सामाजिक-धार्मिक सुधारणा, पाश्चातीकरण, आधुनिक व्यवसायातील वाढ, नागरीकरण आणि बाजारू अर्थव्यवस्था ह्या घटकांचाही समावेश आहे. परंतु शेवटी या सर्व घटकामुळे संमिश्र बदल होत आहेत हेच ड्यूमाँट यांनी स्पष्ट केले आहे.

- **स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - ३** (Check your progress)

खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. लुईस ड्यूमाँट यांनी १९४९ ते १९५० दरम्यान भारतातील कोणत्या राज्यात संशोधन केले?

२. लुईस ड्यूमाँट यांच्या पद्धतीशास्त्राचे कोणतेही दोन मुख्य आधार लिहा?

३. लुईस ड्यूमाँट यांनी विशद केलेले अपवित्रतेचे दोन प्रकार कोणते ?

४. लुईस ड्यूमाँट यांच्या मते जातीव्यवस्थेतील 'श्रेणीरचना' टिकवून ठेवणारी भारतातील व्यवस्था कोणती ?

५. डॉ. घुर्ये यांच्या मते भारतातील मागासलेल्या जमातीचे मागासलेपण असण्याचे कारण कोणते?

### २.३.२ संरचनात्मक-प्रकार्यवादी दृष्टिकोण (Structural Prespectives) :

सामाजिक घटनांचे स्वरूप जाणून घेण्यासाठी संशोधक समाजाच्या रचनेवर भर देतात पण वास्तवात समाजाची रचना ही त्या सामाजिक घटनेच्या कार्यपद्धतीवर अवलंबून असते. म्हणून विशिष्ट समाजाच्या रचनेचा तिच्या कार्यपद्धतीच्या संर्भात अध्ययन करण्याच्या दृष्टिकोणाला संरचनात्मक-प्रकार्यवादी दृष्टिकोण म्हणतात. संरचनात्मक-प्रकार्यवादी दृष्टिकोणात प्रामुख्याने दोन मुलभूत संकल्पनांचा समावेश होतो. त्या दोन मुलभूत संकल्पनां म्हणजे 'संरचनात्मक' (रचनात्मक) आणि 'प्रकार्यात्मक' (कार्यात्मक' संकल्पना होय).

संरचनात्मक घटकांत एखाद्या घटनेला जबाबदार असणाऱ्या घटकांचा शोध घेऊन त्यांच्यातील परस्पर संबंध शोधून काढण्याचा प्रयत्न केला जातो अणि कार्यात्मक घटकात परस्पर संबंधीत घटकात अस्तित्व कायम ठेऊन परस्परातील आंतरक्रियेचा क्रियात्मक स्वरूपातून अभ्यास केला जातो. सामाजिक घटनांच्या रचनात्मक गुणवैशिष्ट्यावर त्या सामाजिक घटनेची क्रियाशिलता अवलंबून असते. म्हणून रचना व कार्य या दोन्ही मूलभूत संकल्पना परस्परावलंबी आहेत. घटनेच्या रचनात्मक स्वरूपावर कार्यात्मक अवलंबू नअसते तर घटनेच्या कार्यात्मक स्वरूपावर रचनात्मक स्वरूप अवलंबून असते. समाजाचे अध्ययन करतेवेळी सुरुवातीला कांही शास्त्रज्ञांनी फक्त रचनात्मक दृष्टिकोणाचा अवलंब केला. तर कांही शास्त्रज्ञांनी फक्त कार्यात्मक दृष्टिकोणाचा अवलंब केला. परंतु या सर्व शास्त्रज्ञांच्या नंतर लक्षात आले की, एखाद्या सामाजिक

घटनेचा अभ्यास केवळ रचनात्मक किंवा कार्यात्मक दृष्टिकोणातून करण्याऐवजी संरचनात्मक-प्रकार्यवादी दृष्टिकोणातून केल्यास त्या सामाजिक घटनेचे आंतरबाह्य स्वरूप स्पष्ट होण्यास मदत होईल. म्हणून तेथून पुढे समाजशास्त्रात संरचनात्मक-प्रकार्यवादी दृष्टिकोणाचा वापर अधिक प्रमाणात होऊ लागला.

संरचनात्मक-प्रकार्यवादी दृष्टिकोणाचा समाजशास्त्रात प्रथम उपयोग सुप्रसिद्ध ब्रिटिश समाजशास्त्रज्ञ हर्बर्ट स्पेन्सर यांनी केला. स्पेन्सर यांनी या दृष्टिकोणाच्या माध्यमातून जीव व समाज यांचा तुलनात्मक अभ्यास करून सामाजिक उत्क्रांतीवादाचा सिद्धांत मांडला आहे. यानंतर एमील डूरखीम मॅनिनोवस्की रॅडक्लिफ ब्राऊन इत्यादींनी अनुक्रमे समाजशास्त्रात व मानसशास्त्रात संरचनात्मक-प्रकार्यवादी दृष्टिकोणाचा अवलंब केलेला दिसून येतो. आधुनिक काळात रॉबर्ट मर्टन आणि टॉलकॉट पारसन्स या समाजशास्त्रज्ञांनी संरचनात्मक-प्रकार्यवादी दृष्टिकोणाचा विशेष अवलंब केला आहे. भारतीय समाजाचा संरचनात्मक-प्रकार्यवादी दृष्टिकोणातून अभ्यास डॉ. एम्. एन्. श्रीनिवास, डॉ. एस्. सी. दुबे, मॅकीम मेरियट, आय.पी. देसाई, डी.एन्. मुजूमदार इत्यादींनी केला आहे. आपण या घटकामध्ये भारतीय समाजशास्त्रज्ञ डॉ. एम्. एन्. श्रीनिवास यांनी संरचनात्मक-प्रकार्यवादी दृष्टिकोणातून भारतीय समाजाचे केलेले अध्ययन पाहणार आहोत.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ४**

  अ) संरचनात्मक-प्रकार्यवादी दृष्टिकोण म्हणजे काय.

  ब) समाजाच्या रचनेवर व कार्यपद्धतीवर भर देणाऱ्या दृष्टिकोणाचे नाव सांगा.

  क) समाजशास्त्रात संरचनात्मक-प्रकार्यवादी दृष्टिकोणाचा प्रथम वापर कोणी केला.

  ड) संरचनात्मक-प्रकार्यवादी दृष्टिकोणाच्या भारतीय समर्थकांची नावे सांगा.

- **डॉ. एम्. एन्. श्रीनिवास** (Dr. M. N. Shrinivas) :

भारतीय समाजशास्त्रज्ञाच्या उदय आणि विकासामध्ये अनेक भारतीय व विदेशी समाजशास्त्रज्ञांनी आणि मानवशास्त्रज्ञांनी आपले मोलाचे योगदान दिले आहे. त्यापैकी जी. एस्. घुर्ये, ए. आर. देसाई, राधाकमल मुखर्जी, एस्. सी. दुबे, डी. पी. मुखर्जी यांच्या बरोबरच डॉ. एम्. एन्. श्रीनिवास या भारतीय समाजशास्त्रज्ञांनी भारतीय समाजशास्त्रात आपले महत्त्वाचे योगदान दिलेले आहे. भारतीय समाजशास्त्रज्ञाचे आणि मानवशास्त्रमांचे एक प्रमुख आधारस्तंभ आणि संरचनात्मक-प्रकार्य वादाचे पुरस्कार्ते म्हणून श्रीनिवास यांना ओळखले जाते.

### अ) जीवनवृत्तांत (१९१६-१९९९) :

मैसूर नरसिंहाचार्य श्रीनिवास यांचा जन्म १६ नोव्हेंबर १९१६ रोजी मैसूर येथे ब्राह्मण कुटुंबात झाला. मुंबई विद्यापीठातील भारतीय समाजशास्त्रज्ञाचे जनक डॉ. जी. एस्. घुर्ये यांचे ते आवडते व हुशारी विद्यार्थी होते. श्रीनिवास यांचे एम्. ए. एल्.एल्. बी. आणि पी.एच्.डी. पर्यंतचे सर्व शिक्षण मुंबई विद्यापीठात झाले. तर डी.फील. ही पदवी त्यांनी ऑक्सफर्ड विद्यापीठातून प्राप्त केली. आपला अध्ययन कालावधी संपल्यानंतर त्यांनी सन १९४८ ते १९५१ या काळात ऑक्सफोर्ड विद्यापीठात भारतीय समाजशास्त्राचे अधिव्याख्याता म्हणून काम केले. सन १९५२ ते १९५९ या कालावधीत बडोदा येथील 'महाराज सयाजीराव गायकवाड' विद्यापीठात प्राध्यापक म्हणून काम केले. याच कालावधीत सन १९५३-१९५४ साली समाजशास्त्र उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल श्रीनिवास यांचा मँचेस्टर विद्यापीठात 'सिनिअर रिसर्च फेलो' म्हणून मान्यता मिळाली. याच

कालावधीत सन १९५६-५७ साली ग्रेटब्रिटन आणि अमेरिकेतील रॉकफेलर फेलोशिप त्यांना मिळाली. तसेच ग्रेटब्रिटन आणि आयर्लंड येथील 'रॉयल ॲंथ्रॉपॉलीजीकल इन्स्टीट्यूट' या संस्तेची फेलोशिप त्यांना मिळाली. या संस्थेची फेलोशिप मिळवणारे हे पहिले भारतीय समाजशास्त्रज्ञ म्हणून ओळखले जातात. कॅलिफोर्निया या मँचेस्टर विद्यापीठात त्यांना मानवशास्त्र व समाजशास्त्र या विषयावर व्याख्यान देण्यासाठी सन १९६३ साली नियंत्रित करण्यात आले होते. सन १९५९ ते १९७२ या कालावधीत दिल्ली विद्यापीठात समाजशास्त्राचे विभाग प्रमुख आणि वरिष्ठ प्राध्यापक म्हणून त्यांनी काम केले. त्यानंतर बेंगलोर येथे 'इन्स्टीट्यूट फॉर सोशल अँड इकॉनॉमीक चेंज' या संस्थेस प्रमुख संचालक म्हणून काम पाहिले.

समाजशास्त्रातील त्यांच्या योगदानाबद्दल त्यांना अनेक पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले. सन १९५५ साली श्रीनिवास यांना ग्रेटब्रिटन व आयर्लंड येथील 'रॉयल अथ्रॉपॉलीजीकल इन्स्टीट्यूट' या नामांकित परदेशीर सामाजिक संस्थेच्या पारितोषिकाचा समावेश करता येईल. सन १९५० साली भारतात 'शरदचंद्र रॉय मेमोरिअल' सुवर्णपदक त्यांना मानवशास्त्रातील योगदानाबद्दल दिले. १९७८ मध्ये जी. एस् घुर्ये स्मृतीचिन्ह देण्यात आले. अशा प्रकारे डॉ. एम्. एन्. श्रीनिवास यांना समाजशास्त्रातील व मानवशास्त्रातील योगदानाबद्दल अनेक पारितोषिके देऊन गौरविण्यात आले होते. अशा या समाजाशस्त्राचे व मानवशास्त्रज्ञाचे १९९९ साली देहावसन झाले.

**ब) ग्रंथनिर्मिती :**

डॉ. एम्. एन्. श्रीनिवास यांनी भारतीय समाज आणि संस्कृती या विषयावर लेखन केले आहे. त्यांनी धर्म ग्रामीण समुदाय जात सामाजिक परिवर्तन इत्यादी विषयावर मौलिक लेखन केले आहे. यांच्या लिखाणाचे क्षेत्र दक्षिण भारत असून त्यांच्या लिखाणावर संरचनात्मक-प्रकार्यवादी दृष्टिकोणाचा प्रभाव पडलेला दिसून येतो.

१. 'कास्ट इन मॉडर्न इंडिया अँड आदर एस्सेज'

२. 'रिलिजन अँड सोसायटी अमंग द कुर्गज् ऑफ साऊथ इंडिया'

३. 'इंडियाज व्हिलेज'

४. 'मॅरेज अँड फॅमिली इन मैसूर'

५. 'सोशल चेंज इन मॉडर्न इंडिया'

६. 'द डॉमिनंट कास्ट अँड आदर एस्सेज्'

७. 'इंडिया : सोशल स्ट्रक्चर'

८. 'डयनामीक्स ऑफ पॉम्युलेशन अँड फॅमिली वेलफेअर'

९. 'द रिमेंबर्ड व्हिलेज'

१०. 'द कोहेसीव्ह रोल ऑफ संस्कृतायझेशन'

११. 'ऑन लिव्हिंग इन अ रेव्हयुलेशन अँड ऑादर एस्सेज्'

१२. 'व्हिलेज कास्ट जेंडर अँड मेथड'

१३. 'इंडियन सोसायटी थ्रू पर्सनल रायटिंग्ज'

याशिवाय अनेक रिसर्च मॅगेझिन मधून त्यांनी आपले लेख प्रकाशित केले होते. उदा. सन १९५२ साली 'मैसूरमधील एकत्र कुटुंबाचे विभाजन' या नावाचा लेख बडोदा विद्यापीठाच्या संशोधन पत्रिकेमधून प्रकाशित झाला होता. सोशॉलॉजिकल बुलेटिन या ऑल इंडियन सोशॉलॉजिकल सोसायटी या संस्थेमार्फत चालवल्या जाणाऱ्या मॅगेझीन मधून मानवशास्त्र आणि समाजशास्त्र या दोन विषयातील परस्पर संबंध स्पष्ट करणारा लेख १९५२ साली, ग्रामीण विभागाचे औद्योगिकरण आणि शहरीकरण या विषयावरील सामाजिक परिवर्तनासंबंधीचा लेख १९५६ साली आणि 'सोशॉलॉजी ॲण्ड इंडियन सोशॉलॉजीस्ट' हा लेख १९७० साली प्रकाशित झाला होता. व्हिलेज इंडिया या नितकालीकामधून 'द सोशल सिस्टम ऑफ अ मैसूर व्हिलेज' हा लेख १९५६ साली प्रकाशित झाला होता. १९५६ साली 'संस्कृतीकरण आणि पाश्चिमात्यीकरण' हा लेख एका त्रैमासिकात प्रकाशित झाला होता. १९५४ साली 'अ कास्ट डिस्पुट अमंग वॉशरमन ऑफ मैसूर' हा लेख इस्टर्न ॲथ्रोपॉलॉजी या नियतकालीकामधून प्रकाशित झाला होता. १९५९ साली 'द डॉमिनंट कास्ट इन रामपूरा' हा लेख अमेरिकन ॲथ्रॉपॉलॉजीस्ट या नियतकालिकामधून प्रकाशित झाला होता. १९५५ साली व्हिलेज स्टडीज् ॲन्ड देअर सिग्निफिकन्स' हा लेख रुरल प्रोफाईल्स या नियतकालीकामधून प्रकाशित झाला होता. १९६० साली 'द इंडियन रोड ॲण्ड इक्वॅलिटी' हा लेख आणि १९७४ साली 'व्हिलेज स्टडीज् पार्टिसीपेंट ऑब्जरव्हेशन अँड सोशल सायन्स रिसर्च इन इंडिया' हा लेख इकॉनॉमिक अँड पॉलिटीकल विकली या साप्ताहिकामधून प्रकाशित झाला होता. १९७३ साली 'इटरर्नेरिअज् ऑफ इंडियन सोशल ॲथ्रॉपॉलॉजिस्ट' हा लेख जागतिक समाजशास्त्र संघटनेच्या नियतकालिकामधून प्रकाशित झाला होता.

**क) अभ्यास पद्धत आणि तंत्र :**

भारतीय समाजाचा अभ्यास करताना वेगवेगळ्या समाजशास्त्रज्ञांनी विविध अभ्यास पद्धतींचा व तंत्रांचा वापर केलेला आहे. सुरुवातीच्या काळात तुलनात्मक व ऐतिहासिक अभ्यास पद्धतीच्या वापरावर भर दिला जात होता. पण काळाच्या ओघात विज्ञानामध्ये अनेक अभ्यास पद्धतींचा व तंत्रांचा उगम झाला आणि त्या सर्व अभ्यास पद्धतींचा व तंत्रांचा वापर समाजशास्त्रात केला जाऊ लागला. मुळात समाज हा अत्यंत व्यापक व गुंतागुंतीचा असल्यामुळे आणि समाजाचे अधिकाधिक वास्तव ज्ञान प्राप्त व्हावे यासाठी समाजशास्त्रात अनेक अभ्यास पद्धतींचा, तंत्रांचा व दृष्टिकोणांचा वापर करण्यात येऊ लागला.

श्रीनिवास यांनी कोणत्याही एका अभ्यास पद्धतीचा पुरस्कार केला नाही किंवा तसा आग्रह देखील केला नाही. ज्याप्रमाणे अभ्यास विषयात बदल होत जातो किंवा अभ्यास विषयाकडे बघण्याचा दृष्टिकोण बदलतो. त्याप्रमाणे अभ्यासाची पद्धत व तंत्र बदलले पाहिजे असे श्रीनिवास यांचे मत होते. श्रीनिवास यांनी आपल्या अध्ययनात कोणत्याही एका अभ्यास पद्धतीचा किंवा तंत्राचा पुरस्कार केला नसला तरी त्यांच्या एकूण संशोधनावर संरचनात्क-प्रकार्यवादी दृष्टिकोणाचा प्रभाव अधिक प्रमाणात पडलेला दिसून येतो. संरचनात्मक-प्रकार्यवादी दृष्टिकोणाचा पुरस्कार रॅडक्लिफ ब्राऊन यांनी मानवशास्त्रात केला आहे व रॅडक्लिफ ब्राऊन यांचे मार्गदर्शन श्रीनिवास यांनी घेतल्यामुळे श्रीनिवास यांच्या संशोधनावर संरचनात्मक-प्रकार्यवादी दृष्टिकोणाचा प्रभाव पडलेला दिसून येतो. खेड्याचा व जातीव्यवस्थेचा अभ्यास करताना श्रीनिवास यांनी संरचनात्मक-प्रकार्यवादी दृष्टिकोणाचा पुरस्कार केला आहे. विशेषत: दक्षिण भारतातील कुर्ग गावातील धर्मव्यवस्थेचा व समाजव्यवस्थेचा अभ्यास करताना श्रीनिवास यांनी संरचनात्मक-प्रकार्यवादी दृष्टिकोणाचा अवलंब केलेला दिसून येतो. समाजाच्या रचनात्मक व्यवस्थेचा अभ्यास केल्याशिवाय या समाजाच्या कार्यात्मक स्वरूपाचा संशोधकाला अभ्यास करता येत नाही. म्हणून समाज रचना हा समाजशास्त्राचा मुलभूत

अभ्यास विषय आहे. असे श्रीनिवास यांचे स्पष्ट मत होते. म्हणून दर्जा भुमिका सामाजिक संबंध इत्यादीचा अभ्यास करताना श्रीनिवास यांनी संरचनात्मक-प्रकार्यवादी दृष्टिकोणाचा अवलंब केलेला दिसून येतो.

श्रीनिवास यांनी समाजशास्त्रात व मानवशास्त्रात तुलनात्मक अभ्यास पद्धतीचे समर्थन केले आहे. भूतकालीन आणि वर्तमानकीलन समाजव्यवस्थेत कोणकोणती स्थित्यंतरे घडून आलेली आहेत. त्याचे वास्तववादी स्वरूप जाणून घेण्यासाठी तुलनात्मक अभ्यास पद्धत उपयोगी असल्याचे स्पष्ट मत श्रीनिवास यांचे होते. तुलनात्मक अभ्यास पद्धतीच्या आधारे भविष्यकालीन समाजव्यवस्थेबाबत अंदाज मांडता येतात आणि त्याआधारे भविष्यकालीन समाजव्यवस्थेत निर्माण होणाऱ्या अडचणीवर मात करता येते यावर श्रीनिवास यांचा विश्‍वास होता. तुलनात्मक अभ्यास पद्धतीचा वापर करताना अभ्यासकाने ऐतिहासिक संदर्भ पडताळून पाहिले पाहिजेत.

तुलनात्मक अभ्यास पद्धीपेक्षा क्षेत्रकार्य अभ्यास पद्धतीचा अवलंब करण्याकडे श्रीनिवास यांचा जास्त कल दिसून येतो. विशेषत: मानवशास्त्राच्या अभ्यासात श्रीनिवास यांनी क्षेत्रकार्य अभ्यास पद्धतीचा वापर केलेला दिसून येतो. कोणतेही संशोधन निरीक्षणापेक्षा अनुभवावर जास्त प्रमाणात आधारित असले पाहिजे असे त्यांचे मत होते. बृहत अध्ययनापेक्षा सुक्ष्म अध्ययनाकडे श्रीनिवास यांचा ओढा जास्त असलेला दिसून येतो. आणि सुक्ष्म अध्ययनासाठी क्षेत्रकार्य अभ्यास पद्धतीचा वापर केलेला होता.

श्रीनिवास यांचे मत क्षेत्रकार्य अभ्यास पद्धतीचा अवलंब करताना सहभागी निरीक्षणाचा वापर संशोधकाने केला पाहिजे. कारण सहभागी निरीक्षणामुळे संशोधकास संबंधित घटनेचे सखोल ज्ञान प्रप्त होते. क्षेत्रकार्य अभ्यास पद्धतीमध्ये संशोधक स्वत: अभ्यास विषयाशी समरस होत असल्यामुळे संशोधकाला वस्तुनिष्ठ माहिती प्राप्त होते. संशोधकाला आलेला अनुभव व इतरांना आलेला अनुभव यामध्ये फरक असू शकतो म्हणून श्रीनिवास यांनी क्षेत्रकार्य अभ्यास पद्धतीचा संशोधनात्मक पुरस्कार केला आहे.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-५**

अ) एम्. एन्. श्रीनिवासांचे पूर्ण नांव सांगा.

ब) एम्. एन्. श्रीनिवास यांचा जन्म केव्हा आणि कोठे झाला.

क) श्रीनिवास यांनी डी. फील. पदवी कोणत्या विद्यापीठातून मिळवली आहे.

ड) कोणाच्या मार्गदर्शनामुळे श्रीनिवास यांच्या संशोधनावर संरचतामक-प्रकार्यवादी दृष्टिकोणाचा प्रभाव पडलेला दिसून येतो.

इ) श्रीनिवास यांचे मते कोणत्या प्रकारच्या निरीक्षणामुळे संशोधकास संबंधित घटनेचे सखोल ज्ञान प्राप्त होते.

**ड) समाजशास्त्रीय योगदान :**

एम्. एन्. श्रीनिवास यांचे समाजशास्त्रीय योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. ग्रामीण समाजाचा श्रीनिवास यांनी सर्वांगीन अभ्यास केला आहे. जसे खेड्याचा, जातीव्यवस्थेचा, सामाजिक परिवर्तनाचा, धर्माचा, संस्कृतीचा, कुटुंबाचा अभ्यास त्यापैकी पुढील महत्त्वाच्या घटकांचा आपण येथे अभ्यास करणार आहे.

१. सामाजिक परिवर्तन

२. खेड्यांचा अभ्यास

३. जातीव्यवस्था विषयक विचार

४. प्रभावी जात

**१) सामाजिक परिवर्तन :**

एम्. एन्. श्रीनिवासांच्या मते सामाजिक परिवर्तन हा समाजशास्त्रातील महत्त्वाचा अभ्यास विषय आहे. श्रीनिवास यांनी भारतीय सामाजिक परिवर्तनाचे सखोल अध्ययन केले आहे. क्षेत्र कार्य अभ्यास पद्धतीचा अवलंब करून सामाजिक परिवर्तनासंबंधी श्रीनिवास यांनी आपले विचार मांडले आहेत. दक्षिण भारतातील कुर्ग लोकांचा धार्मिक व सामाजिक जीवन पद्धतीचा लघु (micro) व बृहत (ारली) स्तरावर अभ्यास करून समाजशास्त्रात 'ब्राह्मणीकरण' (Brahminization) 'संस्कृतीकरण' (sankritization) व 'पाश्चात्यीकरण' (westrnization) या तीन सामाजिक परिवर्तनासंबंधी संकल्पना मांडल्या आहेत. तसेच सामाजिक परिवर्तनासंबंधात 'धर्मनिरपेक्षीकरण' (secularization) ही आणखी एक महत्त्वाची संकल्पना श्रीनिवास यांनी विषद केली आहे.

प्रत्येक समाजात घडून येणारे बदल हे सुरवातीला लघु स्तरावर घडून येतात. पण बदलाची व्याप्ती जसजसी वाढत जाते तसतसे त्याचे स्वरूप बृहत किवा व्यापक बनत जाते. सुरवातीला कुर्ग गावातील कनिष्ठ जातीतील लोक ब्राह्मण जातीच्या लोकांच्या वर्तनाची अनुकरण करुन आपल्या जीवनाचा दर्जा उंचावण्याचा प्रयत्न करत असल्याचे श्रीनिवास यांना आढळून आले. म्हणून श्रीनिवास यांनी या परिवर्तनाच्या प्रक्रियेला 'ब्राह्मणीकरण' असे नाव दिले होते. पण पुढे कनिष्ठ जातीतील लोक केवळ ब्राह्मणांचेच नव्हे तर वरिष्ठ समजल जाणाऱ्या कोणत्याही जातीच्या लोकांच्या वर्तनाचे अनुकरण करून आपल्या जीवनमानाचा दर्जा उंचवण्याचा प्रयत्न करत असल्याचे आढळून आले. म्हणून श्रीनिवास यांनी 'ब्राह्मणीकरण' ऐवजी 'संस्कृतीकरण' असे या परिवर्तनाच्या प्रक्रियेला नाव दिले.

'आधुनिक भारतातील सामाजिक परिवर्तन' या ग्रंथात श्रीनिवास यांनी 'संस्कृतीकरण' आणि 'पाश्चमात्यीकरण' या दोन संकल्पना विषद केल्या आहेत. कुर्ग लोकांच्या धार्मिक व सामाजिक जीवनाचा अभ्यास करुन या दोन संकल्पना विषद केल्या आहेत. श्रीनिवास यांनी जाती व्यवस्थेचे विश्लेषण उर्ध्वगामी गतिशीलतेच्या संदर्भात केलेले आहे. जाती व्यवस्था ताठर स्वरूपाची असल्यामुळे त्यामध्ये परिवर्तन आढळून येत नाही. असाच समज त्यावेळी होता. पण श्रीनिवास यांनी सर्वप्रथम जातीव्यवस्थेच्या परिवर्तनासंदर्भात भाष्य केले. श्रीनिवास यांच्या मते 'संस्कृतीकरण' म्हणजे अशी प्रक्रिया आहे की ज्यामध्ये कनिष्ठ जातीतील लोक वरिष्ठ समजल्या जाणाऱ्या जातीच्या रुढी, प्रथा, विचारप्रणाली आणि जीवन पद्धतीच्या मार्गाने बदल घडवून आणतात.

संस्कृतीकरणाबरोबरच 'पाश्चात्यीकरण' ही देखील संकल्पना भारतातील सामाजिक परिवर्तनाच्या संदर्भात श्रीनिवास यांनी मांडली आहे. भारतावर ब्रिटिशांनी सुमारे दिडशे वर्षे राज्य केले. यावेळी पाश्चात्य जीवन पद्धतीचा भारतीय जीवन पद्धतीवर प्रभाव पडला. पाश्चात्य शिक्षण, मूल्य, निती, ज्ञान, तंत्रज्ञान थोडक्यात पाश्चात्य आचार व विचार पद्धतीचा भारतीय सामाजिक जीवन पद्धतीवर पडलेला प्रभाव म्हणजे 'पाश्चात्यीकरण' होय. आणि त्याचा परिणाम म्हणून भारतीय सामाजिक जीवनामध्ये परिवर्तन घडून आले. या परिवर्तनाच्या प्रक्रियेला श्रीनिवास यांनी पाश्चात्यीकरण' अशी संकल्पना वापरली आहे.

श्रीनिवास यांनी सामाजिक परिवर्तनाशी संबंधीत मांडलेली आणखी एक महत्त्वाची संकल्पना म्हणजे 'धर्मनिरपेक्षीकरण' होय. श्रीनिवास यांच्या मते धर्मनिरपेक्षीकरण ही एक भारतव्यापी प्रक्रिया असून

पाश्चिमात्यीकरणामुळे या प्रकियेला वेग आला आहे. धर्म निरपेक्षीकरण या प्रक्रियेत धार्मिक संस्था आणि शासन यांच्यात फरक केलेला आहे. थोडक्यात ज्या धर्माचा पुर्वी प्रतिष्ठा अगर मानसन्मान प्राप्त झाला होता. त्याचा राजकीय आणि वैदानिक घटनेशी काहीही संबंध नसणे म्हणजे धर्मनिरपेक्षीकरण होय.

**२) खेड्यांचा अभ्यास :**

भारत हा खेड्यांचा देश आहे. आजही भारतात ७०% जनता खेड्यात राहते. त्यामुळे भारतीय समाजाचा अभ्यास म्हणजे खेड्यांचा अभ्यास होय. या दृष्टिकोणातून एम्. एन्. श्रीनिवास यांनी दक्षिण भारतातील 'रामपूरा' या अलिप्त असणाऱ्या खेड्याचा अभ्यास क्षेत्रकार्य पद्धतीद्वारे केला आहे. श्रीनिवास हे जवळजवळ एक वर्ष रामपूरा या खेड्यात राहिले होते. या काळात त्यांनी रामपूरा खेड्यातील लोकांचा सामाजिक व सांस्कृतीक दृष्टिकोणातून अभ्यास केला. गावातील धर्म, रूढी, प्रथा, परंपरा, सामाजिक संघटना यांचा बारकाईने अभ्यास केला आणि त्यांच्या लक्षात आले की, गावातील लोकांच्यामध्ये स्व-जातीबद्दल आत्मीयता असली तरी एकूण समाजात भावनिक ऐक्य अधिक आहे. साधारणत: खेड्यांचे आकारमान (लोकसंख्या) लहान असते. त्यामुळे व्यक्ती-व्यक्तीत घनिष्ठ व प्रत्यक्ष संबंध निर्माण झालेले असतात. या संबंधातून व्यक्तीगत व सामुहीक व्यवहार होत असतात. त्यामुळे त्यांच्या व्यवहारात फारसा औपचारिकपणा दिसून येत नाही. तसेच प्रत्येक व्यक्ती कुटुंब म्हणून अगर संस्था परस्परावलंबी जीवन असतात. त्यामुळे त्यांच्यात सहकार्य प्रवृत्ती निर्माण झालेली असते.

राजापूरा खेड्याप्रमाणे इतर खेडीसुद्धा जातिनिष्ठ समाजरचनेवर म्हणजेच श्रेष्ठ कनिष्ठ तत्वावर आधारलेली आहेत. जात हा स्तरीकरणाचा बंध प्रकार असला तरी एकूण समाजात किंवा जाती-जमातीत भावनीक ऐक्य असल्याचे श्रीनिवास यांना आढळून आले. जाती व्यवस्थेच्या स्तर रचनेत प्रत्येक जातीला कोणतीतरी जबाबदारी दिली आहे. प्रत्येक जाती ती जबाबदारी पूर्ण करत असते. शिवाय प्रत्येक जातीला विशिष्ट व्यवसाय दिलेला आहे. तो व्यवसाय इतर कोणत्याही जातीला करता येत नसल्यामुळे गावात व्यवसायीक किंवा व्यवहारीक संघर्ष उद्‌भवत नाहीत आणि यातून कांही कारणास्तव संघर्ष उद्‌भवल्यास गावच्या पंचायती मार्फत तो मिटविला जातो. त्यामुळे एकूण समाजात भावनीक ऐक्य असल्याचे श्रीनिवास यांना आढळून आले.

श्रीनिवास यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभाव रामपूरा गावातील लोकांच्यावर पडलेला दिसून आला. तंत्रज्ञानामुळे रामपूरा गावात सामाजिक, आर्थिक व सांस्कृतीक परिवर्तन झाल्याचे त्यांना आढळून आले. संपूर्ण भारतीय समाजातील परिवर्तन समजून घेण्यासाठी खेडेगावांचा अभ्यास अत्यंत महत्त्वाचा आहे असे श्रीनिवास यांचे स्पष्ट मत होते. यासाठी श्रीनिवास यांच्या मते जात, धर्म आणि खेडे हे तीन घटक महत्त्वाचे आहेत. श्रीनिवास यांनी स्वत: राजापूरा खेड्याचा अभ्यास करताना जात, धर्म आणि कौटुंबाचा अभ्यास केला आहे. ग्रामीण समाजातील सामाजिक समस्या किंवा कलह प्रामुख्याने शेती व्यवसायाशी निगडीत असल्याचे जाणवले आहे. तसेच शेजारच्या गावाशी धार्मिक पारंपारिक किंवा राजकीय वैमनस्य असल्यास त्याचा बदला घेण्यासाठी घरांना किंवा गवताच्या गंजीना आगी लावणे किंवा जनावरे पळवून नेणे या मार्गाचा अवलंब केला जातो. पण कौटुंबिक कलह घराच्या बाहेर जाऊ देत नाहीत तर ते घरापुरतेच मर्यादित ठेवतात.

### ३) जातीव्यवस्था विषयक विचार :

जाती व्यवस्थेचा अभ्यास करताना श्रीनिवास यांनी प्रकार्यवादी दृष्टीकोणाचा वापर केला आहे. जातीव्यवस्था हा एक समाजरचनेचा भाग आहेच पण त्यापेक्षा महत्त्वाचे जातीव्यवस्था ही भारतामध्ये हजारो वर्षे टिकून राहिली. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे जातीची कार्यपद्धती होय. म्हणून जातीच्या अभ्यासात श्रीनिवास यांनी जातीच्या रचनेपेक्षा कार्यपद्धतीवर जास्त भर दिलेला आहे. कालमानपरत्वे समाजात भौतिक तंत्रज्ञानात, शिक्षणात व व्यवसायात वाढ होत गेली आणि जातीच्या रचनेत व कार्यात परिवर्तन घडून आले असे जाती विषयक आपले विचार श्रीनिवास यांनी मांडले आहेत. जातीव्यवस्थेच्या परिवर्तनासंदर्भात श्रीनिवास यांनी संस्कृतीकरण व पाश्चीमात्यीकरण या संकल्पना मांडल्या आहेत. त्याचे स्पष्टीकरण आपण पाहिले आहे.

जातीव्यवस्थेचे खंडात्मक विभाजन ही एक ऐतिहासिक प्रक्रिया आहे असे मत श्रीनिवास यांचे आहे. प्रत्येक जात ही अनेक उपजातीत विभागली आहे. आपल्या जाती किंवा उपजाती समुहाचे वेगळेपण टिकवण्यासाठी पुढील घटक जबाबदार आहेत.

विवाहाचा जोडीदार स्वजातीतील निवडतात.

ज्यांचे सदस्य समान व्यवसाय करतात.

ज्यांचे सदस्य समान सामाजिक व धार्मिक जीवन जगतात.

ज्याचे सदस्य सांस्कृतिक जीवन जगतात.

ज्यातील सदस्यावर जात पंचायतीचे नियंत्रण आहे.

प्रत्येक जात ही अनेक उपजातीत विभागली आहे. उपजातीबाबत वरील घटकाबरोबरच श्रीनिवास यांच्या मते पुढील गोष्टीसुद्धा महत्त्वाच्या आहेत. त्या गोष्टी म्हणजे श्रेणीरचना व्यवसायातील फरक सामाजिक व्यवहारावरील निर्बंधने अपवित्रता आणि जातपंचायती.

### ४) प्रभावी जात :

रामपूरा खेड्याचा अभ्यास करताना श्रीनिवास यांनी 'डॉमिनंट कास्ट इन रामपूरा' या पुस्तकात प्रभावी जाती संदर्भात अपले विचार मांडले आहेत. जातीची व्याख्या करताना श्रीनिवास म्हणतात की, अनुवंशिक आंतरविवाही आणि रूढी प्रथा परंपरांचे जतन करणारा स्थानिक समुह म्हणजे जात होय. जातीचे सामाजिक जीवनातील महत्त्व अनन्यसाधारण आहे. रामपूरा गावातील सामाजिक व राजकीय संघटनांचा अभ्यास करताना त्यांनी प्रभावी जातीची संकल्पना विषद केली आहे. तसे पाहील्यास ब्राह्मण वर्गास जाती व्यवस्थेत सर्वोच्च स्थान असताना रामपूरा गावात शेतकरी वर्ग प्रभावी दिसून आला. त्या दृष्टिने सखोल अध्ययन करून श्रीनिवास यांनी प्रभावी जातीची प्रमुख सहा वैशिष्ट्ये सांगितली आहेत.

प्रभावी जातीची वैशिष्ट्ये

१. जमीनीची मालकी

२. संख्यात्मक अधिक

३. स्थानिक स्तरावर उच्च स्थान

४. पाश्चिमात्य शिक्षण

५. प्रशासनामध्ये नोकरी.

६. नागरी उत्पन्नाचे स्त्रेत

सामाजिक आर्थिक व राजकीय क्षेत्रात सत्ता प्राप्त करून समाजव्यवस्थेत उच्चस्थान अनेक जातीसमूहांनी मिळवले आहे. पारंपारिक आणि आधुनिक समाजव्यवस्थेत प्रभावी जातीचे स्वरूप भिन्न आहे असे श्रीनिवासांचे मत आहे. कारण पारंपारिक समाजव्यवस्थेत कमी लोकसंख्येचा जमिनीची मालकी असणारा अनुवंशिकतेनुसार सत्ता अधिकार व प्रतिष्ठा संपादन करणारा जातीसमूह प्रभावी जात म्हणून ओळखला जात होता. पण आधुनिक समाजात मात्र प्रभावी संकल्पना दबलेली आहे.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न–६**

१. एम्. एन्. श्रीनिवास यांच्या मते समाजशास्त्रातील महत्त्वाचा अभ्यास विषय कोणता आहे.

२. श्रीनिवास यांनी 'ब्राह्मणीकरण' ऐवजी 'संस्कृतीकरण' असे सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेला नाव का दिले.

३. सामाजिक परिवर्तनासंदर्भात श्रीनिवास यांनी कोणत्या दोन संकल्पना विषद केल्या आहेत.

४. श्रीनिवास यांच्या मते 'संस्कृतीकरण' म्हणजे काय ते सांगा.

५. श्रीनिवास यांच्या मते 'पाश्चात्यीकरण' म्हणजे काय सांगा.

६. श्रीनिवास यांच्या मते 'धर्मनिरपेक्षीकरण' म्हणजे काय ते सांगा.

७. श्रीनिवास यांना कशाचा प्रभाव रामपूरा गावातील लोकांच्यावर पडलेला दिसून आला.

८. श्रीनिवास यांच्या मते कोणते तीन खेड्यांच्या अभ्यासासाठी महत्त्वाचे आहेत.

- **डॉ. एस्. सी. दुबे** (Dr. S. C. Dube) :

डॉ. शाम चरण दुबे हे एक भारतीय सुप्रसिद्ध मानवशास्त्रज्ञ आणि समाजशास्त्रज्ञ म्हणून ओळखले जातात. भारतीय समाजाचा त्यांनी संरचनात्मक-प्रकार्यवादी दृष्टिकोणातून अभ्यास केला आहे. त्यांच्या अभ्यासाचा महत्त्वाचा विषय म्हणजे ग्रामीण समुदाय होय. संरचनात्मक-प्रकार्यवादी दृष्टिकोणातून त्यांनी भारतीय आदिवासी व ग्रामीण समाजाचा अभ्यास केला आहे. ग्रामीण सामाजिक जीवन समजून घेण्यासाठी दुबेनी ग्रामीण समाजातील वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था, कुटुंबव्यवस्था तसेच नातेदारीचा प्रामुख्याने अभ्यास केला आहे. खेडेगावांची वास्तवता समजून घेण्यासाठी दुबेनी आंध्रप्रदेशातील 'शमिरपेठ' या खेड्याचा अभ्यास केला आहे. भारतीय ग्रामीण समाजाचे गाढे अभ्यासक म्हणजे डॉ. शाम चरण दुबे होय.

**अ) जीवनवृत्तांत : (१९२२–१९९६)**

डॅ. शाम चरण दुबेंचा जन्म २५ जुलै १९२२ रोजी मध्यप्रदेशातील नरसिंगपूर येथे झाला. दुबेंनी एम्. ए. ची पदवी राज्यशास्त्र विषयातून नागपूर विद्यापीठातून संपादन केली आणि लगेच मध्यप्रदेशातील 'कमाल' या 'बदलती कुऱ्हाड शेती' (Shifting Cultivation) पद्धतीने शेती करणाऱ्या आदिवासी जमातीवर संशोधन करून विद्यावाचस्पती (Ph.D.) पदवी संपादन केली. दुबेंनी आपले व्यवसायीक करीअर महाराष्ट्रातील

‘बीशप कॉलेज’, नागपूर येथून सुरु केले. नंतर ते लखनौ विद्यापीठात राज्यशास्त्र विषयाचे प्राध्यापक म्हणून रुजू झाले. या काळात दुबेंनी कमाल जमातीवरील संशोधनावरील पुस्तक प्रकाशित केले. नंतर ते आंध्रप्रदेशातील उस्मानिया विद्यापीठ, हैद्राबाद येथे समाजशास्त्र विषयाचे प्रोफेसर म्हणून रुजू झाले.

दुबेंनी उस्मानिया विद्यापीठ हैद्राबाद येथे असताना नागपूर येथील भारतीय मानवशास्त्रीय सर्वेक्षण विभागाचे उपविभागीय अधिकारी म्हणून काम केले. नंतर ते मध्यप्रदेशातील सागर विद्यापीठात मानवशास्त्राचे प्रोफेसर म्हणून रुजू झाले. या काळात दुबेंची भारत सरकारणे ‘राष्ट्रीय ग्रामीण समुदाय विकास’ योजनेच्या सल्लागारपदी निवड केली. १९७२ ते १९७७ पर्यंत त्यांची सीमला येथे ‘इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ ॲडव्हान्सड् स्टडीज’ ची संचालकपदी निवड झाली. दुबेंच्या समाजाशस्त्रीय योगदानामुळे १९७४ साली त्यांची भारतीय समाजशास्त्र परिषदेच्या अध्यक्षपदी निवड झाली. १९७८ साली दुबे जम्मे व्यािपीठाचे कुलगुरु झाले. मध्यप्रदेशच्या विद्यापीठ अनुदान आयोगाचे चेअरमन म्हणूनही त्यांनी काही दिवस काम पाहिले अशा थोर भारतीय समाजशास्त्रज्ञाचे व समाजशास्त्राचे ४ फेब्रुवारी १९९६ रोजी याच्या ७३ व्या वर्षी देहावसन झाले.

**ब) ग्रंथनिर्मिती :**

डॉ. शाम चरण दुबेंनी समाजशास्त्रात आपल्या लेखणीच्या माध्यमातून विविध प्रकारच्या विषयावर प्रचंड लिखाण केले आहे. दुबेंनी ग्रामीण जीवन, आदिवासी समुदाय, विकास, आधुनिकीकरण इत्यादी अनेक विषयावर लिखान केले आहे. दुबेंनी पुढील ग्रंथांचे लेखण केले आहे.

१. ‘द कमाल’

२. ‘इंडियन व्हिलेज’

३. ‘इंडियाज चेंजिंग व्हिलेजस: ह्युमन फॅक्टरस् इन कम्युनिटी डेव्हलपमेंट’

४. ‘ट्रायबल हेरिटेज ऑफ इंडिया’

५. ‘मॉडनायझेशन अँड डेव्हलपमेंट’

६. ‘एस्से ऑन मॉडरनायझेशन’

७. ‘ट्रेडिशन अँड डेव्हलपमेंट’

८. ‘अंडरस्टँडींग चेंज’

९. ‘इंडियन सोसायटी’

एस्. सी. दुबेंनी कांही पुस्तके हिंदीमधून लिहिली आहेत. उदा. ‘मानव संस्कृती’, ‘भारतीय ग्राम’, ‘विकास का समाजशास्त्र’ आणि ‘संक्रमण की पीढा’ इत्यादी. याशिवाय दुबेंनी विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संशोधन मासिकामधून अनेक पेपर प्रकाशित केले आहेत. दुबेंनी अनेक विषयावर विपूल लिखान केले आहे.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ७**

१. खेडेगावाची वास्तवता समजून घेण्यासाठी दुबेंनी कोणत्या खेड्याचा अभ्यास केला आहे.

२. दुबेंनी कोणत्या आदिवासी जमातीचा अभ्यास केला आहे.

३. एस्. सी. दुबे कोणत्या विद्यापीठाचे कुलगुरु होते.

- **समाजशास्त्रीय योगदान :**

दुबेंचे समाजशास्त्रीय योगदान अतुलनीय आहे. ग्रामीण समाज, आदिवासी समजा, नागरी समाज, भारतीय समाज, खेडेगाव, आधुनिकीकरण इत्यादी विषयावर मानसशास्त्रात आणि समाजशास्त्रात भरपूर लिखान दुबेंनी केले आहे. त्यापैकी कांही महत्त्वाच्या विषयावर आपण येथे चर्चा करणार आहोत.

१. आदिवासी समाज

२. खेड्यांचा अभ्यास

३. समुदाय आणि कायर्क्रम

४. आधुनिकीकरण आणि विकास

५. राजकीय समाजशास्त्र

**१. आदिवासी समाज :**

दुबेंनी एम्. ए. ची पदवी संपादन केल्याबरोबर लगेच पीएच.डी. ची संपादन करण्यासाठी 'कमार' या आदिवासी जमातीचा अभ्यास केला. ही जमात मध्यप्रदेशात असून प्रामुख्याने तीचा मुख्य व्यवसाय शेती आहे. कमाल लोक हे आपली 'बदलती कुऱ्हाड शेती' (Shifting Cultivation) पद्धतीने करता.

**२. खेड्यांचा अभ्यास :**

खेड्यांचा अभ्यास करून दुबेंनी १९५५ साली (भारतीय खेडी) हे आपले पहिले पुस्त प्रकाशित केले. या पुस्तकातील लिखाण भारतीय समाजाचे संरचनात्मक-प्रकार्यवादी दृष्टिकोणातून प्रकाशित केले. या पुस्तकातील लिखाण भारतीय समाजाचे संरचनात्मक-प्रकार्यवादी दृष्टिकोणातून अध्ययन करून केले आहे. म्हणून या पुस्तकाला विशेष महत्त्व आहे. दुबेंनी या पुस्तकात स्पष्टपणे भारतीय खेड्यातील जीवनाचे साररुप वर्णन केले आहे. या गावाची लोकसंख्या २,४९४ असून त्यामध्ये ३४० मुस्लीम होते. दुबेंनी जसा शमिरपेठचा अभ्यास के त्याचप्रमाणे रॉबर्ट रेडफिल्ड यांनी १९३० साली मेक्सीको येथील खेड्यांचा अभ्यास केला आहे. दुबेंच्या निरीक्षणात असे आढळून आले की, भारतातील एकही खेडे स्वायत्त व स्यंपूर्ण नाही.

भारतात खेड्यांची भौतिक रचना कशा प्रकारची आहे याचे विवेचन या पुस्तकात दुबेंनी केले आहे. शहरी भागापासून व मुख्यरस्त्यापासून दूर असलेल्या खेड्यांची रचना एकसारखी नाही. ब्रिटीशकाल व स्वातंत्र्योवर कालातील खेड्यांतील घरांच्या रचनेमध्ये बदल झालेला आहे. वाढत्या लोकसंख्याच्या गरज भागवण्यासाठी जशी नैसर्गिक साधनसामुग्रीची कमतरता भासू लागली तशी खेडी ओस पडू लगली तर दळणवळणाच्या वाढत्या सोयीमुळे रस्त्याला लागून असणाऱ्या गावांचा विकास फारच वेगाने झाला आहे असे विचार दुबेंनी मांडले आहेत.

**३. समुदाय विकास कार्यक्रम :**

दुबेंनी 'भारतातील बदलती खेडी' या पुस्तकात समुदाय विकास कार्यक्रमाबद्दल (Community Development Programme) लिहिले आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ग्रामीण समाजाच्या विकासासाठी समुदाय विकास कार्यक्रम (Community Developemnt Programme) राबवण्यात

आला. त्याच ग्रामीण समाजावर दूरगामी परिणाम घडून आले. आणि ग्रामीण समाजात परिवर्तनाच्या प्रक्रियेला वेग आला. ग्रामीण समाजाच्या बदलत्या स्वरूपाचे वर्णन दुबेंनी १९५८ सील लिहिलेल्या 'भारतातील बदलती खेडी' या पुस्तकात केले आहे. या पुस्तकात दुबेंनी समुदाय विकास कार्यक्रमाचा भारतीय खेड्यावर पडलेल्या प्रभावाचा अभ्यास केला आहे. तसेच समुदाय विकास कार्यक्रमातील महत्त्वाच्या मानवी घटकांच्या नोंदी केल्या आहेत. दुबेंनी शमिरपेठ या भारतातील हैदराबादपासून २५ कि.मी. अंतरावर असणाऱ्या आंध्रप्रदेशातील एका खेड्याचा अभ्यास केला. 'सोशल सर्व्हिस एक्स्टेंशन' या प्रोजेक्ट अंतर्गत उस्मानीया विद्यापीठाच्या अनुदानावर दुबेंनी हा अभ्यास केला. या अभ्यासाचा मुळ हेतू संरचनात्मक–प्रकार्यवादी दृष्टिकोणातून भारतीय खेड्यांतील जीवनाचे स्पष्ट चित्रण करणे हा होता. भारतातील बदलती खेडी या पुस्तकात दुबेंनी पुढील घटक हाताळलेले आहेत.

१. खेड्यांची रचना.

२. खेड्यातील लोक घरांची रचना आणि शेजारी

३. आर्थिक रचना

४. धार्मिक विधीची रचना

५. कुटुंबाची रचना

६. जीवनस्तर रचना

याशिवाय खेड्यामधील कौटुंबिक संबंध, नातेदारी व्यवस्था, अर्थिक वर्गवारी, पारलौकीक, जीवन विषयक संकल्पना उदा. लोककथा, मिथक, जादू इत्यादी घटकांचा दुबेंनी या पुस्तकात आढावा घेतला आहे.

**४. आधुनिकीकरण आणि विकास :**

आधुनिकीकरण ही एक अतिशय गुंतागुंतीची घटना असून आधुनिकीकरणाला अनेक घटक जबाबदार आहे. त्यापैकी दुबेंनी समाजशास्त्रीय दृष्टिकोणातून महत्त्वाच्या घटकांचा अभ्यास केला आहे. विशेषत: दुबेंनी आधुनिकीकरणाच्या असमतोल आणि ताठर सामाजिक नियमने या अडथळ्यांवर जास्त भर दिला आहे. भारताने स्वातंत्र्यानंतरच्या काळात आधुनिकता आणण्याचा प्रयत्न केला होता. पण त्यामध्ये भारतातील थोडे यश व थोडे अपयश मिळाले. याचे वर्णन दुबेंनी 'कन्टेप्ररी इंडिया अँड ईटस् माडरनायझेशन' या १९७४ साली लिहिलेल्या पुस्तकात केले आहे. दुबेंच्या मते आधुनिक समाज हा बुद्धिवादी आणि विज्ञानवादी असतो आणि त्याच्यामध्ये राष्ट्राच्या आधुनिकीकरणासाठी पुरेशे घटक असतात. दुबेंनी विकास या संकल्पनेविषयी 'मॉडरनायझेशन अँड डेव्हलपमेंट' या पुस्तकात आपले विचार मांडले आहेत. त्यांच्या मते विकास आणि आर्थिक वाढ किंवा आर्थिक वृद्धी यामध्ये फरक आहे. भारतातील जास्तीत जास्त लोकांचा विकास झाला नाही असे दुबेंचे मत आहे.

**५. राजकीय समाजशास्त्र :**

दुबेंचे याविषयीचे विचार राजकीय मानसशास्त्रात आढळून येतात. त्यांच्या मते, धार्मिक पवित्रता व अपवित्रता ही जाती व्यवस्थेची मूलभूत तत्त्वे आहेत. शमिरपेठ या खेड्यातील जातीव्यवस्थेचा अभ्यास करताना त्यांना असे आढळून आले आहे. कारण जाती संदर्भात अशा मर्यादा प्राचीन काळापासून चालत

आलेल्या आहेत. जाती व्यवस्थेचा आधार या मूलभूत तत्वावर आधारित असल्याचे दुबेंना आढळून आले आहे. या मर्यादा धर्मविषयक, खानपानविषयक तसेच व्यवसायविषयक दिसून आल्या आहेत.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न–८**

  १. 'कमाल' लोक हे आपली शेती कोणत्या पद्धतीने करतात ?

  २. दुबेंनी कोणत्या खेड्याचा अभ्यास केला आहे ?

  ३. दुबेंनी शमिरपेठ यार खेड्याचा अभ्यास करून कोणते पुस्तक लिहिले आहे ?

  ४. दुबेंचा शमिरपेठ या खेड्याचा अभ्यास करण्याचा मुळ हेतू काय होता ?

  ५. दुबेंनी 'भारतातील बदलती खेडी' या पुस्तकात भारत सरकारच्या कोणत्या कार्यक्रमाबद्दल लिहिले आहे?

## **२.४ सारांश** (Let us Sum up) :

सदर प्रकरणामध्ये आपण प्राच्यविद्या दृष्टीकोन म्हणजे काय? प्राच्यविद्या दृष्टीकोन तयार होण्यामागची पार्श्वभूमीचा आढावा घेतला आहे. प्राच्य विद्या दृष्टीकोन म्हणजे भारत देशाची संस्कृती व समाज निर्मिती वेगवेगळ्या प्रक्रियांनी झालेली असल्यामुळे इतर समाजासाठी उपलब्ध असणारे दृष्टीकोन वापरून भारतीय समाजाचे अध्ययन न करता ऐतदेशीय दृष्टीकोन वापरून भारतीय समाजव्यवस्था प्राचीन ग्रंथाच्या आधारे समजून घेण्याचा प्रयत्न होय.

जी. एस. घुर्ये यांच्या मते, 'भारतीय समाज व्यवस्था ही गुंतागुंतीच्या ऐतिहासिक प्रक्रियांची निर्मिती आहे.'' या प्रक्रियेमध्ये प्रामुख्याने आर्यांचे आगमन, भारतातील इतर धर्मांचा उदय व परकीय धार्मचे आगमन, पाश्चात्य वसाहतवाद, वसाहतवाद विरोधी लढा, भारताची फाळणी, या घटनांचा भारताच्या समाजनिर्मितीमध्ये महत्त्वाचा सहभाग आहे. त्याच बरोबर भारतीय समाजात विविधतेत एकता आढळून येते डी एक विशिष्ट परिस्थिती भारतात आढळून येते. म्हणून भारतीय समाजाचे अध्ययन करण्यासाठी पाश्चात्य देशातील दृष्टीकोन योग्य ठरणार नाहीत म्हणून ऐतदेशिय प्राच्यविद्या दृष्टीकोनातून भारतीय समाजाचा अभ्यास घुर्ये यांनी केला. त्यामध्ये प्रामुख्याने भारतातील संस्कृती व सभ्यता, जातीव्यवस्था, धर्मव्यवस्था इ. चा समावेश होतो. त्याचबरोबर हाच दृष्टीकोन वापरून भारतीय समाजातील जातीव्यवस्था, संस्कृती धर्म या व्यवस्थांचा अभ्यास लुईस ड्यूमाँट या फ्रेंच समाजशास्त्रज्ञाने केला. विशेषत: जाती व्यवस्थेची विचार प्रणाली या घटकावर जास्त भर दिल्याचे दिसून येते.

समाजशास्त्रात समाजाचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास केला जातो. समाज हा व्यापक व गुंतागुंतीचा असल्यामुळे आणि समाजाचे अधिकाधिक वास्तव ज्ञान प्राप्त व्हावे यासाठी शास्त्रात अनेक अभ्यास पद्धती, तंत्रे व दृष्टिकोण विकसीत झालेले आहेत. त्यापैकी एक महत्त्वाची अभ्यास पद्धत किंवा दृष्टिकोण म्हणून संरचनात्मक प्रकार्यवादाला ओळखले जाते.

समाजशास्त्रात समाजाचा सर्वांगीण अभ्यास केला जातो. समाजाचे अधिकाधिक व यथार्थ ज्ञान प्राप्त व्हावे यासाठी शास्त्रात विविध अभ्यास पद्धती व दृष्टिकोण विकसीत झालेले आहेत. त्यापैकी एक अभ्यास पद्धत म्हणून संरचनात्मक-प्रकार्यवादाला ओळखले जाते. भारतीय समाजातील आदिवासींचा व खेड्यांचा

अभ्यास करुन डॉ. एस्. सी. दुबेंनी भारतीय समाजशास्त्रात आपले महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. भारतीय समाजाचा अभ्यास करताना त्यांनी प्रामुख्याने संरचनात्मक-प्रकार्यवादी दृष्टिकोणाचा अवलंब केला आहे.

★ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे (Answers to check your progress) :

- **स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे - १**

    १. प्राच्यविद्या या शब्दाचा शब्द : अर्थ प्राचीन विद्या हा होय.

    २. भारतीय समाज व्यवस्थेचे अध्ययन करण्यासाठीचे मार्क्सवादी दृष्टीकोन आणि लोकउठाव दृष्टीकोन हे दोन दृष्टीकोन आहेत.

    ३. लुईस ड्यूमाँट हा फ्रेंच देशाचा समाजशास्त्रज्ञ होता.

    ४. हिंदू धर्मातील दोन आदर्श धर्म आणि कर्म हे आहेत.

- **स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे - २**

    १. भारतीय समाजशास्त्राचे जनक म्हणून जी. एस. घुर्ये यांना ओळखले जाते.

    २. 'भारतातील जात आणि वंश' या विषयावर घुर्ये यांनी संशोधन पदवी मिळवली.

    ३. इंडियन सोशॉलॉजीकल सोसायटीची स्थापना १९५२ मध्ये झाली.

    ४. ऐतिहासिक आणि तुलनात्मक पद्धती या दोन पद्धतीशास्त्रातील महत्त्वाच्या पद्धती आहेत.

    ५. मुख्य प्रवाहापासून अलग असणे हे भारतातील मागास जमातींच्या मागासलेपणाचे मुख्य कारण आहे.

- **स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे - ३**

    १. लुईस ड्यूमाँट यांनी १९४९-५० या दरम्यान भारतातील तामिळनाडू राज्यात संशोधन केले.

    २. लुईस ड्यूमाँट यांच्या पद्धतीचे मुख्य दोन आधार म्हणजे विचार प्रणाली आणि संरचना व प्राच्यविद्या आणि संरचनात्मक दष्टीकोन हे आहेत.

    ३. कायमस्वरुपी अपवित्रता आणि तात्पुरती अपवित्रता हे पवित्रतेचे मुख्य दोन प्रकार आहेत.

    ४. जाती व्यवस्थेतील 'श्रेणीरचना' टिकवून ठेवणारी भारतातील मुख्य व्यवस्था म्हणजे हिंदूवाद होय.

- **स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे - ४**

    अ) विशिष्ट समाजाच्या रचनेच्या तिच्या कार्यपद्धतीच्या संदर्भात अद्ययन करण्याच्या दृष्टिकोणाला संरचनात्मक-प्रकार्यवादी दृष्टिकोण म्हणतात.

    ब) समाजाच्या रचनेवर व कार्यपद्धतीवर भर देणारा दृष्टिकोण म्हणजे संरचनात्मक-प्रकार्यवादी दृष्टिकोण आहे.

    क) संरचनात्मक-प्रकार्यवादी दृष्टिकोणाचा समाजशास्त्रात प्रथम उपयोग सुप्रसिद्ध ब्रिटिश समाजशास्त्रज्ञ हर्बर्ट स्पेन्सर यांनी केला आहे.

ड) डॉ. एस्. सी. दुबे, आय. पी. देसाई, डी. एन्. मुजूमदार इत्यादी संरचनात्मक-प्रकार्यवादी दृष्टिकोणाचे भारतीय समर्थक आहेत.

- **स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे – ५**

अ) एम्. एन्. श्रीनिवासांचे पूर्ण नाव मैसूर नरसिंहाचार्य श्रीनिवास आहे.

ब) मैसूर नरसिंहाचार्य श्रीनिवास यांचा जन्म १६ नोव्हेंबर १९१६ रोजी म्हैसूर येथे एका ब्राह्मण कुटुंबात झाला.

क) एम्. एन्. श्रीनिवास यांनी डी.फील ही पदवी त्यांची ऑक्सफर्ड विद्यापीठातून प्राप्त केली होती.

ड) रेडक्लिफ ब्राऊन यांच्या मार्गदर्शनामुळे श्रीनिवास यांच्या संशोधनावर संरचनात्मक-प्रकार्यवादी दृष्टिकोणाचा प्रभाव पडलेला दिसून येतो.

इ) श्रीनिवास यांचे मत सहभागी निरीक्षणामुळे संशोधकास संबंधित घटनेचे सखोल ज्ञान प्राप्त होते.

- **स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे – ६**

१. एम्. एन्. श्रीनिवास यांच्या मते सामाजिक परिवर्तन व समाजशास्त्रातील महत्त्वाचा अभ्यास विषय आहे.

२. कनिष्ठ जातीतील लोक केवळ ब्राह्मणांचेच नव्हे तर वरिष्ठ समजल्या जाणाऱ्या कोणत्याही जातीच्या लोकांच्या वर्तनाचे अनुकरण करून आपल्या जीवनाचा दर्जा उंचावण्याचा प्रयत्न करत असल्याचे आढळून आले. म्हणून श्रीनिवास यांनी 'ब्राह्मणीकरण' आणि 'पाश्चीमात्यीकरण' या दोन संकल्पना विषद केल्या आहेत.

३. सामाजिक परिवर्तनासंदर्भात श्रीनिवास यांनी 'संस्कृतीकरण' आणि 'पाश्चीमात्यीकरण' या दोन संकल्पना विषद केल्या आहेत.

४. श्रीनिवास यांच्या मते 'संस्कृतीकरण म्हणजे अशी प्रक्रिया आहे की ज्यामध्ये कनिष्ठ जातीतील लोक वरिष्ठ समजल्या जाणाऱ्या जातीच्या रुढी, प्रथा, विचारप्रणाली आणि जिवन पद्धतीच्या मार्गाने बदल घडवून आणतात.

५. पाश्चात्य शिक्षण, मूल्य, निती, ज्ञान, तंत्रज्ञान थोडक्यात पाश्चात्य आचार विचार पद्धतीचा भारतीय सामाजिक जीवन पद्धतीवर प्रभाव म्हणजे 'पाश्चात्यीकरण' होय.

६. श्रीनिवास यांच्या मते धार्मिक आदर्शकांची सामाजिक आणि व्यवहरीक परिभाषा करणे म्हणजे 'धर्मनिरपेक्षीकरण' होय.

७. श्रीनिवास यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभाव रामपूरा गावातील लोकांच्यावर पडलेला दिसून.आला.

८. श्रीनिवास यांच्या मते जात, धर्म आणि खेडे हे तीन ञघटक खेड्याच्या अभ्यासासाठी महत्त्वाचे आहेत.

- **स्वयं अध्ययनासाठी उत्तरे – ७**

  १) खेडेगावाची वास्तवता समजून घेण्यासाठी दुबेंनी आंध्रप्रदेशातील 'शमिरपेठ' या खेड्याचा अभ्यास केला आहे.

  २) दुबेंनी 'कमाल' या आदिवासी जमातीचा अभ्यास केला आहे.

  ३) एस्. सी. दुबे जम्मू विद्यापीठाचे कुलगुरु होते.

- **स्वयं अध्ययनासाठी उत्तरे – ८**

  १) 'कमाल' लोक हे आपली शेती 'बदलती कुऱ्हाड शेती (Shifting Cultivation) पद्धतीने करतात.

  २) दुबेंनी 'शमिरपेठ' या खेड्याचा अभ्यास केला आहे.

  ३) दुबेंनी शमिरपेठ या खेड्याचा अभ्यास 'भारतातील बदलती खेडी' हे पुस्तक लिहिले आहे.

  ४) दुबेंचा शमिरपेठ या खेड्याचा अभ्यास करण्याचा मूळ हेतू संरचनात्मक-प्रकार्यवादी दृष्टिकोणातून भारतीय खेड्यातील जीवनाचे स्पष्ट चित्रण करणे हा होता.

  ५) दुबेंनी 'भारतातील बदलती खेडी' पुस्तकात भारत सरकारच्या समुदाय विकास कार्यक्रमाबद्दल लिहिले (Community Developemnt Programme) आहे.

## २.६ सरावासाठी प्रश्न (Exercise / Home assignment) :

१. प्राच्यविद्या दृष्टीकोन म्हणजे काय स्पष्ट करा.

२. जी. एस. घुर्ये यांचे भारतातील जाती विषयक विचार स्पष्ट करा.

३. लुईस ड्यूमाँट यांच्या प्राच्यविद्या दृष्टीकोनातून भारतातील जातीव्यवस्था स्पष्ट करा.

४. संरचनात्मक-प्रकार्यवादी दृष्टिकोणाचा अर्थ स्पष्ट करा.

५. एम. एन्. श्रीनिवास यांचा थोडक्यात जीवन परिचय विषद करा.

६. एम्. एन्. श्रीनिवास यांचे समाजशास्त्रीय योगदान विषद करा.

७. एम्. एन्. श्रीनिवास यांचे सामाजिक परिवर्तनासंबंधीच्या संस्कृतीकरण व पाश्चीमात्यीकरण या संकल्पना विषद करा.

८. एम्. एन्. श्रीनिवास यांचे जातीविषयक विचार थोडक्यात स्पष्ट करा.

९. एम्. एन्. श्रीनिवास यांचे प्रभावी जाती विषयक विचार थोडक्यात स्पष्ट करा.

१०. संरचनात्मक-प्रकार्यवादी दृष्टिकोणाचा अर्थ स्पष्ट करा.

११. एस्. सी. दुबे यांचा थोडक्यात जीवन परिचय विषद करा.

१२. एस्. सी. दुबे यांचे समाजशास्त्रीय योगदान विषद करा.

## २.७ चिंतन आणि कार्य (Reflection and Action) :

१. या घटकामध्ये आपण प्राच्यविद्या दृष्टीकोन म्हणजे काय याचा अभ्यास केला आहे. त्याच बरोबर भारतीय समाजातील जातीव्यवस्थेच्या वैशिष्ट्याचे बदलते स्वरूप लक्षात घेण्यासाठी एखादा संशोधन प्रकल्प हाती घ्या किंवा क्षेत्रीय कार्याद्वारे घडणाऱ्या घटनांचे निरीक्षण करा.

२. आपल्या शिक्षकांच्या मदतीने ग्रामीण समाजाचे किंवा एखाद्या खेड्याचे समाजशास्त्रीय दृष्टिकोणातून सर्वेक्षण करा.

३. आपल्या शिक्षकांच्या मदतीने एखाद्या खेड्याचे समाजशास्त्रीय दृष्टिकोणातून सर्वेक्षण करा.

## २.८ अधिक वाचनासाठी पुस्तके (Suggested Readings) :


१) Nagla B. K. (2008) : Indian Sociological Thought : Jaipur, Rawat Pubications.

२) Singh Yogendra (2004) : Idelogy and Theory in Indian Sociology, Jaipur Rawat Publications.

३) बी. के. नागला, 'इंडियन सोशॉलॉजी थॉट,' राव पब्लीकेशन, जयपूर.

४) व्ही. एन्. गजेंद्रगड, 'भारतीय समाजशास्त्र', फडके प्रकाशन, कोल्हापूर.

५) हरिकृष्ण रावत, 'उच्चस्तर समाजशास्त्र विश्वकोश', रावत पब्लीकेशन, जयपूर.

६) Pramanic S. K. (1994) : Sociology of G. S. Ghurye, Jaipur Rawat, Publications.

७) Du Mont Lous (1996) : Homo Hierarchicus : The Caste system and Its Implications. Delhi, Vikas Publications.

८) Ghurye G. S. (1966) : Caste and Race in India.

९) Dhangare D. N. (1998) : Themes and Perspectives in Indian Sociology, Jaipur, Rawat Puyblications.

१०) Singh Yogendra (1986) : Indian Sociology, New Delhi Vistaar Publications.

११) Oommen T. K. and Partha N. : Mukherji (1986) : Indian Sociology : Reflections and Interpretation, Bombay : Popular Pakashan.


❑❑❑

## सत्र २ : घटक ३

# मार्क्सवादी दृष्टीकोन

## (Marxist Perspectives)

**घटक संरचना**

३.१ प्रास्ताविक

३.२ उद्दिष्टे

३.३ विषय विवेचन

  ३.३.१ मार्क्सवादी दृष्टिकोन

  ३.३.२ डी.पी.मुखर्जी

  ३.३.३ ए.आर.देसाई

३.४ सारांश

३.५ स्वयं अध्ययनासाठीच्या प्रश्नांची उत्तरे

३.६ सरावासाठी प्रश्न

३.७ चिंतन आणि कार्य

३.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ३.१ प्रास्ताविक (Introduction)

आपण यापुर्वीच्या दोन युनिटमध्ये भारतीय समाजशास्त्राचे जनक मानल्या जाणाऱ्या जी.एस.धुर्ये यांच्या बरोबरीने ल्युयिस ड्युमॉ यांच्या भारतीय समाजाबाबतच्या इंडॉलॉजिकल दृष्टिकाणाची आणि एस.सी.दुबे व एम. एन. श्रीनिवास यांच्या संरचनावादी दृष्टिकोणातून भारतीय समाजाचे वास्तव्य स्पष्ट करणाऱ्या विचारांची ओळख करून घेतली आहे. याप्रमाणेच या युनिटमध्ये आपल्याला भारतीय समाजाच्या सर्वांगीण स्पष्टीकरणासाठी मार्क्सवादी दृष्टिकोणाचा अवलंब करणाऱ्या डी.पी.मुखर्जी व ए.आर.दुसाई या दोन विचारवंताच्या विचारांचे स्पष्टीकरण समजून घ्यायचे आहे. सर्वप्रथम मार्क्सवादी दृष्टिकोण म्हणजे काय व मार्क्सवादी दृष्टिकोणाचा भारतीय समाजाच्या अभ्यासासाठी कोणी व कसा वापर केला आहे याची ओळख करून घेतल्यानंतर डी.पी.मुखर्जी यांच्या मार्क्सवादी दृष्टिकोणाचा परिचय आपण करून घेणार आहोत.

## ३.२ उद्दिष्ट्ये (Objectives) :

या युनिटच्या अभ्यासानंतर आपणास मार्क्सवादी दृष्टिकोणाबरोबरच खालील दोन भारतीय समाजशास्त्रज्ञांच्या भारतीय समाजाबाबतच्या मार्क्सवादी दृष्टिकोणाबाबत ज्ञान मिळवण्यात यशस्वी होऊ.

डी.पी.मुखर्जी यांनी भारतीय समाजातील सामाजिक वास्तवाचे यथार्थ स्पष्टीकरणासाठी मार्क्ससाठी दृष्टिकोणाचा वापर कशा पद्धतीने केला आहे. या संदर्भात अध्ययन करत असताना आपण त्यांनी व्यक्तिमत्व, आधुनिक भारतीय संस्कृती, परंपरा, समाजशास्त्राचे स्वरूप पद्धती, नव मध्यम वर्गाची भुमिका, भारतीय इतिहासाची बांधणी, आधुनिकीकरण आणि संगित याबाबत मांडलेल्या विचारांची ओळख करून घेणार आहोत.

आर. देसाई यांनी भारतीय समाजातील सामाजिक वास्तवाचे यथार्थ स्पष्टीकरणासाठी मार्क्स वादी दृष्टिकोनाचा वापर कशा पद्धतीने केला आहे. देसाईच्या विचारांची ओळख करून घेत असताना आपण त्यांच्या ग्रामीण संरचना, भारतीय समाजातील परिवर्तन, भारतीय राष्ट्रवादाची सामाजिक पार्श्वभूमी, शेतकऱ्यांना संघर्ष, राज्य आणि समाज याविषयींच्या त्यांच्या विचारांचा आढावा घेणार असून मार्क्सवादी दृष्टिकोणाचे महत्वही जाणून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत.

## **३.३ विषय विवेचन** (Presentation of Subject Matter) :

विषय विवेचनामध्ये प्रामुख्याने आपण मार्क्सवादी दृष्टीकोनाच्या अर्थाने स्पष्टीकरण देवून त्यानंतर डी. पी. मुखर्जी व ए. आर. देसाई यांचे भारतीय समाजाचे विचारांचे अध्ययन पहाणार आहोत.

### **३.३.१ मार्क्सवादी दृष्टिकोण** (Marxist Perspective) :

१८ व्या शतकाच्या उत्तरार्धापासून ते १९ व्या शतकाच्या पुर्वार्धापर्यंत मानव समाजविषयीच्या चिंतनावर प्रामुख्याने आदर्शवादी विचारसरणीचा प्रभाव असल्याचे दिसून येते याच्याच प्रभावामुळे मानवी समाजाचे विश्लेषण करताना चेतना आत्मा यांच्या आधारावर भर दिल्याचे दिसून येते. दुसऱ्या बाजूला जगात होणाऱ्या परिवर्तनाच्या नियमात द्वंन्द्ववादी तत्वाची प्रस्थापना झाली होती. ज्याच्याकडून प्रत्येक प्रकारचे परिवर्तन हा तत्व किंवा विचार यामध्ये समाविष्ट असलेल्या द्वंद्वाचा परिणाम मानला गेला होता. तत्कालिन जर्मन तत्वज्ञ हेगेल यांनी आदर्शवादाची मान्यता आणि द्वंद्ववादाचा नियम यांच्या मिलाफातून 'द्वंद्वात्मक आदर्शवादाच्या' सिद्धांताची मांडणी केली होती. ज्याच्या सहाय्याने सामाजिक परिवर्तन समजून घेण्याचा प्रयत्न सुरू होता. या सिद्धांत हेगेल यांनी हे स्पष्ट केले की, जगताच्या मूलस्थीन विचार असून जग हे विचारांच्या विविध रूपात अभिव्यक्त होते. विचार स्थिर नसून त्यात द्वंद्वाच्या नियमानुसार सातत्याने परिवर्तन होत असते याचाच परिणाम म्हणून मानवी समाजात परिवर्तन अगर विकास होत असतो.

मानव समाजाबाबतच्या वरील स्पष्टीकरणात सर्वात महत्त्वाची मर्यादा ही होती की, या स्पष्टीकरणाकडून मानव समाजाचे स्पष्टीकरण करताना भौतिक घटकाची पूर्णपणे उपेक्षा झाली होती. या मर्यादेवर मात करण्याचा प्रयत्न कार्ल मार्क्स यांनी केला आणि मानव समाजाबाबतच्या आपल्या विचारांची मांडणी पद्धतशीरपणे केली. ज्याला मार्क्सवादी सिद्धांत अगर मार्क्सवादी दृष्टिकोण म्हणून जगमान्यता मिळाली.

मार्क्स यांनी मानव समाजाबाबतच्या आपल्या स्पष्टीकरणात हेगेलच्या द्वंद्ववादाचा स्विकार केला पण आदर्श वादाचा त्याग करतानाच त्याच्या भौतिकवादाचा स्विकार करून 'द्वंद्वात्मक भौतिक वादाचा' सिद्धांत मांडला. आपल्या या सिद्धांतात मार्क्सने हे स्पष्ट केले की जगाच्या मूलस्थानी विचार नसून पदार्थ आहे आणि हा पदार्थ ही स्थिर नसून द्वंद्वाच्या नियमानुसार सातत्याने परिवर्तनशील आहे आणि म्हणूनच मानवी विश्व निरंतरपणे परिवर्तनशील आहे.

आपल्या या सिद्धांताच्या सहाय्याने मानवी समाजाचे विश्लेषण करताना मार्क्स असे मत मांडले की, कोणत्याही समाजाच्या केंद्रस्थानी भौतिक तत्व अर्थात अर्थव्यवस्था किंवा उत्पादन प्रणाली असते. ही उत्पादन प्रणालीच समाजाचा आधार असते. ज्याच्यावर समाजातील इतर संरचना अवलंबून असतात. अर्थात कोणत्याही समाजातील धर्म, विचार परंपरा, मूल्यव्यवस्था राज्य, कायदा इत्यादी उपव्यवस्थांचे निर्धारण अगर निश्चिती करण्याचे काम त्या समाजाची अर्थव्यवस्था अगर उत्पादनप्रणाली कडूनच केले जाते. मार्क्स यांच्या मते उत्पादनाची प्रणाली स्थिर असत नाही तर त्यात समाविष्ट असलेल्या द्वंद्वामुळे अगर अंतरविरोधामुळे या परिवर्तन घडून येण्याची शक्यता निर्माण होते. उत्पादनप्रणाली हाच मानवी समाजाचा आधार अगर केंद्रस्थानी असल्यामुळे यातील परिवर्तनाच्या बरोबरच समाजातील इतर उपव्यवस्थांमध्ये परिवर्तन अगर विकास होत जातो. मार्क्सच्या या दृष्टिकोणाला 'ऐतिहसिक भौतिकवाद' या नावाने ओळखले जाते.

- **मार्क्सवादी दृष्टिकोणाच्या मान्यता :**

मानव समाजाच्या विश्लेषणाचा मार्क्सवादी दृष्टिकोण हा खालील आधारावर अवलंबून आहे.

१) मानव समाज हा विविध घटकांच्या एकत्रिकरणातून निर्माण झालेली एक समगता आहे.

२) समाजाच्या विविध घटकांमध्ये अर्थव्यवस्था अगर उत्पादनप्रणाली हा सर्वात महत्वाचा घटक अगर आधार असून याच्यावर समाजातील विविध घटक आधारलेले असतात. दुसऱ्या शब्दात समाजातील विविध घटकांच्या स्वरूपाची निश्चिती ही त्या समाजातील अर्थव्यवस्था अगर उत्पादनाची प्रणाली याद्वारेच निश्चित केली जाते.

३) सामाजाची अर्थव्यवस्था उत्पादनाची प्रणाली स्थिर असत नाही. तर त्यात द्वंद्वाच्या नियमानुसार सातत्याने परिवर्तन होत असते. या उत्पादन प्रणाली नुसारच समाजातील विविध घटकांचे निर्धारण होत असल्याने उत्पादन प्रणालीतील बदलांबरोबरच समाजाच्या अन्य व्यवस्थांमध्ये परिवर्तन होत असते.

४) समाजांच्या उत्पादन प्रणालीत समाविष्ट असलेला द्वंद्व अगर अंतर्विरोध उत्पादनप्रणालीतील उत्पादन साधनांचे मालक आणि यापासून वंचित वर्गसंघर्षाच्या स्वरूपात अभिव्यक्त होतो आणि हाच आंतर्विरोध समाजाच्या अधिसंरचनेतील परिवर्तनाला चालना देतो.

मानव समाज्याच्या विश्लेषणाबाबत मार्क्सवादी दृष्टिकोण मान्यतांना केंद्रस्थानी मानून अर्थव्यवस्थेच्या स्वरूपात होणाऱ्या परिवर्तनाच्या आधारावर मानव समाजात होणाऱ्या परिवर्तनाची आणि इतिहासाची व्याख्या विशद करतो. याबरोबर द्वंद्व अगर संघर्षाला मानव समाजाच्या प्रमुख तत्व मानून मानव समाजातील विचलन, तनाव, द्वंद्व, संघर्ष इत्यादींच्या अभ्यासावर आपले लक्ष केंद्रीत करतो आणि त्याचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न करतो.

- **मार्क्सवादी दृष्टिकोणाचा भारतीय समाजाच्या अध्ययनातील प्रयोग :**

भारतीय समाजाच्या विश्लेषणासाठी मार्क्सवादी दृष्टिकोणाचा वापर प्रामुख्याने २० व्या शतकाच्या मध्यात केला गेल्याचे आढळून येते. यादरम्यानच प्रथम एम.एन.रॉय या राजकीय विचारवंत व भारतातील प्रथम समाजशास्त्रज्ञ भूपेंद्र नाथ दत्त यांच्याकडून मार्क्सवादी दृष्टिकोणाच्या सहाय्याने तत्कालिन भारतीय समाजाचे स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न झाल्याचे दिसून येते. असे असले तरी यादृष्टिकोणाचा अत्यंत विस्तृत

अगर व्यवस्थित उपयोग भारतीय समाजाच्या स्पष्टीकरणासाठी डी. पी. मुखर्जी, रामकृष्ण मुखर्जी आणि ए.आर. देसाई यांच्या लिखानात दिसून येतो.

भारतीय समाजाच्या स्पष्टीकरणासाठी मार्क्सवादी दृष्टिकोणाचा अवलंब करत असताना डी.पी.मुखर्जी यांनी द्वंद्ववाच्या आधारावर भारतीय समाजात होणाऱ्या परिवर्तनाचे स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न केला असल्याचे दिसून येते. त्यांनी अंतर्गत आणि बाह्य परंपरांच्या रूपात भारतीय परंपरा व इस्लामी परंपरा व पाश्चात्य परंपरा यांच्यातील द्वंद्वाच्या स्वरूपात आणि उच्च अगर स्थानिक परंपरामध्ये विद्यमान असलेल्या द्वंद्वाच्या सहाय्याने स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न केला असल्याचे दिसून येते. याबरोबरच राधाकृष्ट मुखर्जी, ए.आर.देसाई यांनीही या दृष्टिकोणाच सहाय्याने भारतीय समाजाचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला असल्याचे दिसून येते.

- **स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – १**

 १) .................. यांनी आदर्शवादाची मान्यता आणि द्वंद्ववादाचा नियम यांच्या मिलाफातून 'द्वंद्वात्मक आदर्शवादाच्या' सिद्धांताची मांडणी केली होती.

 २) मार्क्स यांच्या मते .............. हाच मानवी समाजाचा आधार अगर केंद्रस्थानी असल्यामुळे यातील परिवर्तनाच्या बरोबरच समाजातील इतर उपव्यवस्थांमध्ये परिवर्तन अगर विकास होत जातो.

 ३) .............. व ................ आणि ................ या भारतीय समाजशास्त्रज्ञांनी भारतीय समाजाच्या स्पष्टीकरणासाठी अत्यंत व्यापक व व्यवस्थित असा मार्क्सवादी दृष्टिकोणाचा अवलंब केला होता.

## ३.३.२ डी.पी. मुखर्जी (१८९४–१९६१) :

भारतात समाजशास्त्राची पायाभरणी करणाऱ्यापैकी एक म्हणून सर्वमान्य झालेल भारतीय समाजशास्त्रामध्ये मार्क्सवादी विचारवंत म्हणून ओळखले जाणाऱ्या पण भारतीय समाजव्यवस्थेच्या व भारतीय परंपरेच्या संदर्भात मार्क्सवादाचा वेगळा अन्वयार्थ विशद करणाऱ्या आणि डी.पी. या नावानेच सर्वपरिचित असलेल्या धुराजती प्रसाद मुखर्जी यांचा जन्म ५ ऑक्टोंबर १८९४ रोजी पश्चिम बंगालमधील एका मध्यम वर्गीय बंगाली कुटुंबात झाला. सत्येन बोस यांच्या म्हणन्यानुसार जेव्हा डी.पी.कलकत्ता विद्यापीठाची पात्रता परिक्षा पास केली तेव्हा सर्वप्रथम त्यांना सायन्समध्ये आपले करीअर करण्याची इच्दा होती. पण त्यांनी अर्थशास्त्र व इतिहासामध्ये एम.ए.पदवी प्राप्त केली. त्यांना पुढील शिक्षणासाठी इंग्लंडला जायचे होते पण त्याच वेळी पहिले महायुद्ध सुरू झाले व त्यांना आपल्या पुढील शिक्षणबाबतच्या विचारांचा त्याग करावा लागला.

डी.पी.मुखर्जींनी कलकत्यातील बनारस महाविद्यालयात आपल्या अध्यापनाच्या कार्यालास सुरूवात केली. लवकरच म्हणजे १९२२ साली लखनौ विद्यापीठात अर्थशास्त्र व समाजशास्त्र या विषयाचा अधिव्याख्याता म्हणून काम करण्याची संधी डॉ. राधाकमल मुखर्जींच्यामुळे त्यांना प्राप्त झाली. याच विद्यापीठातून सुमारे ३५ वर्षे इतके प्रदिर्घ अध्यापनाचे काम करून विभागप्रमुख व प्राध्यापक म्हणून डी.पी. १९५४ साली सेवानिवृत्त झाले. १९५३ मध्ये एक वर्ष त्यांनी हेग येथल आंतरराष्ट्रीय सामाजिक अध्ययन संस्थेत समाजशास्त्राचे व्हिजिटिंग प्राध्यापक म्हणून अध्यापनाचे कार्य केले होते. सेवानिवृत्तीनंतर त्यांना अलिगड विद्यापीठाकडून अर्थशास्त्र चेअरवर पाचारण करण्यात आले. या आमंत्रणाचा त्यांनी अत्यंत

आनंदाने स्विकार केला व आपल्या पाच वर्षे काम केले. १९५५ साली डेहराडून येथे डॉ.आर.एन.सक्सेना यांच्या पुढाकाराने जी पहिली अखिल भारतीय समाजशास्त्र परिषद भरविण्यात आली त्या परिषदेचे अध्यक्षपद डी.पी.नी भुषविले होते. यावेळी आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये आपल्या गतजीवनाकडे दृष्टीक्षेप टाकत त्यानी आपण ज्ञानाच्या सहाय्याने आपले व्यक्तिमत्व व्यापक करण्यासाठीच अर्थशास्त्र व इतिहासाकडून समाजशास्त्राकडे प्रवास केला असल्याचे नमुद केले होते. त्यांनी भारतीय परंपरेचे पारंपारिक स्वरूप जाणून घेऊन त्यात कशाप्रकारे स्थित्यंतरे होत गेली याचे अध्यनयन व संशोधन भारतीय संस्कृतीच्या चौकटीत राहून करण्याचा सल्ला त्यांनी समाजशास्त्राच्या अभ्यासकांना दिला होता. याबरोबरच भारतीय परिस्थितीला लागू पडेल असे नवीन अध्ययन तंत्र विकसित करण्याची प्रेरणाही त्यांनी दिली. १९५६ साली घशाच्या कॅन्सरमुळे त्यांचा वर स्विर्झलंड येथे शस्त्रक्रिया करण्यात आली पण ५ डिसेंबर १९६१ रोजी या महान विचारवंताचा अंत झाला.

**ग्रंथ संपदा :** डी.पी. एक अष्टपैलू विद्वान होते. त्यांनी बंगाली भाषेत १० व इंग्रजीत ९ असे एकूण १९ ग्रंथ लिहीले आहेत. यापैकी महत्वाचे ग्रंथ म्हणून त्यांच्या पुढील ग्रंथाचा उल्लेख करावा लागतो.

१) Basic Concepts in Sociology (1932)

२) Personality and the Social Sciences (1924)

३) On Indian History : A study in Method (1945)

४) Introduction to Indian Music (1945)

५) Views and Counterviews (1946)

६) Problems of Indian Youth (1946)

७) Modern Indian Culture and Diversities (1942)

या ग्रंथ संपदेबरोबरच खऱ्या विद्वतेची चुणूक त्यांनी लिहिलेल्या Tagore : A Study (1943) आणि Introduction to Music (1945) अशा ग्रंथामूधन अभ्यासकांना जाणवते. त्यांनी निर्मीलीली ही ग्रंथ संपदा निश्चितच त्यांच्या विद्वतेची कल्पना अभसकांना देते पण केवळ ग्रंथ निर्मिती करण्यापेक्षा त्यांनी आपल्यासमोर आलेल्या विद्यार्थ्यांची मने संस्कारित करण्यावरच अधिक भर दिला होता.

डी.पी. च्या विचारसरणीवर कार्लमार्क्सच्या तत्वज्ञानाचा विशेष प्रभाव पडल्याचे दिसून येते. पण त्यांनी पूर्णपण मार्क्सवादी पुरस्कार केला नाही. विशेषतः मार्क्सप्रणित विरोध विकासवादाचे तंत्र भारतीय संस्कृतीच्या अभ्यासासाठी वापरण्याचा प्रयत्न त्यांनी केला असल्याचे दिसून येते. याबरोबरच डिल्थे आणि डॉ. राधाकमल मुखर्जी पारसन्स यांच्याही विचारांचा अभाव पडल्याचे दिसून येते.

**१) डी.पी. मुखर्जीची ऐतिहासिक विरोध विकासवादाची संकल्पना :**

समाजशास्त्रीय अध्ययनपद्धती संदर्भात मुखर्जीनी मार्क्सप्रणित विरोधविकासवादाच्या तत्वाचा किंवा द्वंद्वात्मकतेचा अवलंब केला असल्याचे दिसून येते. मुखर्जीचे सुरूवातीचे लिखाण मार्क्सवादी विचारसरणीवर आधारलेले होते. त्यांनी मार्क्सवादी विचारसरणी व अध्ययन तंत्र यांची भारतीय समाजव्यवस्थेशी सांगड घालण्याचा प्रयत्न केल्याचे आढळते. त्यांनी भारतातील जमीनदारी व सरंजामशाही पद्धती, जातिधिष्ठीत समाजव्यवस्था, अनेक व्यावसायिक संघ, धर्म आणि परंपराचा समाजव्यवस्थेवर पडणार प्रभाव, भारतीय

समाजातल अज्ञान, दारिद्र्य कर्जबारीपणा या सर्व पार्श्वभूमीवर मार्क्सवादी विचारांचे मूल्यमापन केले व त्यावरून असा निष्कर्ष काढला की केवळ मार्क्सप्रणित तंत्राच्या सहाय्याने भारतीय समाजव्यवस्थेतील वास्तवाचा आशय विशद करणे अशक्य आहे.

मुखर्जींनी भारतीय समाजात प्रचलित असलेल्या परंपरांत आजपर्यंत जी स्थित्यंतरे अथवा परिवर्तने घडून आली आहेत. त्याबाबतचे स्पष्टीकरण करताना ऐतिहासिक विरोध विकासवादी तंत्राचा अवलंब केल्याचे आढळून येते. भारतीय समाजव्यवस्थेतील अनेक संस्था, संस्कृती आणि पारंपारिक मूल्ये यांच्याकडून भारतातील परंपरांचे संरक्षण करण्याचा सातत्याने प्रयत्न केला जातो. यालाच मुखर्जींनी अन्वय (Thesis) संबोधले आहे. यामध्ये प्रामुख्याने कुटुंब, धर्म, राजकीय संस्था व जातीव्यवस्था यांचा समावेश होतो. समाजमान्य स्वरूपाच्या परंपरा काळाच्या ओघात जेव्हा प्रभावहिन बनत जातात तेव्हा त्यांना होणारा विरोध वाढत जातो. अशा विरोध होणाऱ्या प्रथा, परंपरा व मूल्यांचा समावेश हळूहळू विरोधान्वयात (Antithesis) होत जातो. भारतीय समाजात आढळणाऱ्या सर्वच प्रथा परंपरा व निर्भेळ स्वरूपाच्या असतातच असे नाही. सांस्कृतिक व पारंपारिक विविधता हे भारतीय समाजाचे महत्वाचे लक्षण असल्यामुळे वेगवेगळ्या समुदायातील परस्पर विरोधी परंपरात सुरूवातीला विरोध होतो व नंतरच त्यांच्यात समन्वयात्मक (Synthesis) स्वरूपाची भूमिका निर्माण होते असे मुखर्जींचे मत होते. या मताच्या स्पष्टीकरणासाठी केवळ इतिहासाचाच आधार न घेता अनुभवाधिष्ठित अध्ययनतंत्राचा व स्पष्टीकरणात्मक पद्धतीचाही अवलंब केला होता. भारतीय समाजातील सामाजिक स्तररचनेचे व सामाजिक संस्थांचे स्पष्टीकरण करताना मुखर्जींनी मार्क्सप्रणित तंत्राचा अवलंब केला होता. प्रामुख्याने भारतीय परंपरेत आजपर्यंत जी स्थित्यंतरे घडून आली त्यांचे स्पष्टीकरण करताना ऐतिहासिक द्वंद्ववादाच्या तंत्राचा अवलंब मुखर्जींनी केला होता. भारतातील बहुसंख्य लोक परंपरावादी विचारसरणीचे असून भौतिक क्षेत्रात कितीही सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केलातरी त्यांच्याशी चिकटून राहण्याची वृत्ती भारतीयांत आढळते. एवढेच नव्हे तर आपल्या परंपरा अबाधित राहाव्यात या हेतूने भारतीय आपले सामाजिक बळ संघटित करतात आणि या जोरावर ते आपल्या पारंपारिक मूल्यांना धोका पोहचण्याची शक्यता असेल तर सर्व सामर्थ्यानिशी त्यांचे संरक्षण करतात.

**अ) व्यक्तिमत्व** (Personality) :

डी.पी. मुखर्जी यांनी व्यक्तिमत्वाविषयी 'पुरूष' या संकल्पनेच्या सहाय्याने विचार मांडले होते. त्यांच्या मते 'पुरूष' हा व्यक्ती व समाजापासून अलिप्त असूच शकत नाही. किंवा तो समूह मनाच्या नियंत्रणाखालीही नसतो. पुरूष समाजातील एक क्रियाशील सदस्य या नात्याने इतरांशी संबंध प्रस्थापित करतो आणि त्याच्या वाट्याला आलेल्या भुमिका पार पाडतो. त्यांच्या मतानुसार इतरांशी येणाऱ्या संबंधातून पुरूषाचा विकास होत असतो आणि अशा प्रकारे पुरूष मानवी समुहात उच्च स्थान प्राप्त करतो.

डी.पी. च्या म्हणणाप्रमाणे भारतीय सामाजिक जीवन हे मधमाश्या व त्यांचे पोळे अशा स्वरूपाचे असून भारतीय शिस्तबद्ध लोक आहेत. पण यातील 'सौंदर्य' हे की बहुसंख्य भारतीयांना तसे वाटत नाही. डी.पी. यांचे बाजार व्यवस्थेने पूर्णपणे कब्जा केलेल्या पाश्चात्य व्यक्तिंना कोणते स्वातंत्र नसावे असे मत होते. पाश्चात्य व्यक्ती ही पूर्णांशाने जाहिरातबाजी, साखळी कथा अशांमुळे जीवनाचे ध्येयच हरवून बसली आहे. या सर्वामुळे व्यक्तिच्या निवडीला अगर ग्राहकांच्या स्वातंत्र्याला अजिबात वाव राहत नाही. पण समूह नियमांनी बद्ध असलेल्या व तुलनेने निम्न पातळीच्या आकांक्षा असलेल्या सर्वसामान्य भारतीयांच्या जीवनात समतोल साधला गेला आहे आणि याबाबीचा आपणास भारतीयांच्या मनात उच्च आकांक्षा निर्माण करताना अजिबात विसर पडता कामा नये. अशाप्रकारे भारतीय समाजशास्त्रज्ञांनी आपल्या अभ्यासासाठी व्यक्ति हा

घटक न मानत समूह हा घटक मानला पाहिजे. कारण हीच भारतीय परंपरा आहे आणि यासाठी भारतीय समाजशास्त्रज्ञांनी ही विशिष्ट परंपरा जाणून घेतली पाहिजे.

**ब) आधुनिक भारतीय संस्कृती** (Modern Indian Culture) :

आधुनिक भारतीय संस्कृतीविषयीचे मुखर्जी यांचे विचार सर्वप्रथम १९४२ साली प्रकाशित झालेल्या 'आधुनिक भारतीय संस्कृती' एक समाजशास्त्रीय अभ्यास' (Modern Indian Culture : A Sociological Study) या १९४७ साली प्रकाशित अध्ययनात आढळतात व त्याचीच सुधारित आवृत्तीत आढळतात. या अभ्यासात भारतीय समाजातील प्रभावी संघटन तत्वाबाबत समन्वयाची मांडणी त्यांनी केली आहे. भारतातील ब्रिटीश शासनानेच भारतीय समाजातील बदलाचा एक नवा अध्याय सुरू केला. भारतातील मर्ध्यमवर्गानेच ब्रिटीशांच्या भारतातील एकसंघ शासनाला सुरूवातीला मदत केली व नंतर त्याला यशस्वीपणे विरोधही केला. मुखर्जींचा दृष्टीकोणातून भारत हा एक विविध घटकांच्या विविध प्रादेशिक संस्कृतींच्या एकत्रिकरणातून निर्माण झालेला शांतताप्रिय आणि प्रगतीशील समाज आहे आणि त्याच्या विकासासाठी परंपरांचे पुनरूज्जीवन करणे आवश्यक आहे.

मुखर्जींच्या मतानुसार राष्ट्रीय चळवळीने जरी आदर्शवाद आणि नैतिक तळमळ निर्माण केली असली तरी बौद्धिकतेच्या विरोधी होती. त्यांच्या मतानुसार 'राजकाराने आपल्या संस्कृतीचा विध्वंस केला आहे' मुखर्जींचा असा विश्वास होता की केवळ अनुकरणाने कोणत्याही स्वरूपाचे आधुनिकीकरण अशक्य आहे. त्यांनी सांस्कृतिक सामाज्यवादाची भिती व्यक्त केली होती. त्यांच्या मतानुसार आधुनिकीकरण ही एक परंपरा, मूल्य आणि सांस्कृतिक प्रतिमांनाच्या विस्ताराची, उच्च पातळीची आणि पुनरूज्जीवनाची प्रक्रिया आहे. परंपरा हेच सातत्वाचे तत्व आहे. परंपरांकडून आपल्याला विविध पर्यायातून योग्य पर्यायाच निवडीचे स्वातंत्र्य प्राप्त होते. परिणामी आधुनिकीकरणाची व्याख्या परंपरांच्या अव्हेरातून नव्हे तर त्यांच्या संदर्भातच करणे गरजेचे आहे.

**क) परंपरा** (Traditions) :

डी.पी.मुखर्जी यांच्या मतानुसार परंपरा Traditions ह्या शब्दाची उत्पत्ती (Tradere) या शब्दापासून झाली असून त्याचा अर्थ 'संक्रमित' (To transmit) असा आहे. संस्कृत भाषेत परंपरा असा शब्दप्रयोग असून त्याचाच अर्थ इतिहास असा आहे.

परंपराना एक उगमस्तोत्र असतो. मग तो एखादा पवित्र ग्रंथ असेल अगर एकादा दंतकथातील बेनामी अगर नामी हिरो असेल. परंपरांचे उगमस्तोत्र कोणतेही असले तरी त्यांची एतिहासिकता बहुसंख्य लोकांना ज्ञात असते आणि म्हणूनच अशाचा संदर्भ दिला जातो. त्यांच्या पिढ्यानपिढ्याच्या संक्रमाणामुळेच समाजामध्ये सामाजिक एकजिनसीपणा व सामाजिक एकता निर्माण होते.

**२) परंपरामधील गतित्व** (Dynamics of Traditions) :

परंपरा या जरी जतन करून ठेवत असल्या तरी त्या स्वतः पुराणमतवादी नसतात. मुखर्जी यांच्या मतानुसार परंपरामध्येही बदल होतो. भारतीय परंपरांच्या बदलातील स्मृती, श्रुती आणि अनुभुती ही तीन तत्वे आपणास दाखवून देता येतात आणि यावरच काही उपनिशदांची मांडणीही झाली असल्याचे दिसून येते. येथेच याचा शेवट होत नाही तर विविध पंथाच्या संस्थापक संत महंताना येणाऱ्या व्यक्तिगत अनुभूतीचे काळाच्या ओघात सर्वांच्या अनुभुतीत रूपांतर होत जाते परिणामी त्याला अनुसरून प्रचलित सामाजिक व

धार्मिक व्यवस्थेत बदल होत जातो. परंपरागत व्यवस्थेकडून अशा बदल्या विचारांचा संथपणे स्विकार केला जातो. भारतीय समाजातील सामाजिक व्यवस्थांनी अशा प्रकारच्या विरोधी विचारसरणींना एका निश्चित व्यवस्थेपर्यंत स्वतःमध्ये सामावून घेतल्याचे दिसून येते. प्रेमाची अनुभूती अगर स्वयंस्फूर्तता या बाबींबाबत मुस्लिम धर्मातील संत व अनुयायांच्या बाबतीतही ही बाब जाणवते. परंपरागत व्यवस्थेकडून विरोधी विचारांशी मिळतेजुळते घेतल्याचेही स्पष्टपणे जाणवते.

**३) परंपरा आणि आधुनिकीकरण यातील द्वंद्व** (Dialectics of Tradition and Modernity) :

भारतीय परंपरांची खरी क्षमता ही गतकाळात स्त्री–पुरूषांच्या जीवन सवयी व भावनांत घडून गेलेल्या परिवर्तनानुसार नविन मुल्यांचे स्वरूप निश्चित करण्यात आहे. अशा प्रकारे भारताने असंख्य चांगल्या व काही वाइट मूल्यांचेही जतन केले आहे. प्रश्न असा आहे की, ब्रिटीशांच्या आगमनानंतर उपलब्ध झालेल्या नव्या शक्ती उदा. तंत्रज्ञान लोकशाही, नागरीकरण आणि नोकरशाही यंत्रणा यांचा उपभोग करून घेण्याबाबत आहे. डी.पी.मुखर्जी यांना याबाबत खात्री होती की यासाठी आवश्यक असणारे संतुलन साधण्याची क्षमता भारतीय पंरपरांत आहे. आदिवासी लोकांचा जसा नाश झाला त्याप्रमाणे पाश्चात्य संस्कृतीच्या प्रभावामुळे भारतीय संस्कृती नाश पावणार नाही याची खात्री आहे किंवा त्याबरोबर संतुलन साधण्याची क्षमता निश्चितच भारतीयांत आहे. भारतीय संस्कृतीने आदिवासी संस्कृती स्वतः सामावून घेतली आहे. याबरोबरच हिंदू–मुस्लिम संस्कृती आणि आधुनिक काळात वर्णसंकरही होत आहे. म्हणूनच डी.पी.मुखर्जींच्या मतानुसार संतुलन साधत जगणे हा गुण भारतीय रक्तातच आहे.

मुखर्जी यांची 'परिपूर्ण मानव' सुव्यवस्थित व्यक्तिमत्वाची' संकल्पना ही १) नैतिक औस्तुक्य आणि सौंदर्यात्मक व बौद्धिक संवेदनशीलता याबरोबरच २) एतिहासीकता आणि तार्किकता याबाबतीतील संवेदना यांच्या संयोगातून निर्माण होते. यामधील दुसऱ्या बाबतीतील गुणवत्ता या भारतीय परंपरापेक्षा मुख्यतः आधुनिकतेच्या आधारावर परिक्षित करता येतात. परिणामी या ठिकाणी परंपरा आणि आधुनिकता यांच्यातील द्वंद्व हे भारतीय परंपरा समजून घेण्याशी संबंधित आहे. मुखर्जींचे 'परंपरा आणि आधुनिकता' या विषयीचे सर्वश्रुत लिखान आपणास पंरपरा आणि आधुनिकता या दोन संकल्पना विश्वनीयरित्या समजुन घेण्यास मदत करते. त्यांच्या मतानुसार भारतीय परंपरा आणि आधुनिकता ब्रिटीश वसाहतवाद आणि राष्ट्रवाद आणि व्यक्तिवाद आणि संघवाद या सर्वामध्ये द्वंद्वात्मक संबंध आहेत. आपल्या सव लिखानात त्यांनी या बाबीचे जोरदार समर्थन केले आहे की भारतीय समाजाच्या आकलनासाठी भारतीय परंपरा केंद्रस्थानी आहेत. ब्रिटीश कालावधीत भारतात आलेले आधुनिकीकरण आणि भारतीय परंपरा यांच्यातील संबंध द्वंद्वात्मक आहेत.

**४) मार्क्सवाद आणि भारतीय परिस्थिती :**

मुखर्जींचा मार्क्सवादावर प्रचंड विश्वास होता. त्यांच्या मतानुसार मार्क्सवादाकडून मानवी समाजाच्या विकासाच्या उच्च स्थितीत व्यक्तिमत्वाचे एका नियोजनबद्ध आणि समाजाद्वारे दिग्दर्शित सांधिक व असा प्रयत्न जो अंतिम ऐतिहासिकतेच्या समजुतीसाठी समाजातील इतरांबरोबर अनुकूलन साधले जाते. पण त्यांनी भारतीय समाजाच्या मार्क्सवादाच्या सहाय्याने करावयाच्या परिक्षणाबाबत साशंकता व्यक्त केली आहे. याची त्यांनी तीन कारणे खालीलप्रमाणे विशद केली आहेत.

१) मार्क्सवादी समाजातील सर्वबाबींचे परिक्षण वर्ग संघर्षाच्या स्वरूपात करतात पण भारतीय समाजात फार प्राचीन काळापासून वर्गसंघर्ष जातीपरंपरेने झाकाळून गेला असून अजूनही भारतीय समाजात

नविन वर्ग जाणीवा तितक्या प्रमाणात विकसित झालेल्या नाहीत. २) मार्क्सवादापैकी कित्येक जणाकडून भारतीय सामाजिक आणि आर्थिक इतिहासाबाबत दुर्लक्ष झाले आहे. ३) आर्थिक शक्ती या यांत्रिक पद्धतीने कार्यरत नसताना परंपरामध्ये विरोधाची जबरदस्त शक्ती असते. समाजाच्या उत्पादन पद्धतीतील बदलाच्या सहाय्यानेच केवळ या विरोधावर मात होणे शक्य आहे, आणि अशा प्रकारचा बदल केवळ हिंसक क्रांतीद्वारेच शक्य आहे. पण एखाद्या समाजाने रक्तरंजित क्रांती ऐवजी सहमतीच्या मार्गाचा अंगिकार करावयाचा असेल तर त्या समाजाला आर्थिक परिवर्तन आणि परंपरा यामधील द्वंद्व सामोचराच्या सहाय्याने संपुष्टात आणवे लागेल.

मुखर्जींच्या मते भारतीय समाजशास्त्रज्ञांची सर्वात महत्वाची भुमिका ही भारतीय परंपरांचे अध्ययन करणे हीच आहे व केवळ यामुळेच आर्थिक शक्तीतील बदलाचे समाजवादी स्पष्टीकरण करणे शक्य होणार आहे. थोडक्यात समाजात समाजशास्त्राची मुहूर्तमेढ रोवणाऱ्यापैकी एक महत्वाचे विचारवंत म्हणून डी.पी. मुखर्जींचा उल्लेख करावा लागतो. त्यांच्या लिखानात प्रामुख्याने परंपरा आणि आधुनिकता यांच्याविषयीच्या विचारांचे फार सखोलपणे स्पष्टीकरणा केले असल्याचे दिसून येते.

- **स्वयंअध्ययनासाठी प्रश्न २**

  १) ................. च्या म्हणण्याप्रमाणे भारतीय सामाजिक जीवन हे मधमशा व त्यांचे पोळे अशा स्वरूपाचे असून भारतीय शिस्तबद्ध लोक आहेत.

  २) मुखर्जी यांच्या दृष्टिकोणातून भारत हा एक विविध घटकांच्या विविध प्रादेशिक संस्कृतीच्या एकत्रिकरणातून निर्माण झालेला ............. व ................. समाज आहे.

  ३) मुखर्जींच्या मते भारतीय समाजशास्त्रांची सर्वात महत्वाची भुमिका ही ............... हीच आहे.

### ३.३.३ ए.आर.देसाई (१९१५–१९९४) :

भारतीय समाजशास्त्राच्या इतिहासामध्ये आपल्या भारतीय समाजाबाबतच्या मार्क्सवादी दृष्टिकोणामुळे एक आगळे वेगळे स्थान लोभलेले समाजशास्त्रज्ञ म्हणून ए.आर. देसाई ओळखले जातात. त्यांचा जन्म १६ एप्रिल १९१४ रोजी गुजरात राज्यातील नादिद या ठिकाणी झाला. आपला सुरूवातीच्या कालावधीत त्यांच्यावर त्यांच्या वडिलांचा रमणलाल वसंतलाल देसाई यांचा प्रभाव पडला होत. त्यांचे वडिल एक विख्यात लेखक होते व १९३० च्या दरम्यान त्यांच्या लिखानाचा प्रभाव गुजरातमधील तरूण पिढीवर मोठ्या प्रमाणात पडला होता. मुंबई विद्यापीठात त्यांनी पदवी संपादन केली होती व याबरोबरच कायद्याचीही पदवी मिळविली होती. याच विद्यापीठात डॉ. जी.एस. घुर्ये यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी १९४६ साली डॉक्टरेटची पदवीही मिळवली. पी.एच.डी. पदवी संपादन केल्यानंतर त्यांनी मुंबई विद्यापीठात समाजशास्त्राचा प्राध्यापक म्हणून विद्यादानाचे काम करायला सुरूवात केली आणि यथावकाश समाजशास्त्र विभागाचा प्रमुख म्हणूनही काम केले. इंडियन सोशिऑलॉजिकल सोसायटीच्या संस्थापकापैकी एक असलेल्या ए.आर.देसाई यांना या सोसायटीचा अध्यक्ष म्हणून काम करण्याची संधी १९७८ ते १९८० च्या दरम्यान मिळाली होती. अध्यपनाबरोबरीनेच त्यांनी १९३९ पर्यंत भारतीय साम्यवादी दलाचा सदस्य म्हणून आणि १९५३ पासून १९६१ पर्यंत ट्रटस्कीवादी समाजवादी दलाचा सदस्य म्हणून कार्य केले. पण काही मुद्यांवर मतभेद झाल्यानंतर त्यांनी साम्यवादी दलाच्या सदस्यत्वाचा राजिनामा दिला तरी आयुष्यभर एक मार्क्सवादी विद्यान

म्हणून त्यांनी विचारमंथन केले. अशा या समाजशास्त्रज्ञाचा मृत्यू १२ नोव्हेंबर १९९४ रोजी बडोदा येथे झाला.

- **ग्रंथ संपदा :**

एक प्रतिथयश ग्रामीण नागरी समाजशास्त्र आणि राजकीय समाजशास्त्रज्ञ म्हणून त्यांची ओळख त्यांच्या वाङमयातून संपूर्ण विद्वानांना झाली होती. त्यांनी असंख्य पुस्तकांचे लिखान केले असून त्यापैकी काही महत्वाचे ग्रंथ खालीलप्रमाणे :

१) Social Background of Indian Nationlism (1948)

२) Recent Trends in Indian Nationalism (1960)

३) Rural Sociology in India (1969)

४) Rural India in transition (1961)

५) Slums and Urbanization (ed) (1970)

६) Urban Family and Family Planning in India.

७) A Profile of Indian Slum

८) Present Struggle in India (1978)

या युनिटमध्ये ए.आर. देसाई यांच्या मार्क्सवादी दृष्टिकोणाचे स्वरूप स्पष्ट करण्यासाठी आपण त्यांचे खालील बाबतीतील विचारांचा आढावा घेणार आहोत.

**१) भारतीय राष्ट्रवादाची सामाजिक पार्श्वभूमी :** (Social Background of Indian Nationalism 948) देसाई यांनी आपल्या या प्रसिद्ध ग्रंथामध्ये ब्रिटीश शासनकालातील भारतीय समाजातील राष्ट्रवादाच्या अध्ययनासाठी मार्क्सवादी दृष्टिकोणाचा अवलंब केला होता. त्यांनी ऐतिहासिक द्वंद्वात्मक भौतिकवादाच्या सहाय्याने भारतीय समाजातील ग्रामीण आणि शहरी जातीय आणि वर्गीय, सामाजिक गतिशिलतावादी, शिक्षण आणि भारतीय समाजाच्या इत अंगांनी संबंधित चळवळींचा अभ्यास केला आहे. याबाबतचा त्यांचा ग्रंथ जरी १९४८ साली प्रकाशित झाला असला तरी त्याची लोकप्रियता १९६० व १९७० च्या दशकात भारतीय सामाजिक शास्त्रज्ञांत भारतीय समाजाबाबतच्या स्वजाणीवेच्या प्रभावामुळे मोठ्या प्रमाणात वाढली असल्याचे दिसून येते.

देसाई यांनी प्रकाशित केलेले हे पुस्तक हा मार्क्सवादी दृष्टिकोनाच्या सहाय्याने भारतीय समाजातल राष्ट्रवादाच्या उदयाचा शोध घेण्याचा एक यशस्वी प्रयत्न असल्याचे मान्य करावे लागते. देसाई यांच्या मतानुसार भारतीय राष्ट्रवाद हा ब्रिटीश वसाहतवादाने निर्माण केलेल्या भौतिक परिस्थितीचा परिपाक आहे. ब्रिटीशांनी औद्योगिकरण आणि आधुनिकीकरणाची भारतीय समाजाला ओळख करून देऊन नव्या आर्थिक संबंधाची निर्मिती केली. भारतीय संस्थामध्ये पंरपरेच्या सहाय्याने आर्थिक संबंधात स्थितीशीलता निर्माण झाली होती. त्यात बदल घडवून आणण्याचे काम ब्रिटीशामुळे घडले. देसाई यांच्या मतानुसार जेव्हा पंरपरा या आर्थिक संबंधाशी बांधल्या गेलेल्या असतात तेव्हा आर्थिक संबंधात होणारा बदल सहजगत्या परंपरामध्ये बदल घडवून आणतो आणि अशा परिस्थितीत ते असा आशावाद बाळगतात की भारतीय समाजातील

जातीव्यवस्थेचे पतन नव्या सामाजिक आणि भौतिक परिस्थितीमुळे होते. अशा नव्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीमध्ये उद्योगधंदे आर्थिक विकास आणि शिक्षणाचा समावेश करावा लागतो.

परंपरांच्या उगमाबाबत विचार करताना देसाईंनी त्यांचा उदय जात, धर्म अगर धार्मिक कर्मकाडांत शोधण्याचा प्रयत्न केला नसुन त्यांच्या मते भारताचा द्वंद्वात्मक इतिहासातून हे अगदी स्पष्टपणे दिसून येथे की परंपरांची मुळे ही भारतीय अर्थव्यवस्था आणि उत्पादन संबंधात सापडतात.

२) **शेतकऱ्यांचा संघर्ष** (Present Stuggle) :

ए.आर.देसाई यांनी त्यांच्या १९७९ व १९८६ साली प्रकाशित झालेल्या Present Struggle In India (1979) Agrarian Struggle in India After Independence (1986) या दोन खंडामध्ये भारतीय समाजातील ब्रिटीश वसाहतकालातील आणि स्वातंत्र्योत्तर काळातील शेतकऱ्यांच्या संघर्षाबाबतच्या आणि त्यामधील तफावती या बाबीविषयी अत्यंत महत्वपुर्ण व यथार्थ स्पष्टीकरण केले आहे. सद्याच्या काळातील शेतकरी संघर्षाबाबत देसाई असे प्रतिपादन करतात की हा संघर्ष नव्याने निर्माण झालेल्या शेतकरी वर्ग व गरीब शेतकरी यांच्यातील आहे. तर पूर्वी हाच संघर्ष विकासाच्या अधिक फळांच्या प्राप्तीसाठी होता. देसाई यांच्या मते गरीब या सदरात निम्न जातीतील आणि आदिवासी समुदायातील शेतमजुर व कामगार जे स्वतःसाठी चांगल्या जिवन संधीसाठी संघर्ष करत आहेत अशांचा समावेश होतो. अशा प्रकारे देसाई या मताशी येऊन पोहचतात की भारतीय समाजात प्रगती ही केवळ पिळवणूकप्रधान भांडवलशाही व्यवस्थेतील बदलावरच अवलंबून आहे.

**मार्क्सवादी दृष्टिकोणाचे महत्व** : १९५० च्या व १९६० च्या दशकाच्या सुरूवातीच्या कालावधीत अमेरिकन संरचना प्रकार्यवाद आणि ब्रिटीश कार्यवादाचा प्रभाव सामाजिक शास्त्रांवर आणि प्रामुख्याने समाजशास्त्रावर असल्याचे दिसून येते. पण देसाई यांनी या प्रभावाचा विचार न करता भारतीय समाज आणि राज्य यावर आपल्या बौद्धिक सामर्थ्यावर लिखान चालूच ठेवले होते.

आपल्या १५ व्या ऑल इंडिया सोशियॉलॉजिकल सोसायटीच्या संमेलनात अध्यक्षीय भाषणामध्ये देसाई यांनी भारतीय समाजशास्त्रातील समाजशास्त्रीय दृष्टिकोणाबाबतच्या २७ मुद्यांचे विवरण केले होते. त्यांना असे आढळून आले की भारतीय समाजशास्त्रात प्रामुख्याने मार्क्सवाद विरहीत दृष्टिकोण आढळून आल्याचे नमुद केले होते. याचे कारण स्पष्ट करताना मार्क्सवादाचा अस्विकार हा दृष्टिकोण दुराग्रही हेतुमुलक स्वरूपाचा असल्याने त्याचा अस्विकार केला गेला असे मत मांडले होते. पण देसाई यांच्या मतानुसार योग्य दृष्टिकोनाचे स्पष्टीकरण करावयाचे झाल्यास तो मार्क्सवादीच आहे जो सरकारची ध्येयधोरणे आणि भारतीय अर्थव्यवस्था यांच्या अभ्यासासाठी उपयुक्त आहे. अशा प्रकारे आपल्या अध्यक्षीय भाषणात देसाई यांनी भारतीय समाजाच्या अध्ययनातील मार्क्सवादी दृष्टिकोणाच्या महत्वावर प्रकाश टाकला होता. त्यांच्या मतानुसार, मार्क्सवादी दृष्टिकोण संशोधकाला संशोधनासाठी महत्वाचे प्रश्न उपस्थित करण्याला संशोधनाला योग्य दिशा देण्याला योग्य स्वरूपात अभ्युपगमांची मांडणी करण्याला महत्वाचे संकल्पनांची मांडणी करण्याला संशोधनाला योग्य आणि पर्याप्त संशाधनतंत्राचा अवलंब करण्यासाठी आणि संशोधनाच्या सहाय्याने परिवर्तनाबाबत मध्यवर्ती प्रवृत्तींच्या स्पष्टीकरणासाठी उपयुक्त ठरतो. देसाई यांनी भारतीय समाजाच्या अध्ययनातील मार्क्सवादी दृष्टिकोणाचे काही मध्यवर्ती गुणधर्म विशद केले. समाजातील उत्पादनाची साधने, उत्पादन साधनांच्या वापरातील तंत्रज्ञान आणि आर्थिक बाबीवर आधारित श्रमविभाजन आणि उत्पादनातील सामाजिक संबंध यांच्या योग्य प्रकारच्या अध्ययनासाठी मार्क्सवादी दृष्टिकोणाचे महत्व त्यांनी विशद केले होते. अशाप्रकारे मार्क्सवादी दृष्टिकोण भारताच्या स्वातंत्र्याच्या पूर्वसंध्येला भारतात

आढळणारे मालमत्ताविषयक संबंध समजून घेण्यावर आपले लक्ष केंद्रीत करतो. या संबंधाचे स्पष्टीकरण राज्याकडून भारतीय समाजाच्या परिवर्तनाचे क्रियाशील घटक म्हणून केला जातो. म्हणूनच मार्क्सवादी दृष्टिकोण भारतीय विचारवंतांना भारतीय समाजाचे वर्गीय स्वरूप राज्याची भूमिका आणि राज्याने स्विकारलेले विकासाची दिशा याबाबी समजून घेण्यासाठी सहाय्यभूत ठरतो असे मत देसाई यांनी मांडले होते.

देसाई यांच्या मतानुसार मालमत्ता संबंध हे महत्वाचे असून त्यांच्याद्वारेच उत्पादनाचा हेतू, स्वरूप, नियंत्रण दिशा आणि उद्देश याबाबींचे निर्धारण होत असते. याबरोबरच उत्पदनाच्या संबंधाकडून कोणाला किती, काय आणि कोणत्या आधारावर मिळणारा याचीही निश्चिती होते. स्वातंत्र्योत्तर भारतीय समाजातील मालमत्ताविषयक संबंधाच्या आकलनासाठी अशा प्रकारे मार्क्सवाद उपयुक्त ठरतो असे मत देसाई यांनी मांडले होते.

थोडक्यात देसाई यांच्या मतानुसार मार्क्सवादी दृष्टिकोणाकडून कोणत्याही समाजाच्या परिक्षणामध्ये त्या समाजातील मालमत्ताविषयक स्वरूपाला महत्व दिले जाते. याच्या सहाय्याने ऐतिहासीक स्थितीचा आढावा घेणे शक्य होते. याबाबत देसाई यांनी भारतीय समाजातील परिवर्तन मार्क्सवादी दृष्टिकोणाच्या सहाय्याने समजून देण्याचा प्रयत्न केला आहे. अशा प्रकारे देसाईनी भारतीय समाजातील वास्तवता जाणून घेताना मार्क्सवादी दृष्टिकोण कशा प्रकारे सहाय्यभूत ठरतो याचे सविस्तर विश्लेषण आपल्या लिखानातुन करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या भारतीय राष्ट्रवादाची सामाजिक पार्श्वभूमी या ग्रंथामध्ये भारती समाजाच्या आर्थिक स्पष्टीकरणाचा प्रयत्न योग्य प्रकारे झाल्याचे दिसून येते. देसाईनी भारतीय समाजाच्याआकलनासाठी ऐतिहासिक भौतिकवादाचा वापर केला आहे. त्यांनी हे स्पष्ट केले आहे की कशा प्रकारे भारतीय समाजातील गुणात्मक बदल राष्ट्रीय सहमतीने विशद केले आहेत. आपल्या सर्व समाजशास्त्रीय लिखाणात देसाई यांनी भारतीय समाजाच्या यथायोग्य आकलनासाठी मार्क्सवादी दृष्टिकोणाचा अवलंब करणे का व कसे योग्य आणि हितावह आहे. याचे स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न केला असल्याचे प्रकर्षाने जाणवते.

- **स्वयंअध्ययनासाठी प्रश्न ३ :**

१) देसाई यांनी आपल्या ................ या प्रसिद्ध ग्रंथामध्ये ब्रिटीश शासनकालातील भारतीय समाजातील राष्ट्रवादाच्या अध्ययनासाठी मार्क्सवादी दृष्टिकोणाचा अवलंब केला होता.

२) ............. यांच्या मते परंपरांची मुळे ही भारतीय अर्थव्यवस्था आणि उत्पादन संबंधातच सापडतात.

३) देसाई यांच्या मतानुसार ................ महत्त्वाचे असून त्यांच्याद्वारेच उत्पादनाचा हेतू स्वरूप, नियंत्रण दिशा आणि उद्देश याबाबींचे निर्धारण होत असते.

## ३.४ सारांश :

मार्क्स यांनी मानव समाजाबाबतच्या आपल्या स्पष्टीकरणात हेगेलच्या द्वंद्ववादाचा स्विकार केला पण आदर्शवादाचा त्याग करतानाच त्याच्या भौतिकवादाचा स्विकार करून 'द्वंद्वात्मक भौतिकवादाचा' सिद्धांत मांडला. आपल्या या सिद्धांतात मार्क्सने हे स्पष्ट केले की जगाच्या मूलस्थानी विचार नसून पदार्थ आहे आणि पदार्थ ही स्थिर नसून द्वंद्वाच्या नियमानुसार सातत्याने परिवर्तनशील आहे आणि म्हणूनच मानवी विश्व निरंतरपणे परिवर्तनशील आहे. आपल्या या सिद्धांताच्या सहाय्याने मानवी समाजाचे विश्लेषण करताना

मार्क्सने असे मत मांडले की, प्रणालीच समाजाचा आधार असते ज्याच्यावर समाजातील इतर संरचना अवलंबून असतात. अर्थात कोणत्याही समाजातील धर्म, विचारपरंपरा, मूल्यव्यवस्था राज्य, कायदा इत्यादी उपव्यवस्थांचे निर्धारण अगर निश्चिती करण्याचे काम त्या समाजाची अर्थव्यवस्था अगर उत्पादनप्रणाली कडूनच केली जाते. मार्क्स यांच्या मते उत्पादनाची प्रणाली स्थिर असत नाही. तर त्याच समाविष्ट असलेल्या द्वंद्वामुळे अगर अंतर्विरोधामुळे यात परिवर्तन घडून येण्याची शक्यता निर्माण होते. उत्पादनप्रणाली हाच मानवी समाजाचा आधार अगर केंद्रस्थानी असल्यामुळे यातील परिवर्तनाच्या बरोबरच समाजातील इतर उपव्यवस्थांमध्ये परिवर्तन अगर विकास होत जातो. मार्क्सच्या या दृष्टिकोणाला 'ऐतिहासिक भौतिकवाद' या नावाने ओळखले जाते.

भारतीय समाजाच्या विश्लेषणासाठी मार्क्सवादी दृष्टिकोणाचा वापर प्रामुख्याने २० व्या शतकाच्या मध्यात केला गेल्याचे आढळून येते. या दरम्यानच प्रथम एम.एन.रॉय या राजकीय विचारवंत व भारतातील प्रथम समाजशास्त्रज्ञ भुपेंद्र नाथ दत्त यांच्याकडून मार्क्सवादी दृष्टिकोणाच्या सहाय्याने तत्कालीन भारतीय समाजाचे स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न झाल्याचे दिसून येते. असे असले तरी या दृष्टिकोणाचा अत्यंत विस्तृत अगर व्यवस्थित उपयोग भारतीय समाजाच्या स्पष्टीकरणासाठी डी.पी.मुखर्जी आणि ए.आर.देसाई यांच्या लिखानात दिसून येतो. भारतीय समाजाच्या स्पष्टीकरणासाठी मार्क्सवादी दृष्टिकोणाचा अवलंब करत असताना डी.पी.मुखर्जी यांना द्वंद्ववादाच्या आधारावर भारतीय समाजात होणाऱ्या परिवर्तनाचे स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न केला असल्याचे दिसून येते. त्यांनी अंतर्गत आणि बाह्य परंपरांच्या रूपात भारतीय परंपरा व इस्लामी परंपरा व पाश्चात्य परंपरा यांच्यातील द्वंद्वाच्या स्वरूपात आणि उच्च अगर स्थानिक परंपरांमध्ये विद्यमान असलेल्या द्वंद्वाच्या सहाय्याने स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न केला असल्याचे दिसून येते. याबरोबरच राधाकृष्ण मुखर्जी ए.आर.देसाई यांनीही या दृष्टिकोनाच्या सहाय्याने भारतीय समाजाचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला असल्याचे दिसून येते.

समाजशास्त्रीय, अध्ययनपद्धती संदर्भात मुखर्जींनी मार्क्सप्रणित विरोधविकासवादाच्या तत्वाचा किंवा द्वंद्वात्मकतेचा अवलंब केला असल्याचे दिसून येते. त्यांनी मार्क्सवादी विचारसरणी व अध्ययन तंत्र यांची भारतीय समाजव्यवस्थेशी सांगड घालण्याचा प्रयत्न केल्याचे आढळते. त्यांनी भारतातील जमीनदारी व सरंजामशाही पद्धती, जातिधिष्टीत समाजव्यवस्था, अनेक व्यावसायिक संघ, धर्म आणि परंपरांचा समाजव्यवस्थेवर पडणारा प्रभाव, भारतीय समाजातील अज्ञान, दारिद्र्य, कर्जबारीपणा या पार्श्वभूमीवर मार्क्सवादी विचारांचे मूल्यमापन केले व त्यावरून असा निष्कर्ष काढला की केवळ मार्क्सप्रणित तंत्रांच्या सहाय्याने भारतीय समाजव्यवस्थेतील वास्तवाचा आशय विशद करणे अशक्य आहे. भारतीय समाजातील सामाजिक स्तररचनेचे व सामाजिक संस्थांचे स्पष्टीकरण करताना मुखर्जींनी मार्क्सप्रणित तंत्राचा अवलंब केला होता. प्रामुख्याने भारतीय परंपरेत आजपर्यंत जी स्थित्यंतरे घडून आली त्याचे स्पष्टीकरण करताना ऐतिहासीक द्वंद्ववादाच्या तंत्राचा अवलंब मुखर्जींनी केला होता. भारतातील बहुसंख्य लोक परंपरावादी विचारसरणीचे असून भौतिक क्षेत्रात कितीही सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला तरी त्यांच्याशी चिकटून राहण्याची वृत्ती भारतीयांत आढळते. एवढेच नव्हे तर आपल्या परंपरा अबाधीत रहाव्यात या हेतूने भारतीय आपले सामाजिक बळ संघटित करतात आणि या जोरावर ते आपल्या पारंपारिक मुल्यांना धोका पोहचण्याची डी.पी. च्या म्हणणप्रमाणे भारतीय सामाजिक जीवन हे मधमाशा व त्यांचे पोळे अशा स्वरूपाचे असून भारतीय शिस्तबद्ध लोक आहेत. पण यातील 'सौंदर्य' हे की बहुसंख्य भारतीयांना तसे वाटत नाही. डी.पी. यांचे बाजारव्यवस्थेने पूर्णपणे कब्जा केलेल्या पाश्चात्य व्यक्तिंना कोणते स्वतंत्र स्वातंत्रनसावे असे मत होत. पाश्चात्य व्यक्ती ही पूर्णाशाने जाहिरातबाजी साखळी कथा अशांमुळे जीवनाचे ध्येयच हरवून

बसली आहे. या सर्वामुळे व्यक्तिच्या निवडीला अगर ग्राहकाच्या स्वातंत्र्याला अजिबात वाव रहात नाही. पण समूह नियमांनी बद्ध असलेल्याव तुलनेने निम्न पातळीच्या आकांक्षा असलेल्या सर्वसामान्य भारतीयांच्या जीवनात समतोल साधला गेला आहे आणि याबाबीचा आपणास भारतीयांच्या मनात उच्च आकांक्षा निर्माण करताना अजिबात विसर पडता कामा नये. अशाप्रकारे भारतीय समाजशास्त्रज्ञांशी आपल्या अभ्यासासाठी व्यक्ति हा घटक न मानत समूह हा घटक मानला पाहिजे. परंपरांना एक उगमस्त्रोत असतो. मग तो एखादा पवित्र ग्रंथ असेल अगर एकादा दंतकथातील बेनामी अगर नामी हिरो असेल. परंपरांचे उगमस्त्रोत कोणतेही असले तरी त्यांची ऐतिहासिकता बहुसंख्य लोकांना ज्ञात असते. आणि म्हणूनच अशाचा संदर्भ दिला जातो. त्यांच्या पिढ्यानपिढ्यांच्या संक्रमणामुळेच समाजामध्ये सामाजिक एकजिनसीपणा व सामाजिक एकता निर्माण होते.

मुखर्जी यांची 'परिपूर्ण मानव' अगर 'सुव्यवस्थित व्यक्तिमत्वाची' संकल्पना ही १) नैतिक औत्सुक्य आणि सौंदर्यात्मक व बौद्धिक संवेदनशीलता याबरोबरच २) ऐतिहासिकता आणि तार्किकता याबाबीतील संवेदना यांच्या संयोगातून निर्माण होते. यातील दुसऱ्या बाबतीतील गुणवत्ता या भारतीय परंपरांपेक्षा मुख्यतः आधुनिकतेच्या आधारावर परीक्षीत करता येतात. परिणामी या ठिकाणी परंपरा आणि आधुनिकता यांच्यातील द्वंद्व हे भारतीय परंपरा समजून घेण्याशी संबंधित आहे. मुखर्जींच्या मते भारतीय समाजशास्त्रज्ञांची सर्वात महत्वाची भूमिका ही भारतीय परंपरांचे अध्ययन करणे हीच आहे व केवळ यामुळेच आर्थिक शक्तीतील बदलाचे समाजवादी स्पष्टीकरण करणे शक्य होणार आहे. थोडक्यात भारतात समाजशास्त्राची मुहूर्तमेढ रोवणाऱ्यांपैकी एक महत्वाचे विचारवंत म्हणून डी.पी. मुखर्जींचा उल्लेख करावा लागतो. त्यांच्या लिखानात प्रामुख्याने परंपरा आणि अधुनिकता यांच्या विषयीच्या विचारांचे फार सखोलपणे स्पष्टीकरण केले असल्याचे दिसून येते.

देसाई यांनी प्रकाशित केलेले (Social Background of Indian Nationalism 948) हे पुस्तक हा मार्क्सवादी दृष्टीकोणाच्या सहाय्याने भारतीय समाजातील राष्ट्रवादाच्या उदयाचा शोध घेण्याचा एक यशस्वी प्रयत्न असल्याचे मान्य करावे लागते. देसाई यांच्या मतानुसार भारतीय राष्ट्रवाद हा ब्रिटीश वसाहवादाने निर्माण केलेल्या भौतिक परिस्थितीचा परिपाक आहे. ब्रिटीशांनी औद्योगिकरण आणि आधुनिकीरणाची भारतीय समाजाला ओळख करून देऊन नव्या आर्थिक संबंधाची निर्मिती केली. भारतीय संस्थामध्ये परंपरेच्या सहाय्याने आर्थिक संबंधात स्थितीशीतला निर्माण झाली होती त्यात बदल घडवून आणण्याचे काम ब्रिटीशामुळे घडले. देसाई यांच्या मतानुसार जेंव्हा परंपरा या आर्थिक संबंधाशी बांधल्या गेलेल्या असतात तेंव्हा आर्थिक संबंधात होणारा बदल सहजगत्या परंपरांमध्ये बदल घडवून आणतो आणि अशा परिस्थितीत ते असा अशावादा बाळगतात की भारतीय समाजातील जातीव्यवस्थेचे पतन नव्या सामाजिक आणि भौतिक परिस्थितीमुळे होते. अशा नव्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीमध्ये उद्योगधंदे आर्थिक विकास आणि शिक्षणाचा समावेश करावा लागतो. मार्क्सवादी दृष्टिकोण संशोधकाला संशोधनासाठी महत्वाचे प्रश्न उपस्थित करण्याला. संशोधनाला योग्य दिशा देण्याला योग्य स्वरूपात अभ्युपगमांची मांडणी करण्याला सुयोग्य संकल्पनांची मांडणी करण्याला संशोधनासाठी योग्य आणि पर्याप्त संशोधन तंत्राचा अवलंब करण्यासाठी आणि संशोधनाच्या सहाय्याने परिवर्तनाबाबत मध्यवर्ती प्रवृत्तींच्या स्पष्टीकरणासाठी उपयुक्त ठरतो.

देसाई यांनी भारतीय समाजाच्या उध्ययनातील मार्क्सवादी दृष्टिकोनाचे काही मध्यवर्ती गुणधर्म विशद केले. समाजातील उत्पादनाची साधे, उत्पान साधनांच्या वापरातील तंत्रज्ञान आणि आर्थिक बाबींवर आधारीत श्रमविभाजन आणि उत्पादनातील सामाजिक संबंध यांच्या योग्य प्रकारच्या अध्ययनासाठी

मार्क्सवादी दृष्टीकोणाचे महत्व त्यांनी विशद केले होते. अशा प्रकारे मार्क्सवादी दृष्टिकोण भारताच्या स्वातंत्र्याच्या पुर्वसंध्येला भारतात आढळणारे मालमत्ताविषयक संबंध समजून घेण्यावर आपल लक्ष केंद्रीत करतो. या संबंधाचे स्पष्टीकरण राज्याकडून भारतीय समाजाच्या परिवर्तनाचे क्रियाशील घटक म्हणून केला जातो. म्हणूनच मार्क्सवादी दृष्टिकोण भारतीय विचारवंताना भारतीय समाजाचे वर्गीय स्वरूप राज्याची भूमिका आणि राज्याने स्विकारलेले विकासाची दिशा याबाबी समजून घेण्यासाठी सहाय्यभूत ठरतो असे मत देसाई यांनी मांडले होते.

**३.५ स्वयंअध्ययनासाठीच्या प्रश्नांची उत्तरे :**

- **स्वयंअध्ययन प्रश्न १ :**

१) जर्मन तत्वज्ञ हेगेल यांनी आदर्शवादाची मान्यता आणि द्वंद्ववादाचा नियम यांच्या मिलाफातून 'द्वंद्वात्मक आदर्श वादाच्या' सिद्धांताची मांडणी केली होती.

२) मार्क्स यांच्या मते उत्पादनप्रणाली हाच मानवी समाजाचा आधार अगर केंद्रस्थानी असल्यामुळे यातील परिवर्तनाच्या बरोबर समाजातील इतर उपव्यवस्थांमध्ये परिवर्तन अगर विकास होत जातो.

३) डी.पी.मुखर्जी, रामकृष्ण मुखर्जी आणि ए.आर.देसाई या भारतीय समाजशास्त्रज्ञांनी भारती समाजाच्या स्पष्टीकरणासाठी अत्यंत व्यापक व व्यवस्थित असा मार्क्सवादी दृष्टिकोणाचा अवलंब केला होतो.

- **स्वयंअध्ययन प्रश्न २ :**

१) डी.पी.मुखर्जी यांच्या म्हणण्याप्रमाणे भारतीय सामाजिक जीवन हे मधमाशा व त्यांचे पोळे अशा स्वरूपाचे असून भारतीय शिस्तबद्ध लोक आहेत.

२) मुखर्जीचा दृष्टिकोणातून भारत हा एक विविध घटकांच्या विविध प्रादेशिक संस्कृतीच्या एकत्रिकरणातून निर्माण झालेला शांतताप्रिय आणि प्रगतशिल समाज आहे.

३) मुखर्जी यांच्या मते भारतीय समाजशास्त्रांची सर्वात महत्वाची भूमिका ही भारती परंपरांचे अध्ययन करणे हीच आहे.

- **स्वयंअध्ययन प्रश्न ३ :**

१) देसाई यांनी आपल्या Social Background of Indian Nationalism या प्रसिद्ध ग्रंथामध्ये ब्रिटीश शासनकाळातील भारतीय समाजातील राष्ट्रवादाच्या अध्ययनासाठी मार्क्सवादी दृष्टिकोणाचा अवलंब केला होता.

२) ए.आर.देसाई यांच्या मते परंपरांची मुळे ही भारतीय अर्थव्यवस्था आणि उत्पादन संबंधात सापडतात.

३) देसाई यांच्या मतानुसार मालमत्ता संबंध महत्त्वाचे असून त्यांच्याद्वारेच उत्पादनाचा हेतू स्वरूप, नियंत्रण दिशा आणि उद्देश याबाबींचे निर्धारण होत असते.

## ३.६ सरावासाठी प्रश्न :

१) भारतीय समाजाच्या अध्ययनासाठी डी.पी.मुखर्जी यांनी मार्क्सवादी दृष्टिकारणाचा केलेला वापर विशद करा.

२) ए.आर.देसाई यांचे मार्क्सवाद दृष्टिकोनाच्या सहाय्याने भारतीय समाजातील परिवर्तनाचे अध्ययन स्पष्ट करा.

## ३.७ चिंतन आणि कार्य :

आज जागतिकीकरण, खाजगीकरण आणि आधुनिकीकरणाच्या जमान्यात भारतीय समाजात होत असलेल्या बदलांचा आढावा घेण्यासाठी कोणते भारतीय समाजशास्त्रज्ञ मार्क्सवादी दृष्टीकोणाचा आधार घेतात याचा शोध घ्या व त्यावर एक निबंध लिहा.

## ३.८ अधिक वाचनासाठी पुस्तके :


१) बी.के. नागला, 'इंडियन सोशॉलॉजिक थॉट' रावत पब्लिकेशन, जयपूर,

२) व्ही.एन.गजेंद्रगड, 'भारतीय समाजशास्त्र' फडके प्रकाशन, कोल्हापूर

३) हरिकृष्ण रावत, 'उच्चस्तर समाजशास्त्र विश्वकोश' रावत पब्लिकेशन, जयपूर.


❑❑❑

**सत्र २ : घटक ४**

# सभ्यतात्मक आणि लोकउठाव दृष्टीकोन

## (Civilazation and Sub-altern Perspective)

**घटक संरचना**


४.१ प्रस्तावना

४.२ उद्दिष्टे

४.३ विषय विवेचन

४.३.१ सभ्यतात्मक दृष्टीकोन

- एन. के. बोस (N. K. Bose)
- सुरजित सिन्हा (Surajit Sinha)

४.३.२ लोकउठाव दृष्टीकोन

- डेव्हीड हार्डिमन (David Hardiman)
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर (Dr. B. R. Ambedkar)

४.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

४.५ सारांश

४.६ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.७ सरावासाठी प्रश्न

४.८ चिंतन आणि कार्य

४.९ अधिक वाचनासाठी पुस्तके


### ४.१ प्रस्तावना (Introduction) :

या घटकाद्वारे आपण भारतीय समाजातील सभ्य संस्कृतीचा परिचय करून घेणार आहेत. प्रथम आपण संस्कृती आणि सभ्यता यांच्यातील फरक जाणून घेऊ. नंतर भारतीय सभ्य संस्कृतीच्या दृष्टीकोनातून भारतीय समाज समजून घेणार आहोत.

कोणताही समाज समजून घेण्यासाठी त्या समाजातील संस्कृती समजून घेणे आवश्यक असते. कारण समाजातील सांस्कृतिक परंपरा ह्या सतत बदलत असतात. बदलाची कारणे अंतर्गत व बहिर्गत अशी दोन्ही असतात. या संदर्भात भारतीय समाजातील सांस्कृतिक बदलाविषयीच्या काही संकल्पना जसे, सांस्कृतिकरण,

पाश्चात्तीकरण, वैश्वीकरण, लघु आणि ब्रह्त परंपरा समजून घेणार आहोत. त्याचबरोबर या संदर्भातील एन्. के. बोस व सुरजित सिन्हा यांच्या कार्याचा आढावा या घटकामध्ये घेतला आहे.

या घटकाद्वारे आपण लोकउठाव दृष्टीकोन म्हणजे काय ? हे समजून घेणार आहोत. भारतीय समाज समजून घेण्यासाठी आतापर्यंत आपण सर्व प्रस्थापित समाजातील विद्वानांचे दृष्टीकोन अभ्यासले आहेत. या सर्व विद्वानांनी भारतीय समाजाच्या जडणघडणीमध्ये तळागाळातील असणाऱ्या लोकांच्या कार्याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येते. त्यामुळे या समाज घयकाला समजून घेण्यासाठी काही विचारवंतांनी आपले दृष्टीकोन मांडले आहेत हे अपाण समजून घेणार आहोत. या घटकात प्रामुख्याने डेव्हिड हार्डिमन आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार व कार्य लोकउठाव दृष्टीकोनातही कसे प्रभावीपणे मांडले आहे हे समजून घेणार आहोत.

## ४.२ उद्दिष्टे (Objectives) :

या घटकाच्या अभ्यास केल्यानंतर आपणास

१. संस्कृती आणि सभ्यता यांच्यातील फरक समजून घेता येईल.

२. भारतीय समाजातील सांस्कृतीक बदलाच्या संदर्भातील संकल्पना अभ्यासता येतील.

३. भारतीय समाज सभ्यता दृष्टीकोनातून समजून घेता येईल.

४. एन्. के. बोस यांचे सभ्यतात्मक दृष्टीकोनासाठीचे योगदान स्पष्ट करता येईल.

५. सुरजित सिन्हा यांचे सभ्यता दृष्टीकोनासाठीचे योगदान स्पष्ट करता येईल..

६. लोकउठाव दृष्टीकोन म्हणजे काय ? हे समजून येईल.

७. डेव्हिड हार्डिमन यांचे लोक उठाव दृष्टीकोनातील योगदान स्पष्ट करता येईल.

८. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार व कार्य लोकउठाव दृष्टीकोनातही कसे प्रभावी आहे हे जाणून घेता येईल.

९. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भारतीय समाजाविषयीचे विचार आणि कार्य समजून घेता येईल.

## ४.३ विषय विवेचन (Presentation of Subject Matter) :

सदर घटकामध्ये प्रथम संस्कृती आणि सभ्यता या संकल्पनांचा अर्थ स्पष्ट केला आहे व नंतर त्यांच्यातील फरक स्पष्ट केला आहे हे समजून घेऊन एन्. के. बोस व सुरजित सिन्हा यांचा सभ्यतात्मक दृष्टीकोन पहाणार आहोत.

या घटकामध्ये आपण लोकउठाव दृष्टीकोन म्हणजे काय ? हे समजून गेणार आहोत. त्यासाठी सर्वप्रथम त्याचा अर्थ समजून घेऊ व नंतर या दृष्टीकोनासंदर्भात डेव्हिड हार्डिमन व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा आढावा घेणार आहोत.

### ४.३.१ सभ्यतात्मक दृष्टीकोन (Civilization Perspective) :

सभ्यतात्मक दृष्टीकोन समजून घेण्यासाठी सर्व प्रथम आपण संस्कृती (Culture) आणि सभ्यता (Civilization) या दोन संकल्पनांचा अर्थ पाहू.

● **संस्कृती म्हणजे काय ?**

नार्थ, सी. सी. - संस्कृती म्हणजे मानवनिर्मित अशी साधने, ज्याच्या माध्यमातून मानवी गरजा पूर्ण करण्यासाठी मदत होते.' (Culture consist in the Instruments constituted by men to assist him in satissfying his wants" - North C.C. )

हॉर्टन आणि हंट - 'संस्कृती म्हणजे असे सर्व काही की जे समाजातील सदस्य सामाजिकरित्या शिकतात आणि एकमेकांत वाटतात'

("Culture is everything which is socially learnt and shared by the members of society") Horton and Hunt.

या व्याख्यावरून असे लक्षात येते की, संस्कृती म्हणजे मानवनिर्मिती अशा सर्व भौतिम व अभौतिक घटकांचा ज्यामध्ये समावेश होतो असे सर्व काही जसे शेती करण्याची पद्धती, घर बांधण्याची पद्धती, सण, उत्सव, मूल्य, प्रमाणके, नितीतत्त्वे, श्रद्धा, ज्ञान इ. प्रत्येक मानवी समाजाची वेगळी संस्कृती असते. जसे साध्या आदिवासी समाजात लोकसंस्कृती असते तर आधुनिक समाजात लोकप्रिय संस्कृती आढळते.

**सभ्यता म्हणजे काय?** (What is Civilization) :-

ऑणनॉल्ड टॉयनबी - 'सभ्यता म्हणजे धार्मिक आणि नैतिक व्यवस्था असते. ज्याची व्याप्ती राज्य आणि राष्ट्र यापेक्षा मोठी असते आणि ही व्यवस्था प्रथा, संस्था आणि विचारप्रणालीचे एकात्मीकरण असणारी असते.

("A Civilization is essentially a religious and ethical system holding sway over an area often larger than a state or nation such system is unified by customs, institutions and ideoligies" - Arnold Toynebee)

● **संस्कृती आणि सभ्यता यांच्यातील फरक** (Differences between Culture and Civilization)

आतापर्यंत आपण संस्कृती आणि सभ्यता यांचा अर्थ स्पष्ट केला आहे. आता आपण या दोन संकल्पनांच्या मधील फरक जाणून घेऊ.

**१. सभ्यतेचे तंतोतंत मोजमापाचे साधने आहेत, संस्कृतीसाठी नाहीत.**

(Civilization has a precise standard or measurement, but not culture)

कार्यात्मतेच्या दृष्टीकोनातून सभ्यतेचे मोजमाप करता येते. यामध्ये सभ्यतेची उत्पादने कोणती दर्जेदार आणि उच्च दर्जाचे आहेत आणि कोणते निकृष्ट दर्जाचे आहेत हे मोजतायेते. उदा. ट्रक हा बैलगाडीपेक्षा जास्त वेगाने चालतो. ट्रकपेक्षा विमानाचा वेग जास्त आहे तसेच हातमागावरील कापडापेक्षा यंत्रमागावरील कापडाचे उत्पादन जास्त असते. ट्रॅक्टर हे नांगरापेक्षा श्रेष्ठ असते. अशा स्वरूपाची मोजमापे सांस्कृतिक घटकांचे करता येत नाही तर हे काळानुरूप बदलत असते.

**२. सभ्यता ही सतत प्रगतशील असते तर संस्कृती नसते** (Civilization is always advancing but not culture) :

मॅक आयव्हरच्या मते, सभ्यता ही पुढे विकसित होते असे नाही. तर सामाजिक सातत्य ठेऊन प्रगतीकडे वाटचाल करीत असते. सभ्यता नेहमीच उर्ध्वगामी दिशेने वाटचाल करीत असते. जसे ज्यावेळी ऑटोमोबाईलचा शोध लागला त्यावेळेपासून आजपर्यंत यामध्ये विकासच होत आहे. याच्या तुलनेत संस्कृती ही हळूवारपणे बदलत असते. त्याचबरोबर संस्कृतीचा विकास हा नेहमीच उर्ध्वगामी दिशेने असतो असे नाही. म्हणजेच आपल्याकडे असणारी कविता, नाटक, साहित्य हे प्राचीन साहित्यापेक्षा सरस आहे का ? तर नाही.

**३. सभ्यतेचे संक्रमण सहज शक्य आहे तर संस्कृतीचे नाही** (Civilization is passed on without efforts, but not culture) :

संस्कृतीचे संक्रमण करण्यासाठी सारख्या समान विचाराच्या लोकसमूहाची गरज असते. तर सभ्यतेचे संक्रमण करण्यासाठी वेगवेगळ्या विचारसरणी असणाऱ्या लोकांमध्ये परस्पर सहकार्य भावना असणे गरजेचे असते. म्हणजेच संस्कृतीचे संक्रमण सहज होत नाही तर सभ्यतेचे संक्रमण सहज शक्य होते.

**४. सभ्यतेमधील कार्य सुधारणा कोणीही करू शकते पण संस्कृतीचे कार्य सर्वजण करू शकत नाही.** (The work is civilization can be improved by anybody but that is not possible in the case of culture) :

विकसित झालेली सभ्यता सर्वजण समजून घेऊ शकत नाहीत. परंतु अविकसित संस्कृती समजून घेणे अवघड नसते. म्हणजेच विमान तयार करणारा व्यक्ती, बैलगाडी तयार करणे लवकर समजतो. परंतु बैलगाडी तयार करणारी व्यक्ती विमान तयार करणे समजून घेऊ शकत नाही. म्हणजेच सभ्यता ही शिकण्यासाठी मेहनत आणि कौशल्य आवश्यक असतात. तर संस्कृती शिकण्यासाठी त्या सांस्कृतिक जीवनाचा सभासद असणे गरजेचे असते.

**५. सभ्यता ही बहिर्गत आणि यांत्रीक असते तर संस्कृती ही अंतर्गत आणि जैवीक असते.** (Civilization is external and Mechanical while culture is internal and organic) :

सभ्यता ही सर्व बहिर्गत गोटीचे समावेशन करू शकते. परंतु संस्कृतीमध्ये अंतर्गत विचार, भावना, आदर्श, मूल्य यांचा समावेश होतो. म्हणजेच सभ्यतेमध्ये सर्व (अंतर्गत/बहिर्गत) घटकांना संधी मिळते तर संस्कृतीमध्ये अंतर्गत घटकांना जास्त संधी मिळते.

**६. सभ्यता ही विनाबदल किंवा नुकसानीशिवाय स्वीकारता येते तर संस्कृती नाही** (Civilization is barrowed without change or loss but not culture) :

एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सभ्यतेचे संक्रमण करणे सहज आणि सोबे आहे. जसे रेडिओचा शोध, झेरॉक्स मशिनचा शोध याचे संक्रमण करणे अवघड नाही. परंतु सांस्कृतिक मूल्य लवकर संक्रमण करणे सहज व सोपे नाही.

**७. सभ्यता आणि संस्कृती हे परस्परावलंबी आहेत** (Culture and Civilization are inter-dependent) :

संस्कृती आणि सभ्यता या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. म्हणून या दोघांना वेगळे स्वतंत्र अस्तित्व असणे अशक्य आहे. कारण कोणत्याही सभ्यतेचा विकास व प्रसार होण्यासाठी सांस्कृतिक घटक महत्त्वाची भूमिका पार पाडतात. तर कोणतीही संस्कृती विकसित होण्यासाठी सभात्मकता महत्त्वांची असते.

८. **सभ्यता आणि संस्कृती आंतरक्रियात्मक आहेत** (Both are Interactive) :

संस्कृती हा मानवी जीवनाचा अविभाज्य घटक आहे. या संस्कृतीमध्ये सुधाणा झालेली असते त्यालाच सभ्यता असे म्हणतात. तर सभ्तेच्या विकासामुळे सांस्कृतिक विकासाला चालना मिळते म्हणून संस्कृती आणि सभ्यता या परस्परावलंबी आंतरक्रिया करणाऱ्या व्यवस्था आहेत.

थोडक्यात संस्कृती ही प्रत्येक मानवी समाजात आढळते. परंतु सभ्यता ही प्रत्येक समाजात आढळेल असे नाही. संस्कृती ही जेव्हा गुणात्मकरित्या विकसित होते त्यावेळी सभ्यता निर्माण होते. म्हणजे समाज साध्या संस्कृतीकडून सभ्य (विकसित) संस्कृतीकडे वाटचाल करीत असतो. उदा. ब्रिटिश स्वत:ची संस्कृती सभ्य संस्कृती असल्याचे मानत असत, तर इतर देशातील (भारत, आफ्रिकन राष्ट्रे) संस्कृती ही असभ्य रानटी असल्याचे मानत होते. म्हणजेच संस्कृती सर्व समाजात आढलते. परंतु सभ्यता असेलच असे नाही.

- **सभ्यतात्मक दृष्टीकोन म्हणजे काय ?** (What is civilizational Perspective) :

संस्थात्मक दृष्टीकोनामध्ये अभिजात आणि मध्ययुगीन ग्रंथ, प्रशासकीय नोंदी, गाव, जातिव्यवस्था इ. वेगवेगळ्या विषयाचे विश्लेषण आणि त्याचे व्यापक जाळे व पर्यायाने शेवटी समाजातील एकता आणि विविधता या संबंधीचे वादाचे मुद्दे याचा समावेश होतो.

त्याचबरोबर हा दृष्टीकोन कोणत्या सभ्यतेला तीव्र होण्यासाठी आणि ऐतिहासिकरित्या बांधलेल्या जसे धर्माची प्रतिमा, खेडे, जातिव्यवस्था, राज्यनिर्मिती, जमीन संबंध इ. संरचनात्मक-घटकाचे विश्लेण करते. या दृष्टीकोनाचा स्वीकार करणे, सामाजिक व्यवस्था, राष्ट्र व सभ्यतीकरण हे ऐतिहासिक सभ्यात्मक चौकटीतून समजून घेण्यावर विश्वास ठेवतात.

शेवटी सभ्यतीकरण समजून घेण्यासाठी संस्कृतीच्या गुणाची सूची संस्कृतीचा आशय (आवश्यक सांस्कृतिक प्रक्रिया) आणि सांस्कृतिक संज्ञापन यांचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

- **डॉ. एन. के. बोस** (Dr. N. K. Bose) :

सभ्यतावादी दृष्टीकोन हा भारतीय समाजाचे अध्ययन करणाऱ्या विविध दृष्टीकोनातील एक दृष्टीकोन आहे. एन. के. बोस यांना भारतीय मानवशास्त्रामध्ये अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. बोस यांनी आपल्या अभ्यासामध्ये भारतीय समाजाचा सभ्यतेवर अधिक भर दिला आहे. बोस यांच्या मते संस्कृतीचा मानवी जीवनावर प्रभाव पडतो हे खरे असले तरी, मानव हा संस्कृतीपुढे पुर्णता निष्क्रिय होत नाही. त्या संस्कृतीमध्ये आपल्या सोयीप्रमाणे परिवर्तन करण्याचा प्रयत्न करतो.

भारतातील राजकीय जीवन पद्धती, सामाजिक जीवन पद्धती, जातीव्यवस्था, संस्कृती, प्रमाणके, सामाजिक संरचना, उत्सव, तीर्थ क्षेत्र, सांस्कृतिक समूह, आप्त संबंध मंदीर आदी बाबीवर प्रामुख्याने भर देऊन भारतीय समाजाचा सभ्यतेच्या दृष्टीकोनाचा विचार केला आहे. बोस यांच्यावर मॉलीनॉवस्की या विचारवंतांच्या प्रकार्यवादी दृष्टीकोनाचा प्रभाव पडला असून क्रोबर यांच्या संस्कृती संदर्भातील अधिक प्रभावी पडलेला दिसतो. त्यांनी या देशातील भारतीय समाजातील वास्तवता समजून घेण्यासाठी किंवा एकूणच भारतीय समाजाचे अद्ययन करण्यासाठी सभ्यतावादी दृष्टीकोनाचा आधार घेतल्याचे दिसते. त्यांच्या

माध्यमातून समाजव्यवस्थेत प्रचलित असलेल्या सामाजिक मूल्ये, नियमने, प्रमाणके आदी बाबी महत्त्वपूर्ण मानल्या.

डॉ. बोस यांनी भारतीय समाजाच्या सभ्यतेच्या संदर्भात विचार मांडताना भारतातील विविधतेत एकता यावर अधिकाधिक भर दिला आहे. भारतीय समाजात प्रामुख्याने जात, धर्म, वंश, पंथ, वर्ग, भाषा, संप्रदाय, व्यवस्था आणि नैसर्गिक साधन संपत्तीमध्ये विविधता आहे. वरील सर्व घटक परस्परांशी वेगवेगळे असले तरी देखील भारतीय समाजात एकता दिसून येते. याचे प्रमुख कारण म्हणजे भारतीय समाजातील प्रत्येक व्यक्ती आपल्या जातीचा आपल्या धर्माचा विचार न करता सर्व धर्मीय सणामध्ये उत्सवामध्ये आनंदाने सहभागी होतात. त्यामुळे त्यांच्यात आम्ही सर्व एक आहोत अशी एकतेची भावना दृढ होते आणि त्यामुळेच भारतीय समाजातील विविधतेत एकता आहे असे बोस यांचे प्रतिपादन आहे.

विशाल आणि विविधतेने नटलेल्या भारतातील समाजात सामाजिक, राजकीय, साहित्यीक, सांस्कृतीक आर्थिक इतिहास देखील महत्त्वपूर्ण आहे. भारतामध्ये १७९ भाषा, ५४४ बोलीभाषा प्रचलित आहेत. भारतीय राज्यघटनेने देखील १५ भाषाना राष्ट्रीय भाषा म्हणून मान्यता देखील दिली आहे. एकूण भारत हा बहुभाषिक देश आहे. कच्छ ते आसाम पर्यंत काश्मीर ते कन्याकुमारी पर्यंत देशात भौगोलिक विविधता दिसते. सदर भौगोलिक विविधतेचा परिणाम लोकांच्या वांशिक भिन्नतेत दिसून येतो. नाक, त्वचेचा रंग, केस, डोळ्यांची ठेवण, उंची यामध्ये भिन्नता आढळून येते. भारतात जन्म तत्त्वावर आधारीत वर्णातून शेकडो जाती उपजाती निर्माण झाल्या आहेत. जाती प्रमाणेच धर्म या प्रकारात म्हणजे हिंदू, जैन, बौद्ध, मुस्लिम, ख्रिश्चन, शिख इ. धर्मियांत अनेक बाबतीत विविधता दिसून येते. वेगवेगळ्या धर्मियांचा सनात उत्सवात, चालिरीती, परंपरा रुढी, प्रथा याबाबतीत सांस्कृतिक विविधता आढळून येत असली तरी या विविधतेतच भारतीय समाजाची एकता सामावलेली आहे.

डॉ. बोस यांचे मदतनीस समाजातील जातीव्यवस्थे संदर्भात महत्त्वपूर्ण योगदान आहे. जाती व्यवस्थेचा व धर्माचा काहीच संबंध नाही. जाती या मानव निर्मित असल्यामुळे पवित्र, अपवित्र पुर्नजन्म या खुल्या कल्पना आहेत. एकंदरीत जाती व्यवस्था कशी वाईट आहे हे सांगून त्यात परिवर्तन झाले पाहिजे आणि प्रत्येकाला आपल्या इच्छेनुसार जीवन जगण्याचा अधिकार मिळाला पाहिजे असे त्यांचे मत आहे.

- **सुरजीत सिन्हा यांचे कार्य** (Work of Surjit Sinha) :

आतापर्यंत आपण थोडक्यात सभ्यात्मक दृष्टीकोन म्हणजे काय हे समजून घेतले आहे. या दृष्टीकोनाची.चौकट वापरून सुरजीत सिन्हा यांनी केलेल्या भारतीय समाजाचा अभ्यास आता आपण समजून घेणार आहोत.

सुरजीत सिन्हा हे मानवशास्त्रज्ञ होते. सिन्हा यांनी भारत सरकारच्या मानवशास्त्रीय सर्वेक्षण विभागाचे उप संचालक म्हणून काम केले आहे. त्याच बरोबर त्यांनी बिहार आणि बंगालमधील आदिवासीचे व्यापक क्षेत्र कार्य केले आहे.

सुरजीत सिन्हा हे मानवशास्त्रज्ञ होते. सिन्हा यांनी भारत सरकारच्या मानवशास्त्रीय सर्वेक्षण विभगाचे उप-संचाकल म्हणून काम केले आहे. त्याचबरोबर त्यांनी बिहार आणि बंगालमधील आदिवासीचे व्यापक क्षेत्र कार्य केले आहे.

सुरजीत सिन्हा यांचा विशेष अभ्यास या मध्य भारतातील आदिवासीचे संक्रमण आणि भारतीय सभ्यतेची रचना या संबंधीचा आहे.

सुरजीत सिन्हा यांचे कार्य खालील मुद्यावर केंद्रित आहे.

१. जमात-जात आणि जमात-शेतकरी संबंध.

२. वांशिक गट आणि आर्थिक सुधारणेची पातळी.

३. आदिवासीच्या चळवळी

४. धर्माचे समाजशास्त्र.

५. भारतीय लोकांविषयी क्षेत्रीय अध्ययन.

कोणत्याही संस्कृतीचा विकास (सभ्य संस्कृती) दोन प्रक्रियाद्वारे घडून येतो. म्हणजे समाजातील वेगवेगळ्या स्तरावरील असलेल्या संस्कृतीच्या संपर्काद्वारे विकास घडून येतो. त्याला Orthogenetic प्रक्रिया असे म्हणतात. तर ज्या प्रक्रियेमध्ये समाजाची संस्कृती बाहेरच्या समाजाच्या संपर्कात आल्यामुळे विकासित होते त्याला heterogenetic प्रक्रिया असे म्हणतात. याच प्रक्रियेला रॉबर्ट रेडफिल्ड यांने सांस्कृतिक विकासाच्या 'लघु आणि बृहत परंपरा' असे अनुक्रमे संबोधले आहे. म्हणजेच जर आपण आपल्याच समाजातील विकसित संस्कृती स्वीकारत असाल तर ती लघु परंपरा होय. उदा. एम. एन. श्रीनिवास यांची सांस्कृतिकरणाची प्रक्रिया. ज्यामध्ये आपल्याच समाजातील उच्च जातीच्या संस्कृतीचे अनुकरण कनिष्ठ जाती करतात. जर आपण आपल्या समाजाव्यतिरिक्त इतर (बाहेरील) समाज व्यवस्थेच्या सांस्कृतिक मूल्यांचे अनुकरण करत असाल तर त्यात बृहत परंपरा असे म्हणतात. म्हणजेच आपण भारतीयांनी केलेले पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण होय. यालाच पाश्चातीकरण असेही म्हणतात.

सिन्हा यांनी आपल्या अध्ययनात या वरील दोन प्रक्रियापैकी पहिल्या प्रक्रियेचा अभ्यास केला आहे. सिन्हा यांनी सांस्कृतिक परिवर्तनाचे अध्ययन लघु परंपरा या दृष्टीकोनातून मांडले आहे. यामध्ये त्यांनी मध्य भारतातील आदिम जमातीच्या संस्कृतीचे Orthogenetic रित्या सभ्यतीकरण झाल्याचे अभ्यासले आहे. यामध्ये त्यांनी आदिवासी संस्कृती, शेती करणाऱ्या गावाच्या संपर्कात आल्यामुळे कशी विकसित झाली हे मांडले आहे. पश्चिम बंगाल आणि बिहारच्या 'भूमिज' ह्या जमातीची संस्कृती ही गावातील हिंदू जातीव्यवस्थेशी कशी एकात्म झाली हे अभ्यासले. त्यामध्ये त्यांनी हिंदू जाती व्यवस्थेतील उच्च जातीमध्ये आदिवासी संस्कृती कशी असंस्कृत आहे, ही समज झाली हे मांडले आहे.

- **आदिवासी समाज** (Tribal Society) :

सिन्हा यांचे मते, आदिवासी समाज म्हणजे जो 'परिस्थितीकीच्या दृष्टीने, लोकसंख्यात्मकतेच्या दृष्टीने, आर्थिक व्यवस्था, राजकारण, सामाजिक बंध इ. बाबतीत इतरांपासून वेगळा अलग असतो. 'हे वेगळेपण आदिवासी समूहामध्ये एकात्मतेची भावना निर्माण करते व त्यामध्ये एकजिनसिपणाची भावना वाढीस लावते. ज्यामध्ये सामाजिक स्तरीकरण आणि भूमिकांच्या विशेषीकरणाला प्रतिबंध करते. परंतु वय, लिंग आणि आप्तसंबंधावर आधारित साधे स्तरीकरण येथे आढळते. या आदर्शवत वेगळेपणामध्ये जरी एकात्मतेची, एकजिनसीपणाची, भावना असली तरी ते भारतीय सभ्यतेच्या बृहत परंपरापासून दूरच असतात. ज्यामध्ये समानतेची, वस्तुनिष्ठ जाणीव व नैसर्गिक व अनैसर्गिक जगाला समजून घेण्याची वेगळी पद्धत आहे.

● **जात समूह** (Caste Groups) :

सिन्हाच्या मते, जात, समूह हा आदिवासी समूहाच्या विरोधी वैशिष्ट्ये असणारा समूह आहे. ज्यामध्ये खालील वैशिष्ट्ये आढळतात. जाती या एकमेकांपासून अलिप्त नाहीत. यामध्ये विविधता दिसून येते. त्याचबरोबर स्तरीकरण असलेला समूह आहे. त्याचबरोबर जाती समूह हा स्थानिक समूदायात बहूवांशिक समुदाय म्हणून वास्तव्य असणारा आहे. यामध्ये आंतर संबंध आढलतात. यामध्ये जमीन संबंध वेगळे आहेत. यामध्ये इतर गटाबरोबरच आंतर-अवलंबन आंतरक्रिया आढळतात. त्यामुळे वेगवेगळ्या जाती समूहाचा इतर समूहांशी संपर्क येतो व त्यामुळे सांस्कृतिक देवाण-घेवाणीची प्रक्रिया घडून येते. त्यामुळे सांस्कृतिक परिवर्तनाचा वेग आदिवासी समाजापेक्षा जात समूह असणाऱ्या समाजात जास्त आहे.

● **सभ्यतात्मक दृष्टीकोनाच्या मर्यादा** (Limitations of Civilizational Perspective) :

भारतीय सभ्यतात्मकतेच्या दृष्टीकोनासमोर सर्वात महत्त्वाची लक्ष देण्याची बाब म्हणजे भारतातील आदिम समाजाच्या संस्कृतीचा होत असलेला ऱ्हास होय. त्याचबरोबर खालील काही घटक महत्त्वाचे आहेत.

१. आदिवासींची संस्कृती ही अतिशय छोट्या-छोट्या विभागात वेगवेगळी असल्याने तिचे जतन करणे व भारताच्या संस्कृतीशी संबंधित गुंतागुंत समजणे अवघड आहे.

२. भारतातील आदिवासींच्या संस्कृतीचे स्वतंत्र अध्ययन करणे अतिशय गुंतागुंतीचे आहे. कारण अंदमान निकोबार बेटावरील आदिवासी सोडले तर इतर आदिवासी समुदाय समाजाच्या संपर्कात येत आहेत.

३. असा एक समज आहे की, आदिवासी हे जातीपेक्षा जास्त प्रमाणात विकसित होत आहेत. परंतु हे सामान्यीकरण एकांगी आहे.

४. सर्वात मोठी अडचण म्हणजे एक समग्र भारत देश म्हणून टिकविण्यासाठी होणारे संस्कृतीकरण, राष्ट्रीयकरण हे आदिवासी संस्कृतीचा ऱ्हास करणारे होत आहे. म्हणून काही स्वायत्त सांस्कृतिक धोरणे आवश्यक आहेत.

● **भारतीय सभ्यतेचा दृष्टीकोन** (Perspective of Indian Civilization) :

वरील मर्यादा बरोबरच आदिम समुदायाच्या संस्कृतीचा होणारा ऱ्हास थांबवण्यासाठी काही धोरणात्मक संशोधन या दृष्टीकोनातून होणे गरजेचे आहे. त्यामध्ये सध्या: स्थितीतील आदिम संस्कृती स्वतंत्रफणे अभ्यासणे गरजेचे आहे. यासाठी सिन्हा यांनी खालील विषयानुरूप अभ्यास होणे गरजेचे आहे असे मत मांडले आहे.

१. वेगाने बदलणाऱ्या प्रक्रिया आणि स्वरूपाचे अध्ययन करणे.

२. यासाठी अन्वेषणात्मक संशोधन तातडीने हाती घेणे आवश्यक आहे. नंतर त्याच्यातील आवश्यक बाबींवर लक्ष केंद्रित करता येईल व पुढील संशोधनाला दिशा मिळेल.

यासाठी सिन्हा यांनी आदिम समाजातील अभ्यासासाठी खालील अभ्यासविषय सूचविलेले आहेत.

१. सामाजिक आणि सांस्कृतिक अर्थव्यवस्थेचा अभ्यास.

२. वांशिक समूहांचा अभ्यास.

३. स्थानिक समुदायांचा अभ्यास.

४. प्रादेशिक आणि भारतीय स्तरावरील अभ्यास.

५. विशेषज्ञांच्या संघटनांचा अभ्यास.

**४.३.२ लोकउठाव दृष्टीकोन** (Subaltern Perspective) :

भारतीय समाजव्यवस्था समजून घेण्यासाठी आतापर्यंत आपण विविध दृष्टीकोनांची चर्चा केली आहे. आता आपण लोकउठाव दृष्टीकोनातून भारतीय समाजव्यवस्था समजून घेणार आहेत. तसे पाहिले तर 'डींलरश्रींशीप' या शब्दाचा नेमका मराठी अर्थ स्पष्ट नाही. परंतु काही तार्किक विचाराच्या अनुषंगाने लोकउठाव हा शब्द जवळचा वाटतो. म्हणून या प्रकरणात त्या अनुषंगाने वापरण्यात आला आहे.

ऑक्सफोर्ड डिक्शनरीनुसार "Subaltern" या शब्दाचा अर्थ सामाजिक व्यवस्थेत असणाऱ्या जात, वर्ग, लिंग यांच्या श्रेणी रचनेत असणारा दुय्यम दर्जा होय यामध्ये शरण येणे आणि स्वत:च्या कार्याचे जोरदार समर्थन करणे याचाही समावेश होतो. शब्दश: अर्थ तळागाळातील लोकांनी मांडलेला दृष्टीकोन असाच होतो.

लोकउठाववादी दृष्टीकोनाच्या मते, त्यांनी राष्ट्रीय प्रवाहातील सिद्धांतकारांनी आणि अभिजन इतिहासकारांनी सामान्य लोकांचा आवाज उठवण्याऐवजी किंवा सामान्याचे कार्य प्रवाहात सामावून घेण्यासाठी प्रस्थापितांचे कार्य एकांगीपणे मांडून त्यांनी सामान्यांची असमर्थता दाखवली आहे. म्हणून समाजाचा इतिहास पुन्हा लिहण्याची व समजून घेण्याची गरज आहे, असे लोक उठाववादी दृष्टीकोनकारांनी मांडले आहे. लोक उठाव दृष्टीकोनामध्ये प्रामुख्याने समाजातील साधारण वर्गातील कारागिर, गरीब, शेतकरी, भूमिहीन मजूर, आदिवासी, दलित इ. घटकांचे समाज निर्मितीतील योगदानाचे स्पष्टीकरण दिले आहे. परकीय आक्रमणाच्या विरोधात असो की प्रस्थापित वर्गाच्या पिळवणूकी विरोधात असो सामान्य वर्गातील लोकांची भूमिका आतापर्यंत अभिजनांनी व्यवस्थित मांडलेली नाही. ती मांडण्याचा प्रयत्न लोकउठाववादी दृष्टीकोनकारांनी केला आहे.

- **लोकउठाव दृष्टीकोन म्हणजे काय ?** (What is subalten Perspective ?)

लोकउठाव दृष्टीकोन स्पष्ट करण्यासाठी रणजित गुहा यांचे योगदान महत्त्वाचे आहे. गुहा यांनी सर्वप्रथम लोकउठाव विषयाशी संबंधित विचारवंतांनी एक व्यासपिठ तयार केले. या सर्वांनी मिळून लोक उठाव संबंधिचे संशोधन कार्य प्रसिद्ध केले. ही सर्व शोध-निबंध पुस्तक मालिकेच्याद्वारे १९८२-८४ च्या दरम्यान एकत्रित प्रकाशित करण्यात आले. या पुस्तकांचा "Subalte Studies" असे संबोधण्यात आले. या सर्व ग्रंथ मालिकेचे वाचन केल्यास आपणास लोकउठाव दृष्टीकोन काय हे समजून घेता येते. परंतु आजही एक अशी स्पष्ट व्याख्या या दृष्टीकोनाची तयार झाली नाही असे समजले तरी रणजित गुहा यांच्या कार्यावरून कार्यात्मक व्याख्या पुढीलप्रमाणे करता येईल.

लोकउठाव दृष्टीकोन म्हणजे, 'आतापर्यंत लिहिलेला इतिहास हा अभिजनांनी काही राष्ट्रीय प्रवाहातील उच्च स्तरातील लोकांना खूश करणारा व त्यांचे जास्त गुणगाण करणारा आहे. यामध्ये सामान्य जमाती, शेतकरी, यांनी दिलेल्या योगदानाची दखल घेतलेली नाही. म्हणून सामान्य आदिवासी, शेतकरी व समाजातील तळागाळातील लोकांनी लिहिलेला त्यांच्या कार्याचा इतिहास म्हणजे लोकउठाव दृष्टीकोन होय.'

- **डेव्हिड हार्डिमन** (David Hardiman) :

भारतीय समाजाचा अभ्यास करण्यासाठी डेव्हिड हार्डिमन यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रमाणेच दलितवादी दृष्टीकोनाला महत्त्वपुर्ण स्थान दिले आहे. डेव्हिड हार्डिमनने दक्षिण गुजरातमधील खेडा जिल्ह्यातील सन १९१७ ते १९३४ या दरम्यान राष्ट्रीय आंदोलनातील राष्ट्रवादी शेतकऱ्यांच्या भूमिकांचे सखोल अध्ययन केले आहे. या अध्ययनाचे मुख्य विषय गट, गटबाजी आणि दलित चेतना आहे.

- **डेव्हिड हार्डिमन यांची ग्रंथ संपदा :**

Peasant Nationalists of Gujrat (1981)

Feeding the Bania (1996)

- **डेव्हिड हार्डिमन यांची सबअल्टर्न संकल्पना :**

"Sub-Altern" या रणजित गुहांच्या अध्ययन प्रेरणेतून हा विषय हार्डिमन यांनी अधिक प्रकर्षाने हाताळला आहे. या अध्ययनाचा मुख्य उद्देश भारतातील प्रभावी समूह व निम्न समुहातील परस्परसंबंधाच्या अध्ययनाचा आहे.

"Sub-Altern" या शब्दाचा अर्थ निम्नस्थान किंवा निम्नदर्जा म्हणून सांगितला आहे. अर्थात अशा व्यक्ती ज्याच्या वर्ग, वय, लिंग आणि स्थान किंवा अन्य प्रकारे ते अधिनतेच्या "Sub-Altern" या संकल्पनेत समाविष्ट होतात. डेव्हिड हार्डिमन यांनाही आधिमान्यता दोन प्रकारच्या संबंधाच्या स्वरूपात दिसते.

१) अधिमान्यता जी दुसऱ्याच्या प्रभावाने निर्माण झालेली असते. दबलेले शोषित समूह प्रत्येक वेळी प्रभावशाली समुहापुढे अधिन होतात.

२) अधिन किंवा दबलेला समूह हा आंदोलनाने त्यांचे स्थान उंचावतो पण तरीसुद्धा त्यांच्यावर प्रभावी समुहाचे वर्चस्व असते.

- **डेव्हिड हार्डिमन यांचे गुजरातमधील खेडा जिल्ह्याचे सखोल संशोधन कार्य :**

डेव्हिड हार्डिमन यांनी सन १९७१ ते १९७७ पर्यंत खेडा जिल्ह्याचे सखोल शोधकार्य करून १९१७ ते १९३४ या दरम्यान गुजरात मधील खेडा जिल्ह्यात झालेल्या भारतीय राष्ट्रीय आंदोलनाच्या इतिहासावरती प्रकाश टाकला आहे. या संदर्भामध्ये डेव्हिड हार्डिमन यांनी या आंदोलनात सक्रिय सहभागी असणाऱ्या लोकांच्या मुलाखतींवर भर दिला आहे. या संशोधना संदर्भात खेडा जिल्ह्यातील एका खेड्यात दीर्घकाळ वास्तव्य केले की, जेणे करून ग्रामीण स्तरावरील राजकीय आंदोलन योग्य पद्धतीने समजले जाऊ शकेल.

खेडा जिल्ह्यातील अध्ययनादरम्यान डेव्हिड हार्डिमन यांनी असे म्हटले आहे की पाटीदार समुदायाने राष्ट्रीय आंदोलनामध्ये महत्वपुर्ण भूमिका पार पाडली आहे आणि या क्षेत्रामध्ये पाटीदार समुदाय प्रमुख प्रभावी जाती म्हणून ओळखली जाते. या प्रभावी जातीकडे सर्वाधिक जमीन होती व अन्य शेतीसाधनांवरती त्यांचे सर्वाधिक नियंत्रण होते. पाटीदार समुदायातील जमीनदार आपला सामाजिक दर्जा उच्च ठेवण्यासाठी अनुलोम प्रथांचा आधार घेत होते. या अनुलोम प्रथेनुसार उच्च पाटीदार समुदायातील लोक निम्न पाटीदार समुदायातील लोकांकडून हुंडा घेवून त्यांच्या मुलींबरोबर विवाह करीत आणि आपली सामाजिक परिस्थिती

मजबूत करत. राजनैतिक दृष्टीकोनातून या प्रथेकडे पाहिले असता असे दिसते की, निम्न/कनिष्ठ पाटीदार कुटुंब उच्च पाटीदार लोकांच्या सद्‌भांवावर अवलंबून राहण्यासाठी मजबूर होते.

डेव्हिड हार्डिमन यांनी राष्ट्रीय आंदोलनाच्या संदर्भामध्ये अध्ययन करीत असताना राजनैतिक गटांमधील आपापसामधील संघर्षात्मक संबंधाचे विस्तृत विश्लेषण करताना भारतामधील दलबंदी राजनितीचे सुक्ष्म विश्लेषण केले आहे. या संदर्भात हार्डिमन यांनी भारतीय राजनिती समजण्यासंदर्भात 'सर्वप्रथमगट' या संकल्पनेची समीक्षा केली आहे आणि काही प्रख्यात लेखकांच्या गटसंबंधी विचारांची समीक्षा केली आहे. हार्डिमन यांनी असे स्पष्ट केले आहे की, गट या शब्दाचा प्रयोग दोन अर्थाने केला जातो. १) राजनितिक गट, २) विस्तृत संरक्षक – आश्रित गट.

या संदर्भात असे म्हटले जाते की, गावामधील राजकारणातील गट जमिनीसंदर्भात जोडले जातात. अर्थात लहान गरीब भूमिहीन आपल्या जमीनदारांच्या गटांबरोबर जोडले जात होते व स्वतः ते त्यांच्या गटांचे सदस्य होतात. जमीनदार जिल्ह्याच्या गटाचे सदस्य होतात. जिल्ह्याचा मालक प्रांताच्या विधानसभेच्या गटाचा एक सदस्य होत होता आणि प्रांताचा मंत्री आखिल भारतीय दलाचा सदस्य होत. अशा प्रकारे कनिष्ठ स्तरातील भूमीहिनांना आपल्या उच्च स्तरातील शासकांबरोबर जोडताना हा गटातील प्रभाव संपूर्ण देशभर जाणवतो. गट राजनिती विश्लेषणा संदर्भात डेव्हिड हार्डिमन यांनी 'पॉल ब्रास' यांच्या विधानाचा आधार घेतला आहे. ते म्हणतात की, ''गटातील निष्ठेमुळे भारतीय समाजातील लहान गट – कुटुंब, गाव, जाती-जनजाती आणि राजकीय पक्ष आपापसात जोडले जातात.''

- **डेव्हिड हार्डिमन यांचे आदिवासी सुधार आंदोलन अध्ययन :**

आदिवासींच्या सुधार आंदोलनाचे अध्ययन करीत असताना त्यांनी सर्वप्रथम डॉ. एम. एन. श्रीनिवास यांच्या ''संस्कृतीकरण'' आणि एन्थोनी वेलेस यांची ''पुनरूज्जीवन'' या दोन संकल्पनांचे आपल्या क्षेत्र अध्ययनात समीक्षा करून त्यांच्या त्रुटी आणि मर्यादा स्पष्ट केलेल्या आहेत. याच बरोबर हार्डिमन यांनी या आंदोलनाची व्याख्या ऐतिहासिक द्वंद्वात्मक भौतिकवादी दृष्टीकोनातून केली आहे.

हार्डिमन यांनी आपल्या या अध्ययनासंदर्भात गुजरात मधील ''राणीमहल'' क्षेत्रातील आदिवासींच्या एका दैवी आंदोलनाचे विश्लेषण केले आहे. प्रामुख्याने हे आंदोलन आदीवासींचे खान, पान, राहणीमानाच्या सवयी, आर्थिक समृद्धी, सांस्कृतिक सुधारणा इ. बाबींवर आधारित आहे. डेव्हिड हार्डिमन यांनी गुजरातमधील ''राणीमहल'' भागातील आदिवासींच्या सुधार आंदोलनाच्या अध्ययनासाठी डॉ. एम. एन. श्रीनिवास यांची ''पाश्चिमात्यीकरण'' व एडवर्ड जे. यांची ''पुनरूज्जीवन'' या संकल्पना अपूर्ण मांडलेल्या आहेत.

सुधार आंदोलनाच्या अध्ययनासाठी हार्डिमन यांनी ऐतिहासिक द्‌वद्‌वात्मक दृष्टिकोनाच्या अभ्यासाचा उपाय सुचविला आहे. या संदर्भात ते म्हणतात की, आदिवासी आणि बिगर आदिवासी यांच्यामधील विरोधाने जर तीव्र रूप धारण केले तर तेव्हा समन्वयाचा मार्ग योग्य मानला आहे. हार्डिमन यांच्या मते सुधारवादी आंदोलनाची व्याख्या करण्यासाठी सर्वांत उपयुक्त दृष्टीकोन हा होऊ शकतो की ज्या दृष्टिकोनामध्ये शक्ती आणि मूल्यांना बरोबर पाहिले पाहिजे अर्थात ज्या लोकांकडे शक्ती आहे त्या लोकांच्या मूल्यांचे अनुकरण अधिनिस्त लोक करतात. आदिवासी लोकांनी याच पद्धतीने ज्या लोकांच्या हाती राजकीय शक्ती आहे. त्यांच्या मूल्यांचे अनुकरण केले आहे. मूल्यांमध्ये ही शक्ती असते की, उच्च वर्गातील लोकांच्या शक्तीबळाच्या प्रयोगाशिवाय अधिनिस्त लोक त्यांच्या अधीन होतात.

वास्तवात गुजरातमधील या देवी आंदोलनाला दक्षिण गुजरातमधील आदिवासी आणि पारसी व्यापारांच्या संघर्षाच्या रूपात पाहिले जाऊ शकते या प्रदेशातील पारसी लोक जमीनदारांच्याबरोबर दारू तयार करणे व विकणे याचा व्यापार करतात. हे लोक आदिवासींना दाऊ विकून आपल्या शेतावर कामाच्या बदल्यात कमी वेतन देवून त्यांचे शोषण करीत होते. या संदर्भामधील देवी आंदोलनाद्वारे आदिवासींच्या वाईट स्थितीवर प्रकाश टाकला गेला. ज्याद्वारे पारसी जमीनदार व दारू विकणाऱ्या आदिवासींवर प्रभाव पडला. याचा परिणाम म्हणजे या दोन वर्गात संघर्ष सुरू झाला व त्यातून आदिवासींमध्ये श्रीमंत आदिवासी जमीनदार वर्गाची निर्मिती झाली. देवी आंदोलनातून आदिवासींना आर्थिक स्वातंत्र्याबरोबर सन्मानही मिळाला. पारसी व्यापारी वर्गाचे पतन झाले. त्यांची जागा आदिवासींच्या नवश्रीमंत लोकांनी घेतली व त्यांनी गरीब आदिवासींच्या शोषणाला सुरूवात केली. त्यातूनच पारसी व्यापारी, जमीनदार यांच्या विरोधात आपली ओळख निर्माण करण्यासाठी आदिवासी सुधार आंदोलन मोठ्या प्रमाणात सफल झाले.

डेव्हिड हार्डिमन यांनी ग्रामीण भारतातील गटबाजी, आदिवासी सुधार आंदोलनाची व्याख्या, वर्गसंघर्ष आणि शक्तीसंबंधाच्या स्वरूपात करून भारतातील दलितांच्या शोषणाच्या विश्लेषणाचा नवीन दृष्टीकोन विकसित केला आहे.

- **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार व कार्य** (Thoughts and Action of Dr. Babasaheb Ambedkar) :

भारतीय समाज व्यवस्थेविषयीचा सर्वव्यापक परीक्षण करणारा थोर सामाजिक, राजकीय आणि आर्थिक विचारवंत म्हणून बाबासाहेब आंबेडकर परिचित आहेत. खरे तर बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व कार्य एका विशिष्ट दृष्टीकोनापुरते मर्यादित नव्हते तर ते सर्व मानवी समाजाला मार्गदर्शन करणारे असेच आहे. असे असले तरी त्यांचे कार्य लोकउठाव दृष्टीकोनाच्या ज्ञान शाखेत भरीव योगदान देणारे आहेच परंतु लोकउठाव दृष्टीकोनाला पर्यायी प्रारूप जे मानव समाजाला समजून घेणारे आहे, हे त्यांच्या विचार व कार्यावरून स्पष्ट होते.

भारतीय समाज जगातील इतर समाजाच्या तुलनेत अतिशय गुंतागुंतीचा समाज आहे. भारतात एकेकाळी एक वर्ग 'सोनेरी काळ' म्हणून जीवन जगत होता तर दुसरा 'अमानवी जीवनाचा काळ' म्हणून जगत होता. या बाबतीत भारतात सभ्य समाज अस्तित्वात होता का ? हा प्रश्न पडतो. तरीही काही विचारवंतांचा आजही भारतीय समाज सभ्य होता असेच वाटते आणि जरी नसला तरी तो आपण घडवून आणणे गरजेचे आहे, असे वाटते. यासंबंधी वंचित असणाऱ्या समुदायाविषयी सहानुभूती अनेक विद्वानांनी दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु त्यांचा प्रयत्न निष्पन्न झालेला नाही. याचे कारण म्हणजे हे सर्व विद्वान 'सोनेरी काळ' म्हणून जीवन जगलेल्या समुदायाचे घटक आहेत. त्यांना असे वाटते की, वंचित समुदायाचा विकास होणे गरजेचे आहे. परंतु वंचित समाजांनी प्रस्थापित समुदायांची मने दुखवू नयेत अशी धारणा सर्व विद्वानामध्ये दिसून येते म्हणजे वंचित मागासलेल्या समुदायांनी प्रस्थापित समुदायांच्या अधिपत्याखालीच विकास करून घ्यावा असे होय. परंतु या सर्व बाबीमध्ये उपजत विरोधाभास असल्यामुळे वंचितांचा विकास होऊ शकला नाही. या सर्वांसाठी वंचितांच्या विकासाचे पर्याय प्रारूप म्हणजे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' होय हे सर्वार्थाने समजून गेण्यासाठी लोक उठाव दृष्टीकोनासंबंधीच्या विचार व कर्माचा आपण थोडक्यात आढावा घेणार आहोत.

१. **अस्पृश्यता पद्धतीच्या विरोधातील बंड** (Revolt against Practics of Untouchability):

भारतीय समाजातील अस्पृश्यतेचा प्रश्न सोडवण्यासाठी कोणताही एक प्रभावी उपाय शक्य नव्हता. असे असले तरी अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी वेगवेगळ्या युक्तीद्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रयत्न केला आहे. यामध्ये प्रामुख्याने :

- **धर्म परिवर्तन करणे** (Religious Conversion) :

ज्या धर्मामध्ये अस्पृश्यता ही समाजमान्य आहे असा धर्म) कारण लित व्यक्तीने शिक्षण घेणे, सार्वजनिक ठिकाणी पाणी भरणे, विवाहाच्यावेळी घोड्यावरून मिरवणूक काढणे, उच्च दर्जाचे कपडे घालणे, मेटलची भांडी वापरणे, जमीन सुपीक करणे व उत्पन्न घेणे, रस्त्यावर चप्पल, बूट घालून जाणे, हिंदू उच्च जातीसमोर नतमस्तक होणे, जेवण वाढणे इ. कारणासाठी आतापर्यंत हिंदू उच्च जातींनी अनेक वेळा दलितांवर अन्याय, अत्याचार केल्याचे अनेक उदाहरणे आहेत. म्हणून हिंदू धर्म हा माणसाला माणूस मानणारा नाही म्हणून धर्मपरिवर्तन करणे हे दलितांच्या मुक्तीचे पहिले पाऊल आहे, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मानतात.

- **वर्ग संघर्ष** (Class truggle) :

अस्पृश्यतेचा प्रश्न हाच वर्ग संघषार्चचे मूळ कारण आहे. हा वर्ग संघर्ष हिंदू उच्च जाती आणि अस्पृश्य यांच्यातील आहे. हा वर्ग संघर्ष एका वर्गाने केलेल्या अन्यायाच्या विरुद्धचा आहे. हा वर्ग संघर्ष समान सामाजिक दर्जासाठी आहे. वर्ग संघर्षाची सुरुवात ही ज्यावेळी समान दर्जा मागीतला जातो त्यावेळी होते. धर्म परिवर्तनाची कारणे जी आहेत त्या कारणांपैकी कोणतीही कृती करणे उच्च हिंदू धर्मियांना काहीच मान्य नव्हते. जरी ते अन्यायकारक असले तरीही उच्च जातींना असे कधी वाटत नव्हते म्हणून संघर्ष करणे अटळ आहे. असे आबासाहेब मानत असत. हे सर्व करण्यासाठी मानवाकडे मानवी शक्ती, संपत्ती व मानसिक विश्वास असणे गरजेचे आहे. हे मिळवण्यासाठी अस्पृश्यांना सर्व प्रथम हिंदू धर्म त्याग करणे हाच पर्याय आहे असे प्रतिपादन केले आहे. याशिवाय दलितांना न्याय हक्क मिळणे अवघड होते. म्हणून संघर्ष केला.

२. **हिंदू धर्मातील पवित्र-अपवित्रतेच्या विचारधारेच्या विरोधी बंड** (Revolt Against Purity-Pollution ideology Pursuied by Hinduism) :

भारतीय समाजात फक्त दलितच अल्पसंख्यांक आहेत असे नाही तर इतर अल्पसंख्यांक समुदायही आहेत. परंतु हिंदू धर्मातील अल्पसंख्यांकावर जास्त अत्याचार दिसून हिंदू धर्मियाकडूनच होतात. कारण दलित हिंदू आहेत. यांना संरक्षण कोणीच देऊ शकत नाही. त्यांना दुसरा पर्याय आपणच आहोत ही भावना उच्च जातीत असल्याने दलितांची पिळवणूक जास्त होते. हिंदू धर्मातील मुळातच दलितासाठी कोणतीही सहानुभूती नाही. कारण अस्पृश्य हे अशुद्ध आहेत म्हणून त्यांना कोणत्याही कार्यात सहभागी होणे हे हिंदु धर्मियांच्या नितीत बसणारे नाही. महार व्यक्ती जरी उच्च शिक्षित असला तरी तो उच्च जातीतील अशिक्षित माणसाइतका शुद्ध नाही ही धारणा हिंदू धर्मात विचारप्रणालीचे अनानुकरण करणे महत्त्वाचे आहे. यासाठी बाबासाहेबांनी हिंदू धर्मातील सर्व कर्मकांड दलितांनी सोडून द्यावेत व त्यावर बहिष्कार घालावा असे आव्हान केले यातूनच धर्मांतर झाले.

**३. भेदभाव आणि पिळवणुकीच्या विरोधातील बंड** (Revolt Aainst Expliotation and Discrimination) :

भारतीय समाजात अस्पृश्यांना कधीच न्याय मिळाला नव्हता व न्याय देण्यासाठी तथाकथीत प्रयत्न करणाऱ्या नेत्यांनी फक्त कागदावर व भाषणातून अपले उद्देश स्पष्ट केले. परंतु प्रत्यक्षात काहीच घडले नाही. म्हणून प्रस्थापित हिंदू समाजाकडून होणारी पिळवणूक व भेदभाव संपवण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १३ ऑक्टो. १९३५ ला येवला येथे घोषणा केली की मी हिंदू म्हणून जन्मलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही. याची कारणे म्हणजेच प्रस्थापित समाजाकडून होणारे शोषण थांबवण्याचे उपाय आहेत असे म्हटले आहे. याची कारणे थेडक्यता पुढीलप्रमाणे –

१. मानव हा धर्मासाठी नाही तर धर्म हा मानवासाठी आहे.

२. मानव होण्यासाठी तुम्ही बदला, संघटित होण्यासाठी तुम्ही बदला.

३. मजबूत होण्यासाठी बदला, समानता मिळवण्यासाठी बदला.

४. ज्या धर्मात तुम्हाला माणूस म्हणून वागणूक मिळत नाही. त्यासाठी बदला.

५. जो धर्म पिण्याच्या पाण्याचा अधिकार देत नाही त्यासाठी बदला.

६. जो धर्म प्रत्येक टप्प्यावर अपमान करतो त्यासाठी बदला.

ज्या धर्मात माणसापेक्षा प्राण्यांना, किड्या मुंग्यांना मान आहे पण त्या धर्मात दलितांना कोणताही मान नाही. ज्या धर्मात मानवाला माणूस म्हणून मान्यता नसेल तर तो धर्म कसा ?

या सर्व बाबींचा आधार देऊन डा. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व दलितांना हिंदू धर्म सोडण्यासाठी आव्हान केले आणि १९५६ ला ते प्रत्यक्षात अमलातही आणले. यामुळे दलित वर्गात आज मोठ्या प्रमाणात सामाजिक-सांस्कृतिक जीवनात क्रांती झाली व त्यामुळे काही प्रमाणात पिळवणूक व सामाजिक भेदभाव कमी होण्यास मदत झाली आहे.

## ४.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न (Check your Progress) :

१. संस्कृती म्हणजे काय ?

२. सभ्यता म्हणजे काय ?

३. संस्कृतीच्या भौतिम आणि अभौतिक घटकाची दोन उदाहरणे द्या.

४. सुरजित सिन्हा भारत सरकारच्या कोणत्या विभागाचे उप-संचाकल होते ?

५. सुरजित सिन्हा यांनी भारतातील कोणत्या दोन राज्यातील आदिम जमातीचे अध्ययन केले आहे?

६. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या दोन पुस्तकांची नावे लिहा.

७. रणजित गुहा कोणत्या विषयाचे तज्ञ म्हणून ओळखले जातात ?

८. लोक-उठावाच्या संबंधित पुस्तकाची मालिका केव्हा सुरू झाली ?

## ४.५ सारांश :

संस्कृती ही प्रत्येक मानवी समाजामध्ये आढळते. संस्कृती ही शिकवी लागते. संस्कृतीमध्ये मानवनिर्मित भौतिक आणि अभौतिक गोष्टींचा समावेश होतो. संस्कृती ही परिवर्तनशील असते. संस्कृतीच्या विकासाच्या प्रक्रियेत समाज व्यवस्थेतील इतर संस्कृतीचा संपर्क आल्यामुळे बदल होतो. त्याचबरोबर बाहेरच्या समाज व्यवस्थेच्या संपर्कात असल्यामुळे बदल होतो. अनुक्रमे 'लघु आणि बृहत् परंपरा' असे म्हणतात.

भारतीय समाजाच्या अध्ययनाचे वेगवेगळे दृष्टीकेन आहेत. या दृष्टीकोनातील एक महत्त्वाचा दृष्टीकोन म्हणजे 'लोकउठाव दृष्टीकोन' आहे. लोक उठाव दृष्टीकोनाचा मुख्य अभस विषय समाजातील वंचित घटकांचे भारतीय समाज निर्मितीतील योगदानावर प्रकाश टाकणारा आहे. कारण सर्व दृष्टीकोनामध्ये समाज व्यवस्थेत प्रस्थापित असणाऱ्या समुदायांच्या व्यक्तीच्या कार्याची नोंद एकांगीपणे घेण्यात आली आहे. आणि असे भासवले आहे की, भारतीय समाजाच्या स्वातंत्र्य लढ्यात, लोकशाही व्यवस्थेत, विकासात प्रस्थापित समुदायांचेच योगदान महत्त्वपूर्ण आहे. तर वंचित/मागासलेल्या समाजाच्या योगदानाची दखल घेतलेली नाही. म्हणून भारतीय समाज व्यवस्था समजून घेण्याविषयीचा सामान्य वंचित लोकांच्या कार्याविषयीचा दृष्टीकोन म्हणजे 'लोक उठावदृष्टीकोन होय. सदर घटकामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लोकउठाव विषयक दृष्टीकोनासंबंधीचे विचार व कार्य अभ्यासले आहे.

## ४.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे (Answers to check your progress) :

१. संस्कृती म्हणजे मानव निर्मित अशी साधने व विचार ज्यामुळे मानवी गरजा पूर्ण करण्यास मत होते.

२. सभ्यता म्हणजे साध्या संस्कृतीकडून विकसित संस्कृतीकडे होणारी वाटचाल होय.

३. संस्कृतीचे भौतिक घटक-शेतीसाठी - नांगर, ट्रॅक्टर, लिहिण्यासाठी पेन-वही व अभौतिक घटक, प्रथा, परंपरा, मूल्ये इ.

४. अन्थ्रॉपॉलॉजीकल सर्व्हे ऑफ इंडियन उप-संचालक म्हणून कार्य केले आहे.

५. सुरजित सिन्हा यांनी भारतातील पश्चिम बंगाल आणि बिहार या राज्यातील आदिम जमातीचे अध्ययन केले आहे.

६. हू वेअर शुद्राज आणि बुद्धा ॲण्ड हिज धम्म.

७. रणजित गुहा यांना थोर इतिहास तज्ञ म्हणून ओळखले जाते.

८. लोक उठावाच्या संबंधित पुस्तकाची मालिका १९८२ ते १९८४ या काळात सुरू झाली.

## ४.७ सरावासाठी प्रश्न (Exercise / Home Asignment) :

खालील प्रश्नांची उत्तरे तयार करा.

१. संस्कृती आणि सभ्यता यांच्यातील फरक स्पष्ट करा.

२. सुरजित सिन्हा यांचा सभ्यतात्मकतेचा दृष्टीकोन स्पष्ट करा.

३. सुरजित सिन्हा यांनी सांगितलेले अभसविषय स्पष्ट करा.

४. लोक उठाव दृष्टीकोन म्हणजे काय स्पष्ट करा.

५. लोक उठाव दृष्टीकोनाला दिलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानाची चर्चा करा.

## ४.८ चिंतन आणि कार्य (Reflection and Action) :

तुम्ही ज्या सांस्कृतिक समूहाचे सदस्य आहात, त्यातील संस्कृतीच्या भौतिक घटकांची सूची करा व अभौतिक घटक समजून घ्या व नंतर त्याची तुलना इतर एखाद्या सांस्कृतिक समुहाशी पासून पहा.

लोक उठावासंबंधीचे अध्ययन करण्यासाठी आपण राहात असलेल्या समाजातील वंचित समुदायाच्या शूर वीर व सामाजिक कार्यात वाहून घेतलेल्या व्यक्तीचे अध्ययन करा व समजून घ्या.

## ४.९ अधिक वाचनासाठी पुस्तके (Suggested Readings) :


1. Dhanagare, D. N. 2008 : Themes and Perspectives in Indian Sociology, Rawat Pblication, Jaipur.
2. Singh Yogendra, 2002 : Modernization of Indian Tradition, Rawat Publication, Jaipur and New Delhi.
3. Singh Yogendra, 2007 : Ideology and Theory in Indian Sociology, Rawat Publication, Jaipur and New Delhi.
4. Nagla B. K., 2008 : Indian Sociological Thought, Rawat Publication, Jaipur and New Delhi.
5. Vidya Bhushan and Suchdeva D. R., 1992 : An Introduction to Sociology, Kitab Mahal Publication, New Delhi.
6. Sociological Bulletin : Journal of the Indian Sociology.
7. Ambedkar B R. (1916) : Castes in India : Their Machanism, Gensis and Development Jalandhar, Bheem Patrika Publications.
8. Ambedkar B. R. (1936) : Annihilatation of Caste, Jalandhar Bheem, Patrika Publication.
9. Ambedkar B. R. (1946) : Who were Sudras ? Bombay : Thacker and co.
10. Ambedkar B. R. (1948) : The Untouchables : Who were They and Why they have become Untouchabls ? New Delhi : Amrit Co.
11. Ranjit Guha (1963) : A Rural of Propety for Bengal : An Essay on the idea of the Permenant Settlement, Paris.
12. Ranjit Guha : Subaltern Studies - Volume No. 1 to 10.
13. Dr. Babasaheb Ambedkar Writting and Speeches Vol. 1 to 20 Published by Government of Maharashtra.


❑❑❑